
फटकेवाली
संयम बागायतकर

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

संयम बागायतकर

लिखित

कादंबरी

# फटकेवाली

# फटकेवाली

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला

पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

फटकेवाली (कादंबरी)

लेखक : संयम बागायतकर, वेंगुर्ला
ई मेल : sanyambagayatkar@gmail.com

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २१ ऑक्टोबर २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे .

# फटकेवाली

---

अंदमानच्या जंगलातील नरभक्षक आदिवासी तरुणी मुंबईच्या कॉंक्रीटच्या जंगलात जेव्हा मोकाट सुटते तेव्हा....

---

© संयम बागायतकर, बागायतवाडा, वेंगुर्ला- ४१६५१६

All birds find shelter during a rain.
But Eagles avoid rain
by flying above the clouds.

-Avul Pakeer Jainulabdeen Abdul Kalam

## रवीची नोंदवहीः ७ जुलै १९९५

-----------------------------------

*समुद्राच्या खाऱ्या वाऱ्यामुळे ओठ खारटले होते. सकाळची कुंद हवा वातावरण धुकट बनवत होती. सूर्याची पहिली किरणे बेटापलीकडून डोकावू लागली होती. बेटावरच्या रहिवाश्यांना आम्ही सहज दिसून आलो असतो. मी डॉक्टर पंडितांना खुणावलं. गेली काही वर्षे अंदमानातील अनेक संशोधन मोहिमांमध्ये त्यांचा महत्वाचा सहभाग होता. "पंडित, बोटीचं इंजिन बंद करा. या घरघराटाने ते लोक बुजून जंगलात आत निघून जातील. आपली मोहीम फुकट जाईल. जर ते किनाऱ्यावर उघड्यावर आले नाहीत, तर आपल्याला त्यांचं चित्रण करता येणार नाही." मी माझा हाय डेफिनेशन कॅमेरा सरसावला.*

*"हरकत नाही. आम्ही बेटावर घुसून त्यांची माहिती जमवू." पंडितांनी त्यांच्या माणसाला खूण केली. "सेलियन, राफ्ट पाण्यात उतरवा. आपण बेटावर जातोय."*

*"थांबा, थांबा. बेटावर उतरण्याची परवानगी सरकार कोणालाच देत नाही. तुम्हाला माहीत नाही का? सर्वोच्च न्यायालयाचा मनाई हुकूम आहे." मी चिडलो.*

*"इथं आता आम्हीच सरकार आहोत. आम्ही ठरवू तो कायदा. तिथं वर कळणार कोणाला आहे?" पंडित आणि त्यांची बोटीवरील चारही माणसं राफ्ट पाण्यात उतरवू लागली.*

*"मी वर कळवीन." मी ओरडलो. उत्तरादाखल थबकून पंडितांनी त्यांच्या माणसांना खूण केली. त्यांनी एकमेकांकडे बघत दात विचकले. मला ट्रान्समीटरकडे जाण्यापासून रोखले. माझे हात पाय सफाईने बांधून घातले. त्या आडदांडग्यांच्या ताकदीपुढे माझं काही चाललं नाही. "तुम्ही बेटावर उतरलात तर ती आत्महत्या ठरेल. या बेटावरचे लोक कोणत्याही बाहेरच्या माणसांचं स्वागत भाल्यांनी आणि तीरांनी करतात." मी त्यांना खबरदार करण्याचा प्रयत्न केला.*

*"प्राध्यापक रविंद्र आंग्रे, आपल्या मौलिक सूचनेबद्दल आणि वाटाड्या बनून आम्हाला इथपर्यंत पोहोचवल्याबद्दल मी आपला आभारी आहे. बदल्यात आपल्या अंदमानवरील शोध प्रबंधात एका नव्या मौलिक वैज्ञानिक प्रयोगाची, निरीक्षणं नोंदवण्याची सुसंधी मी आपल्याला देतो आहे. पाहूया ती मूठभर आदिवासी माणसं आधुनिक काळातील शस्त्रास्त्रांचा सामना कसा करतात. ज्यांना आग म्हणजे काय माहीत नाही, अशा माणसांचा आग ओकणाऱ्या शस्त्रास्त्रांशी पहिल्यांदा सामना होतो, त्यावेळी ती काय प्रतिक्रिया देतात, याचा अभ्यास तुम्हाला करता येईल." एवढं बोलून डॉ. पंडितांनी एक खवचट हास्य केले. बोटीवरचा एक अवजड पेटारा खोलला. मला सांगण्यात आलं होतं की त्यात बेटावरच्या रहिवाश्यांसाठी भेटवस्तू आहेत.*

*"या आहेत तुमच्या भेटवस्तू? बंदुका आणि हातबॉम्ब?" मी शिसारीने ओरडलो. पण माझी दखल घेण्यात आली नाही. भेकड डॉ. पंडित बोटीवरुन उतरले नाहीत. ती चार माणसं हत्यारे घेऊन किनाऱ्याकडे राफ्टमध्ये बसून निघाली. आम्ही दोघे बोटीवरुन काय घडतं पाहू लागलो. याक्षणी ते चौघे सेन्टीनेलींच्या तीर-भाल्यांना बळी पडते, तर मला जास्त आनंद झाला असता. स्वतःच्या मनातील हिंसक कल्पनेची मला क्षणभर*

*लाज वाटली. पण ते तसंच होतं. कोणता तरी एक पक्ष बळी पडणार होता. डॉ. पंडितांचा किंवा आदिवासींचा. फरक हा होता की पंडितांची टोळी आदिवासींच्या घरजमिनीवर नाहक आक्रमण करत होती. तर आदिवासी आपलं, आपल्या घरजमिनीचं, जगण्याचं आत्मरक्षण करणार होते. अन्यायापासून बचाव!*

*जशी अपेक्षा होती तसंच घडलं. बोटीच्या घरघराटाने आदिवासी सावध झाले होते. तयारीत होते. चौघांची टोळी किनाऱ्यावर उतरताच, त्यांच्यावर बाणांचा आणि भाल्यांचा वर्षाव करत, आदिवासी पुढे आले. त्यांच्या नग्न शरिरांवरुन उन्हे चकाकली. ते लाकडी भाले आणि तीर फायबर ग्लासच्या मजबूत शिरस्त्राणांचे आणि कवचांचे काही बिघडवू शकले नाहीत.आदिवासी गोंधळल्याचे इथून स्पष्ट दिसत होतं. त्यानंतर मारा करायची पाळी आक्रमकांची होती. त्यांच्या गनफायरचे धाडधाड आवाज हवेत घुमले. झाडीतून कलकलाट करत पक्षी आकाशात उडाले. आवाज विरायच्या आत किनाऱ्यावर जेवढे म्हणून आदिवासी नजरेच्या टप्प्यात होते, एकेक करत खाली वाळूत कोसळले. माझ्या डोळ्यातून ओघळणाऱ्या आसवांना मी रोखू शकलो नाही.*

*“कसलं कच्चं मन आहे हो प्राध्यापक तुमचं?” डॉ. पंडितांना हिणवलं. “घाबरु नका. त्या बेशुद्ध पाडणाऱ्या गोळ्या आहेत. जीव घेणाऱ्या नाहीत. तामिळनाडूच्या जंगलातून वेचून आणले आहेत मी हे गडी. हत्ती, वाघ, रानडुक्कर हवं तेवढं मोठं आणि ताकदीचं जनावर बिनचूक होऱ्यात घेऊन, जिवंत पकडणारे कसबी शिकारी आहेत ते. जंगली माणसांची शिकार तर त्यामानाने कितीतरी सोप्पी.”*

*मी पाहिलं, किनाऱ्यावर खाली पडलेल्या दोन आदिवासींना दोघा जणांनी खांद्यावर घेतलं होतं. बाकीचे दोघे त्यांना सुरक्षा पुरवत होते. पण झाडीतून चुकार काही तीर अंगावर येण्यापलीकडे कोणताही प्रतिकार होत नव्हता. दोन आदिवासींची धरपकड करून कामगिरी साधून ते चौघेजण राफ्टमधून परतीला निघाले. खरा अडथळा आणला तो एका महाकाय सुसरीने. तिला बंदुकीच्या एका फैरीत शांत करण्यात आलं. तिच्या डोक्याच्या ज्या तऱ्हेने चिंधड्या उडाल्या. त्या बघून त्या गोळ्या खऱ्या असाव्यात.*

*"तुम्हाला ते आदिवासी जिवंत कशाला हवे आहेत?" माझी शंका विचारली.*

*"पैशासाठी. आंतरराष्ट्रीय स्तरावरची बडी प्रयोगशाळा त्यांचे डी. एन. ए. मिळावेत, म्हणून हवी ती किंमत देईल. गेली हजारो-हजारो वर्षे, त्यांचा वंश अस्पर्श राहिला आहे." उत्तर आले.*

*"ती माणसं आहेत. प्रयोगासाठीची जनावरं नाहीत." मी पुन्हा चिडलो.*

*"माझी माणसाची व्याख्या काय आहे सांगू?" डॉ. पंडितांच्या चेहऱ्यावर विषारी हासू उमटले. "जो प्राणी पैशाला स्वतःहून विकला जातो, तो म्हणजे खरा माणूस. बोला प्राध्यापक, तुमची किंमत काय आहे?" पण मी त्यांच्या चेहऱ्यावर थुंकण्याआधी, ते बोटीजवळ पोहोचलेल्या राफ्टला बोटीशी जोडून घ्यायला उठले.*

*राफ्टवरची माणसं आणि राफ्ट बोटीवर ओढून घेणं सोप्पं नव्हतं. समुद्रात सांडलेल्या ताज्या रक्तानं अनेक शिकाऱ्यांना आकर्षून घेतलं होतं. सुसरींच्या काळ्या पाठींची समुद्राच्या पाण्यावर डोकावणारी संख्या वाढली होती. तिथे किनाऱ्यावर चाळीस-पन्नास जणांच्या समूहाचा, आमच्या दिशेने पाहत जोरदार आरडा-ओरडा चालू होता. डॉ. पंडितांच्या गड्यांपैकी दोघे जण बोटीवर आले होते. बोटीतून बाकीच्या दोघांनी एक-एक करत दोन्ही*

*आदिवासींची बेशुद्ध शरीरे वर चढलेल्यांच्या हाती दिली. आता ते दोघे वर येण्याच्या तयारीत होते.*

*तोच अचानक पाण्यातून उसळून एका आकृतीने वर झेप घेतली. त्यातल्या एकाला गळाठलं आणि दुसऱ्या बाजूला धाडकन पाण्यात पाडलं. एवढ्या वेगाने ती हालचाल घडली की नेमकं काय झालं? हे कोणालाच समजलं नाही. ती सुसर होती का माणूस? पाण्यात नेलेल्या गड्याचा कुठे मागमूस दिसेना. ती शिकारी माणसं लगेच सावध तत्पर झाली. शत्रूचा अंदाज घेवू लागली. किनाऱ्यावरच्या माणसांना ही हालचाल कळली असणार. तिथून आता एका सुरात-तालात ठोक्यांचा आवाज ऐकू येऊ लागला. मी पाहिलं की ते आपापले भाले विशिष्ट लयीत एकसामाईकपणे जमिनीवर ठोकू लागले होते. कसलीतरी सामुदायिक प्रार्थना वा मंत्र आळवू लागले होते.*

*राफ्टमध्ये राहिलेल्या माणसाने आपल्या साथीदाराची आशा सोडली. स्वतःला वर घेण्यासाठी खुणावले. मात्र त्याला वर घेतानाच त्या काळ्या आकृतीने अचूक वर झेप घेऊन, त्याला सुद्धा पाण्यात ओढून नेले. बोटीवरच्या गड्याने मारलेली गोळी त्या गड्याच्याच अंगात घुसली.*

*"बोट चालू करा, ताबडतोब." डॉ.पंडितांनी हुकूम सोडला. "इथलं काम आटोपलय, निघा." ते गडी आपल्या साथीदारांचे काय झालं जाणल्याशिवाय तिथून निघायला नाराज दिसले. तेव्हा डॉ. पंडितांनी स्वतः इंजिनापाशी जाऊन बटणं दाबली. स्टार्टर खेचला.घूं...घूं... करत इंजिन धडाडू लागले.*

“नाही, रामू आणि सेलियनला घेतल्याशिवाय नाही.” दोघातला एक गडी रागाने गरजला.

“मूर्खांनो, ते मेले. आता आम्ही मरायच्या आधी निघूया.” डॉ. पंडितांचा आवाज भितीने चिरकला.

राफ्टला बांधलेली दोरी खळाळली. साहजिकच साऱ्यांचे लक्ष तिकडे वळले. विरुद्‌ध दिशेला मला डोळ्यांच्या कोपऱ्यातून बोटीच्या मागच्या बाजूला हालचाल दिसली. एक काळी बुटकी बाई नांगराचा उपयोग करुन तिथून चढून आली होती. तिच्या शरीराचा सुडौलपणा ती तरुण असल्याचं सांगत होता. तिच्या अंगावर फक्त कमरेला एक दोऱ्यांचे चाबूकासारखे वळे होते. त्यात काही छोटे लाकडाचे छर्रे अडकवलेले होते. बस्स! तीच होती तिची हत्यारं.

तिला पाहून क्षणभर का होईना, शिकारी गडी थक्क झाले. तेवढा अवसर साधून तिने दोघांवर अचूक नेमाने चाबूक फटकारला होता. त्यामुळे दोघांच्याही बंदुकांची दिशा बदलली. गोळ्या भलतीकडेच धडाडल्या. त्या बहुतेक इंजिनावर वा त्याच्या टाकीवर लागल्या. पुढच्या क्षणी तिथं मोठा स्फोट झाला. त्यासरशी ती काळी बाई माझ्या दिशेने झेपावली. एका क्षणासाठी तिची आणि माझी नजरानजर झाली. त्यात मला दिसला तो राग आणि रागच! माझ्या शेजारी आदिवासींची मुटकुळी होती.

“दुना आबे ऊं उ... ऐ अवासी ई यॅबे,” ती जे काही बोलली ते तसंच्या तसं आठवणं मला शक्य नाही. मला आठवतं ते इतकंच की तिने एका झटक्यात माझ्या हातापायांना बांधलेल्या दोऱ्या, कसल्या तीक्ष्ण हत्याराने कापल्या. माझ्या बाजूला पडलेला दोन्ही आदिवासी शरीरे, एका-एका

*हातात धरली आणि सरळ पाण्यात बुडी मारुन घेऊन गेली. पुढे विचार करायला अवधी मिळाला नाही. कदाचित बोटीवर स्फोटके ठेवलेली असावीत. त्यांचे बॉम्बचे व्हावे तसे धडाके एकामागोमाग सुरु झाले. माझ्या पुढ्यात असलेल्या आडोश्याच्या ठिकऱ्या उडाल्या. त्यातली एक डोक्यावर बसली. मी भेंगाळलो. बहुतेक पाण्यात पडलो. पुढे काय झालं? मला माहीत नाही.*

*त्या सगळ्या प्रसंगातून माझ्या लक्षात त्या बाईची, त्या संपूर्ण डोक्याचं मुंडन केलेल्या, अंगावर एक सुद्धा केस न राखलेल्या बाईची ती तेजतर्रार नजर रुतून राहिली आहे. बाई अशी पण असते? सुसरींनी भरलेल्या समुद्रातून पोहत येणारी, आग ओकणाऱ्या शस्त्रांच्या आणि शत्रूच्या घेऱ्यात आपणहून घुसणारी? त्यांना धडक देऊन मात देणारी? आपल्या जीवाभावाच्या माणसांच्या सुटकेसाठी आकाशपाताळ एक करणारी? ती माझी छायाशी, त्या सेन्टीनेली तरुणीशी पहिली सलामी होती. पुढे तिच्या त्या बोलांचा अर्थ तिच्याकडूनच कळला. ते जणू तिच्या जगण्याचं सारसूत्र होतं. "अन्याय सहन केला जातो म्हणून केला जातो. ज्याला प्रतिकार करायचा आहे त्याला काही ना काही मार्ग असतोच."*

----------------------------------------

"इन्शाला! खरं असेल का गं हे?" सलमाने दोन्ही हात गालांवर धरले. "कुठे मिळाली तुला ही डायरी?" डोळे मोठे केले.

"धुरंधर मॅमच्या डेस्कच्या खणात." साराने डोळे मिचकावले.

“तू तिथं त्या भोचक भवानीच्या केबिनमध्ये कशाला गेली होतीस?” सरलाने डोळे बारीक केले.

“सांग बघू तूच.” साराने मान वेळावली. लाडात सरलाच्या गळयात हात टाकले आणि ओठांनी चुंबल्यासारखे केले.

“काय?” सरला गोंधळली.

“मी सांगते. कडू पाटीलने हिची काही तक्रार केली असनार. म्हणून मॅमने हिला दम द्यायला बोलावलं असणार.” सलमा आपल्या खुर्चीत मागे आरामात रेलली.

“माय स्वीट स्वीट गोड, तुझं अर्ध उत्तर बरोबर आहे. पण सॉरी टू से, अर्ध चूक आहे.” साराने कपाळावर आलेल्या कुरळया बटा झटक्याने मागे उडवल्या. “माझी तक्रार तर केली होती. पण ती कडूने नाही. सांगा कोणी?” आणि पुन्हा ओठांची चुंबल्यासारखी हालचाल केली.

“तू? तू कोणाचा तरी मुका घेतलास म्हणून?” सरलाचे डोळे चकाकले.

“ओह् येस! तिखट, आता तू राइट ट्रॅकवर आलीस. सांगा कोणाचा?” आणि साराने दोन्ही हातांनी चेहरा झाकून घेत लाजल्यासारखे केले.

तिचे ते दोन्ही हात आपल्या दोन्ही हातांनी घट्ट धरून सलमाने बाजूला उपटले, “त्या मुग्धा गोडबोलेचा की काय?”

“तिने दात नीट घासले तर घेईन. तुमचा काय अनुभव तिच्याबाबत?”सारानं नाक वाकडं केलं.

“आम्हाला काय माहीत? जाता येता सगळयांच्या गळयात हात घालतेस. मिठ्या मारतेस. गालगुच्चे घेतेस. आंघोळी करताना सरळ आत घुसतेस, नाही का गं गोड?” सरलाने फिरकी ताणली, “तुलाच ते माहीत.”

“अमा तिखट तूने तो मेरे मुंह की बात छिनली.” सलमाने पुस्ती जोडली.

“त्या झाडूवालीच्या मुलाचा, प्रकाशचा मुका मी घेतला मी. काल ती आजारी होती. तेव्हा तिच्या जागी तो आला होता. बाथरुम साफ करताना एकटा होता आणि ...” एक दिर्घ उसासा साराने टाकला.

“ वाटलं नव्हतं हां, तो शेळपट मॅमकडे तक्रार करायची हिंमत करेल म्हणून कधी.” सरलाने नाक खाजवलं. “तो तर मॅम समोर आली तरी थरथरतो.”

“ओ येस! म्हणून तर मी...” साराने तिचं वाक्य पूरं करायच्या आधी सलमाने तिचे केस ओढले. “ए, सोड. दुखतं ना.”

“यार आंबट, आपले हे आंबटषौक आता जरा कमी कर. एक दिन आपल्या सगळयांना तू फसादमध्ये घालणार आहेस. पण त्या भोचकभवानीने तुला बरी ही डायरी काढू दिली?”

“अगं, मी तिच्या केबिनमध्ये पोचले आणि तिने फायरिंग सुरु केलं. तितक्यात काशीबाई सांगायला आली की मुग्धा जिन्यात चक्कर येऊन कोसळलीय.

तशी भोचकभवानी गेली मुग्धाला बघायला. ओफ! मग केबिनमध्ये एकटा प्रकाश उरला साक्ष द्यायला आलेला. मी झडप घालायच्या आधी झुकांडी देऊन पळाला." साराने खालचा ओठ दाताखाली दाबून चावला. परत एक उसासा सोडला. "आणि माझं लक्ष उघड्या ड्रॉवरकडे गेलं. म्हटलं बघू चार पैसे मिळतात तर. बॅडलक. पैसे नाही पण ही डायरी मिळाली. ती घेतली आणि सटकले."

"यार तू पण कम्माल! जरा बाकीचे खण सुद्धा तपासायचे ना! कुठे तरी मिळालेच असते. जाम तंगी आहे बघ." सलमाने तोंड वाकडे केले.

"काय गं, पण हा रविन्द्र आंग्रे आहे तरी कोण? मॅमचा कोणी एक्स?"

"गोड, जरा डोळे उघडे ठेवून फिरत जा. आजूबाजूला लावलेल्या पाट्या वाचत जा." सरलाने सलमाच्या डोक्यावर बोटांनी टकटकवलं. "आपल्या कॉलेजच्या इमारतीचं मूळ नाव 'आंग्रे भवन' आहे. तो मूळ मालक असणार."

"डॅम इट! मला वाटलं होतं, यै भोचक भवानीचा नवरा मालक आहे. दोघं धुरंधर नवरा-बायको तर आपणच सगळया कॉलेजचे आणि हॉस्टेलचे मालक असल्याच्या तोऱ्यात वावरतात." साराने मुठी आवळल्या.

"श्शू! मला कडू पाटिलचा आवाज येतोय." सलमाने दोघींना गप्प राहायची खूण केली. खोलीच्या बंद दाराला कान लावला. दबक्या आवाजात फिस्कारली. "लेडिज हॉस्टेलमध्ये पुरुषाचा आवाज?" तसं बाकी दोघी लगोलग दाराला कान लावायला सरसावल्या.

पलीकडून दोन व्यक्ती आपापसात हसत खिदळत चालल्याचे आवाज आले. “अरे इथं नको उघड्यावर, माझ्या रुमवर चल ना.” बाई.

“ओ शीट! तुझी रुम पाचव्या मजल्यावर आहे. लिफ्ट बंद आहे.” बुवा.

“मग तुला बंद लिफ्टमधली मजा पायजेल काय? मनू डार्लिंग.” बाई.

“हा कडूचा बॉयफ्रेन्ड मनू शर्मा आहे.” सारा वतवतली, “माय फूट. या बीचला बॉयफ्रेन्ड रुमवर न्यायला परमिशन आहे. आम्हाला मात्र बॉयफ्रेन्डला फोन लावला तरी फायरिंग.”

“बहुत नाइन्साफी.” सलमा.

“ ऐ! ऐका गं जरा. काही तरी जोरदार भानगड आहे. पोलिस आणि काय काय.” सरलाने दोघींना चापट्या मारल्या. दटावलं. पलीकडचे आवाज लांब विरत चालले.

“स्साला ती सुमन जाम आखडू बनत होती. एक रात्र तिला इतकी जड कशाला वाटायला हवी होती? आशिष आणि मी एका रात्रीचेच वीस हजार मोजायला तयार होतो.” मनु.

“छट! स्सालीची लायकी हाय काय तितकी?” कडू.

“अरे समजा कर ना! कोरा माल म्हणून आशिष तयार होता तेवढे घालायला. तर स्सालीने आमचा इन्सल्ट केला. आमच्यावर थुंकली रांड.” मनु.

“काय? हद्दच झाली हं. टू मच. मी रेक्टर मॅमला सांगून त्या सुमनची हकालपट्टीच करते. यू नो, कॉलेजचे ट्रस्टी राहुल धुरंधर माझे मामा हाय.” कडू फुशारली. यावर मनु जोरात हसला. ते हसू दूरवर विरत गेलं.

“ते नक्की जिन्याकडे गेलेत.” सरलाने ओठ आवळले.

“त्यांचा सुमनच्या बाबत काय कट चाललाय? यार मुसिबत आहे. आपल्याला कळलंच पाहिजे.” सलमाने नाकपुड्या फुलवल्या.

“काय करु शकणार आहोत आपण कळलं तरी?” सारा खंतावली, “ त्यांच्या पैशाच्या ताकदीपुढे? कडूच्या नजरेला पडलो तर आपलीच विकेट जाईल.”

“दु ना आवे ऊं उ अबासी बॅ.” सरला फुत्कारली.

“काय?” सारा वैतागली.

“अन्यायाचा प्रतिकार करायचाय त्याला मार्ग असतोच. इति छाया.” सरलाने झटक्यात उत्तर दिलं.

“मेरी तोबा! तुला छायाची गोष्ट खरी वाटतेय?” सलमा हादरली.

“चला.” दरवाजाची कडी खोलत सरला बाहेर पडली सुद्धा. सारा व सलमा घुटमळत तिच्या मागोमाग निघाल्या. पहिल्या मजल्याच्या गॅलरीवजा व्हरांड्यातून खोल्यांमागून खोल्यांची बंद दारे मागे टाकत तिघी जिन्यापाशी पोहोचल्या. तिथं कोणी नव्हतं. साराने कान टवकारले.

“ती दोघं लिफ्टमध्ये आहेत.” सारा बाकी दोघींच्या कानात कुजबुजली.

“गोड, तू कोणी येतंय का नजर ठेव. आम्ही...” दोघी लिफ्टला कान लावतो असं खुणावलं. आतून उसासे ऐकू येत होते.

“त्या सुमनचं परत परत नाव कशाला घेतेस? तिचा विषय आम्ही संपवलाय. तिच्या चेहऱ्यावर ॲसिड मारलं.” मनु खिदळला. “काय स्साली वळवळली? तू बघायला पाहिजे होतीस. मजा आला.”

आतले उसासे एकदम थांबले. “ॲसिड? पण मग तुझ्या बापाला मिटवामिटवीचा जाम फटका बसला असणार.” कडूचा हलका आवाज आला.

“हट! डॅडीपर्यंत विषय गेलाच न्हाय.”

“तो कसा काय?”

“स्सालीला अशी दहशत बसवलीय ना की तुझ्या बहीणीची पण हीच हालत करेन. काय मजाल घरवालोंकी माझी तक्रार देतील?” मनु फिस्सफिसला.

सलमाला जिन्याच्या खालून कोणाची चाहूल लागली. ती लगोलग सारा आणि सरलाला ओढू लागली. धुसफुसली “कोणी येतंय.” तिघी व्हरांड्यात धावल्या. आपल्या रुमच्या दारापर्यंत पोहोचल्यावर त्यांच्या जीवात जीव आला. चढलेल्या श्वासाने सलमा दोघींना विचारती झाली, “असा काय भूत बघितल्यासारखा तुमचा चेहरा झालाय?”

सारा हळूच सलमाच्या कानाशी लागली. जे काय ऐकलं ते खुसपुसली. सलमाचा चेहरा त्या दोघींपेक्षा जास्त पडला.

“आपण पोलिसांना कळवायचं का?” सारा व सरलाच्या उंचावलेल्या भिवयांकडे बघत सलमाने तातडीचा खुलासा केला, “म्हणजे निनावी चिठ्ठीने किंवा तसं काही....”

तोच जिन्याकडून तंग आवाज आले. रेक्टरबाई कडूवर ओरडत होत्या. “तुला जी काही थेरं करायचीत, ती तिथं बाहेर कर. इथे माझ्यामागे आधीच खूप व्याप आहेत. ते अजून वाढवू नकोस. ए मॅन यू आऊट?” शेवटचा शब्द बाईंनी इतक्या जोराने किंचाळला की पाचव्या मजल्यावरच्या व्हरांड्यात थांबलेल्या मुली डोकावून खाली पाहू लागल्या.

दोन मिनिटांनी मनु शर्मा मजेत गुणगुणत इमारतीच्या बाहेर पडताना दिसला. मग तो ज्यात मागे वळून पाहत वरच्या मजल्यांच्या गॅलरीत उभ्या होत्या, त्या सगळया पोरींना त्याने हाताचं मधलं बोट पुढे दाखवून अश्लिल खूण केली. आपल्या आलिशान कारमध्ये बसला. जोरात गाडी गरगरवत निघून गेला. त्याच्या दिशेने गोड, आंबट, तिखट तिघीजणींनी बोटं कडाकडा मोडली आणि त्या वळल्या. मागे कडू पाटिल उभी होती.

“काय गं ए भवान्यांनो, सवताला लय शाण्णी समजताय काय? ऑ? भाडखाऊ, माझ्या याराला बोटं मोडता!” कडू गरजली.

सारा आणि सलमा लगेच नजरा खाली घालून उगी झाल्या. पण सरला तिखट नजरेने कडूच्या नजरेला नजर देत राहिली. “ए भाडखाऊ, डोळे वर करुन काय बघते? आधी नजर खाली. खाली.” खसकन सरलाचे केस धरून कडूने तिचं

डोकं खाली केलं. रागाने सरलाची नखं तिच्या मुठीत रुतली. कडूचं लक्ष तिकडे गेलं. “रांडेची मुठी वळते? एवढी तुझी मजल गेली? काय पाठ फोडून घ्यायची हुक्की आली काय? ऐ बाजारबसवे, तुला बोलते. कानात घुसत नाय की कान फोडू? आत्ता....”

घाईघाईने सलमाने सरलाच्या मुठी आपल्या हातांनी सोडवल्या. तोपावतो व्हरांड्यातल्या सगळया खोल्यांची बंद दारं उघडली होती. त्यातून पोरी घाबऱ्याघुबऱ्या नजरेने बाहेर डोकावू लागल्या होत्या. “भिकारड्यांनो, लायकी काय तुमची? माझ्या चप्पलेकडं तरी उभं राहायची हाय का गं? कोणाच्या पोरी गं तुम्ही? मोलमजुरी, रस्त्यावर धंदे करणाऱ्या आईबापाच्या नाय का गं? बोटं कोणाला मोडत होता? ए सटवे, तुला विचारतेय मी.”

“सॉरी चूक झाली.” साराच्या डोळयात अपमानाने पाणी तराळलं.

“चूक झाली ना? हां? मग अशी कबूल नाय करायची. थोबाडं फोडून घ्या आपली. एकामेकाकडे काय बघता? तिकडं त्या सगळया पोरींकडं काय बघता? काय विचार काय हाय तुमचा? आजच्या आज बाडबिस्तारा गुंडाळून गावाला जायचं हाय का? इथला मुक्काम संपला की काय तुमचा?” कडूच्या या धमकीचा परिणाम झाला.

आंबट, गोड, तिखट तिघीजणींनी नाइलाज होऊन आपापल्या थोबाडात मारून घेतल्या. “काय थप्पड मारताय की गालाला पावडर लावताय गं बया? कसा फक्कड ठोलावर थाप मारतो, तसा आवाज घुमला पाहिजे.”कडूचं समाधान

होईना. तिघींनी पुन्हा आपापल्या गालावर थपडा मारून घेतल्या. “नाय नाय,नाय.... ही काय चुकीची खरी सजा नाय. मी काय म्हणते, आपला हात आपल्यावर तसा चालणार नाय. तुमी असं करा, एकामेकीची थोबाडं फोडा, चला लवकर. वेळ लावू नका. प्रत्येकीनं इतर दोघींची थोबाडं फोडा.”

आंबट, गोड, तिखट तिघीजणींना एकामेकीशी नजर देता येईना. पण मजबुरीपोटी त्यांना कडू पाटिलचं ऐकावं लागलं. एकामेकीच्या थोबाडात जोरात मारावं लागलं. “अगं, काय सकाळपासून खाल्लं नाय की काय? अंगात जोर नाय? जोर कसा हवा! हातातली बांगडी तडकली पाहिजे.”

चेहरे माराने लाल लाल झाले होते. भरीला कडू पाटिलने त्यांची व्हिडिओ क्लिप बनवून ती मोबाइलवर व्हायरल केली. आपल्या खोलीमध्ये परतल्यावर तिघी गादीवर कोसळून रडरड रडल्या. हातांवर फुटलेल्या बांगड्यांचे ओरखडे रक्ताळलेले होते.

साराचं लक्ष रवीच्या नोंदवहीकडे गेलं. ती उठली. डायरी धरुन खिडकीबाहेर भिरकवायला निघाली. सरलाने वेळेत तिला रोखलं. “आंबट, कडूवरचा राग छायावर काढू नको.”

“हा यार, ये जिल्लत पहिल्यांदा तर आपण भोगत नाही आहोत. छायाचा काय कसूर?” सलमा उसासली. सारा यावर थोडा वेळ गप्प बसली. मग डायरीतलं पुढचं पान उलटून वाचू लागली.

## रवीची नोंदवहीः ७ जुलै १९९५

---

*अर्धवट ग्लानीत माझ्या कानावर अगम्य भाषा पडत होती. कष्टाने मी डोळे उघडले. आपण कुठे-कसे आहोत याचं भान यायला मला जरा वेळ लागला. माझ्या सभोवताली दाट हिरवं जंगल होतं. एका झऱ्याच्या शेजारी खडकांवर मी पहुडलेला होतो. माझ्या अंगावर कपडे नव्हते. जखमा होत्या. त्याच्यावर पांढरे-पिवळे लेप होते. त्याचा आंबूस-तिखट वास नाकाशी झोंबत होता. त्या लेपामुळेच बहुधा डासांचा गुणगुणाट करणारा थवा माझ्याशी थोडं अंतर राखून होता. उन्हं कडक होती आणि सरळ माझ्या डोळ्यावर येत मला जाळत होती. झऱ्याच्या सोबतीमुळे हवा आल्हाददायक थंड वाटत होती. एखाद्या झुळकेबरोबर पाण्याचा शिडकावा हलकेच माझ्या अंगावर येऊन जाई. जर अंगात मुक्या माराचे ठणके जाणवत नसते, तर ती फार सुखाची स्थिती होती, असं मला म्हणता आलं असतं.*

*मी डोकं उचलून पाहिल्यावर, काही अंतरावर एक नागडा आदिवासी मोठ्या दगडाने लाकडी दंडुक्यावर काही ठोकताना दिसला. झऱ्याच्या खळखळाटात त्या ठोकाठोकीचा आवाज कळत नव्हता. या माणसाला माझी हालचाल जाणवली असावी. त्याने मोठ्याने कोणाला हाकारले. जणू त्या हाकेचे प्रतिध्वनी यावेत, तसे दूर दूर त्या हाकेचे शब्द परत परत ओरडले गेले. ऐकू आले. मग खूप वेळ काही झालं नाही. मला उठावसं वाटत होतं. पण अंगात तेवढं त्राण उरलं नव्हतं.*

*तो माणूस परत शांतपणे त्याची ठोकाठोकी करत राहिला. मी उन्हाच्या तिरिपिमुळे डोळे मिटून घेतले. मिटल्या डोळ्यांपुढे नारिंगी रंग पसरला.*

*मला कोणी अंगाला खडसावल्यामुळे मी डोळे उघडले. माझ्या समोर 'ती' उभी होती. मी तिला ओळखू शकलो. कारण तिच्या कपाळावर चंद्राकार खोक होती. आता तिचे डोळे धगधगत नव्हते. शेवटी इतकी हजारो वर्षे बाहेरच्या दुनियेपासून अस्पर्श राहिलेल्या सेन्टीनेलींनी तो स्पर्श स्वीकारला होता? माझ्या रुपात. मी त्यांच्याशी कृतज्ञ असायला हवं होतं. मी तसं कृतज्ञतेचं हसू तिच्याशी हसलो. आपोआप प्रतिक्रियेमुळे तिचे ओठ हसण्यासाठी विलगले होते. पण ते तिने मुडपले. बोलण्यासाठी मी ताकद एकवटली, "पाणी." ते तिला कळलं नाही? मी खुणेसाठी ओठांवरुन जीभ फिरवली. तिच्या डोळ्यांत हलकेच समज उतरली. तिने हातांच्या ओंजळीतून झऱ्याचे पाणी आणले. ती ते माझ्या ओठांमध्ये ओतणार, तोच तो ठोकाठोकी करणारा म्हातारा तिला जोराने ओरडला. हातातले पाणी माझ्या ओठात न ओतता, तिने बाजूला उपडी केले. तिच्या चेहऱ्यावर अपराधी भाव उमटला. जरी भाषा समजत नव्हती तरी मी त्यांच्या देहबोलीवरुन समजलो की म्हाताऱ्याने तिला तिथून हाकलून लावले.*

*कितीतरी वेळ गेला. वरची उन्हं बाजूला कलली. सावल्या लांबल्या. माझ्यावर सावली आली. मी भूक आणि तहानेने कासाविस झालो होतो. पिकलेल्या फळांचा आंबूस-गोड वास माझ्या नाकाला गुदगुदल्या करुन भूक जास्त चाळवून गेला. भाले जमिनीवर ठोकून चालणारे त्यांचे सामुदायिक गाणे माझ्या कानावर आले. कराकरा चावल्याचे, मचामचा खाण्याचे, फर्राफर्रा ओरपण्याचे आवाज येऊ*

*लागले. मी मान त्या दिशेला कलवंडली. शरीर वळवळले. तिथे तीस-चाळीस फक्त पुरूषांचा जमाव बसलेला होता. पार्टी करावी तसं त्यांचं खाणं चालू होतं. लाल रक्ताळलेलं पांढरसं ते कच्चं मांस होतं नक्की. भुकेल्या पोटी मला मांसाचं वावडं नव्हतं. निदान ते जी फळं ठेचून तोंडी लावण्यासाठी वापरत होते, ती फळं तरी मला मिळावित, असा माझा उद्देश होता. मला पाणी पाजणं नाकारून, त्यांनी माझ्याशी शत्रुत्व दाखवलं होतं. मग मला जिवंत का ठेवलं होतं? कदाचित माझ्या जखमांवर लावलेल्या लेपासाठी पाण्याचं पथ्य असावं. मी आशादायक विचार करत होतो. म्हणून कुशीवर वळून रेटा लावून बसता झालो. आता माझ्या लक्षात आलं की ते काय खात होते. माणसाचं शरीर. एका गोऱ्या माणसाचं शरीर. डॉ. पंडित गोरे होते. मला पुढच्या दिवसांसाठी राखून ठेवलेलं होतं. विचारांच्या श्रमांच्या ताणाने मला ग्लानी आली. मी कोसळलो.*

*पुन्हा मी कधी भानावर आलो तेव्हा अंधार माजला होता. वरती आकाशात लाखो चांदण्या चमकताना दिसत होत्या. जंगलातल्या जनावरांचे घुत्कार-विचित्र आवाज चालू होते. सेन्टीनेलींच्या जंगलाचा एक तिखट दर्प होता. नाकाला सणसणी आणणारा. दालचिनी आणि मिऱ्यांच्या वासाचं मिश्रण असल्यासारखा. पण त्याबरोबर अजून एक ओळखीचा गंध मला जाणवला. तिच्या अंगाचा. खोबऱ्याचं कच्चं दूध अंगाला चोपडलेला.*

*नारळाच्या करवंटीतून तिने मला तो रस पाजला. हळूहळू मला झेपेल अशा बेताने. मी बोलायला गेलो. तेव्हा तिने माझ्या तोंडावर हात ठेवला. तो घट्ट गाठाळ स्पर्श दयेचा होता. मी आवाज करु नये,*

*बाकीच्यांना कळू नये हा त्याचा अर्थ होता. मग डोळ्यांवरुन हात फिरवून तिने ते बंद करायला लावले. मी झोपावं असं तिला सुचवायचं होतं. ती निघून गेली. त्या रसामुळे मला बरीशी हुशारी आली. मला वाटलं मी उठून उभा राहू शकेन. तसा प्रयत्न केल्यावर यश मिळालं. सगळ्या सांध्यांमधून, अंगातून निषेधाच्या कळा मारल्या. चालता येण्यासाठी, धावता येण्यासाठी मला अजून शक्तीची गरज होती, अजून विश्रांती. अजून पोट भरभरुन रस. विचार करता करता मला झोप लागली.*

*दिवसा उजेडी मोठमोठ्याने सामुदायिक प्रार्थनेच्या पठणाने आणि भाल्यांच्या ठेक्याने मला जाग आली. चार पुरुषांनी माझे शरीर खांद्यांवर उचलून घेतलं. ते मला एका मोठ्या खळग्यात घेवून गेले. त्या मातीच्या खळग्याभोवती काळ्या राखेचं रिंगण घातलेलं होतं. पक्ष्यांच्या पिसांचा मुकुट घातलेला एक म्हातारा रिंगणाभोवती हुमहुमत घुमत फिरत होता. हा कसला धार्मिक आचार असावा.*

*तिथे शे-दिडशे लोकांचा जमाव जमला होता. त्यात बायका, मुले, म्हातारी, बाप्ये सगळ्या वयांचे लोक होते. 'छाया' मी तिचं मनोमन नामकरण केलं होतं, तिथे उपस्थित होती. मुकुटवाल्या मांत्रिकाकडे जाऊन एक बाप्या काही जोरजोराने बडबडला. त्या दोन्ही बाप्यांचा आपापसात वाद चालला होता, असं मला वाटलं. ज्या तऱ्हेने ते सारखे माझ्यावर अधून-मधून नजरेचे कटाक्ष टाकत होते, त्यावरून वादाचा मुद्दा मीच असावो.*

*मुकुटवाल्या म्हाताऱ्याने त्या दोघा वादपटूंना दोन विरुद्ध दिशांना धाडून दिलं. एका दुसऱ्या म्हाताऱ्याला खूण केली.तो म्हातारा माझ्या*

*नजरेच्या कक्षेबाहेर कुठे गेला. त्या पुरुष-अर्धा पुरुष खोल खळग्यात असल्यामुळे, खळग्याच्या काठाशी असलेल्या लोकांपलीकडचं मला काही दिसत नव्हतं. तो दुसरा म्हातारा कसलं गठलं घेऊन आला. ते त्यानं खळग्यात रिकामी केलं. त्यातून काळ्या-पांढऱ्या मोठ्या मोठ्या गोलाकार वळ्यांचं वळवळणारं काही खड्ड्यात पडलं. अंदमानचा अभ्यासक असल्याने मला कळलं, तो अंदमानी जातीचा विषारी नाग होता. आदिवासींच्या जगण्याच्या पद्धतींचं मला जितपत ज्ञान होतं, हा माझा निवाडा चालला होता. 'शत्रू की मित्र' मानावा याचा. जर नाग मला डसला तर मी शत्रू. आपोआपच माझा निकाल लागणार होता.*

*रिंगणाभोवती जे कोणी लोक होते, ते त्यांचा तो भाल्यांनी जमिनीवर धरायचा ठेका होता, तो वाजवत गाऊ लागले. हे फार वाईट होतं. जर नागाला चहूबाजूंनी जमिनीतून तो ठकठक आवाज जाणवू लागला, तर त्याला सगळ्या वाटांनी कोंडल्यासारखे, घेरल्यासारखे वाटणार होते. नाग त्यामुळे चवताळणार होता. नुस्ता खड्ड्यात पडून तो शांत राहिला असता. पण आता असुरक्षितता वाटून तो राग काढायला काही लक्ष्य शोधणार होता.*

*एक वेळ नागापेक्षा चपळाई दाखवून त्याला हातांनी धरणं मला जमलं असतं. पण तो चांगला तीन हात लांब साप होता. शरीरातल्या क्षीण ताकदीनिशी त्याच्याशी झटापट मला जमली नसती. समजा, मी त्याला गळा आवळून ठार करण्यात यशस्वी झालो असतो, तरी माझी सुटका नव्हती. आता ठेका धरणारे शंभर भाले माझ्या अंगात घुसवले गेले असते. न्यायनिवाडा करणारा देवाचा पवित्र दूत ठार केल्याची शिक्षा*

*म्हणून. नागाने माझ्यावर खरंच दया करुन मला चावा न घेता सोडणं, हाच माझ्या सुटकेचा एकमेव आणि अशक्य मार्ग होता.*

*मला जसं वाटलं होतं, नागाचं सरसरणं वाढत चाललं होतं. तो चिडत चालला होता. डोकं वर उचलून त्याने सभोवतालचा अंदाज घेतला. मला नजरेने हेरला. फणा फुलवला. आता जास्तीत जास्त निःस्तब्ध राहणं हाच त्याच्यापासून बचाव करायचा कामचलाऊ उपाय माझ्याकडे उरला होता. नागाने माझ्याकडे बघत फणा जोराने जमिनीवर आपटला.*

*अचानक मोठा घरघराट आकाशातून ऐकू येऊ लागला. तो त्या नागाला ऐकू आला असता तर बरं झालं असतं. त्याचं तिकडं लक्ष वेधलं जाऊन, मला काही हालचाल करायची संधी मिळती. हेलिकॉप्टर डोक्यावरून घरघरत गेलं. ते फारसं खाली नव्हतं. आदिवासी ठेका धरायचे विसरले. त्यातल्या कोणी कोणी हेलिकॉप्टरच्या दिशेला भाले फेकले. याचा पूर्वानुभव असल्याने पायलटने ते फार खाली घेतलं नसावं.*

*या गडबडीत एका बाईच्या कडेवरचं तीन-चार वर्षाचं मूल खाली पडले. खळग्यात पडल्यावर जोरजोरात किंचाळत कडांवरुन चढायचा निष्फळ प्रयत्न करु लागले. आई आरडाओरडा करत वरुन वाकून मूल ओढून घ्यायचा प्रयत्न करु लागली. त्यात तिला यश येणं शक्य नव्हतं. मुलाचे हात तिच्यापर्यंत पोहोचत नव्हते. ते परत परत खाली घसरुन येत होतं. त्याचं केकाटणं, जोरदार हालचाली सापाला आमंत्रणच होतं. साप फुत्काकत त्याच्याकडे सरसरला. आणि मी त्या मुलाच्या व सापाच्यामध्ये.*

*सापाचा डंख माझ्या डाव्या मनगटावर बसला. असह्य कळ उठली. मी उजव्या हाताची पक्कड सापाच्या मानेवर बसवली. लगोलग सापानं त्याच्या शरिराचे विळखे माझ्या हातावर चढवले आणि तो पिळवटू लागला. एकीकडे अंगात त्याचं विष भिनत असताना, माझ्या क्षीण शरीराला त्याचा रेटा सहन करता येणं शक्य नव्हतं. पण मला समाधान होतं. साप माझ्यात गुंतल्यामुळे छायाला खळग्यात उतरुन, त्या मुलाला वर सुरक्षित उचलून देता आलं. वर आकाशातलं, आम्ही न परतल्यामुळे शोधात आलेलं हेलिकॉप्टर काही दखल न घेता परतून गेलं. माझा निवाडा झाला होता. शत्रू. नाग मला डसला होता.*

*त्या विषाच्या प्रभावाखाली डोळ्यांच्या आकुंचित झालेल्या बाहुल्यांमुळे, मला दुहेरी प्रतिमा दिसू लागल्या. छायाची निळ्या-काळ्या रेषांनी, तांबड्या- पिवळ्या ठिपक्यांनी नटलेली आकृती नाचू लागली. हलता हलता कधी माझ्या फार जवळ येई. कधी फार लांब जाई. ड्रगची नशा केल्यावर होते तशी माझ्या मनाची उन्मनी अवस्था झाली. बघता बघता छाया नागात बदलली. परत परत मला डसू लागली. तिच्या प्रत्येक डंखासोबत मनात-शरीरात सुखाचा कल्लोळ उठू लागला. हे इतकं सुख सहन करण्यापलीकडे होतं. लवकरच मी त्या सगळ्याच्या पलीकडे, जाणीवांच्या पार पोहोचलो.*

---

"हा रवी आता मला जिवंत असायला हवाय." साराने निश्वास टाकत म्हटले, "माझ्यासाठी..."

त्या डायरीला बीसपेक्षा जादा साल होऊन गेलेत, अक्कल की दुश्मन. सलमाने साराला टपली मारली. “तुझ्या अब्बूच्या वयाचा असेल तो आता.”

“कशावरून गं? तेव्हाच तो म्हातारा असला तर? प्राध्यापक म्हातारे असतात.” सरलाने मांडीवर जोरदार थाप मारून ठासले.

“माय फूट! तो आपला ओशनोग्राफीचा प्रोफेसर रमेश, काय म्हातारा आहे? जॉली गुड फेलो.” साराने च्वक् केलं.

“आयला, तो पण तुझ्या हिटलिस्टवर आहे?” सरलाने आ वासला.

“ओह येस! पण मुद्दा तो नाही. मला म्हणायचंय. हा रवी तर एकदम हिरो आहे.” साराने खुलासा केला.

“अमा यार, हिरो बिरो कुछ नही. हां, पण डोकेबाज आहे. बघ नाहीतरी तो साप चावून मरणारच होता. त्या बच्च्याला वाचवून तो आदिवासी की नजरमध्ये हिरो बनला. हिसाब लगाकर केलेली चाल.” सलमाने आपली अक्कल पाजळली. सारा तिच्यावर तुटून पडणार होती. तोच दारावर टकटक झाली.

“कोण?” तिघींच्या तोंडून एकदम प्रश्न बाहेर पडला.

“मी मुग्धा. धुरंधरमॅमनी निरोप दिला आहे. साराला त्यांच्या ऑफिसमध्ये लगेच बोलावलं आहे. सारा आहे का?”

“जा गं आंबट, तिला तुझा चेहरा दाखव.” सरला फिस्कारली. “अगं, म्हणजे मुग्धाला. नाहीतर ती इथंच दारावर थापा मारत राहिल. बावचळलेल्या साराला स्पष्टीकरण दिलं.

साराने जाऊन दार उघडलं. फक्त चेहरा बाहेर काढून मुग्धाला सुनावलं. “त्यांना सांग पाच मिनिटात आले.” त्या दरम्यान सलमाने रवीची डायरी डोळयांसमोरून गायब केली. मुग्धा 'हो' म्हणून चालती बनली.

“कशाला गं बोलावलं असेल? मीच डायरी पळवली, तिला कसं कळलं?” सारा स्वतःशी चुटपुटली. “तिथे सी.सी.टीव्ही. लावलाय काय गं?”

“कुछ भी? अगं, तिची केबिनमध्ये जी थेरं चालतात, ती काय त्याचे सबूत तयार करेल? तो अकाऊंटंट भाटीया येतो ना तिच्याकडे, तेव्हा दार आतून लॉक असतं.” सलमाने खबर पुरवली.

“जायला तर हवंच. पण मला खूप भीती वाटतेय गं.” सारा रडवेली झाली.

“चल मी येते तुझ्याबरोबर. तिखट, आम्ही दोघी तिथूनच जरा बाहेर जाऊन येतो. या जखमांवर लावायला औषध आणि मलमपट्ट्या आणायच्या आहेत. तुला काय हवंय बाजारातून?”

सलमाच्या प्रश्नाला सरलाने नको म्हणून उत्तर दिलं. सलमा, सारा दोघी रूमबाहेर पडल्यावर लगेच रूमला कडी घालून घेतली. तिला डायरी पुढे वाचायची उत्सुकता लागली होती. आज कडू पाटीलसमोर आपल्याऐवजी छाया

असती तर तिने काय केलं असतं? मात्र ढीग शोधलं तरी तिला सलमाने लपवलेली डायरीची जागा सापडेना.

साराने लपवलेला एक लांबलचक चामडी बेल्ट सापडला. हा तिला तिच्या नव्या बॉयफ्रेंडने भेट दिलेला असावा. सरलाने कयास बांधला. अशा महागड्या वस्तू त्या तिघींच्या आवाक्यापलीकडे होत्या आणि जमीनीवर पडलेला एक कागद, त्याच्यावर एका अंग रंगवलेल्या बाईचं चित्र होतं. खाली तिचं नाव लिहिलेलं होतं. “छाया आंग्रे” सरलाच्या तोंडातून हलकेच एक शीळ निसटली. डायरीतून तो कागद निसटला असावा. छायाच्या हातात चाबूक दाखवलेला होता. साराच्या चाबकासारखा. तो चाबूक हातात घेऊन सरलाने छायाची चित्रात दाखवलेली पोझ घेऊन पाहिली. स्वतःचा असा एक सेल्फी घेऊन, तो इंटरनेटवर आपल्या मित्रमैत्रिणीना पाठवायला तिला आवडलं असतं. त्यासाठी लागणारा मोबाईल घेणं तिला आणि तिच्या घरच्यांना परवडणारं नव्हतं.

आरशात स्वतःच्या चेहऱ्याला वेडावून दाखवताना तिच्या मनात लखक्कन एक कल्पना चमकली. सारा आणि सलमा परततील, तेव्हा त्यांना छायाच्या रूपात सादर होऊन चकित करायची. दुपारी कडू पाटीलने केलेल्या रॅगिंगचा पडसाद नाहीतर, त्यांची सगळी संध्याकाळ आणि रात्र कडू करणार होता.

तिच्याकडे काळया रंगासाठी काजळ तर होतंच सलमाचं. लाल रंगाची साराची भडक लिपस्टिक. पांढरा खडू उगाळून तिला तो रंग बनवता आला असता. ती फटाफट कामाला लागली. त्या दोघी परतण्याआधी रंगरंगोटी पुरी व्हायला

हवी होती. चार वाजल्याचे पाच झाले. तासाभरात तिचा चेहरा रंगवून पूर्ण झाला. आरश्यात तिने स्वतःचं कौतुक केलं. व्वा! किती छान भेसूर चेहरा बनला होता. जर कोणी तो बघून किंचाळलं, तर ना याचं चीज होणार!

होता होता सहा वाजले. सूर्य मावळू लागला. सरला मैत्रिणींची वाट पाहून कंटाळली. मनात खट्टू झाली. चेहरा धुवून टाकायला उठली. आणि पांढऱ्या रंगाची डबी कपड्यांवर सांडली. “अरे देवा!” तिने घाईघाईने कपडे उतरवले. आत रंगाचे ओघळ, छायाच्या अंगावरील रेषांसारखे दिसत होते. जर तिने सगळंच अंग छायासारखं रंगवलं तर? ती पुन्हा कामाला लागली.

त्या नादात घड्याळाकडे तिचं लक्ष राहिलं नाही. एक कसली तरी अजब हुरहुर तिच्या मनाला लागली होती. काहीतरी बरं घडणार होतं. तिचा डावा डोळा फडफडत होता. अचानक बत्ती गुल झाली. सरलाने खिडकीतून बाहेर डोकावले. सगळीकडचीच वीज गेली होती. कधी परत येईल सांगता येणार नव्हतं. पंखा बंद पडल्यामुळे खोलीत उकडायला लागलं.

अशावेळी त्या दार उघडं करून वाऱ्याला यायला-जायला वाव देत. धीर करून तिने दार उघडलं. तिला कोणी असं पाहिलं तर? बाहेर व्हरांड्यात कोणी नव्हतं. तिला हुश्श झालं. तशा संध्याकाळी अभावानेच कोणी रूमवर थांबत. कॉमन हॉलमध्ये टि.व्ही.बघायला जात. सगळीकडे अंधार दाटला होता. अर्थात मुंबईचा अंधार असल्याने तो तितका मिट्ट नव्हता. व्हरांड्यात छान गार वाऱ्याची

झुळूक वाहत होती. सरला त्याच्या मोहात पडली. रूमबाहेर येऊन वारा खाऊ लागली.

मागून कोणाची चाहूल लागली. कॉमन बाथरूमकडून कोणी घाईघाईने येत होते. अशा अवतारात त्या कोणासमोर आपल्या रूममधून घुसून, आपली पोलखोल करायची सरलाची इच्छा नव्हती. ती जिन्याकडे पळाली. जिन्यामध्ये दडायला छान अंधार होता. पण एकाएकी तिथे आधीच उभ्या असलेल्या व्यक्तीने, सरलाच्या चेहऱ्यावर टॉर्चचा झोत पाडला. एक जोरदार किंचाळी मारून दिली.

“ऐ ओरडायला काय झालं?” सरलाला अजून कोणी आपल्याला तशा अवस्थेत बघायला, तिथे धावायला नको होतं.

“तू... तू... कोण हाय?” कापरा असला तरी कडू पाटीलचा आवाज सरलाला बिनचूक ओळखता आला.

“मी छाया आंग्रे” सरलाने घोगऱ्या आवाजात उत्तर दिलं.

“ती.... ती तर मेली हाय.”

“मी परत आलेय. भूत बनून.....!”

“क.... कशाला?”

“तुझ्यासाख्या माजलेल्या म्हशींना वठणीवर आणायला.” सरलाने फाडकन् बेल्ट हवेत फिरवला. त्याचा मस्त सप सप आवाज झाला. कडू पाटील आपल्याला घाबरतेय, या कल्पनेनेच सरलाला आनंदाच्या उकळया फुटल्या.

“नको, नको, मला मारू नको.”

“मग माझी रक्ताची तहान कशी भागणार? माझी माणसाच्या मांसाची भूक कशी मिटणार? कशी मस्त भरलेल्या अंगाची आहेस तू... बिल्कुल मला पाहिजेल त्या मापाची. छप्पन-छप्पन-छप्पन.”

“काय छप्पन?”

“तुझी इंचातली मोजमापं. तुझी सगळी चरबी वितळवून त्याचा साबण केला, तर आख्खं हॉस्टेल आठवडाभर त्यात आंघोळ करू शकेल.”

“काय पन हा? इतकी काय मी जाडी नाय.”

“ऐ चूप! लाडात यायचं काम नाय. हां!” सरलाने पुन्हा एकदा बेल्ट चाबकासारखा कडाडवला. “हा मगरीच्या कातडीचा चाबूक आहे. याने फटके लगावून लगावून, तुझी सगळी चामडी सोलवटून, त्यावर मीठ मसाला मारून, आख्खी जाळात भाजेन. आणि मग हा हा हाऽऽऽ.” सरला एक आसुरी हास्य मनापासून हसली.

“नको, नको. मला सोड. माझ्यावर दया कर.”

“तू केली होती का कोणावर कधी दया? आज दुपारी?”

“चुकले, चुकले. परत नाय अशी वागणार.”

“चुकीची माफी अशी मागतात?”

“मग कश्शी... कश्शी?”

“थोबाड फोडून घे, आपल्या हातांनी. हातातल्या बांगड्या फुटेपर्यंत.”

“माझ्या हातात बांगड्या नाहीत. सोन्याचं ब्रेसलेट हाय.”

“चूप! सबब सांगू नको.” सरलाने यावेळी बेल्ट कडूच्या दिशेने फटकारला.

“आय, आय लागतं.”

“हां.. मग सुरू कर थोबाड फोडून घेणं. की मी फोडू चाबकानं.”

“नको, नको. मी घेते फोडून.”

“असा नाही. आवाज कसा डफावर थाप पडतो तसा यायला हवा.” थोडा वेळ थापडांचे आवाज आले आणि मग हंदके देऊन रडण्याचे.

“आता रडते कशाला?”

“दुखतं म्हणून..”

“आता कळलं कसं दुखतं? पुन्हा कोणाच्या वाटेला जाशील?” सरलाने चाबूक जोरात फडफडावला.

“नाय, नाय, आता जाऊ?”

“जा आणि ज्यांच्या ज्यांच्या कळीला गेली होतीस, त्यांची त्यांची माफी माग.”

“हो, मागते मागते.”

“नाहीतर, येत्या अमावस्येला मी तुझा बळी घेईन.”

“नको, नको. तू सांगते तसं सगळं करते.”

“चल तर मग, निघ इथून.” पळत्या फळाची आज्ञा घेत कडू पाटील दडादडा जिने उतरून गेली. सरलाने खोलीवर धूम ठोकली.

कडू पाटील धावता धावता परतणाऱ्या सारा आणि सलमावर आपटली. तोच लाईट आली. एकमेकींना एकमेकींची ओळख पटली. तशा सारा व सलमा जाम टरकल्या.

“आमची चूक झाली. अंधारात चुकून टक्कर झाली.” दोघी माफी मागू लागल्या.

“नाय नाय गं. माझी चूक हाय. माझी माझी. मला थोबाडात मारा.” कडू कळवळून म्हणाली. भीत भीत तिने मागे जिन्याकडे एक नजर टाकली.

“मारतो” “मारतो” दोघी नाइलाजाने म्हणाल्या. आणि एकमेकींच्या एक एक थोबाडीत दोघींनी मारले.

“नको, नको गं बायांनो, असं आक्रीत करू नका.” कडू पाटीलने दोघींचे मारणारे हात धरले. घायकुतीला येऊन ती सारा व सलमाचे हात आपल्या थोबाडावर मारून घेऊ लागली. त्या दोघी जास्तच भिऊन गेल्या. आपले हात मागे ओढू लागल्या.

“नको नको कडू ताई.”

“मी तुमची ताई ना, ताई ना? मग मारा ना मला. अगं, मारता की नाय?”

“आँ?”

“माफीऽऽ माफी मागते तुमची. मारा ना गं मला. नाय तर ती मारून टाकेल गं,” कडू पाटील रडत रडत खाली कोसळली. तशा सारा आणि सलमा जीव घेऊन सुटका करून घेत पळाल्या. रूमवर पोहोचल्यावर त्यांच्यासाठी वेगळं सरप्राईज हजर होतं.

## रवीची डायरी : १० जुलै १९९५

--------------------------------

*मी डोळे उघडले. मी दाट हिरव्या जंगलात होतो. मी अजून जिवंत होतो? मला देवाचे आभार मानायला हवे होते.*

*“पालुगा, अका बिया सोमासेई.” माझ्याऐवजी दुसरं कोणी देवाचे आभार मानत होतं. 'सॅडल पीक” या अंदमान बेटांवरील सर्वात उंच गिरीशिखरावर राहणाऱ्या आदिवासी देवाचे. मी चकित झालो. या शब्दांचा अर्थ मला कळत होता. 'पृथ्वीची लेकरं आम्ही पालुगा देवा तुझी कृतज्ञ आहोत.” ही तर जारवांची भाषा होती. जिचा मी अभ्यास केला होता. मी जारवांच्यात कसा येऊन पडलो? मी सभोवताली उतावीळपणे नजर फिरवली.*

*मी सेन्टीनेलींच्या बेटावर त्याच त्या झऱ्याच्या शेजारच्या खडकावर झोपलेलो होतो. कपड्यांशिवाय. पांढरे पिवळे लेप दिलेल्या अवस्थेत. मग ती नागाकरवी परीक्षा एक स्वप्न होते का? मला माझा डावा हात पाहायचा होता. तो मला उचलता येईना. माझ्या लक्षात आले, वेलींच्या जाड घट्ट दोरानी मला बांधून घालण्यात आले होते. साप मला नक्की चावला होता. कारण तो चावलेला हात बधिरलेला होता.*

*एक छोटा तीन-चार वर्षांचा मुलगा माझ्या चेहऱ्यावर ओणावला आणि हसला. पालुगा देवाचे आभार त्याची आई माझ्या शेजारी उकिडवी बसून मानत होती. “तू अका बियांची भाषा कशी बोलतेस?” जारवांच्या भाषेत विचारलं. हा माझा आवाज मला वाटला नाही. विषाच्या प्रभावाने माझा आवाज बदलला?*

*“मी मुळची अका बिया आहे. एका वादळात समुद्राने मला तिथून आणून इथे सोडलं, बोमाबोई लोकांनी मला त्यांच्या या बेटावर आश्रय दिला. पालुगा त्यांचं बरं करो,” तिने जारवांच्याच भाषेत उत्तर दिलं. ती मला शत्रू मानत नव्हती.*

*“मी जिवंत कसा? सापाचं काय झालं? मला बांधून का ठेवलंय?” मी धडाधड प्रश्न विचारत सुटलो. तिच्या चेहऱ्यावरचं हास्य विझलं.*

*“बिमाबानं तुला वाचवलं.” या शब्दांचा आधी मला उलगडा झाला नाही. म्हणजे 'चंद्रकोरीने तुला वाचवलं.' याचा, पण पुढे बिमाबाने माझे चावे घेऊन, माझ्या जखमेतून शिरणारं नागाचं विष काढून थुंकून टाकलं. या तिच्या साभिनय निवेदनानंतर, ती छायाला चंद्रकोर म्हणत होती, हे माझ्या लक्षात आलं. छायाला तिच्या कपाळावरच्या जखमेमुळे ते नाव मिळालं असणार.*

*साप देवाचा दूत असल्यामुळे, साहजिकच त्याला पकडून पुन्हा जंगलात सोडून देण्यात आलं होतं. 'माबा माबा' म्हणजे या बाईला दुःख याचं होतं की माझा निवाडा 'शत्रु' म्हणून झाला होता. अर्थात शत्रूला ठार करण्यात येणार होतं आणि त्याच्या हट्ट्या कट्ट्या शरीराचं मांस फुकट न घालवता खाल्लं जाणार होतं. नागाच्या विषाचा माझ्या शरीरात अंश सुद्धा उरू नये, यासाठी अजून तीन दिवस वाट पाहण्यात येणार होती. बिमाबा तेव्हा, पूर्ण प्रकाशाने तळपणार असता. त्या प्रकाशात ही मेजवानी समारंभपूर्वक होणार होती. तोपर्यंत मी कुठे पळून जावू नये, म्हणून मला बांधण्यात आलं होतं. एवढं सांगून झाल्यावर त्या विचाराने तिला रडण्याचे उमाळे येऊ लागले. तिचं सांत्वन करण्यासाठी माझ्याकडे शब्द नव्हते.*

*तिला फारसं रडता आलं नाही. एका बोमाबोई तरूणीने लाथ मारून तिला बाजूला सारले, मारत ढकलत माझ्यापासून दूर नेलं. ही तर बिमाबा. छाया! तेवढ्याने छायाचं समाधान झालं नाही. तिनं माझ्या गलितगात्र शरीराला सुद्धा काही लाथा घातल्या. तिचे डोळे राग अनावर झाल्यावर धगधगतात तसे धगधगत होते. ती बरोबर घेऊन आली होती, ते शहाळं तिनं धाडकन जोराने खडकावर आपटून फोडलं. त्यातल्या पाण्याचा आणि मलईचा पायांखाली चेचून राडा केला. हिला जर माझा इतका राग होता, तर आधी मला वाचवलं तरी का होतं?*

*छायाने पुन्हा माबामाबाला लाथा मारायला सुरूवात केल्यावर मात्र, इतर काही सेन्टीनेलींनी हस्तक्षेप केला आणि तिला धरली. तिला आवरायला जवळ जवळ चार माणसं लागली. तरी माबामाबाच्या दिशेला हवेत दुगाण्या झाडणं चालू होतं. ती लोकं छायाला धरून दूर नजरेआड घेऊन गेली. माबामाबा उठून माझ्या दिशेला यायला निघाली. पण दुसऱ्या एका म्हाताऱ्याने तिला हात मध्ये आडवा घालून अडवलं. निघून जायला सांगितलं. शत्रूशी कोणा स्त्रीनं जवळीक साधणं त्यांना आवडलं नव्हतं, तेही त्यांना कळत नसलेल्या भाषेत.*

*उरलेला दिवस मी तहान-भुकेने तळमळत जर्जर अवस्थेत काढला. जर मला खायचे होते तर खाण्यासाठी पुरेसं मांस मिळावं, म्हणून तरी उरलेले तीन दिवस त्यांनी मला अन्न द्यायला हवं होतं. मी माझ्या आणि जारवांच्या भाषेत आणि अंदमानातील ज्या कोणत्या भाषेत मला सांगता येईल, सांगायचा ओरडून प्रयत्न केला. त्या आरडाओरड्याचा परिणाम इतकाच झाला की झऱ्याजवळ ठोकाठोकीचे काम करणारा म्हातारा वैतागून निघून गेला. परिसर सामसूम झाला. कधीतरी रात्र झाली. किती*

वेळा मला डुलक्या लागत होत्या आणि किती वेळा जंगली जनावरांच्या खडबडाटाने मोडत होत्या.

माझ्या नाकाशी तिचा वास दरवळला. ओल्या खोबऱ्याच्या रसाचा. आसपास आता इतर कोणी नव्हतं.

माझ्या तोंडात तिने तो रस कोंबल्यावर मी तो रागाने थुंकून टाकला. मान दुसरीकडे वळवली. दिवसा लाथा घालते आणि रात्री घास भरवते. छायाची वागण्याची तऱ्हा अजब होती. तीन दिवसांनी मरायचंच होते. तेवढा काळ तिचे उपकार कशाला हवे? तिने माझी मान दाबून धरून, जबरदस्तीने माझ्या तोंडात रस भरवायचा काही काळ प्रयत्न करून बघितला. नाक दाबून तोंडात घालायचा प्रयत्न केला. मला ढास लागली. घशात अडकला, गुदमरून माझा जीव होत्याचा नव्हता झाला. पण मी तो रस थुंकलाच. आंग्राचा रवी काय चीज आहे, हे मला तिला दाखवून द्यायच होतं. कोणाच्या मेहरबानीचा मोताद नाही. नाइलाज झाल्यावर ती निघून गेली.

मध्ये बराच वेळ गेला असावा. कोणाची हालचाल व अस्तित्त्व मला अगदी जवळ जाणवलं. क्षीण चंद्रप्रकाशात मी माबामाबाला ओळखलं. छाया तिला घेऊन आली होती. माबामाबा माझ्या कानाशी लागली आणि खुसपूसू लागली. “स्वतःचा जीव संकटात घालून आम्ही तुझ्याकडे आलो आहोत. शत्रूशी बोलायला वा त्याला मदत करायला कोणालाही पूर्ण मनाई आहे. तसं कोणी आढळलं, तर त्यालासुद्धा शत्रू मानण्यात येईल आणि त्याची शत्रूसारखीच गत होईल... आम्ही तुझ्या सुटकेची योजना बनवली आहे. तेव्हा आता हे अन्न खा आणि आपली गेलेली ताकद परत मिळव.”

*“पण मग दिवसा बिमाबाने तुला-मला लाथा का मारल्या?” मी अजूनही अडून होतो.*

*हा प्रश्न माबामाबाने बिमाबाला विचारल्यावर तिने काही उत्तर दिलं. माबामाबाने ते मला भाषांतर करून सांगितलं. “तुझी सुटका केल्यावर, बोमा बोईंना तिचा संशय येऊ नये म्हणून तिने ते नाटक केलं.”*

*“मी तुझा मुलगा वाचवला. म्हणून तू मला मदत करतेस. बिमाबा मला मदत का करतेय?” आंग्रेंचा राग सहज जात नाही.*

*पुन्हा दोघींची खुसपूस झाली. माबामाबाने मला उत्तर ऐकवलं. “बिमाबाची खात्री आहे की तू शत्रू नाहीस. तेव्हा तुला त्याची शिक्षा मिळणं अन्याय आहे. बिमाबा कधी अन्याय सहन करत नाही.” एवढं बोलून माबामाबा खुसखुसली, “एक बाई म्हणून खरं सांगू का? बिमाबाचं तुझ्यावर मन जडलंय. म्हणूनच मला तुझ्याशी गुलूगुलू बोलताना बघून ती रागाने आंधळी झाली होती. बायकांचा मत्सर तुला ठावूक नाही का? यावर मी काय बोलणार? माझी बोलती बंद झाली. त्यापुढे त्या दोघींना जे आणि जसं पाहिजे होतं, मी निमूटपणे केलं. ऐकलं आणि खाल्लं-पिल्लं.*

*पुढचे तीन दिवस उगवले आणि मावळले. रोज रात्री माझा पौष्टीक खुराक, छाया न चुकता मला आणून भरवत होती. मी खात होतो. तिसरी रात्र उगवली. पौर्णिमेच्या चंद्राबरोबर! आकाश निरभ्र स्वच्छ होतं. चांदणं सगळीकडे असं झिरपलं होतं वाटावं जणू दिवस चालू आहे. बोमाबोईंची टोळी माझ्याभोवती जमली होती. यात फक्त पुरूष होते. माझ्या काढण्या काढून टाकून, मला यापूर्वी त्यांनी नरमांस खाल्लं होतं, त्या जागेवर नेण्यात आलं. पाण्याची धार धरून माझ्याभोवती ओलं वर्तुळ तयार करण्यात*

*आलं. त्याच्या बाहेर आपापल्या भाल्यांचा जमिनीवर ठेका धरत ते फेर करून नाचू लागले. त्याचं सामुदायिक गाणं-प्रार्थना चालू झाली. एका क्षणी अचानक त्यांनी त्यांचे भाले हवेत वर उंचावले, माझ्या दिशेने रोखले आणि खाली आणले. पण माझ्या शरीरात घुसवले नाहीत. ते तीनवेळा असे भाले माझ्यावर मारणार होते. तिसऱ्यावेळी शरीरात आरपार.*

*त्यांनी पुन्हा फेर धरला आणि एका स्त्रीची जोरदार किंचाळी जवळच्या झाडीतून ऐकू आली. त्यापाठोपाठ एका रानडुकराचं डुरकावणं. जवळ मोठी खुसपूस सुरू झाली. कोणा स्त्रीचा वाचवा म्हणून धावा ऐकू येऊ लागला. त्यांच्यात चर्चा सुरू झाली. स्त्रीचा आवाज दूर दूर जाऊ लागला.*

*लगोलग एका म्हाताऱ्याने दोन तरूणांना काही आदेश दिला. ते इथेच थांबले. बाकीची सर्व पुरूषमंडळी घेऊन, तो त्या स्त्रीच्या सुटकेसाठी कुठेतरी रवाना झाला. ते दोघे माझ्यावर भाले रोखून सज्ज तयार राहिले. आमच्या योजनेत असे आम्ही गृहीत धरलेल नव्हतं. माबामाबा संकटात सापडलेल्या स्त्रीची भूमिका वठवून, सगळ्या पुरूषांना तिथून घेऊन जाईल असं ठरलेलं होतं. मग मी पळ काढायचा होता. या दोघाचा सामना मी करू शकेन का? मला शंका होती. काय करावं सुचेना. माबामाबा फार वेळ बाकीच्यांना चकवू शकणार नव्हती. वेळ कमी होता. मला जगायची ही अखेरची संधी होती. माझ्या थोड्याश्या हालचालीने-चळवळीने ते दोघे युद्धाच्या पवित्र्यात सज्ज झाले. मला फक्त कबड्डीतली हातघाई येत होती.*

*अचानक सप्सप् आवाज करत आसूड कडाडला. त्या दोघांचेही भाले आसूडाने बाजूला उडवले गेले. त्या दोघांनी अचूक ओळखलं. "बिमाबा." रागानं हाळ्या ठोकल्या. तिची त्या दोघांशी हातघाई जुंपली. मी*

*त्यात माझा वाटा उचलत एकाला पाय ओढून खाली पाडला. दुसऱ्याला छायाने खाली पाडला. माझा हात आपल्या हातात धरून तिने मला उठवलं. तो डावा हात नव्हता हे माझं सुदैव. मला जवळच्या झाडीत तिने खेचला. तिच्या मागोमाग मी धावू लागलो. चांदण्या रात्री त्या निर्बीड अरण्यात पाठलागाचा खेळ सुरू झाला.*

*सपकन् एक तीर येऊन माझ्या डाव्या हाताच्या जखमेत रूतला. कळवळलो. थांबलो, बाण उपटायला वेळ नव्हता. छाया जाईल त्या दिशेने त्या वाटेला धावत राहायचं एवढं फक्त कळत होतं. त्या जंगली बाईच्या गतीने, या जड ओझं झालेल्या शरीराने जंगलात धावणं सोप्पं नव्हतं. कितीदा तरी आपटत, ठेचकाळत, खाली पडून पुन्हा उठत, मी धावत होतो. सारं जंगल बोमाबोईंच्या आरोळ्यांनी दणाणून उठलं होतं. नशीब आम्हाला कुठे घेऊन जात होतं?*

---

वाचन रंगात आलेलं असताना दारावर मध्येच ठोठावलं गेल्यामुळे आंबट, गोड, तिखट मनापासून खवळल्या. सरलाला घाईघाईने कॉटखाली सारण्यात आलं. वरून चादर टाकली गेली. डायरी तिच्याच हाती देण्यात आली होती. मग खोलीवर एक नजर टाकून सगळं नीटनेटक आहे, खात्री झाल्यावर सलमाने दार उघडलं. दारात मुग्धा गोडबोले उभी होती.

“अल्ला! मॅमनं पुन्हा बोलावलं काय? मगाशी आम्ही गेलेलो, तो त्यांच्या केबिनमध्ये कोण इन्स्पेक्टर होता. आम्ही किती वाट बघितली बघितली आणि मॅम सीधे त्या पोलिसवाल्याच्या साथ निघून गेल्या.” सलमानं न विचारता खुलासा देऊन टाकला.

“तेच गं विचारायला आलेय. मॅमसाठी नाही.” मुग्धानं आठ्या चढवत आपला खुलासा केला. “चौकीदार सांगत होता की तुम्ही दोघी आज संध्याकाळी खूप उशिरा परतलात म्हणून. सुमनला बघायला हॉस्पिटलला गेलेलात म्हणे.”

“हो, गेलेलो. सुमन आमची खूप जवळची मैत्रिण आहे. ती बेचारी इतकी तकलिफमध्ये आहे, तर तिला भेटणं काय गुनाह आहे?” सलमानने भुवया चढवत प्रश्न केला.

“अगं, मला पण सुमनबद्दल खूप वाईट वाटतं. म्हणून तर घाईघाईने तिची चौकशी करायला तुमच्याकडे आले.” मुग्धाने सलमाचे हात आर्जवाने हातात घेतले. डावीकडे-उजवीकडे एक चोरटी नजर टाकली. आवाज दाबून विचारलं, “मी आत येऊ? मला काही सांगायचंय. असं दारात नको.” ती फार अस्वस्थ झालेली होती. नाइलाजाने सलमाला दारातून बाजूला होऊन मुग्धाला आत घ्यावं लागलं. आत शिरल्या शिरल्या मुग्धानं लगेच मागे वळून दार बंद करून कडी घालून टाकली. हात छातीवर धरला, “सुमन काय म्हणाली? तिने सांगितलं का, मनु शर्मानं तिच्यावर ॲसिड टाकलं?”

“हे तुला कोणी सांगितलं? हाऊ कम? सुमन कोणाचंच नाव घेत नाहीय. आय मीन ती फार क्रिटिकल स्टेजला आहे, यू नो? ती बोलूच शकत नाहीय. मॅम पोलिसवाल्याबरोबर त्याच्या गाडीतून गेल्या, म्हणून आम्ही त्यांच्या मागोमाग गेलो होतो. काय झालं ? बघायला. मॅमसमोर सुमन काही बोलली नाही. तिचा आख्खा चेहरा जळलाय. तिच्या घरच्यांकडे तर हॉस्पिटलचे इलाजाचे भरण्याइतके सुद्धा पैसे नाहीत. तिची मुंबईतच दुसरीकडे शिकणारी बहिण तेवढी हजर होती. मॅमनं तर तिची जबाबदारी घ्यायला सरळ सरळ नकार दिला. म्हणे हॉस्टेलच्या पोरी बाहेर काय लफडी करतात, त्याच्याशी मॅनेजमेंट नी ट्रस्टचा काही संबंध नाही. हाऊ अँबसर्ड!” सारा भसाभसा बडबडली.

मुग्धानं डोकं दोन्ही हातांनी गच्च आवळत नंदीबैलासारखे आडवं तिडवं हलवहलव हलवलं.”आई गं, आता मी करू तरी काय?” ती तिथेच कॉटवर खचून बसली. साराने तिच्या बाजूला बसून तिला कवेत घेत खांद्यावर थोपटल्यासारखं केलं. “कम ऑन यार. काय, प्रॉब्लेम काय आहे?” विचारलं.

“मनुने संध्याकाळी मला हॉस्टेलबाहेर बाजारात अडवलं आणि म्हणाला....” पुढचे शब्द उच्चारण्याआधी मुग्धाचे अंग भीतीने गदागदा हलू लागले, “म्हणाला, सुमनने त्याला नाही म्हटलं म्हणून त्याने तिला सजा दिली. जर मी त्याला नाही म्हटलं, तर मला पण तो तीच सजा देणार. चेहऱ्यावर ॲसिड फेकायची. सुमनवरचा विजय साजरा करायला, आज रात्री त्याला मी हवीय. मला रात्री अकरा वाजता 'रंगिला रतन' बारमध्ये भेटायला बोलावलंय.”

“रास्कल, ब्लडी बास्टर्ड” सारानं शिव्यांची लाखोली मनुला घातली. “काय लेडीज हॉस्टेल म्हणजे त्याला फुकटचे हरेम वाटलं की काय?”

“कम्बख्त, रोज त्याला हॉस्टेलवरची नवी पोरगी हवी झाली काय?” सलमा रागाने फणफणली. “मुग्धा बिल्कुल जाने का नही.”

“अगं पण तो वीस हजार रूपये देतो बोलला. एका रात्रीचे.” मुग्धा उसासली.

साराने तिचे दोन्ही कान उपटून धरून चेहरा फिरवला. आपल्या चेहऱ्याशी भिडवला. “बाय होली मेरी, मी सांगतेय ते नीट ऐक डियर. हे फक्त तुझ्यात आणि माझ्यात. आजपर्यंत झवलेल्या एका पण पोरीला, त्यानं कधी कबूल केलेल्यातला, एक रूपयासुद्धा दिलेला नाही. आय स्वेअर.” कन्फेशन दिलं. “पक्का बारभाष्या आहे तो. मी सांगते तुला, तू आत्ताच्या आता बँगपक करून इथून गायब हो. महिनाभर तरी परत फिरकू नको. दॅटस् ऑल यू कॅन डू.”

“लेकिन क्यूँ? म्हणजे उद्या तो जिला तिला विचारत सुटेल आणि आपण आपलं सगळे शिक्षण-करीयर अर्धं टाकून घरी पळून जायचं? घरच्यांना काय सांगायचं? बंबई हमें रास नाही आली? आपण पळून गेलो, पलट कर जबाब नाही दिला, तर मनु अजून माजत जाईल. चल मुग्धा, मै आती. आपण पोलिसात त्याची फर्याद देवूया.” सलमा तावातावाने बडबडली. मुग्धाचा हात धरून तिला खेचू लागली. मुग्धाने तो हात झटका देऊन सोडवून घेतला. “तू कुठे चालली?”

“बॅग पॅक करायला. मुग्धा घाईने दार उघडून ते आपटून निघून गेली.

तसं साराने जावून तितक्याच घाईने दाराला परत कडी घातली. कॉटखालून सरला सरसरत बाहेर आली. उभी राहिली. तिचे डोळे धगधगत होते. छायाचे वाटावेत असे रंगलेल्या चेहऱ्यावरचे. “मनु शर्मा, तुला छाया आंग्रेने भेट द्यायची वेळ आली आहे. ॲसिडचं उत्तर ॲसिडने.” सरलाने तिखट घोषणा केली.

---

'रंगिला रतन' बारचं नाव निऑन साईनमध्ये झगझगत होतं. बारच्या दरवाजापाशी वातावरण रंगीत-संगीत करणारे रंगीबेरंगी दिव्यांचे झोत पसरलेले होते. एक भली मोठी लाल पगडी घातलेला दरवान बंद दारापाशी गिऱ्हाईकांसाठी ते उघडायला तयार उभा होता. ते आतून लोटलं गेलं. त्याच्या तोंडावर आपटलं गेलं. लडखडत मनु शर्मा आणि त्याला सावरायचा प्रयत्न करत त्याचा दोस्त बारबाहेर आले. दरवानाच्या 'सलाम साब'ला मनुने “नरकात जा” प्रत्युतर दिलं. तो रस्त्यावर येऊन आपली गाडी शोधायचा प्रयत्न करू लागला.

“मनु, रात्रीचे दोन वाजलेत. आता तू सरळ घरी जा. हॉस्टेलवर नको जाऊ. त्या पोरीला उद्या बघू.” मित्र समजावू लागला.

मनुनं सुनसान निर्जन रस्त्यावर चारी बाजूला नजर टाकली. “कोण नाय आता बघायला, चल सालीचा गेम करून टाकू. भितो काय? अरे, मनु शर्मा कोणाच्या बापाला नाय भीत. चल.”'मित्राला ओढू लागला. मित्राने आपला हात

सोडवून घेतल्यावर आधार नाहिसा झाल्यामुळे, दाणकन रस्त्यावर तोल जावून बसता झाला. “मादरचोद कोण रांडेचा मला पकडणार?”

“मनु, तुला जादा झालीय, तुला गाडी चालवायला जमणार नाही. चल, तुला तुझ्या घरी सोडतो.” मित्राने वाकून दोन्ही हात मनुच्या बगलेत टाकून त्याला उभं करायचा प्रयत्न केला.

“अरे हाड! दोन पेगमध्ये आऊट होणारा तर तू... तू काय मला पोचवणार?” मनुने जोरजोराने छाती पिटली. “सॉलिड कपॅसिटी हाय माझी, सॉलिड, धा क्वार्टर व्हिस्की मारली तरी पोटातलं पाणी हलणार नाय. जा.”

“मनु, तुला साधं उभं पण राहता येत नाही आहे. तुझे झोके जाताहेत.” मित्राने सत्य परिस्थिती सांगण्याचा प्रयत्न केला.

“कोण म्हणत मला उभं राहता येत नाही?” मनु झिंगत जवळच्या कारचा उपयोग करून तिच्या आधाराने हळूहळू उभा राहिला, “भडव्या चूप! जादा शाणपण्णा करू नको, माझा मी जाणार. तू तुझे काय ते बघ. चल फुट बे.”

“मर लेकाच्या,” मित्र मनुला सोडून निघाला. आपली गाडी शोधून काढून, चालू करून निघून गेला. जाताना त्याच्या गाडीच्या वाटेत, मध्ये उभा असलेला मनु आला. हेडलाईटच्या दिव्यांचा प्रकाश नकोसा होऊन मनुने मित्राला शिव्यांची लाखोली वाहिली. मनुला शिताफीने कट देऊन गाडी गेली. उरला एकटा मनु.

तश्या एका वळचणीला काळोखात उभ्या तीन आकृत्या हलल्या. सरलाने घाई करत अंगावरचा बुरखा काढून सलमाच्या हातावर ठेवला. "तुझ्या अम्मीजानला बुरख्याबद्दल धन्यवाद दे. तू रस्त्याच्या त्या टोकाला जावून लक्ष ठेव. सारा, तू त्या उलट्या दिशेला जावून लक्ष ठेव. ती ॲसिडची बाटली आण इकडं."

"ओ जीझस!" साराचा भीतीनं आवाज फुटत नव्हता. "सगळं ठिक होऊ दे. सरला, तू शुअरली त्याला भिडू शकते ना?" बाटली सरलाकडे दिली. सरलाने ती कमरेच्या वळयात खोचली. साराने हातांनी क्रॉस केला आणि ती आपल्या नेमलेल्या दिशेला धावली. सलमा गल्लीच्या दुसऱ्या टोकाला पोहोचली होती. सरलाने अंदाज घेतला. सुदैवानं मनु दरवाजापासून बराच लांब आला होता. मध्ये एक गाडी येऊन आडोसा निर्माण झाला होता.

"जय शिवाजी, जय भवानी" स्वतःला प्रोत्साहन देत सरला शिकारीकडे सरसावली. मनुच्या पुढ्यात सपसप चाबूकासारखा बेल्ट फडफडला,

"कोण बे तू आँ?" मनुने गोंधळून पाहिलं. समोर काळया पांढऱ्या चट्ट्या-पट्ट्यातली कोणी बाई उभी असल्याचं त्याला दिसलं. "साला, खरोखर जादा झाली की काय?" त्याला संशय आला. त्यामुळे त्याने जोरजोरात डोकं झटकून शुद्धीवर येण्याचा प्रयत्न केला. "आता माझा मूड नाय. उद्या ये मेरी जान," फाटकन त्याला चाबकाचा फटका बसला. "स्साली रांड!"

"मी छाया आंग्रे. परत आलेय तुझ्यासारख्या सांडांची मस्ती उतरवायला."

मनु जोरजोरात हसतच सुटला. इतका की त्याला ठसका लागला. खोकता खोकता बोलला, “तू? तू काय करणार? अरे तुझ्या सारख्या छमकछल्लौची मस्ती तर मी उतरवत असतो.”

त्याबरोबर सरलाने फटकारलेला पट्टा मनुने अध्ध्यावरच हाताने रोखत धरला. ओढला. सरला त्याची ही शिताफी बघून चकित झाली. तिचा तोल गेला. पडता पडता तिने त्याच शिताफीने त्याच्या गुडघ्यावर पाय मारून त्याला खाली पाडला.

“ए, चिटींग, चिटींग.” तो अडखळत बोलला आणि उठू लागला. तिने पुन्हा त्याला पाय मारून खाली पाडला. तो उताणा रस्त्यावर पसरला. घाई करून सरलाने ॲसिडची बाटली उघडली. आणि आख्खी त्याच्या चेहऱ्यावर ओतून दिली. चरचरल्याचा आवाज झाला. मांस जळल्याचा वास आणि वाफा उठल्या. मनु वेदनांनी जोरात ओरडला.

तोच सलमा घाईघाईने तिच्या दिशेने आली. “चल लप, एक गाडी येतेय.” सलमाने सरलाला बाजूच्या गाडीमागे ओढलं. “आंबट लप” ओरडून साराला सावध केले. एक कार येऊन रोरावत मनुच्या पुढ्यात उभी राहिल्याचं त्यांना दिसलं. गाडीखालून त्या कारमधून उतरलेल्या माणसाचे पायच त्यांना तेवढे दिसत होते. त्याने मनुला लाथ हाणली.

“व्वा! ही तर पहिल्या पानावरची बातमी आहे. आमदार पुत्राची शिकार.” बोलून तो माणूस निघाला. तोच मनुने त्याचा पाय गच्च धरला.

“सोडणार नाय तुला कश्शीच.” मनु सुरसुरला.

“हाड! मर तुझी कुत्र्याची मौत. तिच तुझी लायकी.” तो कारवाला लाथेनंच मनुची पक्कड झिडकारून निघाला.

“बाई होतीस. आता पुरूष कशी झालीस?” मनु शुद्धित नव्हता.

“कोण बाई?” प्रश्न आला.

“छाया आंग्रे?” मनु त्यापुढे काही बोलू शकला नाही. बेशुद्ध झाला. लाथांनीच मनु बोलण्यापलीकडे गेलाय याची खात्री करून तो कारवाला कारमध्ये बसून निघून गेला.

तशी कुठूनशी सारा बाहेर पडली. मनुकडे जाऊन त्याला चाचपडून पाकिट घेऊन आली. “माय गॉड! हजाराच्या नोटा आहेत सगळया.” म्हणती झाली.

## रवीची डायरी : ११ जुलै १९९५

---------------------------------

*पळता पळता अचानक छाया मला धरून दाबून एखाद्या घनदाट झुडपात लपवे. काही क्षणांची उसंत आम्हाला मिळे. त्या दरम्यान मला घट्ट स्वतःच्या अंगाशी लपेटून, ती माझे हलके चावे घेई. त्या जंगली बाईची ही प्रेम करण्याची रित फार रांगडी आणि अवेळी होती. मी पुढच्या क्षणी जिवंत असेन का नसेन? हा घोर माझ्या जीवाला लागला होता. शरीरसुखाची अशी पशुवत ओढ मला तिरस्करणीय वाटत होती. तिच्या तापल्या अंगाचे चटके मला नकोसे होत. माझ्या थंड प्रतिसादाने मग ती देखील विझल्यासारखी होई. मी उबग आल्यामुळे तिच्या शरीराच्या स्पर्शापासून माझं अंग चोरत होतो. पण भावना अनावर झाल्यासारखी ती लागटपणे माझ्या अंगावर आपलं अंग घासत राही.*

*कदाचित तिच्या मनात 'क्षण एक पुरे प्रेमाचा, मग वर्षाव होवो मरणांचा' अशी काही उलघाल होत असेलही. ती मला कळणे अशक्य होतं. एकमेकांच्या डोळ्यातले भाव वाचायला आम्ही काळोख्या सावलीत असमर्थ असायचो. तिचे अस्फुट उद्गार आणि शब्द माझ्या समजशक्तीच्या बाहेर होते. काही क्षणांची निराशा अनुभवली की ती पुन्हा मला हाताला खेचून झाडीतून बाहेर काढे. आम्ही पळायला लागू. काही वेळाने पुन्हा तिच्या मनात आशेचा जोर वाढला की ती मला झाडीत दाबे.*

*मी कमालीचा हैराण झालो होतो. माझ्या शरीरातली सगळी ताकद संपून गेली होती. तरी पाय कसे पळत होते ? ते एक आश्चर्य होतं. मन*

*आणि शरीर काही वेदना-ताण जाणवायला जणू बधिर होऊन गेलं होतं. किती वेळा मी वेलींच्या जाळ्यात पाय अडकून पडलो. कितीदा काट्यांनी ओरबाडलो गेलो. कितीदा फाटकन एखाद्या फांदीच्या मध्ये आलेल्या दांड्याने मला फटकावले. दगडामातीत आपटून चेहरा ठेचला गेला.*

*मग समुद्राची गाज खूप जवळ जाणवू लागली. रानाचा आंबूस वास उतरला. त्याच्या जागी खारा वास नाकात भणाणू लागला. पायाखाली मऊ वाळू जाणवायला लागली. धावणारे पाय त्यात सरकू लागले. रान विरळ होऊ लागलं. आम्ही समुद्रकिनाऱ्यावर पोहोचलो. चांदण्यात चंदेरी वाळू आणि लाटा लखलखत होत्या. आता आम्ही समुद्राला समांतर वाळूतून धावू लागलो.*

*लवकरच किनाऱ्यावर जाड वेलींच्या दोराने बांधून घातलेला राफ्ट माझ्या नजरेस पडला. दोर सोडवायच्या भानगडीत न पडता, छायाने तो हत्याराने कापून टाकला. राफ्ट पाण्याकडे ढकलण्यासाठी तिचे प्रयत्न सुरू झाले. मी तिला मदत करायचा फक्त आभास वठवू शकलो. माझा फुललेला श्वास मला स्वतःला पुरत नव्हता. छाती धपापत होती. राफ्ट इंचाइंचाने पुढे सरकत होता. समुद्राकडून येणाऱ्या वाऱ्याचा जोर त्याला विरोध करत होता.*

*बोमाबोईंची टोळी इथे पोहोचण्याआधी जर तो पाण्यात नेण्यात आम्हाला यश आलं, तर माझी सुटका नक्की होती. अंदमानातील आदिवासी समुद्रलांघन करत नाहीत. त्यांनी त्यासाठीचे तराफे वा नावा विकसित केल्या नाहीत, हे मला माहीत होते. छाया या राफ्टचा उपयोग करायला तयार होती, ही मोठी क्रांती होती. तिचा बंडखोर स्वभाव त्यातून स्पष्ट होत होता.*

*"बिमाबा, अवासी बँ ई ई." अंगावर शहारे आणणारे बोल झाडीतून उमटले. त्यापाठोपाठ ते उच्चारणारा बोमाबोई तरूण झाडीतून बाहेर आला. दुसरा तरूण कुठे होता कोण जाणे? त्याचे तीर संपून गेले असावेत. भाला कुठेतरी फेकीत हरवला असावा. त्याच्या हातात त्याने एक दांडा शस्त्र म्हणून धरलेला होता. तो सावधपणे एकेक पाऊल पुढे टाकत, आमच्या दिशेला जवळ येत होता.*

*"बिमाबा, ना बाईं ई ई" छायाने त्याच्या मागणीला नकार दिलेला स्पष्टपणे मला कळला. राफ्ट ढकलायचं काम सोडून ती पवित्र्यात उभी राहिली. मी तिला खुणेनं सुचवलं की राफ्ट ढकलायचे काम तिने चालू ठेवावं. मी याला काय ते बघतो. त्यावर ती जे काही हसली, माझा पुरूषी अहंकार भयंकर दुखावला. आमच्या या क्षणभर कलापाचा फायदा उठवून, त्या तरूणाने फेकलेला दगड, माझ्या कानाच्या पाळीला झेझरून पुढे उडाला. थोडक्यात निभावलं. त्या दगडाचा नेम माझं डोकं होतं. छाया माझ्या आणि त्याच्या मध्ये आली. आणि तिने मला पाठीशी घातला. कमरेचा आसूड काढून हवेत वर फडफडवला. ही तिची त्याला अखेरची सूचना होती. "याउप्पर पुढे येऊ नकोस."*

*तो तरूण जागेवर थबकला. चंद्राकडे त्याची पाठ असल्याने त्याच्या चेहऱ्यावरचे भाव मला कळले नाहीत. "बिमाबा बँ ई ई ई." मागे झाडीतून आवाज आला आणि दुसरा तरूण बाहेर पडला. आपल्या साथीदाराचा आवाज कानावर पडल्यावर, पहिल्या तरूणाला धीर आला. तो पुढे पुढे सरकू लागला. थोडं पुढे आल्यावर त्याने दिशा बदलली आणि तो बाजूला सरकून लागृला. त्याचा साथीदार शांतपणे मागून आमच्याकडे येत राहिला.*

*आम्हाला दोन दिशांनी घेरण्याचा त्यांचा विचार होता. धोकादायक जंगली जनावर ते असेच घेरत असतील.*

*आता छायाचा पवित्रा बदलला. चाबूक म्यान केल्यासारखा तिने खाली सोडून दिला. ती शांतपणे बोमाबोई भाषेत काही सांगू आणि विनवू लागली. तिच्या स्वरावरून ते जाणवत होते. बहुतेक ती त्या दोघांना त्यांच्या एकत्र आठवणीत गुंतवून टाकू इच्छित होती. सामोपचाराने ते आम्हाला जावू देतात का? म्हणून प्रयत्न करत असावी.*

*मागाहून आलेल्या तरूणावर तिच्या बोलण्याचा परिणाम जाणवायला लागला. तो पुढे यायचा थांबला. छायाने राफ्टमधले लाल-पिवळ्या दोरांचे तुकडे हातात घेतले आणि त्यांना ते तुकडे उंचावून दाखवत समजावू लागली. मी ते दोरांचे तुकडे ओळखले. डॉ. पंडितांनी बोटीवरच्या आदिवासी कैद्यांना याच दोरांनी बांधून घातले होते. म्हणजेच छायाने राफ्टचा उपयोग करून ते कैदी परत किनाऱ्यावर नेले होते. भारी डोकं! मला तिचं कौतुक वाटलं. ते दोराचे तुकडे आपल्या गळ्याभोवती धरून फास लावत असल्यासारखे छायाने आवळले. मेल्यासारखं केलं. 'ओह! बघा आपले लोक यांनी मरणार असते, मी त्यांना सोडवून आणलं.' असं काही चाललं असावं.*

*तो थांबलेला तरूण डोकं धरून खाली बसता झाला. दुसऱ्या तरूणावर छायाच्या बोलण्याचा परिणाम झाला नाही. तो त्याच्या सावकाश गतीने बाजूने वळसा घालून आता जवळ येत चालला होता. "लोईबा बँ ई ई ई" छाया ओरडली. तेव्हा बसलेला तरूण उठला आणि धावत त्या पहिल्या तरूणाकडे गेला. त्याला समजावायचा प्रयत्न करू लागला. पहिल्या तरूणाने आठमुठी भूमिका घेत त्याला ढकलून दिले. आमच्याकडे*

*किंचाळून झेप घेतली. छायाचा आसूड कडाडला. त्याच्या हातातल्या दांडक्यावर आसूडाचे वळ पडून तो दांडा हातातून सटकला.*

*पण तो तरूण इतका जवळ आला होता की सरळ छायाच्या अंगाशी भिडला. तिचे चळवळे हात हातांनी पकडायचा त्याने कसोशीने प्रयत्न चालवला. तसे ते येताच ताकदीने तिच्यामागे वळवले. तिला खाली दाबले. तिने पडून घेतले. त्यामुळे तोसुद्धा तिच्यावर पडला. दोघं एकमेकाला आवरायचा प्रयत्न करत, वाळूत गडाबडा एकमेकांवर लोळू लागले. अखेर त्याने तिला खाली पुरते दाबून, तिच्याच चाबकाने तिचे हात गुंडाळले. दुसरा हात मोकळा करून तिचा गळा दाबू लागला.*

*छायाला मदत करायला मी पुढे सरसावलो. त्याला लाथा घालू लागलो. तसा इतका वेळ नुस्ता बघत असणारा दुसरा तरूण येऊन मला खेचू लागला. त्याने मागून माझ्या दोन्ही काखांतून हात घालून, माझ्या मानेमागून दाबायला सुरूवात केली. मला अधांतरी वर धरल्यामुळे, माझे हात-पाय अधांतरी फडफडू लागले. छायाचं आणि पहिल्या तरूणाचं काय चाललंय, मला दिसत नव्हतं.*

*“लोईबा ईना.” छायाचा थंड आवाज आला आणि आसूड फडाडला. मला धरणाऱ्या तरूणाने सोडून दिलं. तो हेलपाटत दूर झाला. आलटून पालटून वाळूत थंडगार पडलेल्या आपल्या साथीदाराकडे, आसूड घेवून उभ्या छायाकडे आणि माझ्याकडे पाहू लागला. आसूड फडफडवून छाया त्याच्यावर खेकसली. तो मागच्या मागे पसार झाला. छायाच्या हातून आसूड गळून पडला. अतीव दुःखाने तिने वाळूत मरून पडलेल्या तरूणाकडे पाहिलं. आपल्या रोजच्या जीवाभावाच्या माणसाला ठार करायचं दुःख! एका परक्या माणसासाठी.*

*मी राफ्ट पाण्याच्या दिशेने ढकलायच्या कामाला लागलो. त्याचा आवाज ऐकू गेल्यावर ती भानावर आली. ढकलायच्या कामाला मदतीला आली. हळूहळू राफ्ट पाण्यात पोचला. मी त्या मरून पडलेल्या तरूणाशेजारचा दांडा घेऊन आलो. राफ्टमध्ये बसलो. पाण्यात पडल्यावर अगदी हलका झालेल्या राफ्टला छाया पाण्यात पुढे ढकलू लागली. पायापासून जमीन सुटल्यावर तेवढ्यावर थांबली. मला निरोप द्यायला तिने हात उंचावला.*

*मी राफ्ट पुन्हा हात मारून तिच्याकडे नेला. तिचा हात धरला. तिला खुणेने राफ्टमध्ये चढ सांगू लागलो. ती माझा हात सोडवून घ्यायचा प्रयत्न करू लागली. जर तिला तो खरोखर सोडवून-घ्यायचा असता, तर तेवढं बळ तिच्यात नक्की होतं. मला कळत होतं. हे सुद्धा कळत होतं की शत्रूला सोडवून पळून जायला मदत केल्याबदल्यात, बोमाबोई तिला जिवंत सोडणार नव्हते. त्यांच्यातल्या एकाला त्यासाठी ठार करायचा, जघन्य अपराध केल्यानंतर तर कसेच नाही. हे कदाचित तिला सुद्धा कळत असावे. तिला मरायला सोडून, मी एकटा माझा जीव वाचवून पळणार नव्हतो. माझा हात झिडकारून ती किनाऱ्याकडे धावली. मी राफ्टमधून उडी घेतली. तिच्यामागे धावलो. तिला अर्ध्यावर रोखले.*

*समोर झाडीतून प्रचंड गर्जना करत बोमा बोई बाहेर पडले. आमच्या दिशेने येऊ लागले. छाया मला पाण्यात 'राफ्टकडे जा' म्हणून ढकलू लागली. मी हट्टीपणे तिथे उभा राहिलो. अखेर ती माझ्या डोळ्यांना डोळे भिडवून डोकावून बघत राहिली. सपकन् एक बाण येऊन माझ्या दंडात घुसला. त्याबरोबर माझा हात खेचून, ती राफ्टकडे पोहत निघाली. एक हात तिच्या हातात ठेवून मी दुसऱ्या हाताने पोहू लागलो. आम्ही*

*राफ्टमध्ये शिरतो तोपर्यंत एक-दोन भाले राफ्टवर येऊन पडले. त्यांचाच उपयोग करून आम्ही राफ्ट समुद्रात बोमाबोईंच्या माऱ्यापलीकडे न्यायचा प्रयत्न करू लागलो. आत पुरेसे समुद्रात गेल्यावर मी मागे वळून पाहिले.*

*किनाऱ्यावर बोमाबोई त्यांचे भाले एकसामाईकपणे वाळूत ठोकून गात होते. ते आम्हाला निरोपगीत होते, शापगीत होते की कसे? मला कळत नव्हते. जिला कळत होते, तिच्याकडे मी पाहिले. किनाऱ्याच्या दिशेने पाहणारा तिचा चेहरा चंद्रप्रकाशात उजळला होता. डोळ्यातून पाणी खळत होतं. आपल्या जन्मभूमीपासून, आपल्या लोकांपासून होत असलेल्या कायमच्या ताटातुटीने, त्या दुःखाने तिचा चेहरा पिळवटला होता.*

*मी शांतपणे किनाऱ्यापासून दूरच्या दिशेने राफ्ट वल्हवत राहिलो. किनाऱ्यावरची माणसं पार नजरेआड होईपर्यंत ती त्यांना आणि ते तिला न्याहाळत राहिले. हळूहळू राफ्ट समुद्रातल्या आतल्या प्रवाहात ओढला गेला. आपणहून लांब जावू लागला. तसं मी आंबलेलं थकलेलं अंग, धाडकन आडवं टाकून दिलं, छाया माझ्या अंगावर कुशीत रेलली. या तिच्या स्पर्शात कसली वासना नव्हती. होतं ते घर हरवलेल्या मुलीचं आधारासाठी धडपडणं.*

---

"पुढची पानं कुठेत?" साराने डायरी चाळली. "ओ गॉड ! इथं आता एकदम वीस ऑगस्टची एन्ट्री आहे." सलमाने साराच्या हातातली डायरी काढून आपल्या हातात घेतली. "इन्शाल्ला! मधली मधली काफी सारी पानं गायब आहेत."

त्यातली काही विलग झालेली तिनं हाताने उचलून, डायरीतून काढून मैत्रिणींना दाखवली. “बिल्कूल बेकार का बाईडिंग यार.”

खाली सटकलेली दोन पानं, सरलानं उचलून परत डायरीत कोंबली, “आंबट, मॅडमच्या त्या ड्रावरमध्ये बाकीची पानं पडलेली असणार.” हातांनी डोळयांवर रूळणारे केस उडवले. “अगं कळलं ना तुला, मला काय म्हणायचंय?”

“सॉरी तिखट, माझ्याकडे टेलिपथी नाही. पण बेबी तुला जर असं म्हणायचं असेल, की मी पुन्हा तिथं जावू आणि त्या गॉडझिलाच्या समोर, तिच्या ड्रावरमध्ये असलेली पानं काढून आणू, तर नो, नॉट, नेव्हर.” साराने तिच्या कुरळया बटा डोळयावर ओढल्या.

“माझ्या लाडके, तुला तर तसं पण धुरंधर मॅमला भेटायला जायचंच आहे. कालची अधुरी राहिलेली तुमची प्रेमभेट? तुला आज पुरी करायचीच आहे. मी काय म्हणते, जरा प्रयत्न करून बघायला, हात मारून बघायला काय हरकत आहे?” सरलाने तिची हनुवटी एका हाताने धरून, दुसऱ्या गालावर हलकी टिचकी मारली. “आंबट बाय, तुझी हात की सफाई आम्ही काल बघितली हाय.”

“ओ दॅट! बेबी, ते पैसे मी सुमनसाठी घेतलेत. तिच्या इलाजाची सोय करायला. नथिंग मोअर.” साराने लटक्या रूसव्याने चेहरा वळवला. “आम नॉट लोफर.”

“अमा यार, तुम भी? भिंतीला पण कान असतात. छोडो ये डायरी वायरी का चक्कर. काल आपण रातभर बाहेर होतो कोणाला कळायला नको, म्हणून मी

तुम्हा दोघींना लवकर उठवलं. तर बसल्यात डायरी वाचत." सलमा वैतागली. "चलो, झटपट तयार होके बाहेर पडू. कोणाला कसला संशय नको."

"येस, येस, येस. गोड, यू आर बॉस. तू जे म्हणशील ते. आपल्या सगळयात जास्त ब्रेन तर तुलाच आहे." साराने मखलाशी केली. "तिखट बेबी, पयला माझा नंबर बाथचा. काल रात्री तुझा रंग धुवून काढताना, तुझी आंघोळ तर झालीच आहे. आणि मग बाथरूमच्या टाईल्सवरचा रंग धुवून काढताना, गोडची पण आंघोळ झालीच आहे."

"अल्ला! या पोरीला अक्कल देताना इतका कंजूष का झाला ? अरे क्या बार-बार कालची बात बोलते? जरा जबानला लगाम दे. ऐसा समज, काल काय झालंच नाही. विसरून जा तो सगळा माजरा." सलमा वैतागली. "और तो सुमनवाला सगळा पैसा, तिखटकड़े दे. ती सुमनला देऊन येईल. रोज रोज आपण तिला भेटायला गेलो, तर लोकांच्या नजरेवर येईल."

"काय तू गोड? इतक काय भ्यायचं? कोणाला काही कळणार नाही. तू उगाच चोराच्या मनात चांदणं तशी घाबरून जाऊ नकोस." सरला सलमाला समजावू लागली. "काल आपण रात्री मेसमध्ये न जेवता, बाहेर जेवायला गेलो. नऊ वाजता परत आलो आणि झोपी गेलो. ना मुग्धाबद्दल आम्हाला काही माहिती ना मनु शर्माबद्दल. चला रोजच्या कामाला लागा. दुपारी परत लंचच्या आधी रूमवर भेटू."

---

दारावर खटखट झाली. “मी आहे.” सरलाने बाहेरून ओळख दिली. तशी सारा पलंगावरून उठली आणि तिने दाराची कडी काढली. सरला उतरलेल्या चेहऱ्याने आत आली. रूमालाने गळयावरचा घाम टिपत, हाशहुश्श करत पंख्याखाली विसावली.

“व्हॉटस् मॅटर बेबी? तू इतकी अस्वस्थ का?” साराने तिला विचारलं.

“कोणाला शक झाला काय गं आपला?” सलमा धास्तावून पूढे झाली.

“नाही गं तो विषय नाही.” सरलाने डोळे थकव्याने मिटून घेतले. “कालच्या जागरणाचा थकवा जाणवतोय आणि....”

“ॲन्ड वॉट?” साराने बिछान्यावर लोळण घेत विचारलं.

“अगं ते पैसे, मनुचे गं,” आवाजाची पट्टी एकदम खाली आणत सरला कुजबुजत्या आवाजात बोलू लागली, “ते सुमनला कसे द्यायचे, ही मोठी गडबडच झाली.”

“यॉनी के?” सलमाने त्या दोघींच्या शेजारी पलंगावरील रिकाम्या जागेत लोळण घेतली.

“आपण ते कुठून आणले म्हणून सांगणार? आपली तंगी तर सगळयांना माहीत आहे. आपल्यासारख्या भुक्कड पोरी, एकदम इतके पेसे उचलून मदतीला देतात म्हणजे गडबडच दिसणार.” सरलाने खुलासा केला.

"ओके. नो प्रॉब्लेम." सारा आपल्या कुरळया बटेशी खेळू लागली. "ते पैसे कसे खर्च करायचे, याचे खूप सगळे प्लॅन्स् माझ्याकडे रेडी आहेत. तिच्या डोळयांपुढे स्वप्ने तरळू लागली. "सुमनच्या नशिबात पैसा नाय तर नाय."

"बकवास बंद. ए लडकी, ते पैसे आपण आपल्यासाठी वापरले. तर आपण चोर ठरू." सलमा एक हात गालावर टेकत विचार करू लागली.

"टेक इट इझी गोड. चोरी जोपर्यंत पकडली जात नाय, तोपर्यंत ती चोरी ठरत नाही. आपण तो मनी असा स्मार्टली वापरायचा, की कोणाला पन सस्पेक्ट होणार नाही." सारा हातावर हात चोळू लागली.

"गप्प गं, आपलं तर आपल्याला माहीत असणार ना?" सरलाने अंग शहारवलं, "मला नाही आवडणार स्वतःला चोर म्हणायला."

"तुने मेरी मुँहकी बात छीन ली तिखट." सलमाने तिला दुजोरा दिला.

"आणि ते पैसे आता आहेतच कुठेत? मी ते सुमनच्या उशी खाली ठेवून आले गुपचूप." सरलानं खबर दिली.

"अल्ला. ही एक पोरगी बिनडोक आपल्यात होती. आता तू सुद्धा अक्कल बेचके खा गयी?" सलमानं हातांनी डोकं बडवलं. "अमा तिखट, ते पैसे दुसऱ्याच कोणी भलत्या-सलत्यानं तिथून उचलले तर? समझो हॉस्पिटलवाला वॉर्डबॉय नायतर नर्सनं सफाई करताना नेले तर?"

“माय गॉड! मी इतक्या मेहनतीने पैसा जमवून आणायचा आणि तू तो असा फेकायचा? धिस इज टू मच तिखट.” सारा.

“ए, कसली मेहनत आंबट? आणि कोणाची अक्कल गं गोड?” सरला भडकली. “तुम्ही दोघी तिथं हव्या होतात. मग कळलं असतं. एकतर तो पोलिस इन्स्पेक्टर तिथं चौकशीला उभा होता. तो कमी की काय? दूसरा एक पेपरवाला रिपोर्टर पण बातमी काढायला आला होता. तो तर सरळच तिला विचारत होता की मनु शर्मानंच तिच्यावर ॲसिड फेकलंय काय? म्हणून…”

“काय सांगते काय? वो मनु इतका गधा होगा क्या, हर एकाला सुमनवर ॲसिड फेकलं सांगत फिरला?” सलमाला नेहमीच जगातल्या लोकांच्या बिनडोकपणाचं आश्चर्य वाटायचं.

“लेट इट गो डियर. पैसा काय येतो आणि जातो.” डोळे मिटून ते दुःख पचवत असल्यासारखी सारा बडबडली. “पैशामुळं आपल्या फ्रेंडशिपमध्ये अंतर पडता नये.” तिनं आपला हात पुढे केला.

“अगं, मी तसं कधी म्हटलं?” सरला वैतागली.

“कुछ भी हो तिखट, या आंबटची ऐसी आदत आहे बुरी. काय पण बोलणार.” सलमा सुद्धा सारावर घसरली,

“मुलींनो झालं ते झालं. पाठी बघून काही उपयोग नसतो. आपण नेहमी पुढे बघायला हवं. आता पुढच्या वेळी माझा चान्स, हां! मी बनणार छाया.” उठून उभं राहत साराने चाबूक फडकवल्यासारख केलं.

“पुढची वेळ? आता अजून कोणाला धडा शिकवायचाय? गं पोरी फार उडू नकोस. आपलं गुपित उघड पडलं ना, तर आपलाच गेम होईल.” सरलाने हातातली उशी सारावर फेकून मारली. तिनं उशी चुकवली.

“बिल्कुल दुरूस्त. दर वेळी नसीब साथ देणार, ऐसा नही. काल बारमधून एकाएक कोन बाहेर आला असता तर? त्या मनुच्या मदत वास्ते बीचमें येता तर? आपण काय जॅकी चॅन माफिक कराटेवाल्या आहोत का?” सलमा उसासली. “आज तक त्या कडू पाटीलची दादागिरी कधी मोडता आली नाही.”

“ओफ! जसं काय कडू पाटील सुपरमॅन आहे? तिच्या पैसेवाल्या फादर-ब्रदरचा तिला सपोर्ट नसता ना, तर मी कधीच तिची चटणी केली असती चटणी. सॅन्डविचमध्ये भरून खाऊन टाकली असती तिला.” साराने फुदकत कमरेवर हात ठेवले.

“आता सांगणार असते, साली ड्रामेबाज.” सरलानं शिवी घातली.

सारानं आपल्या पर्समधून मेकअपची डबी खोलून एक कागदाची सुरळी बाहेर काढली. “ही बघा. कोणाकोणाला धडा शिकवायचाय, त्याची मी हिटलिस्टच तयार केलीय.”

“हाय मै मर जावाँ. तुझी कोणा कोणाबरोबर झोपायचंय, त्याची विशलिस्ट तर आम्हाला माहीत होती. ये और क्या गजब तुने कर डाला?” सलमाच्या या बोलण्यावर सरलाला हसू आवरता येईना.

“यादी तू नाही, मी बनवणार.” उघड्या दारातून खणखणीत उच्चारले गेलेलं वाक्य ऐकू आलं. तिघी सटपटल्या. एक हडकुळा उंच खप्पड गालाचा माणूस होता तो. सोनेरी फ्रेमचा चष्मा लावलेला. फ्रेन्च कट दाढी राखलेला. काळी पॅन्ट-पांढ़्या शर्टचा औपचारीक वेष केलेला. त्याचे पांढरे झालेले केस त्याची चाळीशी पार झाल्याची चुगली करत होते. त्याने आत शिरून मागे दार खिट्टी लावून बंद केल. “पोरींनो, अशा गोष्टी दार उघडं ठेवून बोलायच्या नसतात. माफ करा. आपण कुठपर्यंत पोहोचलो होतो? हां. यादी मी बनवणार आणि त्यात ज्याची नाव असतील, त्यांची त्यांची शिकार तुम्ही करणार.”

“कोन तू?” सलमा.

“तुझा काय संबंध?” सरला.

“डॅम यू. माय फूट.” सारा.

“काल मी रंगिला रतनच्या बाहेर, एका खुडबुड्या खबरीच्या मागावर रात्री बारापासून होतो. पण रात्री दोन वाजता तर मला जॅकपॉट लागला. जरा हे वाचा. म्हणत त्या माणसानं तिघींच्या अंगावर वर्तमान पत्राच्या प्रती फेकल्या. ती वेगवेगळी वार्तापत्रे होती. तिघींनी त्यांच्यावरचे, पहिल्या पानावरचे मथळे वाचले.

“छाया आंग्रे इज बँक. अ डार्कर शॉडो इन डार्क नाईट, बी अवेर यू स्कॉऊन्ड्रल्स.” सारा.

“सच या चमत्कार? भुतनीने लिया बदला. रंगिला रतन मनु शर्माकी कहानी उसीकी जुबानी.” सलमा.

“न्यायाचा चाबूक, कायद्याच्या कचाट्यातून सुटलेल्या गुन्हेगारांच्या पाठीवर, पुन्हा एकदा फडफडणार. फटकेवाली परत आली.” सरलान एक मथळा वाचून, ते वार्तापत्र त्या माणसावर उठवलं. “यात आमचा काय संबंध?” तिखटपणे विचारलं.

“तर सगळ्या शहरभर आज एकच चर्चा चालू आहे. ही छाया आंग्रे कोण? कोण आहे ही फटकेवाली? मनुच्या आमदार बापाने तर तिच्याविषयी काहीही माहिती देणाऱ्याला, कळवणाऱ्याला एक लाख रूपये बक्षीस जाहीर केलंय.” त्या माणसानं तिघींनी त्याच्यावर परत फेकलेली वार्तापत्रे, शांतपणे गोळा करता करता उत्तर दिले.

“ओ रिपोर्टर, तुम्ही चुकीच्या जागी आलात. आम्हाला यातलं काही ठाऊक नाही.” त्या माणसाला तितक्याच थंडपणे उत्तर देऊन, सरलानं आपल्या मैत्रिणींना त्याचा परिचय दिला. “हे आज सकाळी सुमनच्या तिथं पत्रकार म्हणून हजर होते.”

“माफ करा जनाब. इथे आपल्याला काही खबर मिळू शकणार नाही. हे लेडिज हॉस्टेल आहे. इथं पुरूषांना प्रवेश नाही. आपली बेअब्रू होण्याआधी तश्रीफ

ले जाईए.” सलमानं देखील त्याच थंडपणे सुनावलं. दाराकडे इशारा केला. मागोमाग, साराने जाऊन दार उघडले.

“अरे, मी सांगायला विसरलो की मी एक धडाडीचा माणूस आहे. समोर घडलेल्या चित्तःचक्षुर्वैसत्यम गोष्टीमागचे गूढ उकलण्यासाठी मी वाटेल ते धाडस करतो. तशी गरज भासली तर चाबूकवाल्यांचा त्यांच्या परतीच्या मुक्कामापर्यंत पाठलाग करतो. रात्री तीन वाजता लेडिज हॉस्टेलवर परतायला परवानगी असते का? आपल सहज कुतुहल म्हणून विचारतोय.” तो माणूस मानभावीपणाचा उत्कृष्ट नमुना होता.

“ऑल यू से इज लाय. आम्ही नाकारतो हे सगळं. तुझ्यासारख्या भानगडबाज माणसाला कोण बिलिव्ह करणार?” साराने अक्कडबाजपणे सुनावलं. “सो बेटर यू गो.” दार खडखडवलं.

“पोलीस विश्वास ठेवतील की नाही त्यांचा प्रश्न. पण मनूचा बाप ठेवेल. त्याच्या हाताखाली कोल्ड ब्लडेड गुंडांची फौज आहे. मला नाही वाटत ते तुम्हाला साधं सरळ मरण देतील.” तो माणूस बेरकेपणानं बोलला. “मला वाटतं, आता तुम्ही हे उघडलेल दार लावून घ्यावं. कारण आपल्याला काही गोष्टी प्रायव्हेटली बोलायच्या आहेत. मिस सारा डिसोझा. त्या बंद दाराआडच बोलल्या जातात.”

आपलं नाव ऐकून साराच्या भुवया ताणल्या गेल्या. मग दोन्ही मैत्रिणींकडे पाहत, नाइलाज झाल्यासारखे खांदे उडवून तिनं दार बंद केलं.

"तुला काय हवंय? तू इथं का आलायस?" सरलानं त्याच्याकडे धारदारपणे रोखून पहात विचारलं.

"हा फोटो बघा." खिशातून एक पासपोर्ट साईज फोटो काढून त्यानं तो तिघींना दिसेल असा समोर धरला. "नीट बारकाईने बघा. हा माझा धंद्यातला प्रतिस्पर्धी आहे. मला हा जगातून नाहीसा व्हायला हवाय."

"आय डोन्ट गेट. याचा अर्थ काय?" सारा तणतणली.

"सोप्पं आहे. आज रात्री फटकेवालीचा घाला याच्यावर पडेल. आणि जगातून एक भुईला भार झालेला माणूस कायमचा नाहीसा होईल." तो उत्तरला.

"यू मीन मर्डर? खून!" सारा चिरकली.

"ओ येस. पोरगी शहाणी आहे. दिसते तितकी बुद्ध नाही. वा!"

"तू खुनाच्या सुपाऱ्या वाटतोस काय रे?"

"अरेच्या! हे चांगलं बिझनेस प्रपोजल आहे. मी तुमचा एजन्ट बनायला तयार आहे. मी सुपाऱ्या आणायच्या. तुम्ही त्या फोडायच्या. माझे कमिशन वजा जाऊन तुम्हाला तुमची फी मिळेल. पण सध्या ही पहिली सुपारी तुम्ही फुकट फोडायची."

"तुम्हाला काही गलतफहमी झालीय. आम्ही तसल्या मुली नाही आहोत. सुमन आमची जीवाभावाची मैत्रिण होती. तिच्यावर अन्याय करणाऱ्याला धडा मिळावा, इसलिए जैसा समझमें आया आम्ही केला. खुदा का वास्ता आम्ही बाकी

इतर सीधेसाध्या मुलींसारख्याच आहोत. माफ करा. यह आमच्या बसकी बात नहीं."

"तुम्ही तसल्या मुली नसाल. हरकत नाही. पण आता तश्या बना. त्याशिवाय तुम्हाला पर्याय नाही. हा असा मार्ग आहे, जिथं फक्त पुढेच जाता येतं. मागे वळता येत नाही."

"फॉर झीजस! आम्ही तुमच्या पाया पडतो. आम्ही पुन्हा तसलं काही करणार नाही. वुई स्वेअर, आम्हाला सोडून द्या. प्लिज. तुम्ही तर सोसायटीच्या वेलबिईंगसाठी काम करणारे रिपोर्टर."

"मुलींनो गलतफहमी तर तुमची काही झाली आहे. मी रिपोर्टर आहे म्हणजे तो सोसायटीच्या वेलबिईंगसाठी झटणारा पत्रकार नव्हे. माझा मुख्य पेशा आहे ब्लॅकमेलिंगचा. प्रेसचा शिक्का तर बस्स त्यासाठीचं एक हत्यार आहे. माफ करा. पण दया माया असले काही माझ्याकडे नाही. मी एक सेन्ट परसेन्ट पूर्ण धंदेवाईक माणूस आहे."

"प्लिज सर, आय प्लिड यू... आय बेग यू."

"आंबट, नको पाया पडू याच्या. मी त्याला पुरेपुर ओळखला. तर पत्रकारराव, जर खून पाडल्याशिवाय आमची सुटका नसेल, तर मग पहिला तुमचाच पाडायला काय हरकत आहे? नाही का? कायमचा घोर संपला."

"नाही. नाही. तुम्ही तश्या मुली नाहीत."

“अल्ला जाने, नाही. पण तू वैसी बनाने अडे हो.'

“राईट सेड.. छायाला वेळ पडल्यावर आपल्या माणसाचा बळी घ्यावा लागला. फॉर वॉट इज राईट, न्यायासाठी योग्य ते करायला आम्ही रेडी.”

“ठिक आहे. मी तर समजत होतो, या पोरी अजून अंड्यातून पण बाहेर आल्या नाहीत. उडायला लागल्यात रे. पण अजून दुनियेत खूप काही बघायचं तुम्हाला बाकी आहे.” बोलता बोलता त्याने खिशातून पिस्तुल काढलं. मात्र तीन बाजूंना उभ्या तिघींवर तो एकावेळी लक्ष ठेवू शकला नाही. सलमानं उचलून मारलेली खुर्ची पाठीमागून त्याच्या डोक्यात बसली.

# रवीची नोंदवही : २० ऑगस्ट १९९५

-------------------------------------------

*छायाचं काय करावं हे कळेनासं झालंय. आज सकाळी कामवाल्या गंगाबाईंनी खूप चिडचिड व्यक्त केली. रोज रोज गवत आणि पानांचा पसारा साफ करण्यात त्यांचा तासभर मोडतो. कधी कपाटाच्या छतावरून, कधी बाल्कनीतून, कधी जिन्यावरच्या माळ्यावरून. छाया रोज रात्री झोपण्यासाठी स्वतःचा हा गवतपानांचा बिछाना तयार करते. दोन महिने झालेत तिला मुंबईला आणून. अजून तिला पलंग, वा बिछाना वा चटईशी जमवून घेता येत नाही. ताजा हिरव्या पाना-गवताचा गुंतावळा हवा जातो. आजूबाजूचे बहुतेक बंगलेवाले बोंबा मारत आहेत ते वेगळे. ही ताजी हिरवाई त्यांच्याच बागांमधून आणि कुंड्यांमधून छायानं लांबवलेली असते. छायाला थेट अडवायचं साहस कोणात नाही. मग गाऱ्हाणं घातलं जातं ते माझ्याकडे. आई बाबा तसं कोणी आलं की कानांवर हात ठेवतात. रवीनं तिला आणलीय. त्यालाच काय ते सांगा.*

*छायाला काही सांगायला समजावयाला जावं, तो तिची समजूत पटत नाही. यात काय वाईट वा चुकीचं आहे तिला आकळत नाही. इथे झाडांवर-पानांवर ज्याची त्याची आपली खाजगी मालकी आहे, ही बाब छायाला पटत नाही. रूचत नाही. पचत नाही. खूप कटकट केली तर मग रागाने जवळच्या एखाद्या झाडावर रात्र काढते. पण मुंबईसारख्या*

*महानगरात तिला हवी असलेली झोपेसाठीची शांतता मिळणं दुरापास्त. तिची चिडचिड होते.*

*या शहरी जीवनाशी जुळवून घेणं, छायासारख्या आदिवासी स्त्रिला अशक्य झालंय. सकाळी उठल्यापासून रोजचे देहविधी आटपायचे, तरी तिला आणि बाकी सगळ्यांना असा दुहेरी मनःस्ताप असतो. शेजारच्या शिरीन आंटी सकाळी ज्या काय घुश्श्यात माझ्या अंगावर आल्या. छाया त्यांच्या अंगणातली हिरवळ उसकून, त्यात खड्डा करून, एखाद्या मांजरीसारखी हगून ठेवते. वरून थोडीशी माती लोटून ठेवते. आज सकाळी आंटीचा त्यात पाय गेला. श्यॅ श्यॅ ! आईनं वर्णन ऐकून उलटी केली.*

*छायाला जर विचारलं की बाई तू संडासात का जात नाहीस? तर तिचं म्हणणं असतं त्या पांढऱ्या भांड्यात, चार भिंतीच्या घुसमटीत तिला श्शी कशीच होत नाही. बरं लोकांचं नको, आमचंच अंगण उकर म्हणायचं, तर आमच्या बंगल्याचं बहुतेक सगळं आवार फार वर्षांपूर्वी सिमेंटनं फरसबंदी केलेलं आहे.*

*दात घासणं तिला माहीत नाही. बाबांनी बाभळीच्या काड्या चावायला आणून दिल्या. तर म्हणाली, “मी काय माकड आहे?” आंघोळीचं वेगळं कवतुक आहे. पलीकडच्या पात्रावालांच्या बंगलीत एक कारंजाचा हौद आहे. तिथं सगळ्यांसमोर हवं तेव्हा बिनकपड्यांची डुबकी लगावत असते. पात्रावालाचा याला काही आक्षेप नाही. त्याचा नाही म्हणूनच त्याच्या बायकोचा आहे. ती बाई सुद्धा सकाळी थयथयाट करून सांगून गेली. तिच्या नवऱ्याला छायाच्या पाठीवर माती घासताना तिने रंगेहात पकडलं म्हणे.*

छायाला विचारलं, तिला त्यात काय वावगं कळत नाही. “तो मला मदत करतो, तर मी कशाला नाही म्हणू?” असं छायाचं म्हणणं पडलं. पाणी, जमीन, एखाद्याचा स्पर्श सुद्धा, ह्या सामाईक नव्हे तर खाजगी मालकीच्या गोष्टी आहेत, असं सांगितलं की छायाला फार राग येतो. “किती उलट्या चालीचं जग आहे तुझं.” असं ती मलाच उलटं सुनावते. हा तर ज्याची त्याची मालकी अडवून बसलेल्या, या मालक लोकांचा बाकींच्यावर अन्याय आहे म्हणते. तिच्या तोंडून अन्याय शब्द ऐकला की माझ्या काळजात चरचरतं. छायानं आपल्या पद्धतीनं त्या अन्यायाचा समाचार घेणं, आम्हाला परवडणारं नाही.

सकाळची कौतुकं संपत नव्हती. तो दुपारी बारा वाजता शिरीन आंटीचा मुलगा झेबू धावत आला. माझगावची आख्खी माथरपाखडी त्यांच्या टेरर जिमी कुत्र्याला घाबरते. पण छायानं त्या कुत्र्याला हातोहात पळवला. त्या कुत्र्याला वाचवा असं झेबू हाफत सांगू लागला. माझ्या हृदयानं एक जोरदार उसळी घेतली. मागे रस्त्यावरचा एक भटका कुत्रा छायानं फाडून खाल्ला. जिमीचं तसं काही होण्याआधी, त्याला वाचवण्यासाठी, झेबू हायहुय करत नुस्ता नाचत होता. जिमीची आता फक्त हाडंच उरली असतील, या कल्पनेनं शिरीन आंटीला घेरी आली होती. तिच्यासाठी रूस्तमला, तिच्या नवऱ्याला रूग्णवाहिका बोलवावी लागली.

झेबूचा धावा ऐकताच घरातले आम्ही चार जण, चार दिशांना जिमीच्या शोधासाठी पांगलो. मी आणि झेबू मागच्या दारी. बाबा पुढच्या दारी. आई गच्चीवर. गंगाबाई पात्रावालाच्या बंगलीकडं. मागच्या आवारातलं दृश्य असं होतं. जिमीचे चारी पाय एकत्र करून बांधलेले होते. त्याला झोपाळ्याच्या वरच्या दांडीला उलटा टांगून ठेवला होता. तो कुई कुई

*करत होता. शिरीन आंटीने भरपूर पैसे मोजून सांभाळलेली, त्याची उंची मऊमऊ झालदार आयाळ, छाया धारदार वस्तऱ्याने उतरवत होती.*

*मला बघताच खुशीचं हसली. म्हणाली की याला मी आता साफसूफ करून ठेवते. मग रात्री भुकेच्या वेळेला लगेच ताजा खाता येईल. मी जिमीला सोडवायला गेलो. जिमी आमच्यावर गुरगुरायला लागला. छायानं सरळ त्याच्या तोंडात पानाचा बोळा कोंबला. मी तिला समजावयाचा प्रयत्न केला की हा कुत्रा शिरीन आणि झेबूचा आहे. त्यांचा त्यांना परत देऊन टाक. छायानं विचारलं म्हणजे हा कुत्रा शिरीनची पारध आहे का? प्राणी पाळले जातात. केवळ आवड म्हणून. हे समजणं तिच्या कुवतीबाहेर होतं. मी हो म्हटलं.*

*त्यावर छाया मोकळेपणाने म्हणाली की मग मी तिला याच्या बदल्यात दोन कुत्रे पारध करून आणून देईन. इथं कुत्र्यांची काही कमतरता नाही. फक्त शिरीनला नव्हे, सगळ्यांनाच त्याच्यात वाटा देईन. गेल्या वेळी सुद्धा कुत्रा खाल्ला, तेव्हा तिने एकटीने खाल्ला नव्हता. प्रत्येक शेजारघरी त्याचा काही ना काही वाटा नेवून दिला होता. हो की नाही? छायानं झेबूची साक्ष काढली. झेबूने अंग शहारलं.*

*“रे, ये बायडी छे, के काली अमवासना काला भूत?” झेबूच्या या प्रश्नाला माझ्याकडं उत्तर नव्हतं. शिरीन आणि झेबूला हाच कुत्रा परत पाहिजेय असं मी मोठ्या मिनतवारीनं छायाला पटवू शकलो. नाराजीने अखेर छायानं जिमीला झेबूच्या स्वाधीन केला. छायासमोर भुंकायची जिमीची हिंमत झाली नाही. थोड्या वेळानं त्याचं मोठमोठ्यानं भुंकणं कानी आलं. घरी पोचल्यावरच्या कागाळ्या होत्या त्या.*

*आम्ही जरा या घोरातून हाश हुश्श करतोय, तो स्वैपाकघरातून आचारी भोलाराम तक्रार घेऊन आला. बाजारातून आणलेले दहाच्या दहा नारळ छायानं गायब केले होते. नारळ आणले की त्यातले काही फोडून ती मटकावते. उरलेले ठेचून त्यांचं दूध काढून अंगाला फासते. अंदमानमधला हा एकच खाद्यपदार्थ तिला इथं मुंबईत मिळतोय. बाकी तिची उपासमार चालू आहे. शिजवलेलं अन्न तिला माहीत नाही. आवडत नाही.*

*बाजारातून आणलेले मासे बर्फात शिळावलेले असल्यामुळे, क्वचित कधी नाइलाजाने छाया खाते. ते देखील कच्चे, त्यांचे खवले, आणि काटे मग तसेच स्वैपाकघराच्या फरशीवर पडलेले असतात. ते साफ करायचं काम ज्या मांजरी करत, त्या हल्ली कुठे दिसेनाश्या झाल्यात. तेव्हा हे साफसफाईचं जास्तीचं त्रासदायक काम भोलारामवर पडतं. आणलेली भाज्या आणि फळं छायानं आधीच उडवलेली असली, तर ऐनवेळी रांधा-वाढायच्या वेळी त्याची फार पंचाईत होते. हल्लीच्या हल्ली हॉटेलातून मागवल्या जाणाऱ्या, पार्सलांच्या पुडक्यांचा खप आमच्या घरी दामदुप्पटीने वाढलाय. आम्ही बाहेर शिजवलेलं अन्न मागवून घरी खाणं, हा पूर्वी भोलारामला त्याच्या पाककौशल्याचा अपमान वाटायचा. आताशी तोच फोनवरून ऑर्डर देऊन मागवून घ्यायला लागलाय. मग आईचं आणि त्याचं वाजतं.*

*छायाच्या खाण्यापिण्याच्या सवयींचा सगळ्यात मोठा धसका माझ्या कॉलेजच्या विद्यार्थी-विद्यार्थीनींनी घेतलाय. शंका निरसनासाठी माझ्या घराकडे येणं त्यांनी आता बंद केलंय. छताला टांगलेल्या झुंबरावर वा पंख्यावर झुलत बसून खाण्या-पिण्याची वाईट खोड छायाला जडली आहे.*

*पूर्वायुष्यातला फांद्यांवर झुलत खाण्याच्या सवयीचा हा अनुशेष असावा. त्या खाण्यात बाहेरून कोणाच्या झाडापेडांवरून उचलून आणलेल्या अळ्या, टोळ, किडे, किटक, झालंच तर सरडे, बेडूक काहीही अभक्ष्य असू शकतं.*

*विमला मुखर्जी सोफ्यावर चहा घेत असताना, अचानक तिच्या कपात काही हिरवे थेंब वरून गळून टपकले. साहजिकपणे तिची नजर वर गेली. तिला जे काही दिसलं, त्या धसक्याने पुढे आठवडाभर तिने ताप काढला. तो साप छायानं कुठून शोधून आणला होता तिला ठाऊक. तसं एका परिने बरं झालं. अंदमानवर पीएचडी करायचा आणि त्यासाठी मला गाईड बनवायचा, विमला मुखर्जीचा बेत तिनं रद्द केला. त्या गळेपडू मुलीपासून माझी सुटका झाली.*

*आताशा आमच्या घरी येणं-जाणं अनेक लोकांनी हाय खावून सोडून दिलं आहे. मी प्राध्यापकी करतो, त्या कॉलेजच्या प्राचार्य श्रीनिवासांवर आज संक्रांत आली. बाबा कॉलेजच्या ट्रस्टींपैकी एक असल्याने अध्ये मध्ये प्राचार्य त्यांना भेटायला येतात. छायाविषयी काही बाही त्यांच्या कानावर आधी गेलेलं होतं. कोणताही धक्का पचवायच्या तयारीने ते आले. बाबांबरोबर दिवाणखान्यात चहा घेत बसले होते.*

*आरडाओरडा करत रूस्तम आला. त्याच्या बंगलीचं मागचं दार छायाने फोडलं-मोडलं म्हणून तक्रार घेऊन. त्याच्या मागोमाग हा एवढा गहजब का करतोय? जाणून घ्यायला छाया आली. तिचं म्हणणं आतून रूस्तमची मुलगी मेहरू, छायाला हाका मारून बोलावत होती. म्हणून छाया तिला भेटायला गेली होती. दार कसंच उघडेना. तेव्हा त्या*

*अडकलेल्या बापड्या मुलीची सुटका करण्यासाठी, छायाला दार फोडावं लागलं.*

*मेहरू म्हणाली की तिने छायाला हाका मारल्या खऱ्या, पण त्या सगळ्या टि.व्ही.वर अंदमानातली दृश्य दाखवत होते, ती छायाला दाखवायला म्हणून. मेहरूने हर शक्य त्या प्रकारे छायाला समजवायचा प्रयत्न केलेला, की बाई दरवाजाची मूठ डावीकडे फिरवून 'पुल' कर म्हणून. पण अशा यांत्रिक करामती छायाच्या डोक्यात शिरत नाहीत. त्यावर 'घे दगड आणि हो फोडून मोकळी' हा तिचा एकच सरळ उपाय असतो. भरपाई द्यायचं कबूल करून बाबांनी रूस्तमला शांत केला.*

*प्राचार्यांनी छायाच्या विषयात न पडणे शहाणपणाचं झालं असतं. पण शहाजोग माणसांना जो धडा कधी ना कधी आयुष्यात मिळणं भाग असतं, तो त्यांच्या नशिबात लिहिलेला अटळ होता. त्यांना वाटलं की हा 'पुश' आणि 'पुल'च्या गैरसमजातून झालेला घोटाळा आहे. छायाला अजून मराठी पुरेशी नीट येत नाही. नर्सरीतल्या मुलांसारखं तीन-चार शब्द जोडून बोलते. भरीला आजूबाजूला अठरापगड भाषांचा-उच्चार शैलीतल्या फरकांचा सामना, तिला मुंबईत करावा लागतो. लिहिणं आणि वाचणं शिकवायचे माझे सारे प्रयत्न तिने उडवून लावलेत. पण प्राचार्यांमधला हाडाचा शिक्षक एकाएकी*

*जागा झाला. ते छायाला 'पुश' आणि 'पुल' मधला फरक समजावून देवू लागले.*

*'पुश'ची प्रात्यक्षिकांसह उदाहरणं आजूबाजूच्या वस्तूंबर, कपबश्यांवर, ट्रेवर वगैरे करून झाली. 'पुल'च्या प्रात्याक्षिकांसाठी अशा निर्जीव गोष्टींवर उदाहरणं देणं त्यांनी चालू ठेवलं असतं. तर कदाचित ती*

*धडपणे पार पडलीही असती. प्राचार्यांनी हाताबोटावर पुलचे काही प्रयोग करून दाखवले. आणि नेहमीच्या लकबीने रूबाबात आपल्या घनदाट केसांच्या बटांमधून हात फिरवला. छायाला एवढा इशारा ते केस 'पुल' करण्यासाठी पुरेसा झाला. ते सगळेच सुटून हातात आल्याचं पाहून, छायाला किती धक्का बसला असेल. याची मी कल्पना करू शकतो. नेमकी त्याचक्षणी नवऱ्याची बाजू मांडायला म्हणून, शिरीन आंटी आपल्या मैत्रिणीला मिसेस पात्रावालाला घेऊन हजर झाली. मिसेस पात्रावालाला मनातल्या भावना फार उच्चरवाने बोलून दाखवण्याची, फार वाईट खोड आहे.*

*"अरे, तमारा प्रिन्सिपाल तो एकदम गंजा हाय नी. पन आ अधेड उमरमा ऐने शू माटे डुप्लिकेट बाल जोईऐ छे? कालेजनी फटाकडा डिकरीयों सामे इन्प्रेशन मारवा केम?" मिसेस पात्रावाला हे ब्रेकिंग न्यूज पसरवण्यासाठी, टि.व्ही.चैनेलापेक्षा जास्त फास्ट आणि दूरपर्यंत पोहोचणारं माध्यम आहे. दुर्दैवाने प्राचार्यांना ही गोष्ट माहीत आहे. त्यांना हार्ट अ‍ॅटॅक यायचा बाकी राहिला.*

*या सगळ्या घडामोडींवर छायानं संध्याकाळी कळस चढवला. मेहरू संध्याकाळी छायाला फिरायला बाहेर घेऊन गेली. आख्ख्या माथर पाखडी मध्ये एक मी सोडलो, तर या चौदा-पंधरा वर्षाच्या मुलीशी तेवढं छायाचं जमतं. मेहरू छायाला समजून घेऊ शकते. त्या दोघी अशा नेहमी फिरायला जातात. मेहरू मला सांगते की छायाला किंवा जिमीला, दोघांना फिरायला नेण्यात फारसा फरक नाही. अर्थात एकत्र नाही. मेहरू एकावेळी एकाच जनावराचं नियंत्रण करू शकते.*

*तर ही दोघं म्हणजे जिमी कुत्रा किंवा छाया आपणहून कोणाच्या कळीला जात नाहीत. पण लोकं मुद्दामहून विचकावून वा भिऊन अंग काढल्यासारखं बिचकून दाखवून वगैरे त्यांना डिस्टर्ब करतात. बिथरवतात. चिथवतात. आणि हल्ला झाला की उलटे त्यांच्यावर हिंस्त्रपणाचा आरोप करतात. अशावेळी छायालासुद्धा आंजारून-गोंजारून-चुचकारून शांत करण्यात मेहरू तरबेज झालीय.*

*तर तशा दोघी संध्याकाळी भांडारवाडी टेकडीच्या बागेत टहळत होत्या. पावसाचे दिवस आहेत. तो पडला. दोघी भिजल्या. कपडे भिजले. छायाला अंगावरच्या कपड्यांचं नेहमी ओझं वाटतं. ओल्या कपड्यांचं निमित्त साधून तिनं ते उतरवून टाकले. रस्त्यावरचे टारगट टगे नागडी बाई बघून चेकाळतात. गेल्या महिन्याभरात शंभरापेक्षा जास्त जणांनी जायबंदी होऊन, तिच्या वाटेला न जाण्याचा धडा शिकलेला आहे. तरी कधी एखादा उटपटांग नवखा माणूस सरसावतो.*

*आज मात्र बागेत फोटोसेशन चालू असलेल्या मॉडेल पोरींना ती दुर्बुद्धी सुचली. तिथे बघ्यांची आधीच जाम गर्दी होती. ती छायाकडे टकामका बघायला लागली. फोटोग्राफर्सनी फटाफटा फ्लॅश उडवले. छायाला न ओळखणाऱ्या लोकांना हा फोटोसेशन मधला पब्लिसिटी स्टंटचा भाग वाटला. त्यांनी छायाच्या धाडसीपणाची आरती ओवाळली. मॉडेल पोरी पार दुर्लक्षल्या गेल्या. 'टोटली आऊट ऑफ फोकस' म्हणतात. तश्या झाल्या. त्यांचा तिळपापड झाला. कोण ही कानांमागून येऊन तिखट झाली? आमच्यापेक्षा 'बोल्ड नी ब्युटीफुल' ठरली? काली कलूटी, नाक नकटी 'शो स्टॉपर' बनली? त्या मॉडेल पोरी नाकं मुरडत, तोंड वाकडं करत छायाला टोमणे मारायला लागल्या.*

*चांदनी जैन ही प्रसिद्ध सुपर मॉडेल आहे. तिनं छायाकडे वळलेल्या फोटोग्राफरला सुनावलं की या बेढब-बुटक्या, कुरूप-काळ्या, बिन घाटाच्या, बिन चेहऱ्या मोहऱ्याच्या नागड्या बाईपेक्षा, तिच्या कमनीय गोऱ्यापान शरीराचं, झाकलेलं असलं तरी अनेक पटीने सेक्स अपील अधिक आहे. फुकट या काळ्या बाईमागे लागून, तिच्यासारख्या ब्युटीक्वीनचा किंमती वेळ वाया दवडू नये. आख्खी फॅशन इंडस्ट्री तिच्या एका एका मिनिटासाठी झुरते. या काळ्या बाईची तर तिच्या चप्पलेजवळ उभं राहायची देखील लायकी नाहीय.*

*इतर मॉडेल पोरींनी चांदनीची रि ओढली. त्या सगळ्या छायाकडे बघून व्यंगबाण चालवत हसायला लागल्या. छायाला भाषा तितकीशी समजत नसली, तरी हावभाव आणि देहबोलीचा अर्थ लावण्यात ती पटाईत आहे. या कापडं गुंडाळलेल्या बायका आपल्या बिनकपड्याला हसतायत, तिला बिनचूक कळलं. मग त्या बायकांच्या गर्वाचं घर, म्हणजे ती गुंडाळलेली कापडं फाडायला, खाली उतरवायला छायाला कोण रोखू शकणार होतं? छायानं सरळ चांदनीच्या दिशेनं मोर्चा वळवला होता.*

*राहुल धुरंधर हा माझा मित्र मॉडेल फोटोग्राफर आहे. चांगला तगडा आणि ब्लॅकब्लेट होल्डरसुद्धा आहे. लाडीगोडी लावून चांदनी त्याचा फुकटात अंगरक्षक म्हणून वापर करून घेत असते. छायानं एका डावात राहुलला सरळ धोबीपछाड घातला. दूर केला. राहुलने सगळा प्रसंग मला रंगवून सांगितलाय. गायींच्या कळपात जखमी वाघीण चवताळून घुसावी आणि पंजाच्या एकेका तडाख्यात तिने गायींची सालटी सोलून काढावी, तसा तो प्रकार होता, म्हणाला, त्या सालटी उर्फ कपडे गमावणाऱ्या पोरींच्या हाहाकारात, कोणीही नरपुंगव मदतीला धावला नाही. उलट फार*

चवीने तो बिनपैशांचा तमाशा पाहण्यात आला. त्या नाजूक नखरेल नटव्या बाहुल्याच्या बनावटी रूपांपेक्षा, छायाच्या धगधगत्या चंडीरूपातच राहलला अस्सल सेक्स अपील दिसलं बोलला.

खरं तर या मॉडेल पोरींनी छायाचे जाहीर आभार मानायला हवेत. त्यांना आणि त्यांचं भांडवल जे शरीरसौष्ठव, त्याला छायामुळे केवढं मोठं कव्हरेज फुकटात मिळालं. भरपूर प्रसिद्धी मिळाली. ब्रेकिंग न्यूजमध्ये आयती परत परत जाहिरात झाली. तसं न करता चांदनी जैन आमच्या घरी आली. बाबांच्या मिलिटरीतल्या दोस्ताची पोरगी. बाबांची लाडकी. आमच्या घरी येणं जाणं असणारी. आईची जवळची.

चांदनीने रस्त्यावर तिचा जो तमाशा झाला, त्याचं सारं उट्टे आमच्या घरी तमाशा करून काढलं. काय हुंदके दिले! काय अश्रू ढाळले! आपली अब्रू कायमची गेल्याचा गळा काढला. आईबाबांच्या पार डोक्यातच गेली. 'तिला' अशी सोडू नका. पोलिसांच्या हवाली करा. असलं जंगली जनावर रस्त्यावर मोकाट फिरू देणं फार धोक्याचं आहे. 'तिला' पिंजऱ्यात तुरुंगात टाका. चांदनी जैन कडाडली.

जमलेल्या शेजाऱ्यांनी, आप्तांनी, मित्रांनी, घरच्या नोकरमाणसांनी, आईबाबांनी, सगळ्यांनी चांदनीला दुजोरा दिला. छाया बोलत काही नसली, तरी तिला सगळं दिसत होतं. कळत तर होतंच होतं. छायाची अपेक्षा होती, निदान मी तरी तिची बाजू घेऊन बाकीच्यांशी भांडेन. त्यांना तिची बाजू पटवून द्यायचं काम करेन. ते काम मेहरू करत होती. शिरीन आंटीन मेहरूला फटकारून, झिंज्या धरून घराकडे ओढून नेलं. घरात कोंडून बंद करून ठेवलं.

*इतक्या सगळ्यांच्या विरोधात जाणं मला जमलं नाही. या सगळ्या रोज रोजच्या कटकटीला मी पुरता कातावून गेलो होतो. छायाला आणल्यापासून मला माझी म्हणून घरातली, बाहेरची, प्रोजेक्टची, कुठलीच कामं करता येत नव्हती. सारखं छायाला आणि छायापासून इतरांना सांभाळायच्या रेटारेटीत सगळं आयुष्य पसार होतंय असं वाटत होतं. माझ्या सगळ्या आयुष्याचा, कामांचा, योजनांचा विचका होऊन गेलाय असं वाटत होतं. छायानं माझा जीव वाचवला खरा, पण मला जर माझं म्हणून आयुष्य जगता येत नसेल, तर काय कामाचा?*

*मी छायावर जाम उखडलो. हे आमचं जग तुझ्या जगासारखं नाही, कबूल. पण आमचं हे सगळं जग तुझ्या हिशोबानं बदलण्यापेक्षा, तू स्वतःला आमच्या या जगासारखं का बदलत नाहीस? ज्या गोष्टी करू नको सांगतो, त्याच गोष्टी परत परत का करतेस? ज्या गोष्टी कर सांगतो, त्या कशाच का करत नाहीस? मी त्या सगळ्या गोष्टींची यादीच वाचली.*

*क्षणभर छायाचे डोळे प्रचंड धगधगले. अन्याय म्हटला की पेटत तसे. आता ती भडकून माझ्यावरच हल्ला करणार, अशी भीती मला झाली. पण ते निवले आणि टचटचून भरून आले. आपले अश्रू लोकांपुढे सांडून, त्यांचं भांडवल करायला ती चांदणी जैन नव्हती. त्या मानी स्त्रीनं मोठ्या प्रयासानं आपले अश्रू सगळ्यांपासून लपवले. सगळ्यांकडे आणि माझ्याकडे पाठ फिरवली.*

*उत्तर दिलं, कारण की ती जिमी कुत्रा नव्हती. मेहरूने त्याला बस म्हटलं की बसणारा, उठ म्हटलं की उठणारा, धाव म्हटलं की धावणारा, थांब म्हटलं की थांबणारा. तिने काय करावं आणि काय करू नये, सांगायचा अधिकार दुसऱ्या कोणाला नाही. तिचा तिला आहे. आमच्या या*

*जगात काही थोडी माणसं दुसऱ्या सगळ्या माणसांवर, प्राण्यांवर, झाडांवर, जमीन, पाणी, आकाशावर ताबा गाजवतात. तिच्यासाठी हा सगळा अन्याय आहे. ती या जगासारखी बनणार नाही. बदलणार नाही. जर आम्हा सगळ्यांना ती शत्रू वाटत असेल, तर आम्ही तिला मारून, कापून खावं. पण लढल्याशिवाय ती कोणाच्या हाती सापडणार नाही. ज्याला तिला धरायचं असेल, त्याने तशी हिंमत करावी. ही ती चालली.*

*छाया निघून गेली.*

*कोणी तिला धरायला पुढे झालं नाही. बाकी सगळे निघून गेल्यावर, निरवानिरव झाल्यावर मात्र माझं मन खायला उठलं. कृतघ्न म्हणायला लागलं. छायाने माझ्यासाठी तिच्या आख्ख्या जगाशी लढा दिला. सगळ्या मर्यादांच्या पार जावून. आणि मी किती स्वतःपुरतं बघणारा आहे? छाया आयुष्यातून निघून गेली, तर त्याचं दुःखं वाटण्याऐवजी मला हायसे वाटणार आहे. अखेर मी याच अन्यायावर आधारलेल्या जगातला, तेच संस्कार हाडीमांसी मुरलेला एक आप्पलपोट्टा!*

---------------------------------------------------------------------

सलमानं डायरीचं पान संपवलं आणि दारावर टकटक झाली. तिनं घाईघाईने डायरी लपवली. “कोन?'

"मी सोअर' उत्तर आल्यावर चिडून कोण सोअर विचारलं. "अगं म्हणजे आंबट." साराच्या या उत्तरावर तिला दोन सणसणीत शिव्या देत सलमानं दार उघडलं.

"का डरवते? मी डायरी वाचत होते. काय बोलली ती मुलुखमैदान तोफ! तुझ्या चिंध्या चिंध्या झालेल्या दिसत नाहीत. बरसली नही क्या?"

"ओ गॉड! मला जरा ब्रिथिंग तरी करू दे. तिच्या बम्बार्डिंग मधून बाहेर पडले नाही, तर तुझं झालं चालू." सारानं लगबगीनं दार मागे गच्च कडी लावून बंद करून घेतलं. उघडतंय का? खात्री करून बघितलं. "त्या रास्कलशी सामना झाल्यापासून गं, कॉन्फिडन्स गेलाय. दार पुरतं लॉक झालंय खात्रीच वाटत नाही. हे घे." हातातला कागद सारानं सलमाच्या हातात ठेवला. "गॉडझिलानं मला रूम खाली करायची नोटिस दिलीय. त्यासाठीच तिनं मला भेटायला बोलावलं होतं. गेल्या सहा महिन्यांचं हॉस्टेलचं रेन्ट भरलं नाही म्हणून."

"ओफ!" सलमानं हुश्श केलं. "इतनाही? मी काय घाबरले होते. मला वाटलं तिला आपला शक झालाय की काय?"

"ओ ओ ओ! इथं मला ती हाकलून द्यायच्या गोष्टी बोलतेय, आणि तुला रिलिफ वाटतोय." सारानं नाक मुरडलं.

"वा भाई वा! नोटिस तर तिनं मला भी दिलीय. अब्बा बोलले कम्बख्त और एक महिना, तरी पैश्याचं जमणार नाहीय. दुनिया में मुसिबत काय फक्त तुला आहे? बदनसिब और भी है तुम्हारे सिवा ए गालिब."

सारानं एक हात सलमाच्या तोंडावर ठेवून ते बंद केलं. “बस्, बस्. आता इथं तुझा मुशायरा सुरू करू नको. त्या बास्टर्ड मनुचे पैसे थोडे आपल्याला पण ठेवायला हवे होते. डिलिव्हरी कमिशन म्हणून गं.”

आता सलमानं आपला एक हात साराच्या तोंडावर दाबला. “श्शू! दिवारोंके भी कान असतात. कधी गं सुधारणार तू?”

दारावर पुन्हा टकटक झाली. दोघींच्या “कोण?” ला “तिखट.” उत्तर आलं. सारानं दार उघडून सरलाला आत घेतलं आणि बाहेर कोणी नाही याची खात्री करून पुन्हा घाईघाईने कडी घालून घट्ट बंद केले.

“अल्ला जाने, दारावर जरा टकटक झाली की माझी तर जान सीनेसे निघून जाते. हरदम हा भीतीचा साया मला आता घेरून असतो.” सलमा डोळे गच्च बंद करून कॉटवर खच्चून बसली.

सरलाने वर्तमान पत्रं तिच्यावर फेकली. “ह्या बातम्या बघितल्यात. त्या आगलावे रिपोर्टरचा मुडदा पोलिसांना

सापडला.” सरलाने सलमाच्या बाजूला बसकण मारली. कावऱ्या बावऱ्या डोळयांनी सारा आणि सलमानं बातम्या वाचल्या.

“फटकेवालीच्या चाबकानं फोडण्याआधी त्याला डोक्यात हाणून मारलंय, त्यांना कळलंय.”

“सगळंच तिरपागडं झालंय. मी सुमनच्या उशाखाली ठेवले होते ते पैसे, तिच्या जुगारी भावानं आणि दारूड्या बापानं उचलले. उडवले. तिची बहीण बसलीय रडत, सुमन आता काही जगत नाही.”

“फटकेवालीनं त्या दोघा ब्लडीफूलना फटके घातले पाहिजेत.” सारा उसळली. “आमच्या तोंडातला घास काढून, आम्ही तिला घातला होता.”

“फटके लगावले म्हणून काय त्यांची पैदाशी बदमाषी सुटेल?” सलमा विचार करत बोलली.

“प्रयत्न करून बघायला पाहिजे एकदा.” सरलानं ओठ चावले.

“बायांनो जरा होश जमिन टिकाके चाला. आपल्या पायांखाली आधी काय जळतंय ते बघा. पहले आपल्या मुसिबतचा काही हल शोधा. मग दुसऱ्यांचा विचार करा.” सलमा दोघींवर वैतागली.

दारावर अचानक टकटक झाली. सलमाने “कोण?” म्हणून विचारलं.

“पोलीस.” म्हणून उत्तर आलं. तिघींच्या तोंडाचं पाणी पळालं. एकमेकींकडे भीतीनं भरलेल्या डोळयांनी बघत, त्यांनी एकमेकींना धीर द्यायचा प्रयत्न केला. सरला दार उघडायला उठली. सलमा डायरी लपवायला उठली. सारानं बातमीपत्रे उचलून, टेबलावरच्या दुसऱ्या वर्तमानपत्रांमध्ये घुसडून टाकली. “दार उघडायला इतका वेळ का लागला?” दारातून उभ्या असलेल्या पोलीस इन्स्पेक्टरनं दार उघडल्या उघडल्या, त्यांना दमात घ्यायला सुरूवात केलीय.

“हे लेडिज हॉस्टेल आहे. इथे पुरुषांना यायला नो एन्ट्री आहे. आम्हीकाय, असतो तश्याच अवतारात समोर यायचं?” सारानं मखलाशी केली.

“तुम्ही तिघी याच रूममध्ये राहता?”

“हो.” सामाईक उत्तर मिळालं.

“काय नावं तुमची?” तिघींनी एक एक करत सांगितली.

“आणि कोण राहतं?” यावर नकार मिळाला.

“छाया आंग्रेविषयी तुम्हाला काय माहिती आहे?”

“काहीही नाही.” तिघींनी एकजात नकार दिला. त्यांचे चढलेले श्वास आता बऱ्यापैकी मंदावलेले होते.

“पण तिचं भूत इथं दिसलं होतं म्हणे!”

“असं ती कडू पाटील म्हणते.” सलमानं उत्तर दिलं.

“हो. बाकी आम्हाला इथं कोणाला दिसलं नाहीय.” सारानं रि ओढली.

“नक्की ?”

“हो.” पुन्हा तिहेरी होकार.

“बरं मनु शर्माला ओळखता?”

“हो. तो कडू पाटीलचा बॉयफ्रेंड आहे. हॉस्टेलवर येतो कधी कधी तिच्याबरोबर.” सारानं आतली माहिती पुरवली, “पण हे मी सांगितलं तिला सांगू नका.”

“का? आणि इथं पुरुषांना यायला नो एन्ट्री आहे ना?” तिच्या डोळ्यात आपली कठोर नजर रोखत त्यानं विचारलं.

“इथं तिला काय वाट्टेल ते करायची परमिशन आहे.”

“का?”

“ते काय ते तिलाच विचारा ना. ती हॉस्टेलच्या आणि कॉलेजच्या संचालकांची भाची आहे.” सारानं कडवटपणे सुनावलं.

“ओह! आणि मनु शर्माच्या सुमन जोशीबरोबरच्या भानगडीबद्दल तुम्हाला काय माहिती आहे?”

“त्यांची काही भानगड नव्हती. तो तिला वरचेवर छेडायचा. तिला तो आवडत नव्हता. तेव्हा तो नेहमी तिला धमकी द्यायचा.” सरला पोटतिडीकीने उसळून बोलली. क्षणभर थांबून पुढे बोलून मोकळी झाली. “शेवटी ती धमकी त्यानं खरी केली.”

“म्हणजे मनु शर्माने सुमन जोशीवर ॲसिड फेकले. असं म्हणायचंय तुम्हाला? तुम्ही तिथं होतात? हे शपथेवर सांगू शकता?”

“आमच्यातलं कोणी तिथं नव्हतं. पण हॉस्टेलच्या सगळ्या पोरींना पक्कं ठावूक आहे. त्याचंच हे काम.” सरलानं निक्षून सांगितलं.

“का? सुमनचा दुसरा देखील कोणी आशिक असेल?”

“सुमन वैसी लडकी नव्हती साहेब. ती कधी कोणाच्या अध्यामध्यात नसायची.” सलमाने खात्री दिली.

“बरं, मनु शर्माने सुमन जोशीवर ॲसिड फेकलं असेल, तर मनु शर्माच्या चेहऱ्यावर कोणी ॲसिड फेकलं?”

“ते काही आम्हाला ठाऊक नाही सर. तो त्याला वाटेल त्या पोरीची कळ काढायचा.” सरलानं लगेच उत्तर दिलं. “त्याला भरपूर शत्रू होते.”

“अच्छा, मग तुमची सुद्धा कळ त्यानं काढली असेल, काय?” आता ती करडी पोलिसी नजर सरलाच्या जिवाचं पाणी पाणी करू लागली.

“साहब, आम्ही फार मामूली लोकं आहोत. त्या बड्या लोकांच्या भानगडीत आम्हाला अडकायचं नाही. कोणी किती त्रास दिला, तरी आम्हाला बर्दाश्त करावाच लागतो. नाहीतर आमचं इथं राहणं मुश्किल होईल. अजून काय सांगणार?” सलमानं सरलाला सांभाळून घ्यायचा प्रयत्न केला.

“अडकलात तर तुम्ही आधीच आहात."

“सॉरी सर. मी नाही समजले.” सारा उसनं अवसान आणत, थरथरत्या ओठांवर जीभ फिरवत म्हणाली.

“हा बघा, याला याआधी कधी बघितला होतात?" पोलिसवाल्यानं एक फोटो काढून तिघींसमोर धरला. तिघींनी एकमेकींकडे गोंधळून पाहिलं.

“नाही.”

“काही आठवत नाही.”

“हा काल तुमच्या रूमवर आला होता. रिर्पोटर आगलावे. वॉचमनने खात्रीनं सांगितलंय.”

“तो का हा?” चेहऱ्यावर विचार करत असल्याचे भाव आणत सलमा फोटो निरखू लागली. “असेल, हा तोच असेल. तो कडू पाटीलला भेटायला आला होता. मी त्याला सांगितलं की ती पाचव्या मजल्यावर राहते. मग तो गेला.”

“कडू पाटीलच्या खोलीवर?”

“हो. म्हणजे मला नक्की नाही सांगता येणार. त्याने विचारलं. मी सांगितलं. तो गेला. मी दार लावून घेतलं.”

“मुग्धा गोडबोलेची तुम्हाला काय माहिती आहे?”

“ती दुसऱ्या मजल्यावर राहते. आमची ओळख आहे तिच्याशी.”

“शेवटची कधी भेटली होती?”

“आता ते नक्की नाही सांगता येणार. का?”

“नीट आठवून, सांगा. काल भेटली होती का? की परवा त्याआधी?”

“धुरंधर मॅडमना मी परवा भेटायला गेले होते, तेव्हा मुग्धाला चक्कर आली, असं शिपाई काशीबाई सांगत आली. त्यांच्या केबिनमध्ये. त्यानंतर? नो चान्स. मी नाही पाहिली तिला.” साराने खुलासा केला. सलमा आणि सरलाने गेल्या दोन दिवसात मुग्धाशी काही भेट झाल्याचे आठवत नसल्याचं सांगितलं. तोच कडू पाटील दारात येऊन परस्पर मागे फिरल्याचं त्यांना दिसलं.

“साहब, ती बघा कडू पाटील.' सलमाने लगेच बोंब ठोकली. कडूचा नाइलाज झाला. तिला परतून मागे यावं लागलं. “कडू हे इन्स्पेक्टर, छाया आंग्रेच्या भुताची चौकशी करायला आलेत.” पोलीस इन्स्पेक्टरला काही बोलू न देता, त्याआधीच तिने विषय फिरविला.

“साहेब, मी तुम्हाला सगळं सांगते. पन इथं नको.” कडू चारी दिशांना कावरीबावरी नजर टाकत म्हणती झाली. “तिला कळल.”

“कोणाला?”

“साहेब, दुसरीकडं कुठं पन. इथं नको. मला तिचं नाव घ्यायला लावू नका. माझं रूमवरचं सामान घ्यायला आले होते. पुन्हा मी इथं पाऊल टाकणार नाय. मी तुमची आवाराबाहेर वाट बघते. या तिथं.” घाईघाईने सगळे शब्द तोंडातून थुंकून टाकून, कडू पाटील पळत निघून गेली.

“आपण पुन्हा भेटूच. मला सुमनची जास्त माहिती हवी आहे.” त्या तिघींचा नाइलाजाने निरोप घेऊन इन्स्पेक्टर निघाला.

“सर, आपलं नाव नाही सांगितलंत.” सारानं त्याच्या वळलेल्या पाठीला विचारलं.

“इन्स्पेक्टर बिलिमोरीया.” सांगून तो तरूण तगडा पोलिसवाला लांब लांब ढांगा टाकत निघून गेला.

“काय त्याचं नाव पण तुझ्या विशलिस्टमध्ये टाकलंस की काय?” सरलानं साराला चिमटा काढला. सारा कळवळली. पण तिने आधी घाईघाईने दार लावून टाकलं. पक्के बंद असल्याची खात्री केली.

“बेबी, हा जोक मारायचा टाईम नाय आहे. चला बॅगा भरा आणि पुन्हा तो बिलिमोरीया चौकशीला येण्याआधी आपापल्या घराकडे पळा. काय ती त्याची नजर? स्साला, एक्सरे लावून पार आत बघतोय वाटत होतं.”

“हो यार. आपल्याला रूम खाली करायची नोटिस दिलीय. अच्छा बहाना है.” सलमा आपलं सामान भरायला वळली. “लेकिन तिखटचं काय?”

“माझं काय?” सरला गोंधळली. “नोटिस मला मिळालीय. तुम्हाला पण?”

“होली मेरी! तिखट. तुला पण रेन्ट भरलं नाही, म्हणून नोटिस दिली?” सारानं ओठातून शीळ घातली.

“हो. भाऊ पैसे पाठविणार होता. पण त्याला जमलं नाही. झालं ते बरंच झालं.” सरलानं तोंड वाकडं केलं. “अगं पण आपण असे एकदम पळून गेलो, तर त्या पोलिसवाल्याला आयताच आपला संशय येईल.”

“काविळ झालेल्याला सगळं पिवळं दिसतं, वैसा तेरा हुआ है.” सलमा बडबडली. “आपल्याला नोटिस मिळाली. म्हणून आपण गेलो. मुग्धासारखं बिनावजह तर नाय ना? तो लागेल त्या मुग्धाच्या मागे.”

“ओ शीट! म्हणजे मुग्धाला फशी घालून आपण सुटायचं?” सारा चुटपुटली. “आपण डेअरिंग केलं खरं, पण ते अंगाशी आलं. मला त्या पत्रकार आगलावेचे सताड उघडे मेलेले डोळे, सारखे समोर दिसतात. आपल्याला फाशी दिलं तर बेटर. सुटू एकदाच्या.” सारा हुंदके देवून रडू लागली.

“चूप. आपला जीव वाचवायला हजार खून माफ असतात. त्या नीचाबद्दल वाईट वाटून घेऊ नकोस. पुढचे अनेक खून आपण वाचवले. जे तो पाडणार असता.” सरलानं खडसावलं.

“लोंडीयो एक बात खरी खरी सुनलो. आपल्या घरी आपली सगी माँ को पण हे गुपित सांगू नका. खुनी म्हणून त्या आपला तिरस्कारच करतील.”

## रवीची डायरी : २१ ऑगस्ट १९९५

---

*छायाची मला काळजी वाटत होती, ती अनाठायी होती. आज आईने मला जो वृत्तांत सुनावला, त्यावरून माझी खात्री झाली. मात्र छाया पासून लोकांना होणाऱ्या घोराबद्दल वाटणारी काळजी, दुप्पटीने वाढली. झालं असं होतं की आई शिरीन आंटीबरोबर त्यांच्या नात्यातल्या लग्नाला गेली होती. मेहरू सुद्धा बरोबर होती. संध्याकाळी परतताना शिरीनची गाडी वाटेत कुठे पंक्चर झाली.*

*ड्रायव्हरवर ती गाडी सोडून मग मंडळी टॅक्सीने घराकडे परतत होती. तो टॅक्सीवाला निघाला अडेलतट्टू. माथरपाखडीत थेट घरापर्यंत न सोडता नारीयलवाडीच्या नाक्यावर यांना सोडून, आंटीशी भरपूर हुज्जत घालून तो गेला. जिथपर्यंत मला कयास करता येतोय, शिरीन आंटीची अखंड चालू असणारी बडबड सहन करणं, त्याला ड्रायव्हिंग करताना असह्य झालं असणार.*

*संध्याकाळ नंतर या आतल्या वस्तीत असणाऱ्या रस्त्याला फारशी वर्दळ नसते. कोणाही लुटमार करणाऱ्या चोराला, सोयीची वाटावी अशी जागा आणि वेळ. त्यात लग्नात मिरवलेली डायमंड ज्वेलरी, तशीच अंगावर झगमगवत घालून चाललेल्या बायका. जोडीला संरक्षण काही नाही. म्हणजे चोराच्या तोंडाला पाणी सुटणार की नाही? आई आमची फार हुशार. पुढे घडणाऱ्या गोष्टीचा अदमास आधी घेऊन, तिने आंटीला दागिने काढून पर्समध्ये ठेवायला सांगितले.*

*"अरे पुरा पचास लाखनी जुवेलरी हाय नी." म्हणत शिरीन आंटीला आईचं म्हणणं पटलं, म्हणून ते सगळे अंगावरचे दागिने उतरवून भसाभसा आपल्या पर्समध्ये तिने भरले. पर्स दुसऱ्या मोठ्या शॉपिंगबॅगमध्ये टाकली. आईचं म्हणणं आहे, नेहमीच्या अतिशयोक्ती करायच्या आपल्या स्वभावानुसार, शिरीननं पाच लाखावर एक शून्य जास्त जोडून पन्नास केलं.*

*आंटीनं आईलासुद्धा आईचे दागिने पर्समध्ये भरायला सांगितले. पण आपले दागिने खोटे असल्यामुळे, आपल्याला फिकिर नसल्याचं आईनं सांगितलं. यावर आंटी फार नाराज झाली. तिच्या भाच्याच्या लग्नात खोटे दागिने घालून मिरवलं त्याबद्दल. मेहरूला दागिन्यांची नावड असल्यामुळे, मोठ्या मुश्किलिनं तिच्या गळ्यात एक सोनसाखळी तेवढी चढवण्यात, आंटीला यश मिळालेलं होतं. तर मंडळी आपल्या अक्कलहुषारीवर खूश होऊन, फुशारकीने वाटेवर चालत होती.*

*नेहमी दारावर येतो तो शहाळेवाला कटकरप्पा, नेमका आपली हातगाडी ढकलत आपल्या घराकडे परत चाललेला, त्यांना वाटेत भेटला. आईला तेव्हा फार नवल वाटलेलं की घश्यात बोट घातली तर माश्याचं शेपूट हातात येईल, इतकं तुडुंब जेवण 'पात्रांना मच्छी','धनसाक' आणि काय काय शिरीननं हादडलं असताना सुद्धा, तिला शहाळं खाण्याची भूक कशी लागू शकली? शिरीनचं स्पष्टीकरण होतं की जी काय थोडीफार पावलं ती आता चालली होती, त्यात ते सगळं जिरलं होतं. तिनं कटकरप्पाला चार शहाळी सोलून देण्याची ऑर्डर सोडली.*

*आईचे डोळे खूपच विस्तारले असणार. कारण आईकडे बघून शिरीनने पुन्हा एकवार जास्तीचं स्पष्टीकरण केलेलं की, अजून घरापर्यंत*

*पुढे चालायचंच आहे. घरापर्यंत आता खाल्लेलं शहाळं जिरून जाईल. तेव्हा ती पुढची तरतूद म्हणून, तिला जास्तीची शहाळी घ्यावी लागत आहेत. नंतर घरी परतल्यावर शिरीनच्या या खादाडपणावर रूस्तमनं खूप टिका टिप्पणी केली. या खादाडपणामुळेच वीरपल्ली कृष्णस्वामी तीरूवरंगण्णनला पन्नास लाखावर डाका घालायची सुसंधी मिळाली.*

*झालं असं की कटकरप्पा एकेक शहाळं सोलत होता आणि ते लगोलग शिरीन आंटीनं उघडून धरलेल्या, शॉपिंग बॅगमध्ये टाकत होता. त्यावेळी एक काळा शर्ट आणि काळी लुंगी नेसलेला काळा माणूस, मेहरूच्या कथनानुसार इतका काळा की त्याचे कपडे कुठले आणि त्वचा कुठली? हे कळू शकत नव्हतं. तर तसा तिथं शहाळ्याच्या गाडीशी येऊन थांबला. एकसारखा टवकारून शिरीन आंटीकडं बघू लागला.*

*आईनं तरी आंटीला त्याच्याकडं दुर्लक्ष कर म्हणून बजावलं होतं. पण आंटीचं तोंड बंद करणं सर्वश्रेष्ठ देव अहुर माझदाला सुद्‌धा शक्य नाही, असं रूस्तम छातीठोकपणे सगळ्यांना इतकं बजावत असतो, ते कशाच्या जोरावर? वीस वर्षाच्या अखंड सहवासाच्या अनुभवाच्या जोरावरच ना? खऱ्या अनुभवाचे बोल कधी खोटे होत नाहीत. आंटीनं त्याला टोकलंच, "केम बायडी नाय बघली कदी तू?"*

*"बायडी तर बघितलं खूप, पण असलं लाख रूपयाची साडी नेसलेलं, तरी रिकामी हाता-गळ्याची बाई, बघलं नव्हतं हो कदी.' वीरपल्लीनं हेल काढून उत्तर दिलं. मग त्याचं लक्ष आंटीनं उघडून धरलेल्या बॅगमध्ये चकचकणाऱ्या शानदार जडाव काम केलेल्या पर्सकडे गेलं. "असं आहे काय? गळ्यातलं नी हातातलं त्या पर्समदी टाकलं की काय?"*

"ऐ वीरपालीनी नजर घणी सरस एकदम पारखी हशे ऑ?" चोर असला तरी त्याच्या गुणांची कदर करण्यात शिरीन आंटीची दर्यादिली कमी पडत नाही. "मारी गारा साडीनी सव्वा त्रण लाखनी किंमत ऐने चौकस पता चाली." तो सगळा प्रसंग रंगवून सांगताना, त्याच त्या माणसांना सतराव्यांदा सांगताना सुद्धा, आंटी अजिबात कंटाळत नाही. आणि दरवेळी नव्याने सांगताना साडीची किंमत अंमळ काही काही हजार रूपयांनी चढतच जाते. "तो ऐने मने एकदम जरब साथे सांगला की ऐने पर्स हवी थाई छे. हुं पण ऐने कई दियु, केम तारा बापना माल छे केम? तो एकदम आगबबूला थई गयो. खटाकसे चाकू निकाली मारी गले मुखी दियु. बोलला कसा, ये बायडी तुझा गळ्यावर हा चाकू फिरला ना, तर नारळातून पाण्याची धार उडते, तसा तुझ्या गळ्यातून रक्ताची धार उडेल बघ. चल, खोल ती पर्स नी दाखव आतमंदी काय?"

आता इथे आई शिरीनला चार शिव्या प्रत्येक निवेदनाच्या वेळी घालते. कारण शिरीन आंटीने त्या चोराला खडसावलं होतं की त्याला तिचा रिकामी गळा बरा दिसतो? पण ह्या शेजारणीच्या गळ्यातला चमचमता लक्ष्मीहार कसा दिसत नाही? "एटली पार्सलिटी केम थाय?"

त्यावर त्याने चिडून उत्तर दिलेलं, "अय्योय्यो! वीरपल्ली कृष्णस्वामी तीरूवरंगळनचं सात पिढी सोनं नी माणिकं चोरत आलं. आमचं घराणं किती नावाजलेलं, बाजीराव पेशवानं मस्तानीला दिलेलं मंगळसूत्र, आम्ही तेच्या बेडरूममदी घुसून पळवलं. ते पन तो घोरत असताना, खरं दागिनं नी खोटं दागिनं, तर आमी न बघताच, नुस्तं, वासानं हंगून सुद्धा सांगू शकतो की वो." आई यावर शिरीन आंटीवर फार आगपाखड करते. जे झालं ते झालं. पण हे ऐवढे बारीकसारीक तपशील, आलेल्या गेलेल्याला

*कशाला खोलात जावून सांगितले पाहिजेत म्हणून? अर्थात शिरीन आंटीचं तोंड बंद करणं म्हणजे....*

*त्यापुढे असं झालं की आंटीला आठवलं की तिच्या पर्समध्ये तिनं अशा अडीनडीला उपयोगी पडावी, म्हणून काळ्या मिरीची पूड फवारणारी बाटली ठेवलेली आहे. तिनं स्मार्टली त्या चोराच्या रत्नपारखीपणाचं कौतुक त्याला सुनावलं. आपण आपल्या घराची चावी तेवढी पर्समधून काढून घेतो आणि उरलेलं सगळं त्याला परत करतो, अशी 'जेन्टल रिक्वेस्ट' केली.*

*एवढं कोडकौतुक करणारा लुटीचा बळी, वीरपल्लीच्या सात पिढ्यांना कधी भेटला नव्हता. तो हरखला आणि त्याच्या सात पिढ्यांनी जी चूक केली नव्हती ती त्याने केली. त्याने बळीला 'हालचाल' करायची संधी बहाल केली. मेहरू तर 'मस्तानीला लुटणाऱ्यांच्या घराण्यातला पिढीजात चोर' म्हणून त्याच्याबरोबर आपला एक फोटो काढू इच्छित होती. आपल्या मित्रमैत्रिणींमध्ये मिरवण्यासाठी. तो कॅमेरा सुद्‌धा त्याच पर्समध्ये होता. यावर वीरपल्ली मोठमोठ्याने हसला. "बायडी, तुमचं पोरगं खूप हुश्शार हं, माझं पोरगी पण असंच हुश्शार आहे. मला फासायला बघतं की!"*

*तोपर्यंत शिरीन आंटीनं पर्स खोलली होती. हाताने चाचपून तिनं बाटली शोधली. अचानक हात बाहेर काढून फस्कन् समोर फवारली. सगळीकडे परफ्युमचा मादक गंध पसरला. वीरपल्ली अनुभवी चोर असल्याने जे समजायचं ते समजला. आंटीनं लाजेनं लाल होत "मिस्टेक थई गयु." म्हटलं.*

*“मिस्टीक तर माझी झाली बायाडी.” तो चूक कबूल करायला लाजला नाही. लाल झाला नाही. काळाच्या काळाच राहिला. शिरीन आंटीच्या हातातली पर्स आणि बॅग त्यानं हिसकावून घेतली आणि तो पळायला लागला.*

*“चोर, चोर हाय हाय मारी दौलत लुटी गयी.' आंटीनं भोकाड पसरलं. मेहरू त्यातल्या त्यात डोकं ठिकाणावर ठेवून “चोर चोर, पकडा पकडा.” ओरडायला लागली.*

*काही क्षणात बाजूच्या झाडावरून, धपकन् कोणी त्यांच्या पुढ्यात उडी मारली. हाता पायावर लाल-पांढरे पट्टे फासलेलं छायाचं ते रूप बघून, शिरीन आंटीची दाताची खिळखिळी बसली. आईनं कटकरप्पाला सोडून छायाला बडबडायला सुरूवात केली. “अगं जा त्या चोराला पकड आधी. छाया बाई, तुला हात जोडते गं, जा तो खूप लांब जाईल.” रंगवलेला असला तरी छायाच्या चेहऱ्यावरली अढी मेहरूने बरोबर टिपली.*

*“अहो काकी, तिला फक्त रविदादानेच छाया बोललेलं चालतं. आपण तिला बिमाबा बोललं तरच ती ऐकणार.” मेहरूने बिमाबाला समजतं त्या प्रकारे तिला निकडीची गोष्ट समजावली. बिमाबाने नाक फेंदारलं. अंगावर फवारलेल्या त्या किंमती अत्तराचा गंध कितीतरी वेळ दरवळत राहून, त्या चोराचा माग सांगत राहणारा होता. त्या गंधाचा मागोवा घेत छाया गेली. शिरीन आंटीच्या मनात काही आशा जागली. ती थरथरायची थांबली.*

*“ओ मडमजी, चार नारियलचं चाळीस रूपये झाले.” कटकरप्पा कटकटला. “माझं गरिबाचं नुकसान कशाला करता? तो चोर माझे नारीयल पन घेऊन गेला. ते तुमच्या बॅगेत ओ.”*

*एवढं निमित्त शिरीन आंटीच्या तोंडाचा बंद पडलेला पट्टा चालू करायला पुरेसं होतं. "अरे, हुं तुझं रोजरोजनी गिरायक, तो माणस मला लुटते. आनी तू काय गंमत बगते? साला गंमत बगते? तेचा एटलासा नाना चाकूला, तुजा हातमदी एटला मोटा कोयता असताना भिते? अरे बायडी हाय, तरी मी तेच्या साथे फायट करते. तेच्यावर स्प्रे*

*मारते. आनी तू मर्द हाय तरी नुस्ता बगत राहते? चुडी घाल हातामंदी चुडी." शिरीन आंटीला आपले हात रिकामी असल्याची जाणीव झाली. तिनं आईच्या हातातल्या बांगड्या काढून, कटकरप्पाला द्यायला सांगितल्या.*

*आई उत्तरली की बांगड्या खऱ्या सोन्याच्या आहेत. अश्याच नाही देता येणार. "काय पन स्साली भंकस हाय नी. ते रत्नपारखी चोरला हे नाय ओळखता आला?" शिरीनचा जीव मेटाकुटीला आला.*

*जश्शी गेलेली थोड्या वेळाने तश्शी छाया परत आली. तिच्या हातात बॅग बघून शिरीन जाम खुशालली. "हुं वारी जाव तारा उप्पर." म्हणत तिने छायावरून हात ओवाळत कानांशी बोटं कडाकडा मोडली. पण छायाला मिठी मारायला तिला जरा कचकचलं. ते काम मेहरूनं केलं.*

*आईनं मात्र शहाणपणानं बॅग आपल्याकडे घेऊन उघडून बघितली. "अगं ह्यात पर्स नाही आहे." किंचाळली. शिरीनने धसकून बॅगेत पाहिलं आणि ती सुद्धा किंचाळली.*

*मेहरूने बिमाबाला विचारलं, "की पर्स कुठेय?" पर्स म्हणजे काय त्याचं वर्णन केलं.*

*छाया म्हणाली की, "त्या चोराला ती पर्स हवी झाली. ती त्याला दिली. ही खायची शहाळी तर परत आली. अजून काय हवं?" मेहरूची त्यानंतर बरीच मिनिटं त्या पर्सचं आणि त्यातल्या चकचकणाऱ्या दगडांचं महत्त्व, बिमाबाला पटवून देण्यात खर्च पडली. अखेर ती पर्स मेहरूला, तिच्या मैत्रिणीला हवी आहे. म्हणूनच केवळ बिमाबा परत त्या चोराच्या मागावर गेली.*

*खूप वेळ गेला. पण शिरीन आंटी, मेहरू आणि आई तिथेच वाट बघत थांबून राहिल्या. कटकरप्पा सुद्धा उत्सुकतेमुळे थांबून राहिला. मधल्या वेळात चारही सोललेली शहाळी, नंतर पैसे देतेच्या बोलीवर शिरीन आंटीनं फस्त केली. तिचं डोकं गरगरायला लागलं की फक्त पोटात जाणारं अन्नच, ते शांत करतं. असं ती म्हणते.*

*शेवटी एकदाची छाया पर्स घेऊन परतली. वीरपल्ली कृष्णस्वामी तीरूवरंगळन त्या पर्सला असा चिकटला होता की त्याला पर्ससकट ओढत बिमाबाला आणावा लागला होता. छायासमोर आईला स्फुरण चढलं. कटकरप्पाचा कोयता उगारून तिनं वीरपल्लीला धमकावलं. जर त्यानं पर्सला धरलेला हात सोडला नाही, तर ती कोयत्यानं तो हात कापेल. हात नसले तर त्याचा पिढीजात धंदा बंद करून त्याला भीक मागावी लागेल.*

*वीरपल्लीला हे मोठं धर्मसंकट उभं राहिलं. त्यांच्या सात पिढ्यात हाती आलेला माल कधी परत केला गेला नव्हता. मग इतर काही नाही तरी काही तरी, म्हणून मेहरूच्या गळ्यातल्या सोनसाखळीला खेचून तो पळाला.*

*छाया त्याच्या मागावर जाणार तो शिरीन आंटीनं तिच्या पायाला मिठी घातली. “अरे बिमाबा आजतक तूनी माजा जेटला नुकसान केला, तेच्या घणाबद्धा मला आता परत केला हाय. ते चेन गेला तर गेला. तुज्यासारका सच्चा दिलचा माणस मिळाला. तुला माजा घर कदी पन खुला हाय. केवापन येनी.”*

-----------------------------------------------

आजूबाजूचा गलका-गोंधळ वाढला. त्यामुळे सरलाला वाचन चालू ठेवणं अशक्य झालं. रवीच्या डायरीचं म्हणजे छायाच्या गोष्टीचं ती कितव्यांदापारायण करत होती, तिचं तिला सांगता आलं नसतं. कागदांवरची नजर उचलून तिनं अवतीभोवती पाहिलं. शाळकरी आठ-दहा वर्षांच्या मुलींचा तो गलका होता. त्यांना भेळ तिखट झाली होती. त्या मुली सरलाच्या भावाकडे “स्स हाय!” नाकानं सू सू करत गोड चटणी मागत होत्या. तशी सरला जागेवरून उठली. गोड्या चटणीच्या पातेल्यातला डाव घ्यायला सरसावली. डावातून येणारी थोडी थोडी गोड चटणी, तिने त्या सगळया मुलींनी हातात धरलेल्या कागदावरच्या भेळेवर घातली.

तिचा भाऊ तिच्याकडे बघून हसला. दुसऱ्या गिऱ्हाईकासाठी शेवपुरीची तयारी करण्यात तो व्यस्त होता. “ताई अजून अजून!" घोळक्यातून चिमण्या चिवचिवल्या. सरला हसली आणि तिने परत थोडीशी चटणी त्यांना दिली.

“का रे हसलाससा?” तिनं भावाला विचारलं.

“नाय बघत व्होतो, जेवापासून तू परत आलीयास तू बदलली हायस.” भावाने हलकेच भरलेल्या पु-यांवर शेव शिवरत म्हटलं. “आधी कोणी काय जादा मागलं की रागे भरायचीस. याचं पैसं आमच्यावर पडतंत कावायचीस.”

“मग आता?” सरलानं भिवया उंचावत भावाकडे बघितलं, त्याने उत्तरादाखल नुस्तं तिच्या हातात असलेल्या चटणीच्या डावाकडे नजर फिरवली. “हे? त्यात काय?”सरलानं नाक उडवलं. पण ती स्वतःशी विचार करू लागली.

गि-हाईकांना शेवपुरी दिल्यावर भाऊ जरा रिकामा झाला. सरलाकडे वळला. “मला कळतं गं, तुला शिकायची किती आवड हाय. सारखं ते कागद घेऊन आभ्यास करत असतशी. करू काय तरी खटपट. धा-बारा दिसात येतील धंद्यातलं पैसं परत हातात. ती कालेजची थकबाकी चुकवून टाकू. तू काय तश्शी हुश्शार हायेस. माझ्यासारखी रिकामी डोक्याची नायशी. काय महिन्याचा अभ्यासाचा खेळखंडोबा झाला ती तूट अश्शी भरून काढशीलशी गं.”

सरला विमनस्कशी हसली. “तुला रे कोणी सांगितलं मी अभ्यास करतेय? ही एक गोष्ट आहे. ती परत परत वाचतेय.”

“लय आवडीनं वाचतेसशी? इतकं काय हाय त्याच्यात?”

“आपल्या जगण्यातल्या प्रश्नांची उत्तरं सापडतायत का शोधत असते.”

“काय की कोण गांधी-बिंधी लय मोठं माणूस हाय का गं?”

“नाही. ती एक जंगली....” सरलानं आपले पुढचे शब्द गिळले. सलमानं दिलेली बजावणी तिला आठवली. घरच्यांना यातलं काहीही कळू देता नये. एक सूत्र दिलं की हळूहळू सगळीच कहाणी उलगडावी लागली असती. “अरे बायका-बायकांच्या त्या गोष्टी आहेत. तुला नाही कळायच्या, आवडायच्या.”

“म्हंजे, स्त्री मुक्तीवाल्या की काय?” भावाच्या या चाचरत विचारलेल्या प्रश्नाचं सरलाला खूप खळाळून हसू आलं. “लगीन करू नका सांगणाऱ्या?”

“हो, तसंच समज.”

“सरू, तुझं शिक्षण पुरं झालं नी तुला भारी पगाराची नोकरी लागली की नाय, अक्शी आमच्या जगण्यातल्या सगळया प्रश्नांची उत्तर मिळतीतशी बग.” भाऊ एवढं बोलून पाणीपुरीसाठी आलेल्या जोडप्यासाठी त्या तयारीला लागला. सरला त्याला मदत म्हणून पुऱ्या फोडून द्यायला लागली. “हे असं अधी मधी विघ्नं चालायचंच गं!”

“भाऊ मी परत जायचं नाही, ठरवलंय. पुरे हा तुझ्यावरचा सगळा भार. मी आता इथंच काहीतरी काम शोधते.” भावाची मडक्यात बुडवलेली पुरी हातात फुटली.

वैतागाने दुसरी पुरी भरून गिऱ्हाईकाच्या बशीत ठेवत तो करवादला, “माझी काय तक्रार हाय का? माझा मी करतोया ना सगळं पार. मला अक्कल असती तर मीच शिकलो असतो. देवानं तुला अक्कल दिली हाय, त्याचं काय चीज करतसशी की नाय?" पुन्हा हातातली पुरी मटक्यात फुटली.

“भाऊ माझं ऐकून घे. नुस्ता पैशाचा प्रश्न नाही. मुंबईसारख्या बड्या शहरातलं जगणं आता साधं-सरळ राहिलेलं नाही रे. मी विटलेय त्या जगण्याला. आपलं हे गावातलं शांत-साधं जगणं मला पुरे. गरीबीतलं का होईना? अब्रु राखून तर जगू शकतो ना आपण?”

“खरंच गं सरू तू बदललीसशी. पार बदललीसशी. कुनाला सांगितलं तर खरं वाटायचं नाय की तू बोलते हे!" गिऱ्हाईकांच्या वाट्याच्या सगळया पुऱ्या घालून, मिळालेल्या उसंतीत गोंधळलेला भाऊ बोलला. “अगं, तुझ्या त्या जिद्दीचं काय झालं? तुझ्या त्या बड्या सपनांचं काय? इतकं काय होऊन राहिलंय गं तिथं? आल्यापासून बगतोय. गप गपशी असतसशी ? काय झालंय ते सांगच आता.”

“आता कसं सांगू तुला? बड्या बापाच्या पोरी आम्हाला काय आणि कसं कसं होस्टेलवर छळतात, काय काय घालून पाडून बोलतात. किती आणि कसं मारतात. त्यांना तर सात खून माफ आहेत.”

“आगं पण गरीबांच्या वाटयाला ठरलेलं भोगच हायती ते. म्हणून तर आपण गरीब राहयचं नाय, ठरवलं हाय की नाय? म्हणून तर इतकं टेकाटेकीनं पण खर्च करून तुला तिथं धाडली हाय ना? आज पावतो केलेली इतुकी सारी खटपट-धडपड मग फुकट?" भाऊ कावला.

“बड्या बापाच्या पोरी काय करतात ते सहन करू रे. पण बड्या बापाचे पोरगे आमच्याशी काय खेळ मांडतात, ते कोणत्या शब्दात सांगू?नको भाऊ.

आपला गाव बरा. इथं मिळेल तो भाकरतुकडा, नाही तर पाण्याचा घोट घेऊन जगणं परवडलं.”

“आपला गाव बरा?” भाऊ कसानुसा हसला. गाव पण आता गावासारखा नाव राहिला गं पोरी. सगळीकडे बरीवायट मानसं….”

त्याचं बोलणं पुरं व्हायच्या आधी एक कार करकरत येऊन समोर उभी राहिली. “ऐ सुभान्या, रांडेच्चा, चार प्लेट शेवपुरी दे चकण्याला आनि पैटिस बांधून दे वीस-बावीस चुतमारीच्या.” गाडीची काच खाली करून, एका काळया गॉगलवाल्यानं डोकं बाहेर काढत ऑईर सोडली. त्याचं ओरडणं ऐकताच, भाऊच्या भेळगाडीजवळ होती ती गिऱ्हाईकं हातातले खाद्यपदार्थ तसेच तिथे टाकून घाईघाईन पांगली.

“सरू, ही गिऱ्हाईकं पळततशी, त्यांच्या जोडीने तु पन पळ. चल जा सांगतोयसा. माझी आण तुला. जा बिगी बिगी.”भाऊनं सरलाला धावडवली. थोड्या अंतरावर जाऊन थांबली.

“ए रांडेच्चा, फालतू टायमपास करू नको. हात चालव लवकर. तिखट मार बराबर. पन लय तिखट झाली, तर तोंडात तुझ्या मिरचीचा भुक्का भरतोया. बग याद ठेव.” मग्रूर आवाजानं दरडवायचं काम चालू होते. थरथरत्या हातांनी ऑर्डरच्या गोष्टी बनवून सुभान्या गाडीपाशी येऊन गेला. झटक्यात गाडीतून तो आडदांड काळा गॉगलवाला खाली उतरला. “भडव्या, पैटिस गरम हाय ना? आज कितीचा धंदा केला?” पाकिटांच्या पिशवीत हात घालून पैटिस चुरडून बघत,

गरमपणाची खात्री करत त्यानं विचारलं, "आरं बोलकी. गल्ल्यात किती जमले हाय?"

"मालक, गरीबाला बायका पोरं हायतशी. दया करा, रांगडदादा. पंधरा दिसांआधीच सगळा उचलून नेला की तुम्ही." सुभान्या गयावया करू लागला.

"मी सांगितलं होतं काय रे, तुला पोरं पैदा करायला? चल बगू किती हाय ते?" सुभान्याचं मानगूट धरून काळा गॉगलवाला त्याला फरफटत भेळगाडीपाशी आला. गल्ल्यात त्याने हात घातला.

"रांडेच्या, नुस्तीच दहा-वीसाची नोट ठेवतोशी, शंभर-पाचशेच्या नोटा कुठं दडवल्याशी?"

"मालक, आज बड्या नोटा काय बी नाय. अवं दया करा." सुभान्या रडू लागला. गॉगलवाला खदाखदा हसला. गल्ल्यात बचक मारून हातात आल्या तितक्या नोटा घेऊन चालू पडला. थोड्या वेळानं तो गाडीत बसल्यावर, गाडी रस्त्यावर धुरळा उडवत निघून गेली. सरला भावापाशी धावली.

"भाऊ, हे तर मुंबईपेक्षा सुद्धा अती झालं रे." भाऊ तिच्या हातावर डोकं ठेवून गदगदून रडला.

"तुला पाठवायला ठेवलेलं, जमा केलेलं सारं पैकं, पंधरा दिवसांपूर्वी घेऊन गेलं. आज पुनांदा वडाप मारून गेले. येतात आनी फुकटचं खाऊन जातात

हरामखोर. ते बी परवडलं गं. पन आमच्या कष्टाची सारी कमाय, फुकट उचलून नेतात. इथं जगणं झालंया महाग.”

“मग पोलीस काय करतात?”

“हप्ते खातात. अजून काय करनार? त्यांच्यामंदी कोनी शिस्तीचा आला की त्याची लगेच उचलबांगडी करतात.”

“इतकी पहुँच आहे त्यांची? कोण आहेत कोण ते?”

“गावातल्या नामचीन दारूअड्डेवाल्यानं ठेवलेले पोरगे हाय.”

“पण सगळे गाववाले मिळून ठोकत का नाहीत त्यांना?”

“इतकी गावातली एकी असती, तर अजूनशी काय पायजेल होतं गं? कोनी काय करायचं ठरवायला लागलं की, आतले भेदी सगळं त्यांना जाऊन सांगत्याती. म्हादू तीन महिन्येआधी सगळ्यांना जमवत होता. भेटून सांगत होता. पण गावाची एकत्र बैठक जाण्याआधीच, तो गायब झाला हाय. तेवापास्नं त्याचा काय बी पत्ता नाय. सगळे तोंडात गुळनी धरून बसून हाय. समजायचं ते समजूनशान.”

“इथं आता छाया पाहिजे होती.”

“कोन छाया?”

“छाया आंग्रे.” आपण जरा जास्तच बोलून गेलो काय? अशी धास्ती सरलाला वाटायला लागली. “मुंबईतल्या पेपरात आताशा बातम्या येतात. ती

कोण फटकेवाली म्हणून आहे. असं कोणी कोणावर अन्याय जुलम करताना दिसलं ना, तर ती चाबकाने फोडून त्यांना वठणीवर आणते. धडा शिकवते.”

“मग बरं हाय की? तू मुंबैतच राहा की! तुझ्यावर कोन जुलम करतात, त्यांची नावं तिला सांगतशी, तर ती तुझी सोडवनिशी करील की. जमलं तर तिला आपल्या गावात पन घेऊन येईनाशी गं.” सरला विचारात गढली.

भेळ गाडीच्या पट्टीवर कोणी टकटक केली. “ओ भाऊ, एक सुकी भेळ द्या की.” एक परकरातली पोरगी होती. सुभान्या स्वतःला सावरून, गिऱ्हाईकाची मागणी पुरी करायला उठला.

“कोन हाय कोन गं ही छाया? कोनी जबरी पोलिसवाली हाय का?” भेळेचं मिश्रण कालवता कालवता सुभान्याच्या डोक्यात तिचाच विचार चालू होता.

“नाही. लोकं म्हणतात ती भूत होऊन परत आलीय.”

“आत्ता?” सुभान्याची कांदा चिरताना बोटावर सुरी गेली. “आये गं?” तो चुटपुटला.

## रवीची डायरी : २४ ऑगस्ट १९९५

-------------------------------------------

*कालपरवात माजगाव टेकडीवरल्या बागेत, झाडावर बसलेल्या छायाला बघितल्याच्या अफवा, सध्या माथरपाखडीत फिरताहेत. पण आज छायानं असा जंगी धमाका केला की माजगावातल्या पोराटोरांच्या ओठांवर देखील 'बिमाबा फटकेवाली' नाव येता जाता खेळायला लागलंय.*

*झालं असं की आमचा स्वैपाकी भोलाराम काल रात्रीला गंगाबाई कामावर आली नाही, म्हणून चौकशीला तिच्या घराकडे गेला होता. राणीच्या बागेत तिचा नवरा माळी म्हणून काम करतो. त्याच आवारात मग एका कोपऱ्यातल्या खोपटीत सखाराम आणि गंगाबाईनं आपलं बि-हाड थाटलंय.*

*राणीच्या बागेत गंगाबाईकडे जायचं झालं की मेहरू आणि झेबू दोन्ही शेजारी मुलं भोलारामचा पिच्छा पुरवतात. त्यांना न कळवता, न बोलवता गेलं तर भोलाशी रूसवा धरतात. सकाळी भोला गेला, तेव्हा मेहरू घराकडे नव्हती. झेबू होता. त्याला जोडीला घेऊन भोलाराम राणीच्या बागेत गेला होता. झेबूचा हा सगळा हट्ट तिथले प्राणीसंग्रहालयातले प्राणी बघायला मिळावेत यासाठी असतो. भोलाला देखील कोणी सोबतीला असलं तर हवंच असतं. कारण सखाराम हा फार संशयी आणि भडकू माणूस आहे. गंगाबाईच्या बाबतीत तो कोणाचाही संशय घेतो. बागेत रपेटीसाठी असलेल्या घोड्याचा देखील. घोडेवाल्याचा तर घेतोच घेतो, पण त्या चार पायाच्या जनावराचा देखील संशय घेतो.*

*तर अशाप्रकारे मनात एक प्रकारची धाकधूक घेऊन, भोलाराम झेबूचा हात धरून, गंगाबाईच्या खोपटीपर्यंत पोहोचला. दार बंद लोटलेलं होतं. पण त्याला कडी नव्हती. भोलाने ते खटखटवलं. आतून कण्हण्याचा क्षीण आवाज आला. भोलानं गंगाबाईच्या नावानं हाका मारल्या. उत्तर येईना.*

*तेव्हा त्यानं झेबूला आत डोकावायला सांगितलं. तसं डोकावल्यावर झेबूला गंगाबाईचा मुलगा गणू पांघरूण घेऊन झोपलेला आणि कण्हताना दिसला. "आ तो बीमार हशे."*

*मुलगा आजारी असल्यामुळे, त्याच्यापाशी देखभालीसाठी राहावं लागलं असणार म्हणून गंगाबाई आली नाही. याचा योग्य अंदाज भोलारामने केला. पण ती कामावर नेमकी कधी येणार? तिला भेटल्याशिवाय त्याला कळणार नव्हतं. भोलाराम विचार करतो आहे, तोवर झेबू काकाकुवा पोपट ठेवले होते, त्या पिंजऱ्याकडे पळाला. घराकडे परतलेल्या सखारामच्या तावडीत भोलाराम एकटा आयता सापडला.*

*"ए भडव्या, साला मादरचोद तु इथं काय करतो? ऐ, इथं तिथं काय बघतो ऑ? तुझ्याशी बोलतोय बहेनचोद." आल्या आल्या सखारामनं शिविगाळ आणि बोंबाबोंब सुरू केली. "साल्या माझ्या बायकोला फूस लावतोस? पाजी, हरामखोर, बेईमान." सखारामची बोंबाबोंब इतकी मोठी होती की बागेत सकाळची दौड आणि सैरसपाटा करायला आलेली माणसं जागेवर थबकली. कान देऊन आवाजाच्या दिशेने आली. जमली. तमाशा बघायला इतके श्रोते जमलेले पाहून, सखारामला अजून ऊत आला. त्याच्या तोंडातून शिव्यांची गटारगंगा भसाभसा वाहायला लागली.*

*इतक्या लोकांसमोर होणारा अपमान भोलारामला सहन होईनासा झाला. त्यात काही ओळखीचे लोक होते.*

*“डार्लिंग, आ तो दारू मुकीने, एकदम टेर झाला हायनी. हे मुनसिपालटीवाला काय करते? असला गांडा माणसने कामाला शू काम ठेवते? डर्टी इडियट.” मिसेस पात्रावालानं मिस्टर पात्रावालाच्या कानात खुसपुस केली. “अरे भोला, ते केम अस्ला ऐकून घेते हाय? लगावनी डफ्फरला एक काननुं नीचे सॉलिड बंपर.” मौलिक सूचना केली.*

*“आ शू बोले छे कैसर तू?' मिस्टर पात्रावालानं लगेच आक्षेप नोंदला. “तमे तो एकदम मारामारीनी स्टार्ट करावा माँगो छे. फुल्ली रॉंग सेईंग हां डार्लिंग. भोला, बी अ जंटलमन. कॉल पुलिसवाला.” भोलारामनं नाइलाजानं अस्तन्या सरसावल्या होत्या. सदऱ्याच्या बाह्या त्यानं पुन्हा खोलून खाली घेतल्या.*

*“ऐ बावा, तू तर एकदम बायल्या हाय. माझ्या भानगडीत पडू नको. काय? मी जाम टेरर आदमी हाय. पुलिसवाल्याची धमकी मला देवू नको. नी ही स्साली तुझी फुगलेली बायको हाय ना, तिला सांग, मला इंग्लिस शिव्या घालू नको. मला समदं कळतं हाय. आय कान वॉक इंग्लिश, आय कान टाक इंग्लिस, आय कान फक इंग्लिस.” झुलता झुलता, बोलता बोलता त्या त्या क्रियांचा अभिनय करून दाखवायचा सखारामनं प्रयत्न केला. “स्सालीला फुटबॉल बनवून लाथ मारून, कंपाऊंडच्या पार उडवून टाकीन.” सखारामनं रिकाम्या हवेत लाथ इतकी जोरात उडवली की दुसऱ्या पायाचा तोल जावून तो खाली पडला. तशी त्याने पुन्हा घाणेरड्या शिव्यांची राळ उडवून दिली.*

*तोच घाईघाईने गंगाबाई धावत तिथं आली. मिसेस पात्रावाला समोर तिनं पदर पसरला. आणि गयावया केल्या. "तो नशेत हाय. काय बोलतोय, समोर कोन हाय? काय बी उमज त्याला पडत नाय हाय. माफ करा सायब. माफ करा मेमसाब. तुमी मोठी मानसं, याच्या नादाला लागू नका. चिखलात दगड टाकला तर तुमच्यावरच उडनार. हात जोडते...." गंगाबाईला वाक्य पुरं करायला मिळालं नाही. उठून उभ्या राहिलेल्या सखारामनं फाडकन तिच्या मुस्काटात मारली.*

*"रांड स्साली, नवऱ्याला चिखल म्हणती? नावं ठेवती? ही कोण तुझी मोठी माणसं लागून गेली हाय, मला माहीत हाय. बाजारबसवी यांच्या ढेंगाखाली निजते आनी तोंड वर करून पुढ्यात बोलते." गंगाबाईला ढकलून खाली पाडून सखाराम लाथांनी जमेल तसा हाणायला लागला.*

*"मेले, मेले. आई आई' करत ती त्या लाथा चुकवायचा प्रयत्न करत कळवळू लागली.*

*"अरे, पेस्तम, बुलावनी पुलिस. हे तो एकदम मॉनस्टर झाला हाय. तिला मारून टाकेलनी?' मिसेस पात्रावाला नवऱ्याला गदागदा हलवू लागली.*

*"नो नो डार्लिंग. हा तेंचा हजबंड वाईफचा झमेला हाय. शाण्णा माणसने तेच्यात पडाचा नाय. काले ते एक जमाई करनार आनी आमाला बोलनार, तू मदी पडला कशाला? ही बायडी उल्टा मला विचारनार, माज्या हजबंडला जेलमदी कशाला पाठवला? अमे आ लफडामां नथी पडवानु, चालो अय्यांथी," मिस्टर पात्रावाला मिसेस पात्रावालाचा हात धरून*

*ओढू लागला. जड कैसरला बारीक पेस्तमनं ओढणं शक्य कोटीतली गोष्ट नव्हती.*

*ती हलेना. तेव्हा मग त्याने नवरेपणाची खास ताकद वापरली, “कैसर चाली पडो. नथी तो अमारे पन झगडा शुरू थाय छे.” मिसेस पात्रावाला फुरंगटून नाइलाजाने मिस्टर पात्रावालाबरोबर चालू पडली. पण गंगाबाईच्या किंचाळ्यांनी तिच्या पायात बेडी पडल्यासारखे झाले.*

*“अरे, ऐटला बद्‌धा घणा माणस तमे जमा थाय छे. रोकोने...” तिनं जमलेल्या बघ्या मंडळींना आवाहन केलं. तसं बघ्या मंडळींची एकमेकांशी नजरानजर झाली आणि ते पांगायला लागले.*

*“भोला, तू कुछ करनी.” झेबू भोलारामचा हात गदागदा हलवत बोलला. “आ,सखारामनी साईज जो, अने तमारी साईज जो. तू तेच्यावर हात टाकलानी तरी तो खाली चिरडून जाईल.”*

*“ना बाबा ना, आमी ना जोईबे.” भोलारामचं अंग थरथरलं. “ऐशा समझदारी नाईबे. ऐ सब भला मानुष जे थाय, आमी पन ते थाय. चालो आमी घरे जाईबे.” भोलानं झेबूचा हात ओढला. पण तो झेबूनं झटकला.*

*“भोला, जोनी, गणू मार खातो हाय.” विस्फारलेल्या डोळ्यांनी झेबू पाहत राहिला. आईच्या किंचाळ्यांनी आजारी तापाने फणफणलेला गणू बाहेर आला होता आणि त्याने स्वतःच्या आईच्या अंगावर झोकून दिलेलं.*

*“स्साल्या लय चरबी झाली तुला पन. तू माझा पोर असताना, तिच्या वाटेनं उभा नाय राहता. रांडे, कोनाचा हा पोर तू माझा म्हणून सांगते? हरामजादी.” सखाराम बायको आणि मुलाला दोघांना लाथा हाणू लागला. त्यात गंगाबाईच्या कनवठीची गाठ एकदम सुटली. त्यात बांधलेले पैसे*

*बाहेर विखुरले गेले. “धंदा करते आणि रांड माझ्यापास्नं पैकं लपवून ठेवते.” लखलखत्या डोळ्यांनी सखाराम ते गोळा करू लागला. “रांडे, काल मला दारूला घालायला पैकं नव्हतं. आता हे कुनाबरोबर झंगाट लावून आणलंस सांग.” विरोध करणाऱ्या गंगाबाईचा गळा त्याने गच्च धरला.*

*“नको, नको. ते नेवू नको. गणूच्या दवापाण्यासाठी उधारी करून आणलले हाय.” गंगाबाईच्या तोंडातून कसेबसे शब्द रेटले. तसा हिसडा मारून सखारामनं तिला खाली आपटली. ते घेऊन निघाला. तोच झेबू अचानक पुढे सरसावला आणि सखारामच्या हातातल्या नोटा हिसकावून घेऊन भोलारामपाशी धावला.*

*“भोलो ऐने नथी आपवानु.” म्हणत झेबू भोलारामच्या आड दडला. तसा भोलारामला प्रतिकाराची संधी न देता, सखारामने त्याच्यावर हल्ला केला. एका फटक्यात भोलाला बाजू खाली ढकलून दिला. आता तो झेबूच्या बखोट्याला हात घालणार होता. अचानक कडकडत एक चाबूक त्याच्या पुढे झालेल्या हातावर येवून पडला. मारानं शिणशिणून सखारामची बोटं बधीर झाली.*

*“बिमाबा आंटी.” झेबू आनंदाने चित्कारला. चाबकाच्या आवाजासरशी पांगलेली गर्दी बिथरून, पुन्हा मागे वळून पाहायला लागली.*

*“बिमाबा, मार मार तेला.” मिसेस पात्रावाला दुरून बेंबीच्या देठापासून ओरडली. मिस्टर पात्रावालाचे रोखू पाहणारे हात झुगारून, परतीची धाव एखादा पेनल्टी शूटआऊटचा फुटबॉल गोलपोस्टकडे जावा, तशी वेगाने धावली.*

*"स्साली जंगली रांड. भितो की काय तुला? नाय तुला ढेंगाखाली घातली, तर बापाचं नाव लावणार नाही." सखाराम तुच्छतेने छायाकडे बघत थुंकला. ते त्याचे शेवटचे शब्द ठरले. कडकडत, फडफडणाऱ्या चाबकाने डोक्यापासून पायापर्यंत, त्याला उभाच्या उभा फाडला. मग त्याच्या पायांभोवती तो गुंडाळून, छायानं त्याला खाली पाडला. पुन्हा जमिनीवर लोळवत लोळवत, सपासप फटकारून काढला. त्याच्या किंचाळ्यांनी जे बघे जमवले, त्याच्या पावपट सुद्धा गंगाबाईच्या किंचाळ्यांनी जमले नव्हते.*

*हे बघायला गंगाबाई शुद्धीवर नव्हती. छायाने अखेर चाबूक सखारामच्या नरड्याभोवती कसला आणि आता ती काय करणार, लक्षात आल्यावर भोलारामने एकदम जावून तिचे पाय धरले. "देबी क्षमा, देबी क्षमा. तुमी माँ काली. तुमी जय तारा. माँ क्षमा. ऐकी गंगा पती, छोडीबे माँ." दोन्ही हात पसरून आणि हातांनी नाही, नाहीची हालचाल करून, भोलाराम छायाची करूणा भाकू लागला. ती नाराजीने भोलाकडे बघू लागली.*

*तसा झेबू पुढे सरसावला. "ओ बिमाबा आंटी, तमे पुलिस पकडीने फासी देईल नी? तेला फरगिव कर आनी जाने दी." झेबूने छायाचा हात धरून तिची समजूत काढायची हिंमत केली.*

*"छाया, तू खराखरा देवी हाय नी. जुग जुग जियो तमे." मिसेस पात्रावाला छायासमोर गुडघे मोडून बसती झाली. "पन आता तेला जाव देनी. तो आता बराबर लायनपर येनार. मी पन लायनपर आली हाय. मी तुला राँग समजला. हा सगळा जमला हाय माणस नाय. गधेला हाय. दुसरा माणसची मदत करायला तेची हिंमत नाय. अय्यांथी तू एकच खरा*

*माणस हाय. तू जंगली नाय नाय. तूच खरा डिसेन्ट लेडी हाय. सोड तेला सोड. आय प्लिड यू." मिस्टर पात्रावाला मिसेस पात्रावालाच्या शेजारी येऊन गुडघे मोडून बसला. त्याच्याकडे बघून मिसेस पात्रावालाने विनंती केली, "पेस्तम तू सांगनी तिला. तुझा गुड फ्रेन्ड हायनी."*

*"बिमाबा, सोड तेला. जावू दे.' पेस्तमनं विनवलं, तसं छायानं सखारामच्या गळ्याचा चाबूक काढून घेऊन, त्याला मोकळा केला. ती जवळच्या झाडावर, जिथून उतरली होती, चढायला निघाली.*

*"अरे, काय भितो काय तुला? डोंगरीच्या सत्तारदादाचा माणूस हाय मी." सखारामची सुरू झालेली धमकावणी, तिनं एकदा नुस्तं वळून मागे बघितलं आणि तोंडातच जिरून गेली.*

-----------------------------------------------

सारानं डायरीचं पान वाचून खाली ठेवलं, कारण माय तिला हाका मारत होती. "हांव किती हाका मारतंय, पन तू ते बुकमदी फुल्ल पिसो जाला गो बाय." मायची कटकट ऐकून सारा जागेवरून उठली. ही तिच्याकडची झेरॉक्स कॉपी होती. ती कॉपी सारानं नीट ध्यानपूर्वक परत आपल्या बॅगमध्ये ठेवली. "किदे खबर ना, तें बुकमदी आसा तरी काय? किदे तुजा बायफ्रेन्डचा लेटर असते गो? सांग मरे, अस्सा गो काय?" मायच्या बोलण्याचा कंटाळा करत, केचांचा बुचडा बांधत, सारा व्हरांड्यातून घरात जायला वळली. "गो तुज्या होठांक लॉक घातलाहा काय?"

“माय कित्या गे पिरपिरी-पिरपिरी करतंस? तुका सांगला मा? बायफ्रेन्डाचो काय इषय नाका. ते एका बायुलाची स्टोरी आसा. तिनी लाईफची फायट कश्शी केल्यानं, तेची खबरबात सांगली आसा.” सारानं घुश्शात मायच्या प्रश्नाला उत्तर दिलं.

“गो चेडवा, इतकिशी बारीक किड होतंय तिया,” मायने उजवा तळहात पुढे करत माप दाखवलं. “तेचा आता इतक्या मोठा तुका कोनी केल्ला? मिया. तुज्या भुतूर काळजात काय चालता, माका सगळां खबर जातां. आयलस तेव्हापासून बगतय, काय तरी, तुजा काळीज जाळताहा. पुन्नांदा पुन्नांदा कितके पावटी, ते स्टोरीत वाचत आसतय. चाळो लागल्यागत पिसो मनुज कस्सा, निजेत आरड घालत जागतंय. काय चलल्लाहा तरी काय तुजा? माजा काळीज कस्सा फाटान चाल्लाहां.” मायने जवळ येऊन साराच्या खांद्यांमध्ये हात रूतवत तिच्या डोळयात डोळे घातले.

साराचे डोळे भरून आले. तिने मायच्या नजरेपासून नजर दुसरीकडे फिरवली. “गो आवशीक सांगतलस नाका तर मग कुनाक मो?” मायने साराला मिठीत घेतलं. आता साराला काही ना काही मखलाशी करणं, मायला पटेल असं सांगणं भाग होतं.

“गे हांव एका फ्रेंडाची गाडी चालवत होतय नी एका बाप्याक गाडी ठोकली. ॲक्सिडेन्ट झालो. तो मेलो. तेचो चेहरो माका दिसता डोळयांसामक्या.” यावर मायनं सारं समजलं, अशा अर्थानं साराला पाठीवर थोपटलं. मिठी सोडली.

“आमी फादरीक सांगाया. तेच्याकडून घराकडे पानी मारून घेवया. मेल्ल्याचा भूत तुका सतावताहा. चेडवा तू कायेक भिवा नाका. चल आम्ही सोमती मंदिरात जावया.” मायनं आपल्या समजुतीनुसार तोडगा काढला. अरे बापरे! फादरसमोर कन्फेशन द्यायची पाळी आली, तर त्यांचे अनेक प्रश्न निघणार असते. सारावर खरीखुरी वाटणारी तपशिलवार स्टोरी सांगण्याची पाळी येणार असती.

“गे माय, तितक्या काय मोठा नाका गे, काय नाका.” मग आपले दोन्ही हात आता मायच्या मानेभोवती गुंफत, तिच्या नजरेत नजर लावत तिला रोखायचा प्रयत्न केला. मायनं ते सरळ काढून टाकले. घरात गेली. सोललेल्या काजूचा डबा येऊन आली.

“चल गो. फैक्टरीत काजी पोचवया नी थयसून येताना वाटेत कंपालात जावया. फैक्टरीची गाडी माका चुकली. ह्या इतक्या बोजा आमी आळीपाळीनं मिळान पोचवया.” मायनं डबा पेलत पायात चपल चढवले सुद्धा. “वायच पैशे गावले तर उद्या चूल पेटतली.”

“आस्सा गो काय? घाय किदे मारतस?” सारा नाराजीने बडबडली.

“मुझे केस काळयांच्चे पांढरे झाले, ते गो किदे? असल्या गोष्टीनी हयगय जाय नाका. वच मरे. जड जालो.” मायनं सरळ डबा साराच्या हातांमध्ये दिला आणि पायऱ्यांवरून उतरून, मागे वळून न बघताच वाटेला लागली. साराला झकत मारत उसासत, मायच्या मागे डबा घेऊन लावावं लागलं. मायच्या तरातरा चालीबरोबर जुळवून घेत, डब्याचं वजन पेलत जाणं साराला अवघड वाटत होतं.

या हातातून त्या हातात डबा परत परत कडेवर फिरवत, सारा मायमागे जात होती. खूप वेळाने खूप पुढे असलेल्या मायनं वळून मागे बघितलं. कारण मोठा हमरस्ता पार करण्यासाठी तिला थांबावं लागलं होतं.

“गो काय हॅ? कसले कसरती करतस?” माय हसायला लागली, “तुमका आजच्या चेडवांका बोजो माथ्यावर घेवूक लाज दिसतां मा? दी हय माझ्यार.” म्हणत साराच्या कडेवरचा डबा काढून घेऊन, मायनं तो आपल्या माथ्यावर ठेवला. हात सोडून सुद्धा तो सहज तोलला. सारानं ते कवतिक पाहून नाक मुरडलं. समोरून जाणाऱ्या गाड्या आरपार दोन्ही दिशांना पसार झाल्यावर, तुरुतुरू चालत माय रस्ता पार करून पलीकडे पोहचली. आणि वळून तिनं साराला आपल्याकडे येण्याचा इशारा केला.

सारानं गाड्यांचा अंदाज घ्यायला दोन्ही दिशांना नजर फिरवली. हादरली. उजव्या बाजूनं एक कार सुसाट वेगाने आजूबाजूला हेलकावल्यासारखी चालून येत होती. ती आता आपल्याच अंगावर येतेय, असं वाटून सारानं मागे उडी मारली. तोल जावून धडपडली. मात्र अचानक दिशा बदलून, कार मायला ठोकून पुढे जात करकच्च ब्रेकचा आवाज मारत थांबती झाली.

साराचा धीर सुटला. आत्ता समोर दिसणारा मायचा हसरा चेहरा तिथून गायब झाला होता. “माय!” नकळत ती जोरात किंचाळली. सरसावून उठली. गाड्यांची पर्वा न करता रस्ता ओलांडून पलीकडे धावली. माय निपचित खाली आडवी पडली होती. डोक्यावरचा डबा खाली पडला होता. त्यातले सगळे काजू

मातीत सांडलेले होते. “माय? माय?” कासावीत होत सारानं पालथ्या पडलेल्या मायला कवेत घेत सुलटं केलं. तोंडातली माती थुंकत मायनं खकाणा काढला. साराच्या जीवात जीव आला. तिनं मायला बसती-सुरती केली.

“हांव तुका सांगता मा, बगलय भुताचो चाळो?” मायनं उलटी साराला झाडायला सुरुवात केली. साराला हसावं की रडावं असं झालं. तिनं मायला धरून उठवायचा प्रयत्न केला. मायला उठता येईना. डाव्या पायातून सणका येऊ लागल्या. सारानं काळजीपूर्वक पाहिल्यावर, त्या पायावर गुडघ्याकडे खरचटल्याच्या खुणा दिसल्या. कारने मायला त्या भागात ठोकलं होतं.

अपघाताचा सुरवातीचा धक्का ओसरल्यावर, मायला वेदनांची जाणीव व्हायला लागली. दुखीने तिचे डोळे अश्रू घळघळू लागले. मग सांडलेल्या काजूंकडे नजर गेली आणि माय कावरीबावरी झाली. थरथरत्या हातांनी सांडलेले काजू वेचायचा प्रयत्न करू लागली. “गेला गो बाय, आठवड्याचा काम माती जाला गो. मालक सगळी कमाय कापतलो गो बाय.” दुःख आणि भीतीने मायला पुढचं काही बोलता येईना. रडता येईना, तिची भांबावलेली नजर साराच्या नजरेत खिळून राहिली.

“व्हॉव! स्टारखानची कार.” कोणीतरी अत्यानंदानं चित्कारलं. धडधडत एक मोटारबाईक साराच्या जवळ जवळ अंगाला घासून पुढे थांबलेल्या कारकडे गेली. तिथे तो बाईकवाला उतरता झाला आणि खजाना गवसल्यासारखा पुन्हा ओरडला, “साक्षात स्टारखान. ओ माय गॉड! ऑटोग्राफ प्लिज.”

स्टिअरिंगवर डोकं टेकलेल्या स्टारखाननं जड झालेलं डोकं उचललं. तारवटलेल्या धुंद डोळयांनी कोण बोलतंय अंदाज घ्यायचा प्रयत्न केला. “कोन बे?”

“मी. मी साक्षात स्टारखानशी आमनेसामने बातचीत करतोय? आय स्वेअर. फक मी. आय कान्ट बिलिव्ह.” त्या तरूणाचा उत्साह फसफसत होता. तसं त्याच्याकडे मिचमिच्या डोळयांनी बघत स्टारखानने डोकं कारच्या खिडकीतून बाहेर काढलं. बाहेरचा अंदाज घ्यायचा प्रयत्न केला. त्याला माय आणि सारा मागे मातीत बसलेल्या दिसल्या.

“कम्बख्त बूढीया, रास्ता तेरे बाप का है क्या? कुत्ता बिल्ली जैसी बीचमें टपकेली.” स्टारखाननं डरकाळी फोडली. त्याचा चाहता तरूण आपल्या हिरोचं लक्ष वेधून घेण्यासाठी उत्सुक होता. परिस्थितीचा थोडाफार अंदाज त्याला आला.

“सर, मी तुमची 'हायवे' फिल्म सोळा वेळा बघितलीय. यस सर. पुरती सोळा वेळा. त्यात सेम सिच्युएशन आहे बघा. हिरोईन आणि तिची आंटी रस्त्यात मध्ये येऊन, ॲक्सिडंटचं सोंग करत असतात आणि कारवाल्यांकडून पैसे उकळत असतात. सेम टू सेम सिच्युएशन सर.” चाहता तरूण फसफसला.

“हू यू?” स्टारखान गरजला.

“हू मी!” एक नाट्यमय पॉज घेत, तो तरूण शेखी मिरवू लागला. “बंदे का नाम वैसे तो विक्रम चौधरी है, लेकिन प्यारसे लोक मुझे विकी रिपोर्टर कहते है. सांजखबर पेपर तुम्ही पाहिला नसणार सर, पण मी त्यांच्यासाठी रिपोर्टींग करतो.” त्याने ऐटित सलाम ठोकला.

“साब ये लडका ठिक बोलला. ये बेवकूफ औरते आपल्याला फासायला बगतात.” स्टारखानच्या शेजारचा धट्टाकट्टा बॉडीगार्ड सारखा दिसणारा बाप्या बोलता झाला. “गावठी ठक.”

“ऐ! तोंड सांभाळून बोल, इडियट.” सारा चवताळून कडाडली, “आधी तुझी गाडी कुठेय बघ. टोटली रॉंग साईड. आम्ही कुठे आहोत बघ. रस्त्याबाहेर. ब्लडी हेल. मिस्टेक कोणाची आहे? बघ, बघ. जरा डोळे नीट उघडून बघ. का डोळे मिटून कार चालवत होतास?”

“ओ मिस. तुम्ही स्टारखानशी बोलताय. जरा जबान सँभालके.” विकी रिपोर्टर परत लाडात आला. “हू यू? नथिंग. पाँव की जूती. तर हू ही? आम्हा लाखो करोडो चाहत्यांचे देव. साक्षात स्टारखान. आमचे रोल मॉडेल, असंच कोणी ऐरे-गैरं तुझ्यासारखं नथ्थुखैरं स्टार होत नसतं. त्यासाठी तशी सुपर क्वालिटी, सुपर कर्तबगारी लागते. तर कोणी सुपरस्टार बनतं. तुझी लायकी तरी आहे का, तोंड वर करून सरांना काही बोलायची? त्यांनी काहीही केलं, तरी ते माफ आहे. त्यांची पोजिशनच तशी सुपर आहे.”

“वेल सेड विकी. यार तुने तो मेरे मुँहकी बात छिनली. कसमसे. साबच्या नेक्स्ट फिल्ममध्ये तुला एक रोल बुक करून ठेवतो.” कारच्या मागच्या भागात बसलेला चष्मेवाला बोलता झाला.

“ओहो! खरं” आनंदाच्या वर्षावानं विकी भिजून चिंब झाला. गहिवरला, “मला माहीत आहे, तुम्ही कोण? खानांचे सेक्रेटरी खन्नाजी, “थँक यू, थँक यू व्हेरी मच सर. मला सरांची सगळी माहिती आहे, हे माझं कार्ड घ्या.”

“अरे यार, अब चलो भी, मर तो नही गई बुढीया. काहे को बखेडा मचाते हो,” स्टारखाननं सेक्रेटरीला झापलं...

“बिल्कुल दुरूस्त सरजी. भीमसिंग गाडी चलाओ. आईए सर, आप पिछे तश्रिफ रखिये,” सेक्रेटरीने अजीजीने विनवलं.

“क्यो? माझा ड्रायव्हिंग काय खराब आहे?”

“तसं नाही सरजी, पण भीमसिंगला आपण जो तनाखा देतो, तो वसूल झाला पाहिजे ना.” सेक्रेटरीच्या या हजरजबाबीपणाला दाद देत, स्टारखान गाडीच्या पुढच्या सीटवरून उतरला, बाहेर येऊन परत मागच्या सीटवर आत जाऊन बसला.

त्याचं एवढं दर्शन हमरस्त्यावरून जाणाऱ्या दोन-तीन गाड्यांमधल्या लोकांना, तिथेच थांबा घ्यायला लावायला पुरेसं ठरलं. “अरे स्टारखान,” “ओ हां!” आश्चर्यानंदाची कारंजी उसळली.

“भीमसिंग जल्दी कार इथून बाहेर काढ, नाहीतर इथं चाहत्या लोकांचा एकदा जमाव तयार झाला, तो कुछ भी हो सकता है, सरजींची हालत पब्लिकला सामोरं जायची नाही.”

सेक्रेटरीच्या या वक्तव्यावर स्टारखान जोराने गुरग्गुरला. "क्या बकते हो?" आणि गाडी स्टार्ट झाली.

तशी धावत सारा गाडीपाशी आली, "ए. रूको रूको, स्टॉप. आमचा कॉम्पेनसेशन दीया आधी. माझ्या मदरचा पाय फ्रैक्चर झाला, सगळा काजू मातीत गेला. मिस्टर स्टारखान? त्याचा पैसा दीया." त्याच्या तोंडाला दारूचा भपकारा आला.

"अरे भाड में जा, तू और तेरी मदर. खाली पिली टेन्शन मत दे." स्टारखान सारावर भडकला, तिने स्टारखानचा हात पकडायचा प्रयत्न केला. त्याच्या टि-शर्टची बाही तिच्या हातात आली.

"नो. नो. असं कसं? नुकसान कोण देणार?" बडबडणाऱ्या साराच्या फाडकन मुस्कटात लगावून, तिला उडवून देऊन, स्टारखान आणि त्याची गाडी तिथून पसार झाले. सुन्न झालेली सारा तिच्यापुढं जमलेल्या लोकांसमोर विकी रिपोर्टर जी बकबक करत होता, ती ऐकत राहिली. हताश डबडबलेल्या डोळयांनी.

"फ्रेन्डस रियली, स्टारखानची दर्यादिली बघा. ही आंटी फुल टू पिऊन आऊट त्याच्या कारसमोर अचानक आली. तिला वाचवायला त्यानं फुल टू वे आऊट जाऊन टर्न मारली. अरे भाय, दिडकोटी रूपयाच्या गाडीला स्क्रॅच गेले. नॉट अ जोक. वर तर वर आंटीच्या पोरीला इलाजासाठी वीस हजार रूपये रोकडा कॅश दिलेत. तरी मायलेकी उलट्या स्टारखानच्या नावाने बोंबा मारतात. उद्याच्या सांजखबरमध्ये वाचा ही स्टोरी..."

## रवीची डायरी : २६ ऑगस्ट १९९५

--------------------------------------------

*छाया खरोखर माझ्या जीवनातून आणि घरातून गेली आहे का? असा प्रश्न मला आजकाल वारंवार पडतो. कारण आमच्या घरातली सगळी मंडळी, आमचे शेजारी दिवस-रात्र तिच्या गोष्टी बोलत असतात. घराकडे आलेला कोणीही पाहुणा तिची चौकशी करतो वा तिची काही बातमी घेऊन येतो. आणि इतर कोणाचं राहू दे बाजूला, माझ्या मनात देखील तिचाच विचार सतत घोळत राहतो. आता, ती कुठल्या झाडावर बसली असेल? काय खात असेल? एक किळसवाणी यादी माझ्या मनात उलगडत जाते. आणि तरी मला त्याची किळस वाटत नाही. पुन्हा आता ती कोणाला नडत असेल? हा घोर लावणारा प्रश्नसुद्धा सतावत असतोच.*

*राणीबाग, भांडारवाडा टेकडी, नाहीतर नारीयलवाडीच्या झाडीत तिनं तिचं जंगल शोधलेलं आहे. मात्र आजचा किस्सा घडला तो रेहमताबाद कब्रस्तानाच्या शेजारात. ती जागा तशी किमान वर्दळीची आणि घनदाट झाडोऱ्याची आहे. मुंबईच्या गोंधळात छायाला आवडेल अशी. तिला कशाला मुडद्यांची भीती वाटणार? ते मुडदेच तिला भीत असतील.*

*जिमी कुत्रा रूस्तमला आवरेनासा झाला होता. तेव्हा रूस्तम त्याला जनावरांच्या डॉक्टरकडे घेऊन चालला होता. मात्र रूस्तमला जिमीला सांभाळून गाडी चालवणं कठीण झालेलं. तेव्हा त्याच्या विनंतीला मान देऊन, बाबा कार चालवायला पुढच्या सीटवर बसले होते. रूस्तम, जिमी मागच्या*

*सीटवर होते. कारच्या टपावर काही आपटल्याचा आवाज आलेला. त्याकडे दुर्लक्ष करून बाबा कार पळवत होते.*

*बाबांना ड्रायव्हिंग करताना हळूहळू समोर काही फरक आणि गडबड जाणवायला लागली. लोक माना वेळावून सारखं आपल्या गाडीकडे बघताहेत, असं दिसायला लागलं. समोरून येणारे गाडीवाले बाबांना गाडीच्या टपाकडे निर्देश करून, काही खुणावू लागले.*

*त्यात पाऊस रिपरिप सुरू झालेला. त्या गाडीकडे बघण्याच्या धांदलीत, समोरून येणाऱ्या एका स्कूटरवाल्यानं, त्याची स्कूटर अनवधानानं गचकन रस्त्यावरच्या एका मोठ्या खड्ड्यात घातली. त्या खड्ड्यातला चिखल पचकन, रस्ता ओलांडायला बाजूला उभ्या असलेल्या, दोन साडी नेसलेल्या गरगरीत बायकांवर उडाला. त्या बायकांनी त्या स्कूटरवाल्याला घातलेली लाखोली, पुढे जाता जाता बाबांच्या अस्पष्ट कानावर आली.*

*रस्त्याबाजूच्या एका चायच्या टपरीवाल्यानं या गाडीकडे बघता बघता चुकून, किटलीतला चहा कपाऐवजी गिऱ्हाईकाच्या अंगावर ओतला. कुठे गाडीवर गाडी आपटली. कुठे कोणाची पायरी उतरताना चुकली आणि नाकावर पडायची पाळी आली. कुठे कोणाचे पाय कोणावर पडले. कुठे कोणाला कोणाचे धक्के लागले. धमाल उडाली.*

*एक मोटारबाईकवर स्वार ट्रॅफिक पोलिसवाला शिट्ट्या फुंकत गाड़ीमागे लागला. जिमीचं उसळणं जास्त वाढलं होतं. तो जितक्या लवकर दवाखान्यात पोहोचता बरं होतं. तरीपण पोलिसाचा मान राखत, बाबांनी गाडी साईडला काढली. रस्त्याकडेला थांबवत लावली.*

*"ओये उतर नीचे, तेरी तो. चल उतर पहले." तो पोलिसवाला पंजाब दा पुत्तर कारच्या टपावर बघत, कोणाला सांगायला लागला. बाबा आणि रूस्तमला कळेना हा कोणाशी बोलतोय?*

*"ओ सरजी हे कोनाला कारच्या टपवर बसवून सैर कराते हो जी?" तो पोलिसवाला बाबांना विचारू लागला.*

*"कोण आहे?" बाबांनी भिवया वाकड्या केल्या.*

*"तुसी देख लो जी." पोलिसवाल्यानं सांगितल्यावर, बाबा गाडीबाहेर उतरले. बघतात तर छाया बसलीय त्यावर.*

*"अगं इथं टपावर काय करतेयस?" बाबा तिच्यावर वैतागले.*

*"मज्जा." तिनं एका शब्दात उत्तर दिलं. बाबानी कपाळाला हात लावला. तिच्या उच्चारावरून रूस्तमला वर कोण आहे, याचाअंदाज आला.त्यानं देखील डोक्यावर हात मारून घेतला. जिमीला डोक्यावर पाय मारून घेता येण्यासारखा नव्हता. पण त्याचा आवाज एकदम गायब झाला. त्याने सीटखाली दडी मारून लपायचा प्रयत्न केला.*

*"ओ सरजी, याचं बाकायदा चालान होणार. हजार रूपये दंड भरा." पोलिसवाल्यानं पावती बुक सरसावलं. पावसाची रिपरिप थंडावल्यामुळे, डोक्यावरचं हेल्मेट बाजूला काढलं. आपल्या काळ्या लठ्ठ मिशांवरचं पाणी बोटांनी झटकलं. "टपावरून केलेली बेकायदेशीर वाहतूक." बाबांच्या उंचावलेल्या भिवयांच्या प्रश्नाला परस्पर उत्तर दिलं.*

*"अरे, आमचा काय फॉल्ट नी? उल्टे आमीच येची कम्प्लेन्ट करते. हे बायडी आमच्या कारवर चढून आमाला त्रास देते." रूस्तम रागाने बडवडला. "घेऊनी जा नी तेला. लॉकअप मदी घाल. एकदम सरस होईल."*

*रूस्तमकडे निर्विकारपणे बघून झाल्यावर, ती तशीच थंड नजर पोलिसवाल्याने बाबांवर फिरवली. "सरजी, तुमचं लायसन दाखवा. गाडीचा पेपर दाखवा."*

*बाबांनी खिसे तपासले. तोंड वाकडं गेलं. "अरे घाईघाईत घरी विसरलो."*

*"अरे माजा चालल नी. हे बघ माझा ड्रायव्हिंग लायसन हाय. जो बराबरथी जो." रूस्तमने आठ्या घालत आपल लायसन पुढे केलं. "डिकरा गाडी मी ड्रायव्ह करते समझनी."*

*"येस सर. आनी गाडीचा पेपर?" पोलिसवाल्यानं लायसन ताब्यात घेतलं. रूस्तमने गाडीच्या पुढच्या कप्प्यातली कागदपत्रं काढून बाबांकडे सोपवली. बाबांनी ती पोलिसवाल्याला दिली. तो ती बारकाईने बघू लागला.*

*"अरे बाबा, मी एकदम चोख मानस हाय. सगळा पेपर बराबर हाय. केम?" रूस्तमनं नाक आक्रसल.*

*पोलिसवाल्यानं मग सावकाश ते कागद टराटरा फाडले आणि त्या तुकड्यासकट लायसन, बाजूला वाहणाऱ्या गटारनाल्यात सोडून दिलं. काय होतंय हे बाबांना, रूस्तमला कळायच्या आधी, ते सगळं नाल्यात हा हा म्हणता दिसेनासं झालं.*

*"आँ, आँ, शू करे छे? केम तमे सटकी गयो केम ? अरे नादान, तुजा सिर फिरला काय?" रूस्तमने मोठा त्रागा केला. "अरे, आंग्रिया, जो नी. घणो पागल माणस जो."*

*“ओ इन्स्पेक्टर,” बाबांनी त्याच्या खांद्यावरच्या पट्टीवर लावलेल्या ताऱ्यांकडे बघून ओळखलं, “काय शुद्धीत आहात का? का दारू पिऊन झिंगून आला आहात? काय केलंत काय?”*

*आधीच्याच थंडपणानं बाबांकडे बघत पोलिसवाला उत्तरला, “सरजी तुमच्याकडे लायसन नाही. गाडीचा पेपर नाही. फिर भी तूसी गाडी चला रहे थे. याचा सगळ्याचा डबल फाईन. सब मिलाके करीब पाच हजार रूपया. आता देता, तर जा सकते हो. नही. तो चला चौकी.” असं होऊ शकतं? बाबांना जबरदस्त मानसिक धक्का बसला.*

*“अरे बदमाष, तू मारे जाने नथी. आमी सोसायटीतला जाना माना लोग हाय. आमचा प्रेस्टीज हाय. साला तुझा बॉस कमिशनर पन आमाला वळखते. तू आमच्या साथे असा बदमाषी कसा करते? साला, यू लॉस्ट कम्प्लिट सेन्स. यूजलेस फेलो.” रूस्तम रागाने लाल पिवळा झाला. “आंग्रीया जा तू, आनी इमिडिएट कमिशनरला फोन लाव. गो गो हरी.”*

*“ओ सरजी, कमिशनर जान पहेचानवाला है जी? मग त्याला विचारा, हर दिन इतना-इतना फाईन जमा करनेचा कम्पलसरी टार्गेट, वो अस्सी क्यू दिला? तेचा ऑर्डर फॉलो करते है जी.” फोन लावायला जाणाऱ्या बाबांच्या बखोटीला धरून पोलिसवाल्यानं त्यांना रोखलं. “कहा चले सरजी. तुसी डिफॉल्टमें हो जी. तुमाला जाने के वास्ते, मैने अभी छोडा नही जी.'*

*बाबांना असं कधी कोणी बखोटीला धरलं नव्हतं. झालेल्या अपमानाने ते चांगले तिरमिरले. “बदमाष, तू काय समजतो काय स्वतःला? सोड मला आधी.” बाबांनी चोहीकडे नजर फिरवली. आजूबाजूला जे लोक इथे काय चाललंय पाहायला थांबलेले, ते एकदम तोंड फिरवून पांगले. त्यात ओळखीचे*

चेहरे देखील होते. ते बघून बाबांचा राग दुप्पट झाला. “काय मोगलाई लागून गेली काय? तू काय म्हणशील ते आम्ही ऐकायचं?”

बाबांनी जोर लावून सुटायचा प्रयत्न केला. पण त्याची पक्कड मजबूत होती. तो स्वतःसुद्धा चांगला धिप्पाड होता. बाबांनी एकवार छायाकडे चोरटी नजर टाकली. तिने इतरांसारखी त्यांच्याशी नजर चुकवली नाही. ती टवकारून त्यांच्याकडे बघत होती. बाबा तिची मदत मागायला लाजले. त्यांनी तिच्यावर जंगलीपणाचा आरोप करून, घरातून तिच्या हद्दपारीवर शिक्कामोर्तब केलं होतं. पण जंगलराजचा 'बळी तो कान पिळी' अनुभव, आता ते एका शिकल्या सवरलेल्या, पोलीस अधिकाऱ्याच्या हातातून घेत होते.

“अरे, हा देशमदी कायदानु राज हशे. तू तो स्साला युनिफार्म पहनावी, स्वतःच कायदा मोडते? क्राईम करते हाय?” रूस्तमने दार उघडून, बाहेर यायचा प्रयत्न केला. तेव्हा अर्धे उघडलेलं दार पोलिसवाल्यानं जोरानं पायानं दाबून, पुन्हा बंद केलं. चपळाईने गाडीच्या बॉनेटवरची चावी मोकळ्या हाताने हस्तगत केली. दुसऱ्या हाताची गच्च पक्कड बाबांच्या बखोटीला तशीच होती.

“ओ बाबाजी, तुसी अंदरही रहना. बाहर आलात तर जानलेवा होईल.” रूस्तमला पोलिसवाल्यानं दम भरला, “आनी तुसी सरजी. बाबांच्या कानात बडबडला, “यहाँ कायदा मी जो बोलेगा, जो सुनाएगा वो. समझमें आला, ऐ? हां हां. हलू नको. नायतर एक लफ्फड कानाखाली बसेल. दो घंटे होश येनार नाय. चल आत घुस. कारमदी जा.” पोलिसवाल्यानं जरबेनं बाबांना कारमध्ये आत लोटलं. आणि कार लॉक करून टाकली.

*“आंग्रिया, ऐ साला बदमाष, तुझे माजे सारके हाय स्टेटस् पोजिशनवाला लोगशी असा रावडी बिहेव करते. ते साधा गरीब लोकशी काय सलूक करत असेल? ऐ तो पुरो जालिम छे” रूस्तमनं डोळे मिटून आक्रोश केला.*

*“ओ सरजी, हाय पोजिशनवाला होसी, तो निकाल फाईनचा पाच हजार रूपया. नही तो, सीधे पुलिस चौकी कार टो कराके नेनार,” पोलिसवाल्यानं पुढची धमकी दिली.*

*“हां, चालो. तुजी मनमानी चौकीवर केटली चाल छे, अमे पन जोईए.” रूस्तमनं कडवटपणानं जवाब दिला. पण बाबा उसासले. “जाऊ दे रूस्तम. मला आता लगेच अकरा वाजता बिझनेस मीटिंग आहे. हे तुझे पाच हजारच्या चक्करमध्ये, माझे पन्नास हजार जातील. हा बदमाष अजून किती वेळ खाईल सांगता येत नाही. आधी इथून सुटू. मग?” बाबांनी हलकेच रूस्तमचा हात खुणेसाठी दाबला. कानात खुसपुसले, “फक्त एक फोन.”*

*“आ केम बोले छो तमे?” रूस्तमला आधी बाबांची खूण लक्षात आली नाही. मग बाबांनी डोळे मिचकावले. तसं त्याच्या डोक्यात प्रकाश पडला. “हां, हां. मुखी नाख. फेक हे पैसे त्येच्या तोंडावर.” रूस्तमनं पॅन्टच्या खिशातून हजाराच्या नोटा काढून, बाबांच्या हातात दिल्या.*

*पोलिसवाला त्याच त्या निर्विकार नजरेनं दोघांकडे बघत होता. त्यानं रिसिटवर आकड़ा घातला. “पक्का पाच हजार है ना?” विचारत बाबांच्या हातातून नोटा मोजायला काढून घेतल्या आणि न मोजता आपल्या खिशात सारल्या. “सरजी पाच हजारचा आकडा तर घातला. साईन मारने पहले*

*दंडाचे पैसे द्या. ही पेशगी तुमी मला जे गाली देते हो, ते बर्दाश्त करने वास्ते मेरी," गाडीत बाबांची आणि रूस्तमची जी आग आग झाली.*

*'आता काय करायचंय ते करून घे. खूप झालं." बाबा गरजले. पोलिसवाल्यानं थंडपणे वॉकीटॉकीवरून 'टो ' कार मागवून घेतली. सोबत चार पोलिस शिपाई सुद्धा आले. रूस्तम आणि बाबांचं बोलणं ऐकून, पूर्णपणे न ऐकल्यासारखं करून, त्या शिपुरड्यांनी क्रेनचा हुक कारला जोडला. ओढायची तयारी पुरी केली.*

*"ऐ हट. चल उठ." पोलिसवाल्यानं छायाला दम भरला. नुस्त्या शब्दांनी ती हलत नाही, म्हटल्यावर शिपायांना तिच्यावर दंडुके मारायचा हकूम दिला. शारीरिक जबरदस्ती होते म्हटल्यावर छाया बिथरली. सपसप तिचा चाबूक फिरला. शिपुरडे दंडुके बाजूला टाकून विखुरले.*

*"ओय तेरी तो?" पोलिसवाल्यानं कमरेचं पिस्तुल काढलं. चाबकाच्या पुढच्या फटकाऱ्याने ते उडवलं गेलं. छाया सरळ त्याच्याशी भिडली. तिच्या सपकाऱ्यांनी सगळ्यांसमोर त्याचा सगळा माज आणि मस्ती उतरवली. "अबे, देखते क्या हो?" त्याच्या किंचाळ्यांवर पोलिस शिपुरडे सरसावले.*

*तसं त्या इन्स्पेक्टरच्या गळ्यात चाबकाचा फास लावून, छायानं त्यालाच ओलिस धरला. सगळा फौजफाटा हतबुद्ध पाहत राहिला. त्या सगळ्यांच्या देखत मग छाया एखाद्या शिकारी बिबळ्याने शिकार न्यावी, तशी त्याला घेऊन जवळच्या मोठ्या झाडावर लटकवत ठेवून, या झाडावरची त्या झाडावर हा हा म्हणता पसार झाली. भरीला मोठा पाऊस आला. तिचा माग लावणं पोलिसांना अशक्य झालं. रूस्तमने हात थकेपर्यंत टाळ्या वाजवल्या. बाबांनी सुद्धा.*

-------------------------------------------------

“बेबीजान तुला किताब पढने तो टूरवर घेतला नाही.”

“जी अब्बाजान. मै समजती,” म्हणत सलमाने नाइलाजानं तिची डायरीची कॉपी मिटली. छायाच्या जमान्यातून बाहेर येत, आजूबाजूला काय चाललंय, याचं भान आणण्याचा प्रयत्न केला. ती तिच्या अब्बाबरोबर ट्रक मधून क्लिनर म्हणून प्रवास करत होती. तिचा नेहमीच सलवार कमीझ न घालता, तिनं शर्ट-पॅन्ट असा पुरूषी पोषाख चढवला होता. केस टोपीमध्ये लपवले होते.

“अबको पुलिसलाठी आनेको ना अब्बा?” सरलानं पाण्याची बाटली उघडून एक दोन बोट घेतले.

“त्याला अजून टायम है. अबको घाट चढाव शुरू होणार. वो उतारको हम पार जाते, की वहाँको चेक-पोस्ट है.” चढलेल्या उन्हाकडे बाहेर त्रासिक नजर टाकत आब्बा बोलला, “ सुन, इंजन गरम झाला. जाको उसकी टाकीमध्ये पाणी भर.”

“आब्बाजान, गाडी चलती. मैं कैसा भरती?” सलमाने डोळे मोठे केले.

“अरे बेबीजान तो मैं थांबवतो ना.” ट्रक अब्बानं रस्त्याच्या कडेला नेत ब्रेक लावला. “सलिम को काय बोलने की जरूरत नाही पडती.” तिच्या रागाने लाल झालेल्या नाकाच्या शेंड्याकडे, मिस्किलपणे बघत आब्बा बोलला. मानेवर

घातलेल्या रूमालाने त्यानं घामाघूम झालेला चेहरा पुसायचा प्रयत्न केला, तो रूमाल आधीचा गच्च भिजून गेला होता.

“तो भाईजानकोच लानेका.” म्हणत ट्रकचं दार उघडून, परत मागे धाडकन आपटत, सलमा ट्रकच्या पुढे गेली. खटपट करून बॉनेट कसंबसं उघडण्यात तिला यश आलं. इंजिनपाशी गरम झळा येत होत्या. जास्तीत जास्त सावधगिरी बाळगत, तिनं पाण्याच्या टाकीत बाटली ओतली. तरी चटका लागायचा तो लागला.”आऊच.

“तेरा भाईजान बुखारमें नही तडपता, तो वोच आनेको.” अब्बांनी उत्तर देताना जास्तीची पुस्ती जोडली, “वो पहले तो चटका नाही खानेवाला आणि खानेको तो आऊच नाही बोलनेवाला. “

“आब्बाजान?” परत ट्रकमध्ये शिरत दार जोरात आपटून घेत, सलमा रागानं चित्कारली.

“बेबीजान गरम झाली.” अब्बा जोरजोराने हसला. “बोल तो, काय झाला है तुला? जबसे तू आली है, मिजाज एकदम गरम ले आली है. तू परेशान नाही हो बेबीजान, अब्बा जिंदा है, तो तुझी पढाई पुरी होणार. बस्, थोडा टायम दे मुझे. पिछले महिने ट्रकचा जबरदस्त काम निघाला. खुद तुम कितना भी होशियारीसे ट्रक चलानेको, कम्बख्त कोण बेवकूफ सीधे लाके तुमको ठोकनाच. नुकसान करनाच. इस वास्ते तेरे को रूपया नाही मिला. पण अबको मै दिन-रात डबलड्यूटी

करतो है. तुम आजकालचा लडका लडकीको तो इतना कामकी आदत नाही. तुझा भाईजान झाला बिमार.”

ट्रक आता घाटाच्या चढाला लागला. एक कार जोरात त्यांना बगल देऊन पुढे निघून गेली. “देख देख बेवकूफ. खुद भी मरनेवाला, हमको भी मरवानेवाला.” बिचकवल्यामुळे अब्बा चिडला.

“अब्बाजान पुलीस?” समोर येत असलेल्या पोलीसव्हॅनला बघून सलमानं खाली डोके झुकवत त्यांच्या नजरेपासून स्वतःला लपवलं.

“ओफ हो! बेबीजान. पुलिसचा नाव घेतला की तुझी जान निकल जाती है, कायको इतना डरती? काय झाला काय है? अब बता भी तो दे ना.” अब्बानं रस्त्यावरची सावध नजर क्षणभर काढून, एक काळजीचा कटाक्ष सलमावर टाकला. “अम्मी सोचसोचके हैरान है. तिची तर दुनियाभरचा झमेला सिरपर घेवून, परेशान होनेकी आदत है, तिला नाही. मुझको तो बोल.” सलमानं काही उत्तर द्यायच्या आधी, ट्रकच्या मागच्या बाजूच्या कार कडून जोरदार हॉर्न देण्यात आला. “घे, अजून एक सरफिरा.” अब्बा वैतागला.

“मगर अब्बाजान वो कबसे हॉर्न देनेको है. जाने दो ना उसको.” सलमा ट्रकच्या बाजूच्या आरशातून मागची आलिशान गाडी बघत बोलली, “ये पैसेवालोंकडे सब्र नही होती.”

“अरे झक मारत जानेको दे उसे? बात पलट मत. बोल बेबीजान बोल, बंबईमध्ये काय गडबड झाली है?” अब्बानं तिचं बोलणं आणि मागच्या कारवाल्याच्या हॉर्नच केकाटणं मनावर घेतलं नाही. समोरच्या बाजूने येणाऱ्या मोठमोठ्या लॉऱ्यांची रांगच्या रांग सुरू झाली. तरी मागच्या कारवाल्याचा हॉर्न

थांबेना. “अबको मै क्या ट्रक रास्तेसे हटाके खाईमध्ये घालू? इसको रास्ता छोडनेको?”

अब्बाच लक्ष जरा हटल्यामुळे, सलमाला विचार करायला जरा उसंत मिळाली. अब्बांना काही ना काही उत्तर द्यावंच लागणार होतं. मग थोडं इथलं, थोडं तिथलं, असं जुळवून तिनं उत्तर दिलं, “वो हमारे होस्टेलमध्ये वरच्या तिसरी मंझिलवर, एक लडकी राहत होती. सुमन जोशी. एक जालीम पैसेवाला लडका उसके पीछे पडलेला. सुमन सुनती नही, तो वो लडकेने सुमनच्या चेहरेपर ॲसिड डाला.”

“या अल्ला!” अब्बाला नुस्तं ऐकून सुद्धा फार वाईट वाटलं. एका बाजूला दरी आणि दुसऱ्या बाजूने जवळजवळ घासत जात असलेल्या लॉऱ्या. त्याचे डोळे रस्त्यावर लागले असले, तरी कान सलमाकडे लागले होते. “बिल्कुल ट्रक जैसी जिंदगी चलती है. तुम कितना भी नेक-सीधे चलो. कोणी तुमको ठोकनाच. “

“अब्बाजान, मगर एक लडकी बरबाद करून, त्याला दिलकी तसल्ली झाली नाही. अबको वो हॉस्टेलकी हर लडकीला धमकाता है, त्याची मर्जी पुरी नाही केली, तो वो उस लडकीको भी...” या सतत केकटणाच्या हॉर्नच्या आवाजात, अब्बाला सलमाचं कितीसं बोलणं ऐकू गेलं होतं, प्रश्नच होता. सलमानं वाक्य अर्ध सोडलं.

दुसरीकडे घाटाची चढण-उतरण संपून, आता सरळ रस्ता नजरेच्या टप्प्यात येत होता. त्यामुळे तिच्या अब्बाला जरा मोकळं होता आलं. “अरे जा

मियाँ जा, दिला तुला पुरा रास्ता खुल्ला. आब्बाने खिडकीतून हात बाहेर काढून, त्या कारवाल्याला पुढे जायचा इशारा केला.

“आणि अब्बाजान, त्या लडक्याच्या चेहऱ्यापर भी किसीने ॲसिड डाला. तबसे पोलीस आको हमको सताती. अजिब उलटा पुलटा सवाल विचारतात. उस लडकेका बाप आमदार होता. पुलिसको केस बनानेको है, वो लोग, कोण ना कोण लडकीला गुनाहगार बनानेको है, मै नही वापस जाती.” सलमाला उत्तरात ट्रकच्या ब्रेकचा जोरदार कर्रकर्राट ऐकायला मिळाला.

त्या मागच्या कारवाल्यानं ट्रकला ओव्हरटेक करून, कार पुढे आडवी घातली होती. “या अल्ला, जी तो करता है, याच्यावर ट्रक घालायला.” अब्बाजानचा रागाचा फुत्कार तिनं ऐकला.

त्या कारमधून एक गॉगल घातलेला दाढीवाला पांढऱ्या शर्टपॅन्टमधला माणूस उतरला. दुसऱ्या दारातून बंदूक घेतलेला पोलिसाच्या गणवेषातला अजून एक. दाढीवाला ट्रकवाल्याची आईबहिण काढून शिव्या घालत, ट्रकच्या दिशेनं धावून आला.

“बेबीजान, तू कैस्सेच बाहर आनेको नाही. तेरे को माझी कसम.” म्हणून अब्बा सुद्धा घाईघाईने ट्रकमधून त्याच्या बाजूच्या दारातून उतरला.

“ए भडव्या, किती वेळ तुला हॉर्न देतोय? हरामजाद्या, रस्ता सोडत नाय?” अब्बाची कॉलर खेचत, गळयापाशी धरत, दुसऱ्या हाताने तो दाढीवाला अब्बाच्या डोक्यावर ठोसे लगावायला लागला.

“साब, गाडीमे माल फुल भरलेला है, साब गाडी साईडको लेता तो खाईमें जाता साब.” गयावया करत हात जोडत अब्बा बोलला. तसं त्याला दाढीवाल्यानं खाली रस्त्यावर आपटलं. लोळवत त्याला लाथेने तुडवायला लागला.

“भडव्या आणि तोंड वर करून बोलतो? माहीत हाय मी कोण?” दाढीवाला अब्बाला तुडवताना त्याच्या बरोबर असलेला पोलीस शांतपणे कमरेवर हात ठेवून उभा होता. जर मार खाणाऱ्याने प्रतिकार केला, तर आमदारांच्या मदतीला जाण्याच्या तयारीत. “हरामजाद्या तू खाईत जा, नाय तर भाडमध्ये जा. माझी खोटी करायच काम नाय तुला.”

“साहेब, मुझे कसा पता लागणार? मागची गाडी तुमची है, नाही तो गलती नाही होती साहेब. गरीबको माफी करा साहेब.” अब्बानं दाढीवाल्याचे पाय धरायचा प्रयत्न केला.

तो 'हाड' म्हणत दाढीवाल्यानं मोडून काढला. “कुत्र्या आता मला वेळ नाय. तू आधीच माझ्या वेळेची लय खोटी केली हाय. नाय तर पट्ट्यानं हाणून तुला माझ्या गाडीची कायमची ओळख दिली असती.” एवढे बोलून दाढीवाला कारकडे जायला वळला. पण अचानक काय मनात आलं, परत फिरला आणि परतून अब्बाच्या थोबाडावर लाथ मारून दिली. त्याच्या बुटाचा ठसा अब्बाच्या गालावर उमटलेला बघितल्यावर, हास्याची कुत्सित रेषा दाढीवाल्याच्या गालावर उमटली. तो कारकडे गेला. तो कारमध्ये बसल्यावर, बंदुकवाला पोलीससुद्धा परत कारमध्ये बसला. कार एकदाची निघून गेली.

तशी ट्रकमधून बाहेर पडून सलमा अब्बाकडे धावली. तो निपचित पडला होता. सलमाचे डोळे आणि गाल आसवांनी डबडबले होते. अब्बाचे कपड़े जागोजागी फाटले होते. आणि त्यांच्या खालची त्वचा. जखमांनी तो रक्ताळलेला होता. “अब्बाजान! “ सलमानं टाहो फोडला. अब्बाचा देह चाळवला. त्याची धुगधुगी तिला जाणवली. त्याला परतून अब्बाचा चेहरा सलमानं हातात घेतला.

अब्बाचे डोळे हळूहळू उघडले. तिच्याकडे बघत तो क्षीणसं हसला. “बेबीजान, अब्बा अभी जिंदा है,” फाटलेल्या ओठांतून शब्द आले. तसा सलमाने धीर एकवटला. जमेल तसं अब्बाला रांगवत, खुरडत तिनं ट्रकच्या खाली नेलं. तिथे सावलीत उन्हाच्या तिरीमिरीपासून वाचवलं. ट्रकमधून पाणी आणि ओढणी घेऊन आली. अब्बाला पाणी पाजलं.

ओढणीच्या चिंध्या करून, रक्ताळलेले भाग झाकायचा प्रयत्न केला.

“तुम डरो नाही. अब्बाको थोडा टायम दे. बेबीजान, माल तो हमे आज पोहचवायचा हैच.” सलमाच्या कुशीत विसावलेला अब्बा बोलला.

“अब्बाजान मै शफीचाचाको फोन करके बुलाती.”

“नाही, आणि कोणाला परेशानीमें नाही डालनेको, सब ठिक होणार.” अब्बानं तिला धीर दिला. “यहाँ तुझे फोन कुठे मिलनेको?”

“अब्बाजान कोण होता तो बेरहम?”

“यहाँका आमदार.”

'अब्बाजान गलती त्याची होती. हम आगेवाली चौकीपर त्याची शिकायत देंगे, लोकांको भी समझ आने दो, त्यांनी निवडून दिलेला वो आमदार कितना घमंडी है, जुल्मी है."

"वो तो लोगोंको पहलेसे माहीत है बेबीजान, शिकायत करको कोई फायदा नाही. ये जमा झालेला पब्लिक, कोण भी हमारी तरफसे गवाही देनेवाला नाही."

सलमानं पाहिलं, खरोखर जमलेल्या बघ्यातला कोणीसुद्धा तिच्या मदतीला आला नव्हता. आपापल्या थांबवलेल्या गाड्यांमध्ये पुन्हा बसून, ती सगळी लोकं तिथून निघून गेली होती. त्यांचे ते एकटेच उरलेले होते. "मैं सोचती, हमारा गाव भले लोकांचा है. मगर यहाँ भी तेच सगळं शहरवालं आहे. पैसेवाल्यांची घमेंड, जुल्म, नाकारा पुलीस, उल्टा उनको साथ देती." विषण्ण होत उदासपणे सलमा पुटपुटली. "यहाँ भी खून के घूंट पीके चुपचाप सहनेका!"

"बेबीजान, पानी मध्ये रहनेको तो मगरमच्छ बराबर बैर नाही लेनेको." अब्बानं डोळे विसाव्यासाठी मिटले. "जिंदगी ऐसीच चलती."

पाण्यात राहून देखील मगरींशी वैर धरणारी, एक व्यक्ती सलमाच्या डोळयांसमोर उभी राहिली. "छाया काय मी तेरी जैसी बनू शकणार कधी?" तोंडातून शब्द गेल्यावर ती काबरी बावरी झाली. अब्बानं ऐकले का? ते काही विचारतील का? पण ते शांतपणे तिच्या कुशीत विसावले होते. सलमाचे मन मग छायाभोवती तिचा विचार करत भिरभिरत राहिले.

## रवीची डायरी : २८ सप्टेंबर १९९५

---

*सकाळी सकाळी हवालदारांची जोडगोळी मला घरी भेटायला आली.मला वाटलं गणपती येताहेत, त्यासाठी उत्सवाची वर्गणी जमा करायला आलेत. परब आणि पवार, नावाचे हे दोघे पोलिसवाले माझ्या ओळखीतले होते. त्यांचा उद्देश माझ्या अटकळीबाहेरचा होता. त्यांना माझ्याकडून छायानं वापरलेल्या गोष्टी हव्या होत्या. कुत्र्यांना तिचा वास देण्यासाठी.*

*ओळखीतले असल्यामुळे दोघांनी माझ्यापासून काही लपवून ठेवलं नाही. छायाविषयी अनेक तक्रारी त्यांच्याकडे जमा झालेल्या होत्या. तेव्हा तिला पकडायची धडक कारवाई करण्याचं ठरवलं गेलं होतं. त्यासाठी आजचा दिवस मुक्रर करण्यात आला होता. येत्या गणेशोत्सवात छाया काय हैदोस घालेल, हे नेमकं सांगता आलं नसतं. मेलेले वा मारलेले कुठले प्राणी आणि त्यांच्या शरीराचे कुठले भाग, ती पुजेच्या जागेवर टाकेल, विटंबना करेल, खळबळ माजवेल, असंतोष होऊन लोकांची दंगल सुरू करेल, याविषयी तीव्र काळजी व्यक्त करण्यात आली होती.*

*मला हे तितकसं पटलं नाही. अर्थात छाया मुद्दामहून असं करणार नाही, हे त्यांना मान्य होतं. पण तिला असं करण्यामुळे काय घडू शकतं, याची जाणीव नाही. नकळत तिच्याकडून असं अगदी जाता-येता सहज घडू शकेल असं त्यांचं म्हणणं होतं. मला ते नाकारता आलं नाही. कोणाच्या देखरेखीखाली ही कारवाई होतेय? म्हणून मी विचारल्यावर मात्र दोघांची*

*बोलती बंद झाली. पवार आणि परब एकमेकांच्या तोंडाकडे बघत, तू सांग, तू सांग, एकमेकांना खुणावू लागले. ही गोष्ट स्पष्ट केल्याशिवाय, त्यांना माझ्याकडून अपेक्षित सहकार्य मिळणार नाही, हे सुनावलं. तेव्हा त्यांना नाइलाजानं इन्स्पेक्टर कपूरचं नाव उघड करावं लागलं.*

*ओहो! म्हणजे लोकांच्या कळवळ्यानं नव्हे, तर सूड उगवण्यासाठी पोलिसवाल्यांची ही कारवाई होणार होती तर. मी एकजात साफ नकार दिला. छायानं वापरलेल्या अशा वस्तू म्हणजे आमचं आख्ख घर आणि घरातल्या सगळ्या वस्तू होत्या. त्यातली कुठली वस्तू उचलून द्यायची? बरं त्या गोष्टींना आमचे घरातल्यांचे सगळ्यांचे वास देखील लागलेले होते.*

*पोलिसवाल्यांना छायानं वापरलेले कपडे हवे होते. मी हसलो. छाया कपडे जवळ जवळ वापरतच नव्हती. तसं सांगितलं. निराश होऊन चरफडत दोघे हवालदार तोंड घेऊन गेले. रिकाम्या हाती परतले, म्हणून साहेबांची त्यांच्यावर खप्पा मर्जी होणार होती. मला त्याबद्दल अजिबात वाईट वाटलं हा नाही.*

*त्यानंतर मी जेव्हा कॉलेजला जाण्यासाठी घरातून बाहेर पडलो, वाटेतरस्त्यावरून पोलिसदळ चार-चार कुत्र्यांमागे धावताना पाहून, मी चकित झालो. पोलिसांच्या एक नव्हे, दोन जीप भरून, त्यांच्यामागे धावत होत्या.*

*कुत्रे झाडांपाशी थांबत, वास काढत, पुढे पुढे जात होते. मी काम-धाम बाकी सगळ्या गोष्टी विसरलो. पवार आणि परब ही जोडी त्यांच्यात होती. एखाद्या जंगली वाघीणीला पकडायची तयारी असते, तसा सगळा सरंजाम त्यांच्या ताफ्यात असलेला दिसत होता. मोठमोठ्या जाळ्या, भुलीचं*

इंजेक्शन मारणाऱ्या तसल्या औषधाचे फवारे. कहर म्हणजे वाघीणीला बंदिस्त करायला मोठा जाळीचा पिंजरा. मी हळूच पवारला जरा बाजूला यायचा इशारा केला. सकाळचा चरफडाट विसरून, तो तसा आला.

मी चौकशी केली. छायाला पकडण्यासाठीच चालला आहात का ? तो साळसूदपणानं हो म्हणाला, मग मला प्रश्न पडला कुत्र्यांना त्यांनी काय हुंगवलं? छायाची तसली वस्तू त्यांना कुठून मिळाली? पवारानं उत्तर दिले की ओल्या खोबर्याच्या दुधाचा वास कुत्र्यांना हुंगवलाय. त्यावरून कुत्र्यांना माग मिळेल, याविषयी मला शंका होती.

त्यांचं म्हणणं होतं की, तसा माग कुत्र्यांना मिळालेला आहे. मला अचंबा वाटला. पण मग छाया अंगाला नारळाचं दूध फासते, हे त्यांना कसं कळलं? कोणी सांगितलं? उत्तरात हवालदार पवारानं नजर उचलून एका दिशेला खुणावलं.

मी त्या दिशेने पाहिलं. गंगाबाईचा नवरा सखाराम होता तो. नखशिखान्त बॅन्डेज गुंडाळलेलं असलं, तरी त्याचा उत्साह पाहण्यासारखा होता. त्याला जातीने आपल्या शेजारी बसवून घेणारा माणूस, देखील तसाच नखशिखान्त बॅन्डेजच्या पट्ट्यांनी गुंडाळलेला होता. इन्स्पेक्टर कपूरचा हात प्लास्टरच्या पट्ट्यांनी गळ्यात अडकवलेला होता. शत्रूचा शत्रू तो आपला मित्र, या न्यायाने एरव्ही दोन विरूद्ध ध्रुवांवर जगणाऱ्या, त्या दोन माणसाची युती जुळून आलेली होती. छायाचा सूड हेच इप्सित दोघांच्या नजरेतून धगधगत होतं.

माझ्या काळजात कुठेतरी खूप गलबललं. देवा यांना यश नको मिळू दे. माझ्या मनाने केलेली प्रार्थना मी ऐकली. हा इतका हत्यारबंद

*ताफा कशाला? ते छायाची शिकार करणार आहेत का तिला ठार मारायला निघालेत?"*

*हवालदार पवार गालात हसला. म्हणाला "तुम्ही काळजी करू नका. कपूरसाहेबांची सख्त ताकीद आहे सगळ्यांना. छायाला कोणत्याही परिस्थितीत जिवंतच पकडायचं. गोळ्या घालून जखमी करा. लंगडी करा. पण ठार करता कामा नये."*

*माझ्या तोंडात एक कडवट चव जागली. ती मी कशीबशी गिळली. कपूरच्या डोक्यात किती खतरनाक गोष्टी शिजत असतील, याचा मला अंदाज आला. मी नीट अदमास घेऊन पाहिलं. कुत्र्यांचा होरा रेहमताबाद कब्रस्तानातून माथारपाखडीकडे जात होता. कपूरला त्याच्या खबऱ्यांनी छायाविषयी तपशिलवार माहिती पुरवलेली असणार.*

*मी माझ्या नकळत त्या ताफ्याच्या मागे मागे चालू लागलो. काही वेळात माझ्या लक्षात आलं, असा चालणारा मी एकटा नव्हतो. छायाविषयी जे जे कोणी जाणत होते आणि तिच्या प्रत्यक्ष सान्निध्याचा अनुभव ज्यांच्या ज्यांच्या गाठीशी होता, असे अनेकजण माझ्यासारखे पोलीस ताफ्यामागे चालले होते. पुढे काय होतंय? या उत्सुकतेनं. तसंही जंगली वाघीणीची शिकार हा रोमांचकारी प्रकार, शहरातल्या लोकांना कधीसा पहायला मिळतो? त्याची नवलाई होतीच. इन्स्पेक्टर कपूरला या बघ्यांच्या फौजेचं वावडं दिसलं नाही. त्याला त्याचा पराक्रम दाखवायला प्रेक्षकांची गरज होतीच.*

*माथारपाखडीत हा सारा जथ्था घुसल्यावर, कुत्र्यांच्या भुंकण्याची पुढे जाहिरातबाजी चालू असल्यानं, घराघरातून माणसं बाहेर डोकावायला लागली. आमच्याकडे एखादी वरात जातानासुद्धा खिडक्यातून इतकी गर्दी*

*जमत नसेल. छायासाठी ही सगळी वरात चालली आहे कळल्यावर, घराघरातून एखादी व्यक्ती बाहेर पडून, गर्दीत सामील होऊ लागली. माथारपाखडीतल्या छोट्या छोट्या गल्ली रस्त्यांतून, त्यामुळे चांगलीच दाटी होऊ लागली.*

*कुत्रे माझ्याच घराच्या दिशेने जाऊ लागले आणि माझ्या काळजात कळा येऊ लागल्या. रक्तप्रवाह शरीरात जोरजोरात उसळ्या मारू लागला. छातीचे ठोके इतके मोठ्याने पडायला लागले की, शेजारचा माणूस चकितपणे माझ्याकडे ते ऐकत पाहू लागला. हातापायांना सूक्ष्म कंप सुटलेला. मला धडपणे उभं राहता येईल काय? भीती वाटायला लागली. चालताना आपला तोल सुटतोय असं वाटायला लागलं. कुठं होती नेमकी छाया? कुत्रे शिरीषाच्या झाडापाशी घोटाळत, वर बघत मोठमोठ्याने भुंकत होते. नक्की छाया तिथेच होती.*

*मग माझ्या मनाच्या एका कोपऱ्यातून मी नेहमी दाबून ठेवायचो, ती जाणीव उसळून वर आली. छायाला पकडायचं तर ती नेमकी कुठे असेल? हे मला नेहमीच मनोमन माहीत होतं. माझ्या घराशेजारच्या आमच्या बंगल्याच्या गेटपाशी असलेल्या मोठ्या विलायती शिरीषाच्या झाडावर. जिथून पहिल्या मजल्यावरच्या माझ्या खोलीची खिडकी दिसते आणि त्यातून मी. रोज रात्री माझं कॉलेजसाठीच्या नोटस् आणि लिखाणा-वाचनाचं काम आटपून, मी झोपण्यासाठी उठे, तेव्हा मला नेहमीच भास व्हायचा, ती तिथं आहे माझ्यावर लक्ष ठेवून. माझ्याशी भांडून दूर गेली, तरी माझ्याच प्रेमात आंधळी. तिचं जवळ जाणवणारं अस्तित्त्व हा भास नसून, ते वास्तव होतं. हे माझ्या मनात माझ्या स्वतःपासूनच दंडवून ठेवायचा, मी प्रयत्न करत असे. का? मला खरोखर नाही माहीत.*

*“तिथे आहे ती.” “दिसली, दिसली.” “ती बघा.” सूचनांचा मोठा आरडाओरडा सुरू झाला. जो तो त्या झाडाकडे वरच्या दिशेने बोट दाखवू लागला. मुख्य शिकारी कपूर जीपमधून उतरून पुढच्या सूचना करायला पुढे सरसावला. धावत जाऊन त्याचा गळा घोटायची उबळ मी फार शर्थीने दाबली. मध्ये इतकी माणसं होती की ते तितकसं शक्य नव्हतं.*

*तो एका हातानं हातवारे करून, त्याच्या कंपूला काही सांगत होता. त्या बंदुकांचे फारसे मोठे आवाज झाले नाहीत. सायलेन्सर असल्यावर इतक्या माणसांच्या कोलाहलात ते ऐकू येणार नव्हते.*

*तिथं नेमकं काय चालू आहे? मला कळेना. मनाची तगमग तगमग चालू झाली. आता एक शिडी आणून त्या झाडापाशी लावण्यात आली. दोघे पोलीस सावधगिरीने वर चढू लागले. तोच ती शिडी वरून कोणी ढकलून दिल्यामुळे सुटली. तिच्यासकट चढणारे खाली पडले.*

*खऱ्याखुऱ्या बंदुकांच्या गोळ्यांची फैर झाडली गेली. गर्दीत एकच तोबा उसळली. थोडा वेळ गेला. प्रतिक्षेचा तो कालावधी काही मिनिटांचा असला, तरी मला काही तासांचा असल्यासारखा वाटला. मग एक काळी आकृती फांद्यांवरून सरकून शिरीनच्या बंगल्याच्या छप्परावर आणि तिथून सज्ज्यात उतरल्याचं मला लांबून दिसलं. छाया जिवंत असल्याचे पाहून, माझ्या मनात आनंद उचंबळून आला आणि पुढच्याच क्षणी, आता ती सहज मारगिरीच्या टप्प्यात आली, या जाणीवेन ओसरून गेला. काळजी उफाळली.*

*पोलिसी कुत्र्यांनी छायाच्या मागावर रूस्तमच्या कुंपणाकडे धाव घेतली. त्या जवळ जवळ पुरूषभर उंच कुंपणावरून ते कसे चढले? हे मला अजूनदेखील कोडे आहे. ते आत गेले. कुत्र्यांच्या भुंकण्याचा एकच*

कल्लोळ उठला. छायानं जिमीच्या पट्ट्याची वादी सोडून दिल्याचा, मी लांबून अंदाज बांधू शकलो. जिमी आत घुसलेल्या कुत्र्यांवर झेपावला. आता कुत्र्यांचं जोरदार विव्हळणं आणि बाचाबाची ऐकू आली.

अचानक छायाने कुंपणाचं गेट उघडल्याचं दिसलं. त्यातून त्या चार कुत्र्यांसकट जिमी बाहेर धावला. "पिसाळलेला कुत्रा." "धावा, धावा, कुत्रे पिसाळले." गर्दीत मोठ्या किंचाळ्या आणि ओरडा माजला. हुल्लड झाली. लोक कुत्र्यापासून वाचायला, त्यांच्यापासून लांब लांब जायला पळू लागले. जाम चेंगराचेंगरी झाली.

कुंपणापाशी पोहोचलेल्या, जवळ असलेल्या पोलिसांना कुत्रे आधी चावले. ते पाहून बाकीच्या पोलिसांची देखील पळापळ झाली. काय करावं, याचं कोणाला भान राहिलं नाही. जो तो स्वतःला वाचवायला आसरा शोधू लागला.

मी निस्तब्ध झालेलो. जणू काय चालू आहे, माझ्या जाणीवेत शिरत नव्हतं. कुत्र्यांनी कपूरचे, सखारामचे चावे घेतले. जिमी माझ्या दिशेनं लाळ गाळत आला. हा माझ्या ओळखीतला जिमी नव्हता. त्याचा अक्राळविक्राळ चेहरा माझ्यासमोर आला. आता तो मला चावणार, त्याआधी त्याच्या तंगड्या खेचून, त्याला कोणी मागे ओढला. तसाच वर उचलून खाली आपटला. त्याची कवटी फुटल्याचा आवाज आला. आणि मग तशीच गत माझ्यावर चालून येणाऱ्या इतर कुत्र्यांची झाली. कुत्रे गतप्राण होऊन, त्यांची कलेवरं रस्त्यावर इथं तिथं पडली. त्यात मधोमध छायाची काळी कमनीय आकृती, माझ्यावर नजर रोखून उभी होती.

*कुत्र्यांचा धोका नष्ट होताच, लोकांचे वर राहिलेले वरचे श्वास खाली आले. खाली राहिलेले वर गेले. छायावर पोलिसांनी जाळी फेकली. ती शांतपणे माझ्याकडे बघत होती. मी काय करणार? जणू विचारत. मी जणू झोपेतून जागा झालो. पुढे जावून ती जाळी उचलून मी दूर केली. तिला जवळ घेतलं आणि मिठी मारली.*

*मला धरायला सरसावणाऱ्या पोलिसांना, माझ्या हितैषींनी अडवल्याचं, मला नजरेच्या तिरक्या कोनातून जाणवलं. रूस्तम, शिरीन, आई, बाबा, मिस्टर आणि मिसेस् पात्रावाला, आमचे बरेचसे शेजारी, मित्रगण, सगळे तावातावाने पोलिसांशी भांडत होते. आमची कोणाची तक्रार नव्हती, तर छायाला धरून न्यायला बघणारे ते होते कोण?*

*छाया आमची आहे. माथारपाखडीची शान.*

--------------------------------------------------

“सरला, काय बघतसशी गं? वाचता वाचता आपल्याशी हसतशी?” वहिनीनं विचारलं. तसं सरलाने छायाच्या गोष्टीतून डोकं बाहेर काढून तिच्याकडे बघितलं. “मला बी सांग की, मला बी हसता येईल की गं.”

“खरंच वहिनी आल्यापासून तुला हसताना बघितलंच नाहीय गं.” तिच्याकडे लक्षपूर्वक पाहात सरला उसासली. “लग्न करून आलीस, तेव्हा लक्ष्मी कशी दिसत होतीस. भरलेल्या अंगाची. तेजाळ रंगाची. आता तुझी काय ही दशा झालीय? पार रया गेली तुझी.”

“इतकं वायट वाटतंया माझं, तर मग तू पुन्नांदा या खाते्र्यात कशापायी जिंदगानी वाया घालवाया परतलीशी?” वहिनीनं उदासपणे सरलाच्या नजरेत नजर घालत प्रश्न विचारला, “हे मला सांगत होते, तू पुन्नादा मंबईला जायाला तयार न्हाई. इथंच कायम राहायच्या गोष्टी बोलतसी. काय बाय आक्रित घडून रायलया आणि ही कसली दळभद्री जळमट, तुज्या मनात भरतलशी गं?” वहिनी चांगली कावली.

“अगं तुला माहीत नाही, तिथली परिस्थिती आणि लोकं कितकी वाईट आहेत.” सरलानं आपली बाजू मांडायचा प्रयत्न केला.

“आणि मग इथं काय येगळं हाय गं? इथं अजून काय येगळं हाय? ह्याच्यापरिस अजून काय वायट हाय गं? तूच तुझ्या नजरेनं सम्दं बगतशी. म्या आनी काय सांगायला पायजेशी गं पोरी? तूच सांग की.' वहिनी जे बोलली, त्यातलं काहीच सरलाला खोडून काढता येण्यासारखं नव्हतं. ती गप्प राहिली. वहिनी पुढे बोलायला लागली. “मला वाटलं होतं, बाई तू जरा चार बुकं शिकलितसशी. बायेरच्या जगात गेलितसशी. तू तरी ह्या समद्यातून सुटलीतशी. म्होरं जावून माझ्या लेकरांना, तुझ्या भाचरांना तरी ह्यातून सोडवशीलशी.” वहिनी रडायला लागली. “पन, माझं नशीबच फुटकं हायशी. तू हाय खाल्लीशी. घरात येऊन आमच्या बरूबर पिचाया बसलीशी.” वहिनीनं कपाळ बडवून घेतलं. “इथं राहून तुझं काय होनार, त्याचा तरी इचार काय केलातशी की नाय?”

“निदान अब्रू राखून तरी जगेन.” सरला चुटपुटली.

"अब्रू कसली आब्रू, कोनाची आब्रू? चुलीत घाल ती.' वहिनी तडकली. "मी सांगते तुला तुझं काय होनार? माझ्यासारखंच तुझंबी, कुना गरिबासंगत मिनती करून लगीन लावून देनार, मंग कारभाऱ्याची, त्याच्या घरच्यांची मर्जी राखत, तू रोज रोज राबराब घरात-दारात राबनार. तो हातामदी दिल तितक्या पैशांत, सगळी हौस मौज मारून, पोटात घालायला तरी चार घास मिळतातशी, याचं समाधान माननार. त्याची कमाई गुंडा-पुंडांनी लुटून नेली, की ते बी समाधान न्हाई. पोरांना धपाटे घालतशी आणि उपाशी पोटानं निजबशीलशी. आनी आनी आब्रू राखाया घराभायर उघाड्यात पदरात तोंड दडवून फिरतशी, तरी ज्यांना लुटायचीच हाय, ते घरातबी घुसून ती लुटनार. लुटली गेली, तरी सांगायाबी चोरी. आपलीच आपल्याशी गं?" वहिनी पदराचा बोळा तोंडात कोंबून, हुंदके कोंडत रडायला लागली.

सरला विस्फारलेल्या डोळयांनी भयचकित होऊन, तिच्याकडे पाहतच राहिली.

--------------------------------------------------------

"दिदी, किती दिन बाद आज तुला हसताना देखा." सलीम बोलला, तशी छायाच्या कहाणीतून सलमा भानावर आली. "जबसे आली तो, बडा लगाव बघतो तुझा, उस कहानीसे."

"भाईजान, तुला पढने देती, तो तू टाल देता. दुनियामें ऐसी भी औरत होती, याचा यकीन करना मुश्किल होतं. मगर ही कहानी बिल्कुल सच्ची आहे. पढना बस में होता है, तर जरूर पढो." सलमानं उत्तर दिलं.

“किस और के किस्से कहानीचं काय करायचं? जर आपल्या रोजमरी जिंदगीत त्याचा काही अमल कर नाही सकते?” सलीमनं तोंड वाकडं केलं.

सलमाच्या अगदी ओठावर रहस्यभेद आला. “ऐसाच नही भाईजान, हमने याच्यावर अंमल केला आहे.”

“कैसा बोल?”

“अं?”

“आता बोलती बंद हो गयी? खुद तर भाग आली होस्टलसे, कोनी और लडकीचा चेहरा एसिडने बरबाद झाला इसलिए. वापसी जाने का बोला भी तो, हाय खाती आहे. चेहऱ्याचा रंग फिका होता.” सलीमने चिडवलं.

“भाईजान, तुला दुसरा कोई माजरा सुचताईच नाही क्या? बार बार घुमा फिरा कर, फिर वहिच बात क्यू करायची?” सलमाच्या कपाळावर दाट आठ्या पडल्या. “अब्बाजान झोपलेत. उनो जगाना मत.”

“जाग गए तो जाग गए. अपनी बलासे.”

“भाईजान?” सलमा रागानं ओरडली. “अब्बाजानको ऐसा बोलताईच कैसा?”

“क्या करेंगे अब्बा जागकें. जाको उस आमदाराचा थोबडा फोडनेका. तर मुझे रोकते. अरे हो जानेका राडा. मैं नाही डरना. तो मुझे खरीखोटी सुनावणार. हम गरीब, वो अमीर. क्या करेगा वो? पुलीस पकडले जाती, जाना दो. खुद सगळी उमर ऐसाच सब बर्दाश्त करत आया. अब बेटाभी वहिच करने का, यहीच आपल्याला शिकवणार ना अब्बा? हमेशा नजर नीचे चोरायची. सबसे बचके

चालायचं. आपली चामडी वाचवायची.” सलीम तणतणला. “मगर फिरभी नाही बचे. तो मुझे क्यू रोकायचं?”

“देखो भाईजान, तू उनका इकलौता बेटा आहे. तुझं कम-ज्यादा कुछ झाला, तो बुढापेमें अब्बा कहाको जाना?” सलमाने अब्बाची बाजू लावून धरली.

“तो तू आहे ना? तू सम्हाल अब्बाको.” सलीमनं एकटक सलमाकडे नजर लावली.

“ऐसा क्या देखता माझ्याकडे?' सलमानं ती सहन न होऊन विचारले.

“नाही, तू अब्बाको नाही सम्हाल सकती.” सलीमच्या या आरोपावर सलमाच्या भुवया वाकड्या झाल्या. “तेरा क्या होगा बताता. तुझे अब्बाने हेच शिकवलं ना, हमेशा खतरेसे बचको चलो. आब्बाजान तुझा बिरादरीमें कोणाशी निकाह लावून देणार. वो कोई ट्रकवालाच होगा. तू भी बच्चे पैदा करणार. उनको यहीच शिकवणार. नजर नीचे. सबसे बचके. उनके बच्चे होणार, तो वो उनको यहींच सिखाना. पिढी दर पिढी यहींच चलता रहना. अरे दिदी, कभी तो गौर कर. सहनेवाला सहता, इसिलिए जुल्मवाला जुल्म कर सकता.”

सलमा डोळे विस्फारून सलीमकडे बघायला लागली. ही तर छायाची ओळ? याला कशी कळली? “तू ही कहानी वाचली?' तिचा विचारताना आवाज चिरकला.

“हां.” उत्तर आलं.

---------------------------------------------------

सारानं छायाच्या कहाणीचं पान मोठ्याने वाचलं आणि खाली ठेवलं. समोर पाहिलं तर मायच्या चेहऱ्यावर हसू फुललेलं. ते पाहून साराच्या चेहऱ्यावरदेखील हसू फुललं.

“किदे जंगलची बाय मनुजात इली तर गो? त्याच्यापन एक ठांव काळजात पिरेमाचो मोग जागलो. देव तेंचा बरा करो.' मायनं छाया आणि रवीसाठी हातांनी क्रॉस करत प्रार्थना केली. साराला तिच्या भोळेपणाचं हसू आलं. माय पलंगावर बिछान्यात पहुडलेली आणि सारा तिला पुस्तक वाचून दाखवत होती.

“माय तुझी कॅप्सूल नी डोसची वेळ झाली.” सारानं तिला आठवण करून दिली आणि औषधं देण्यासाठी पाण्याचा पेला आणायला उठली. पेला घेऊन जवळ आली. तसं मायनं तोंड फिरवलं.

“माका नाका. कडू जहर निस्ता. हांव मेलंय, तर याच दवापाण्यान मरतलंय गो माझे बाय.”

“गे माय, नाटका करू नाका. घे उग्यानं.' सारानं कॅप्सूल मायच्या तोंडात खुपसली. बळे पाण्याचा पेला ओठांना लावून ते पाजले. मायनं ठसका काढला, तसं घाईघाईनं तिच्या पाठीवर थोपटलं. “बगलय? हांव आसा, म्हणान तुझी ही उस्तवार चलली आसा. नाय तर मगे कोण होतो कोणाचो, तुका बगूक?'

“तो असा नी माजी सायेबीण.” भिंतीवर टांगलेल्या क्रूसाकडे आणि मेरीच्या मूर्तीकडे मायनं बोट दाखवलं, “पन काय गो बाय? घरात पेजेक पन शित नाय होता, ता नी ह्या दवापानी आणलंस तरी खयसून?”

सारानं मायच्या नजरेपासून नजर फिरवली. “माझी फ्रेन्ड आसा मा, होस्टेलाची, तीनी धाडला आसा.”

“खरा?” मायनं साराचा चेहरा वळवून, आपल्या पुढ्यात केला. नजरेत नजर लावली. “माजी शपथ डवर." तिचा हात आपल्या डोक्यावर ठेवला. सारानं एक पाण्यानं डबडबलेली नजर भिंतीवरच्या क्रूसावर टाकली. मग मोठा आवंढा गिळला आणि “होय.” म्हणाली. मायनं एक सुस्कारा सोडला. “शेजारातली फोमेंतो बाय म्हणा होती, तीनी तुका भाटकार सांगवेकारा वांगडा, हाटेलानी गळयात गळो घालान बसला बगल्यान.”

“तिका काय म्हणाचा आसा, ता म्हणान दी.” सारानं ओठ दाताखाली चावला. “तिचा चेडू गांवात कितक्या जणांखाली पासला, ता सगळो गाव जाणता. आपला ठेवाचा झाकान नी लॉकांचा बगता वाकान. तिया तिका जाणणेच नाय काय? आसा गे काय माय? तुजा रगत खरा की शेजारकरीन जळफळीन बाय!”

“नाका गो. मायवर रागाव नाका.” मायनं साराच्या तोंडावरून प्रेमानं हात फिरवून, हाताचा मुका घेतला. “तिया कितक्या गो नशीबाचा आसय. तुका आसली मदतीक धावनारी मैतरीन गावली. देव तिचा बरा करो.” मायच्या थकलेल्या चेहऱ्यावर आर्जव प्रगटलं. “आधी हांव आजारी पडलंय की लॉका घराकडे

चौकशीक फेरीये घालीत. बाय, कधी बरा होतंस? आता कोण पन नाय. आता हांव मातारा जालय. कामाचा माणूस उरलय नाय. गरज सरली. सय संपली. पन तुजी

मैतरीन तू लांब इलस. परतायचंय नाय म्हनतस. तरी तुका पैशे उकलून धाडता. ती तुका राखतली. तुजो कालेजाचो-हास्टेलाचो खर्च भागयतली. सांग तिका, पुढे कामाक खय बऱ्या कमाईक लागलंय की ते पैशे परत करतलंस. माका तर ती दयेची देवी सायबीण गमता. ती तुजा सांग पुरा करतली.”

साराला काय उत्तर द्यावं सुचेना. एक खोटं पुढे केलं, की दहा आणखीन पुढे करावी लागतात. तेच झालं. तिला काही बोलणं जुळवता आलं नाही. तोच विकी रिपोर्टर तिच्या घरात दाखल झाला. “काय सांग असेल ते मला सांगा. हा विकी रिपोर्टर जातीनं पुरं करायला हजर आहे.”

साराच्या नाकपुड्या रागाने फुलल्या. “तू? वॉट फॉर यू आर हिअर? रास्कल, माझ्या घरात घुसायचा तुजा डेरिंग कसा झाला? आऊट, आला तसा आऊट हो.”

“नॉट आऊट, मेरी जान.” क्रिकेटचा अंपायर हाताने नाबाद दाखवतो तसं दाखवत, विकी बोलला. आपल्या कोटीवर आपणच खिदळला, “काल तू सांगवेकर वकिलाशी खूप खूप वेळ गुलुगुलु बोलत होतीस. त्याच्या सोबत बोललीस, तसं माझ्याशी पण बोल ना हनी. त्याने तुला जितके पैसे दिले, तितके मी पण देईन.”

“ओ! यू शट अप डॉग, मी त्यांच्याबरोबर मायला ॲक्सिडेंट केला, त्याबद्दल केस घालायची चर्चा करत होते. कळलं. यू ॲन्ड गावभर जे लोग माझी बोंबाबोंब

करतायत ना, त्यांच्यावर पण मी केस घालणार आहे.” सारा त्याच्यावर ओरडत गेली. तसा झटकन तिचा हात पिरगळून, पाठीवर वळवत विकीनं तिला धरली.

“स्साली, दिड दमडीची रांड, तुझ्या साक्षीला किंमत काय? काय पुरावा, स्टारखाननं तुझ्या आईला ठोकलं? तुला भरपाई पाहिजे ना? मी देतो ना.” विकिने साराचा जबरीनं करकचून मुका घेतला.

मायनं हाताला जो मिळाला तो फराटा धरून, त्याच्यावर बसल्या जागेवरून तडाखे घालायला सुरूवात केली. पायाच्या प्लॅस्टरमुळे तिला उठता येत नव्हतं. तडाखे चुकवताना विकीची सारावरची पकड ढिली झाली. तशी सुटका करून घेत, दूसरा खराटा घेऊन तो साराने त्याच्या डोळयांत घुसवला. दुखावलेले डोळे बंद करून घेत धडपडत, तिच्या पुढच्या तडाख्यांमधून सुटण्यासाठी तो घराबाहेर पळाला. तसं सगळं अवसान संपून, सारा मायच्या गळयात कोसळली. मायनं तिला घट्ट धरलं.

“सारा, त्या तुज्या जंगलीन बायकडं जा. ती तुका राखतली. हय नुस्ती जनावरा आसत. हय तुका राखूक कोन नाय. जा चेडवा जा. माजो इचार करू नाका. मुजे दिस आता सरले. तुझी जिंदगानी सुरू होताह. हय त्येची नासवनी करान घेव नाका. जंगलीन बायेक माजो आशीर्वाद सांग.”

सारानं डोकं मायच्या खांद्यावरून उचलून, तिच्या डोळयात बघितलं, तर त्यात छायाविषयी कितका अभिमान आणि विश्वास भरला होता. छाया आता या जगात नाही, सांगून तो तोडायची हिंमत सारात उरली नाही.

## रवीची डायरी : ११ सप्टेंबर १९९५

---

*आज माझ्या आणि छायाच्या लग्नाचा दिवस. बोमाबेईंमध्ये लग्नाचा रिवाज होता की नाही? हे मला तिथल्या वास्तव्यात नक्की कळलेलं नव्हतं. शिरीनचं-रूस्तमशी, मिसेस पात्रावालाचं-मिस्टर पात्रावालाशी आणि आईचं-बाबांशी जसं नातं आहे, तसं आता आपलं एकमेकांशी जुळणार, असं मी छायाला सांगितल्यावर ती आनंदली. तिला तिच्या भावना दडवायची सवय नाही. तिने आनंदाने उड्या काय मारल्या, मला परत परत मिठ्या काय मारल्या. माझा प्रतिसाद थंड पाहून, मग ही आनंदाची बातमी सांगायला आणि तो वाटून घ्यायला, छाया मेहरूकडे धावली. मेहरूचं तिचं आपलं काही खास मैत्रिणीमैत्रिणींचं नातं होतं.*

*मेहरूला या बातमीनं खास आनंद झाला असेल. पण मला आणि छायाला ओळखणाऱ्या सगळ्यांनाच तसं वाटलं नाही. आईला सांगितलं तेव्हा तिच्या कपाळावर अनेक आठ्या पडल्या. “या इतक्या मोठ्या सव्वाकोटींच्या मुंबईत, तुला दुसरी कोणीच का पसंत पडली नाही?” एका वाक्यात तिनं तिचं मत व्यक्त केलं. आता पर्यंत आपल्या लग्नाच्या वयातून पार होत चाललेल्या मुलाचं, लग्न जमविण्यासाठी तिनं नाना प्रयत्न केले होते. दर आठवड्याला मला एखाद्या मुलीचा फोटो दाखवला जात असे. माझा नकार ठरलेला असे. अखेर वैतागून आई म्हणत असे, “आण रे बाबा, एकदाची मला सून आण. जातीबाहेरची, भाषेबाहेरची, धर्माबाहेरची कोणीही आण. पण मला डोळे मिटण्यापूर्वी, एकदाचं*

*आमच्या नातवाचं तोंड पाहण्याचं सुख मिळू दे." तशी प्रत्यक्षात आणतोय म्हणल्यावर, मात्र चेहरा हिरमुसला.*

*बाबांना देखील हा निर्णय आवडला नाही. दिवसभराच्या ताणातून संध्याकाळी सैलावत, ते पेग मारत गच्चीवर बसतात. ती त्यांची खुशालीची वेळ साधून, मी त्यांना ही बातमी दिली. त्यांनी बरेच मुद्दे मांडून, माझं मतपरिवर्तन करायचा प्रयत्न केला. त्यांच्या मते, छायाला आमच्या घरी आश्रय देण्यास काही हरकत नव्हती. जिथं गंगाबाई आणि भोलाराम राहतायत, तिथं अजून एकाची भर. पण सून म्हणून तिला घरी आणणं, म्हणजे आपल्या सर्वसामान्य जगण्याची, आपणहून वाताहात करून घेणं होतं.*

*पत्नी म्हणून एक सर्वसामान्य स्त्री, ज्या अनेक गोष्टी लिलया पार पाडणार असती, त्यातलं छायाला काहीच जमणारं नव्हतं. ना ती कधी आपल्या हाताने काही स्वैपाक करून मला वाढणार होती, ना सासूसासऱ्यांचं पथ्यपाणी सांभाळणार होती. ना नोकरांकरवी या सगळ्याची व्यवस्था निगराणीने पार पाडून घेऊ शकणार होती. घर सांभाळणं आणि घराच्या कामांच्याबाबत छाया शून्य होतीच, वर घराकडे आल्या गेल्या पै-पावण्यांचं, आप्त नातलगांचं अगत्य करणं तिला जमणार नव्हतं. माहीत नव्हतं. शिकवून शिकलं जाणारं नव्हतं. लोकांशी घराचं-घरच्या माणसांचं नातं तुटणार होतं. छाया अतिशय तेजस्वी होती. त्याबद्दल तिच्याविषयी बाबांना अतिशय आदर होता. पण ही अशी असामान्य आकाशीची वीज, आमच्या सामान्यांच्या घरात आणली, तर मात्र तिथं सगळ्यांना पोळून काढणार असती.*

*माझं मन उपहासानं कडवटलं. आपलं सामान्यपण इतकं उराउरी जपण्याचं हे कवतिक पाहून. मी तसं बोलून दाखवल्यावर बाबा विषादानं हसले. म्हणाले, "मुला, तू सुद्धा आमच्यासारखा सामान्यच आहेस. म्हणून आम्हाला काळजी वाटतेय. माझ्या मुलाच्या आयुष्याची सुखाची मी चिंता करण्यात गैर आहे का?"*

*मी रागाच्या भरात बरंच काही बडबडलो, "मुलापेक्षा तुम्हाला स्वतःच्या सुखाची जास्त काळजी वाटतेय. समाजात तुमचं हसं होईल. लोक काय म्हणतील याला भिताहात. घराची काय दशा होईल? तुमचे रोजचे ऐषोराम जगता येणार नाहीत, याचा विचार करताहात. लग्नानंतर मी आणि छाया आमचे आम्ही वेगळे राहू. आमचा काही त्रास तुम्हाला होऊ देणार नाही. छायाची सावलीसुद्धा तुमच्यावर पडू देणार नाही."*

*यावर कधी नव्हे ते बाबांच्या डोळ्यांत अश्रू तरळताना मी पाहिले. थरथरणाऱ्या हातांनी माझे हात हातात घेत म्हणाले, "काय बोलतोस हे? आमचा तू एकुलता एक आहेस. आमचं जे काही आहे, ते सगळं तुझं आणि तुझ्याचसाठी आहे. तुला ज्यात आनंद तो आमचा आनंद." मला असं जरी बोलले, तरी बाबांनी आमच्या ओळखीतल्या अनेक*

*आदरणीय व्यक्तींद्वारे, माझी समजावणी करायचा प्रयत्न केला. प्राचार्य श्रीनिवासांनी माझं सगळं बोलणं ऐकून घेतल्यावर, माफक इतकीच प्रतिक्रिया दिली की ही एका अटळ शोकांतिकेची सुरूवात आहे.*

*सगळ्याच ओळखीतल्यांच्या प्रतिक्रिया अशा निराशाजनक नव्हत्या. शिरीन आणि रूस्तमनं नव्या नवऱ्यासाठी म्हणून केळवण आयोजित केलं होतं. तर पात्रावाला दाम्पत्यानं नव्या नवरीसाठी म्हणजे छायासाठी केळवण आयोजित केलं होतं. मेहरूनं आणि झेबूनं तिथली*

*खास खबर अशी आणली होती, की छायासाठी तऱ्हेतऱ्हेची फळफळावळं, शहाळी आणि एक आख्खी सोललेली कच्ची कोंबडी ठेवलेली. छायानं फारसा तमाशा न करता, ती आवडीने खाल्ली म्हणे. हे ऐकून माझ्या जीवाला जरा गार गार वाटलं. छायाशी लोकांनी आपसूक जुळवून घ्यायला सुरूवात केली होती तर. एवढंच नव्हे तर मेजवानीत सगळ्यांनाच एकत्र मिळून खाता येण्यासाठी, सुशी हा जपानी खाद्यप्रकार होता. समुद्री माश्यांचं कच्चं मांस असतं ते.*

*रूस्तम आणि शिरीननं मला धीर देण्याचा आणि उत्साह वाढवण्याचा बराच प्रयत्न केला. रूस्तम म्हणाला, "रवी तू घरामध्ये वात सुटलेला फटाका आणून ठेवतो आहेस. पण काळजी करू नको. खऱ्या प्रेमात इतकी ताकद असते की ती त्या फटाक्याची वात पेटली, तरी त्याला कधी फुटू देणार नाही. त्याला आवर घालून ठेवेल. बस्! तुझा तो प्रेमाचा बांध, ते प्रेम कधी ढिलं पडू देवू नकोस.*

*अरे, दुनियामध्ये जळणाऱ्यांची काही कमी नाही. शेजारची माणसं दोन वेळचं डाळभात पोट भरून खातात, एवढं बघून पोट दुखणाऱ्यांची, जगात कमतरता नाही. मग भले ही माणसं स्वतः बिर्याणी का खात असेनात? तुमचं एकमेकांवरचं खरं प्रेम बघून जळफळणारे पण अनेक जण असणार. ते तुमच्या मनात, तुमच्या घरात, एकमेकांविषयी उलटसुलट सांगून विष भरायचा नेहमी प्रयत्न करणार. त्याला फसू नका. बळी पडू नका. मला शिरीनविषयी आणि शिरीनला माझ्याविषयी लोक खूप काय काय सांगतात. आम्ही ते ऐकताना हो ला हो दुजोरा देवून सगळं ऐकून घेतो. मग जेव्हा भेटतो तेव्हा एकमेकांना ते सगळं सांगून, त्यावर हसायचा भरपूर मजा घेतो.*

*त्यानंतर शिरीननं मला जरा दमात घेत सांगितलं की ती छायाला पुरेपूर ओळखते. छायाच्या मनात माझ्याविषयी कधी खोट वा संशय येणार नाही. पण मी मात्र छायाविषयी मनात संशय-किंतु, कदापिही न पाळण्यासाठी दक्ष राहिलं पाहिले.*

*"कसला संशय कप्पाळ?" मी उत्तरलो. "छायाच्या जवळ उभं राहायची तरी कोणाची कधी हिंमत होईल काय?"*

*यावर शिरीननं फार गंभीर होत म्हटलेलं, तिला असा गंभीरपणा शोभत नाही. संशय अनेक प्रकारचा असतो. बाई-पुरूषातल्या नात्याचाच असं नाही. यावर रूस्तमनं लगेच कोपरखळी मारली की अरे होय, असले काही ऐकलं की माझ्या बायकोला मेंदू आहे की काय? याचा मला संशय येतो आणि भीती वाटते, माझं खोटं पकडेल की काय? मग काय, हसण्याच्या फवाऱ्यांमध्ये आणि कारंज्यांमध्ये सगळे वाहून गेलो.*

*या जळफळणाऱ्यांचा एक नमुना हातोहातच मला आज सकाळी अनुभवायला मिळाला. आईनं चांदनीला लग्नकार्यात मदतीला म्हणून बोलावून घेतलं होतं. चांदनी जैन, तिच ती (कु) प्रसिद्ध फॅशनमॉडेल. चांदनी अशी नटून-थटून आली होती की जणू काय तिचंच लग्न आहे. तिचं अनिंदय सौंदर्य रत्नमण्यांनी असं लखलखत होतं, की पाहताक्षणी कोणीही जागेवर खिळून जावा. तसा मी खिळलेला पाहून तिच्या आडून आईनं माझ्याकडं बघत डोळे मोडले. आईला काय म्हणायचं होतं ते मला कळलं. कुठे असलं रत्न टाकून, तू तो दगडधोंडा गळ्यात घालून घ्यायला निघालायस?*

*आईनं चांदनीकडे मला सजवायचं काम सोपवलं. सनईचे मंजुळ स्वर घरभर निनादत होते. वेगवेगळ्या अत्तरांनी हवा दरवळत होती.*

*बाहेर पावसाच्या आगमनाने हवेत सुखद गारवा जाणवत होता. आणि चांदनी तिच्या मखमली बोटांनी माझ्या चेहऱ्यावर प्रसाधनं कुस्करत होती. “का करतोयस तिच्याशी लग्न?” कानात गुणगुणल्यासारखं तिनं विचारलं.*

*“कारण माझं तिच्यावर प्रेम आहे.” मी थंडपणे उत्तरलो.*

*“जे तुझ्या डोळ्यात तर मला कधी तिच्याविषयी दिसलं नाही.”*

*“ते दिसायला, आधी आपण कोणावर खरं प्रेम केलेलं असायला हवं, तर ते जाणता येतं.”*

*“यार, तू तर एकदम माझ्या काळजाचा तुकडाच काढलास. चल, आज एकमेकांपासून कसली लपवाछपवी नाही. कबूल की मी पुरूषांशी प्रेमाचे खेळ करते. नजरेनं खेळवते, अदांनी खेळवते, शब्दांनी भ्रमवते. पण कधी काळी मी देखील खरं प्रेम केलेलं आहे. जेव्हा मी या खेळांमध्ये बिलकुल नवी होते. कच्ची होते. त्यानं माझा खेळ केला. हवं होतं ते घेतलं. बाजूला झाला. मी रडरड रडले. मग समजून चुकले. जग हे असंच असतं. फार थोड्या भाग्यवंतांना खऱ्या प्रेमाच्या बदल्यात खरं प्रेम मिळतं. आणि त्या यादीत तुझा समावेश मला करता येत नाही. माझी अनुभवी नजर खोटं सांगत नाही. त्या जंगली भुतणीच्या डोळ्यांत मला तुझ्याविषयी जे प्रेम दिसतं, ते तुझ्या डोळ्यात तिच्याविषयी दिसत नाही. असं का बरं?'*

*“प्रत्येकाची प्रेम करायची आपापली रीत असते. जरूरी थोडीच आहे, जगातल्या प्रत्येकाची रीत तुला माहीत असेल. प्रत्येकाचं प्रेम तुला मिळेल?”*

“तू तिची फसवणूक करतो आहेस. मला फसवू शकणार नाहीस.” चांदनीनं गंभीर आरोप केला.

“मी तुझ्यासारखा फसवा नाही.”

“म्हणून मनोमन माझ्यावर प्रेम असून सुद्धा, तू मला त्याची कबुली देत नव्हतास? मी सांगितलं ना, आज या प्रेमाच्या खेळातली मी हुकूमाची राणी आहे. अंदमानला जायच्या आधी तुझ्या डोळ्यांमध्ये, मला ते प्रेम स्पष्टपणे दिसायचं. आणि मी कित्येक जणांना या खेळात खेळवलंय माहीत असल्यामुळे, तू स्वतःला त्यापासून परावृत्त करायचे, अयशस्वी प्रयत्न परत परत करत असल्याचं सुद्धा दिसायचं. पण खरं प्रेम माणसाला या सगळ्या गोष्टी नजरेआड करायला शिकवतं. आज ना उद्या तू मला मागणी घालणार होतास. बोल खोटंय?' चांदनीनं मला आमनेसामने नजरेला नजर भिडवून दोन्ही हातांनी खांदे गच्च आवळत विचारलं.

मला उत्तर देता आलं नाही. माझ्या चेहऱ्यावरून, अंगावरून डवरलेला घाम, लग्नाचे उंची कपडे भिजवू लागला. छातीतली वाढलेली धडधड तर तिला स्पष्टपणे ऐकायला येत असणार. माझी नजर नकळत तिच्या नजेरतून खाली वळली. ती जिंकली. तिचं खरं होतं. मी तिला फसवू शकणार नव्हतो. दोन्ही हातांत माझा चेहरा पकडून, तिनं पुन्हा मला माझी नजर तिच्या नजरेत भिडवायला भाग पाडलं. “अजून वेळ गेलेली नाही. मी तुझी होऊ शकते. आजपर्यंत केलेल्या सगळ्या गोष्टींची मी तुझ्याकडे कबुली देते. कोणताही आडपडदा नाही. काही लपवणार नाही. मी कंटाळलेय या खेळांना. मला यातून बाहेर पडायचंय. मला मदत कर. मी कायम तुझ्याशी प्रामाणिक राहीन. वचन देते.”

*“आणि छायाचं काय?”*

*“तिचं काय? जाईल परत तिच्या अंदमानच्या जंगलात.”*

*“नाही. ती परत जाऊ शकत नाही. तिथं तिला ठार मारतील.”*

*“पण तिच्यासाठी तू स्वतःच्या प्रेमाचा आणि आयुष्याचा का बळी देतोयस?”*

*“कारण माझं हे आयुष्य माझं नाहीय. तिच्याचमुळे राखलं गेलेलं, पुन्हा पुन्हा परत मिळवलेलं आहे. तिचं आहे. तिची खुशी ती माझी खुशी. मला वाटतं यालाही प्रेमच म्हणतात.”*

*“नाही. याला कृतज्ञता म्हणतात. याच्या जोरावर सगळं आयुष्य तुला तिच्याबरोबर निभावता येणार नाही. मी जाते. छायाला भेटते. तिला सगळं सांगते. तुझी खुशी ती तिची खुशी. खरं प्रेम. ती नाही म्हणणार नाही.”*

*अचानक माझं सगळं अंग ताठ झालं. पाठीचा कणा सरळ झाला. छाती जोरजोरानं धडधडत होती. शरीराला कंप सुटलेला होता. पण मला त्याचं काही वाटेनासं झालं. माझा आवाज कापत घश्यातून घोगरा उमटला. त्याची सुद्धा लाज वाटली नाही. “नाही चांदनी, तू असं काही सुद्धा करायचं नाहीस. तसं करून तुला मी मिळणार नाही. याऊप्पर, मला तुझ्याविषयी काहीही वाटत नाही. शिसारी येतेय मला तुझ्या या नीचवृत्तीची.”*

*चांदनी माझ्या डोळ्यात डोळे लावून, डोळ्यात व्याकुळतेचे भाव आणून एकटक पाहायला लागली. पण मी बधलो नाही. माझी नजर आता ढळली नाही. “छायावर सूड उगवण्यासाठी, तिला मी मिळू नये*

*म्हणून चाललेली, ही तुझी नाटकं आता पुरे झाली. बघ आता माझ्या डोळ्यात, तुला कुठे तुझ्यासाठी प्रेम शिल्लक राहिलेलं दिसतंय का?" ढसाढसा रडत चांदनी माझ्या पायांशी कोसळली. माझ्या पायांना घट्ट मिठी मारून बसली. मी विरघळलो नाही. लाथेनं तिला ठोकरून लग्नमंडपाकडे रवाना झालो.*

*लग्नमंडपात जिकडं तिकडं रोषणाईचा चमचमाट होता. सजलेल्या मिरवणाऱ्या लोकांच्या हालचालींमध्ये आणि बोलण्यात उत्साह होता. पण एक प्रकारचा धास्तावलेपणा देखील होता. धास्तावलेलो तर मी सुद्धा होतो. हा पारंपारिक होमहवन-यागवाल्या लग्नाचा घाट, छायाच्या सवयी आवडींशी जुळणारा नव्हता. मी आणि बाबा सरळ साध्या नोंदणीकृत लग्नाच्या मताचे होतो. पण आईचा हट्ट होता की तिची सुद्धा एकुलत्या एक लाडक्या लेकाच्या लग्नाविषयी काही स्वप्नं होती. हौसा-मौजा होत्या. लोकांच्या मानपानांची काही देणीघेणी बाकी होती. नवरी तर तिच्या मनासारखी नाही करत आहे, निदान लग्नविधी तरी तिच्या मनासारखा करावा.*

*शिरीन आणि रूस्तमने हौसेनं कन्यादानाची जबाबदारी आपल्यावर घेतली होती. छाया त्यांच्याच घरी सजवली जात होती. एकामागून एक विधी आटपले. आणि गलका झाला, "मुलीला आणा."*

*यापूर्वी देखील नजरा अनेक वेळा उत्सुकतेने, नव्या नवरीला बघायला उतावळ्या झाल्या असतील, पण अशा पार कपाळात गेल्या नसतील. मी ओठांवरून जीभ फिरवत भांबावल्या नजरेनं नवरीकडं पाहिलं. तिनं डोक्याला बाशिंग घातलं होतं. पण त्याखाली आनंदीआनंदच*

*होता. शेवंतीच्या पिवळ्याशार फुलांच्या हारांनी, वधूची लाज झाकायचा मोडकातोडका प्रयत्न करण्यात, शिरीनला थोडंफार यश आलं होतं.*

*नात्यागोत्यातल्या सगळ्या साळकाया-माळकायांनी आईकडं नजर टाकली. आई जागच्या जागी भूमिगत म्हणजे नजरेआड गायब झाली. अंतरपाटाला नवरा नवरीनं एकमेकांना पुष्पमाळा घालायचा विधी जरा ठिकठाक पार पडला. पण नंतर होमाच्या विधीत त्या धुराचा त्रास होऊ लागल्यावर, छायानं भटजीला तंबी दिली की ही आग आता विझवावी.*

*भटजीची यापूर्वी कधीच छायाशी गाठभेट पडली नव्हती. आईनं खास माहेराहून बोलावून घेतलेले शास्त्री होते. ते छायाला अडम-तडम बोलले की तुला शास्त्र वगैरे थोडं तरी काही कळतं का? रानटी जनावर आणि असंच बरंच काही.*

*थोड्या वेळात त्याच होमाच्या जाळावर धुरी दिल्यासारखा भटजी उलटा टांगलेला सगळ्या वऱ्हाड्यांना दिसला. मोजके हिंमतबहाद्दर सोडले तर बाकी सगळे पसार झाले. राहिले त्यांनी पोटभर हसत, टाळ्या वाजवत वधूवरांना मनापासून आशीर्वाद दिले.*

-----------------------------------------------------

सरला हॉस्टेलच्या पायऱ्या चढत होती. समोरून काशीबाई आली. “चार दिसांसाठीच गेला व्हतात वं ताई? इतक्यातच परत आलात? न्हाई. बाईसायबांनी सांगितलं व्हतं की तुमी तिघीबी कायमच्या हास्टल सोडून गेल्याती.”

“मी जरा चार दिवस घराकडे जाऊन आले. बरेच दिवस तिकडे गेले नव्हते. कायमची नव्हे.” सरलानं शांतपणे खोल श्वास घेत सांगितलं.

“बरं, तुमी म्हनता तसं, तर तसं वं. पन बाईसायबांना काय सांगू आता?” काशीबाई गोंधळात पडली.

“तू काहीच सांगू नको. काय सांगायचं ते मी सांगते. मॅडम आता आहेत का? मी भेटते त्यांना.” सरलानं काशीला आश्वस्त करायचा प्रयत्न केला.

“न्हाय. गेल्याती धुरंधरसायबांबरूबर मगाशी बायर. कधी येनार, काय सांगितलेलं न्हाय. जावू मी?”

“बरं जा.” सरला झटक्यात हो म्हणाली. आणि विचार आला तसं विचारती झाली, “अगं थांब जरा. माझ्यामागे इथे नवं काही घडलं का? काही नवीन खबर?”

“नवीन म्हंजी?”

“सुमनचं काय झालं? मुग्धा परत आली का? आणि...” जरा रेंगाळून धीर करून पुढे विचारलं, “कडू पाटील नी तिचा यार मनु शर्मा, त्यांचं काय?”

“ताई मला बाई तुमी माफ करा.” काशीबाईनं कोपरापासून हात जोडले. “यातलं मला कायबी नवं ठावूक नाय. आदीच पोलिसवालं विचारून हैरान करत्याती. तुमी यातलं कायबी इचारू नका. इचारायचं असलं तर तुमच्या मैत्रिनीला इचारा. ती बी परत आली हाय.” सरलाच्या उंचावलेल्या भिवयांकडे पाहत स्वतःच पुढचं उत्तर दिलं, “ती किरस्ताव साराताई वं.” तरातरा निघून गेली.

तशी घाईघाईनं सरला खोलीकडे गेली. ती दार ठोठावणार एवढ्यात जिन्याकडे तिची नजर गेली. “अय्या!” तिच्या तोंडातून आश्चर्योद्गार निघाला.

“अल्ला!” जिन्याकडून येणाऱ्या सलमानं तितक्याच आश्चर्यानं प्रत्युत्तर दिलं. अर्थात दार उघडल्यावर दोघींना पाहून सारानं दुहेरी आश्चर्यानं “माय गॉड!” म्हटलं. मग तिघींनी आळीपाळीनं एकमेकींकडे पाहिलं आणि त्या हसत सुटल्या.

सलमाची नजर फोडलेल्या कुलुपाकडे गेली. “अमा यार, हा करतब कोणी केला?”

“हांव मेरी जान, मी केला. गॉडझिलानं आपण जाताच, रूमला नवीन लॉक ठोकलं होतं, नाऊ आय डोन्ट हॅव मास्टर की. सो तोडून टाकलं. डॅम इट. एक फालतू लॉक, माझी एन्ट्री कसं रोखू शकणार?”

“तू तर एकदम कम्माल बनली है यारा. बिल्कुल छाया जैसी.”

“येस माय फ्रेंड. घराकडे जावून हांव, हा इम्पोर्टन्ट लेसन शिकून आली हाय. या दुनियेत जगायचं तर छाया बनूनच जगायला पायजेल हाय. ऐसी वैसी सारा डिसोझाला कोण ब्लडीफूल किंमत देणार हाय?”

“आणि सरला जाधवला?”

“और सलमा शेखको?”

तिघी गंभीर झाल्या. सारानं दाराला आतून कडी लावून ते बंद केलं.

“यू आर ॲब्सोलेटली राईट मॅडम. आता बोला का आलो आपण तिघी परत इथं?”

“क्योंकी, आम्ही ये दुनियाके किसी भी कोने मध्ये गेलो, तो वहाँ वोच वो अन्याय-जुल्म, पैसेवालोंकी मिजास आनी मग्रुरी, हुकूमतवाल्यांची घमेंड आनी जबरदस्ती, एक जैसीच आहे.”

“हो. त्यापासून कुठेच सुटका नाही.” सरलानं सलमाला दुजोरा दिला

“येस, येस, येस. आणि त्या ब्लडीबास्टर्डना वठणीवर आणू शकेल अशी वन ॲन्ड वन ओनली गोष्ट, या जगात आहे, ती म्हणजे.....” सारानं आपला कमरपट्टा हवेत फडफडवला.

“फटकेवालीचा चाबूक." सरलानं वाक्य पुरं केलं.

“यानीके, हम तिनो एकाच मकसदने वापीस आलो आहोत.”

“येस, छाया आंग्रे परत आली पाहिजे. धिस दुनिया बॅडली नीड हर.”

“त्या हरामखोरांच्या दहशतीला चाप लावायला, तिची तशीच प्रतिदहशत हवीच हवी.”

“बात तो सोला आने सच्ची है दोस्त, पण? आपण या अशा मामुली साधारण मुली. बदनमध्ये छाया जैसी ताकद नाही. हातापाईचं कसलं हुनर नाही. लढनेका काही तजुर्बा नाही. छाया, जैसी तेज नजर, तल्लख कान नाहीत. हम लोगों तो एकदम कमजोर. मोम की गुडीयाँ जैसी.”

“म्हणून काय झालं? मनात तर छायासारखीच अन्यायाची चीड धगधगतेय ना? हात धडक द्यायला शिवशिवतायत. जर आपलं मन दुबळं नसेल, तर शरीरसुद्धा सबळ होईल.”

“माय डियर, नुसत्या बड्या बड्या बाता बोलून त्यानं काही साधणार नाही. आपण शिकार करायच्या आधी आपली शिकार होणार नाय, याची पूरी प्रिकॉशन आपण घ्यायला पायजेल. सरळ जावून वॉलवर डोकं धडकलं, तर आपलंच फुटणार. आपल्या शिकारला आपला बिल्कुल सस्पेक्ट होता नाय.”

“त्यासाठी आपल्याला डबल आयडेन्टी फॉर्म्युला वापरला पाहिजे.”

“ये किस बला का नाम है?”

“अगं, असं काय? आपण याआधी त्याचाच नाही का वापर केलाय? आपण कोण आहोत? सारा, सलमा, सरला. आणि बनलो होतो कोण? छाया आंग्रेचे भूत. म्हणून तर अजून पकडल्या गेलो नाही आहोत.”

“ओह! आय गेट ईट. सुपरमॅन आणि रिपोर्टर क्लार्क. नाणं एक. साईडस् टू.”

“हम तीन लोगां. चार बाजूवाला सिक्का."

“दॅटस् मच बेटर. दिसताना तर समोर एक बाई दिसेल. पण आपण तिघी असू तिथं. बाकीच्या दोघी पडद्याआड राहून सपोर्ट करणार. फुल प्रुफ प्लान तयार करूनच अॅक्शन घ्यायची. व्हेरी व्हेरी स्मार्ट.”

“पण त्या काळ्या-लाल रंगानं अंग रंगवायला, काहीतरी तोड काढली पाहिजे. दरवेळी रंगायला दोन तास आणि उतरवायला दोन लागायला लागले, तर आपण पकडल्या जायला वेळ लागणार नाही.”

“मै सोचती, एक काली नकाबवाली पोषाख बनवून घेऊया."

“नकाब? नो वे. माय डियर गर्ल्स, सांगा जरा की सुपर हिरो बॉडी टाईट सूटमध्ये का असतात? बिकॉज एक बेनेफिट तर हाय की अ‍ॅक्शनमध्ये डिफिकल्टी येत नाय. फ्री टू मुव्ह. अ‍ॅन्ड सेकन्डली तुमचा स्कर्ट पळताना कंपाऊन्डच्या तारांमध्ये अडकून फाटत नाय. मी लहान होते, तेव्हा शाळेच्या युनिफॉर्मचा जाम वैताग असायचा. ऑफ-पिरेडला शाळेतून पळताना अ‍ॅटलिस्ट चार वेळा माझा स्कर्ट फाटलाय.”

“अरेरे!” सरला चुकचुकली.

“तो क्या बिकिनीची बात करती हो लडकी?”

“नो, नो, नो बिकिनी. स्किन टाईट बॉडी हगिंग स्पॉन्डेक्स.”

“ऑ! आंबट, जरा जमिनीवर उतर. फार हवेत उडू नको. आपण चित्रपटात काम नाही करणार आहोत. आपला पोषाख आपल्यालाच बनवायचाय आणि जे काही आवाक्यात आहे, त्या गोष्टींपासून.”

“छोडो तिखट याची फिकर. ड्रेसका जिम्मा माझा.”

“सो स्वीट माझी गोड.” सारानं सलमाचा गाल चाटला.

“हं. पण मला जरा दुसरी एक फिकर सतावतेय. पोलीस गं. तो मेला बिलिमोरीया, परत टपकला नाही तर देव पावला.'

“सॉरी तिखट, माझा एक्सपिरीयन्स सांगतो की तो नक्की आपलं इन्टेरोगेशन करायला परत येऊन आपटणार. आपण जगाच्या नजरेत सिंपल आणि हम्बल पोरी आहोत ना. डॅम इट. हे पोलिसवाले, अशाच लोकांना टार्गेट करत असतात. त्यांना नाडत असतात. हॅव यू एव्हर सीन? टॅफिक पोलिसवाला कधी एखाद्या आलिशान मर्सिडीज किंवा बी. एम. डब्लू.ला कागदपत्रं नी लायसन्स चेक करायला थांबवतो काय? नेव्हर. त्याला माहीत असतं, असल्या बड्या कारच्या बड्या मालकाचे हात, वर पोचलेले असतात. त्याला अडवलं तर पोलिसाचा बॉसच, त्याच्या एका फोनवर उलटा पोलिसाला झापणार. पोलिसवाले ट्रक, टेम्पो, टॅक्सीलाच धरतात.”

“कसमसे, यहीच देखते आली हमेशा, पुलिस तो गुंडा मवाल्यांचीच साथ देतात. त्यांच्या दादाभाईसामने शेपटी हलवतात. त्या कुत्र्यांची कशाला फिक्र करायची?”

“लिसन गोड, फिकीर तर करायला लागणार. बट, एक सॉलिड आयडीया हाय. यू नो पोलीस कसा तपास करतात? ते मोटिव्ह शोधतात. कोणाला असलं काम करण्यात इंटरेस्ट असेल? कोणाचा फायदा हाय? त्यावरून ते नेहमी कलप्रिट ट्रेस करतात.”

“हा. माझ्या लक्षात येतंय. मनु शर्मानं सुमनवर ॲसिड टाकलं. त्याच्या चेहऱ्यावर ॲसिड कोण टाकणार? तर सुमनच्या कोणीतरी खूप जवळचं टाकणार. आपण काही तिच्या तितक्या खासगीतल्या नव्हतो. म्हणून त्या बिलिमोरीयाला आपला थेट वहिम घेता येत नव्हता.”

“हाय कम्बख्त. म्हणजे या धुरंधर मॅडम आणि सर का हमे कुछ बिगाडना नाही, उना तो आमची सीधे दुश्मनी.”

“चूप गधडे, समजून घे. दुहेरी ओळख. आपण सलमा, सारा, सरला म्हणून त्यांच्याशी थेट दुश्मनी दाखवायचीच नाही. सरळ साध्या चिल्लर मुली, काय बोलतात, ते गुमान ऐकून घेणाऱ्या. काय करतील, ते निमूट सोसणाऱ्या. कसलंच धाडस नसणाऱ्या. आणि मग एखाद्या रात्री....”

“हा. समझमध्ये आला. अमावसकी रात में, बत्ती गुल होवून अंधेरेमे, एक काली परछाई खिडकीसे अंदर और.........”

“एक किंचाळी. हा हा हा !” सरला भेसूरपणे हसली.

“ओ नो, एक गडबड झाली हाय. प्रॉब्लेम. मी तर ठरवलं होतं, गॉडझिला लॉक का तोडलं? म्हणून विचारायला लागली, तर सिम्पली तिच्या फेसवर पैसे फेकायचे आणि हांव ब्रेक केला, असं स्टाईलमध्ये सुनावायचं.”

“पैसे? ते बाई तू कुठून मिळवलेस?”

“मिळवायचे आहेत. गॉडझिलाच्या केबिनचं लॉक फोडून ते मिळवायचा माझा प्लॅन आहे. नाऊ डोन्ट से गोड, की हा गुन्हा आहे. मला तुझं ते व्हॉट ओके आणि नॉट ओकेवालं लेक्चर नकोय. ही जगण्याची हार्श रिॲलिटी आहे. आपल्याला सर्व्हाय करायचंय तर चोरावर मोर बनूनच पॉसिबल आहे. सगळे लेजिटिमेट रस्ते तर या सिस्टमने आपल्यासाठी कधीच बंद केलेत.”

“नाही आंबट. मै तुझे नही रोकती. अपने कमाईके सभी सही जरिऐ, या लोकांनी कसे बंद केलेत, मी माझ्या घराकडे पुरपुरा अनुभव घेतला आहे. और वैसे भी आता आपले खर्चे खूप बढनेवाले है. तो पोषाख बनवायचाय. कितक्या जागी आपल्याला फिरावं लागणार आहे. कितकी सारी खबरे, कितक्या सगळ्या लोकांकडून हासील करावी लागणार आहे. पैसा तो पानी की तरहा बहाना पडेगा. इमानदारीसे तर रोजचा खर्चा आपण चालवू शकत नव्हतो.”

“आंबट, पण तू हे कसं साधणार होतीस?”

“सॉरी फ्रेंड, त्याचा प्लॅन अजून मला बनवायचा हाय. ती गॉडझिला तिच्या हजबंडबरोबर बाहेर उनाडायला गेलीय, तितक्यात ते जमवायचं होतं.”

“अरे, माझ्या कर्मा! आणि आता या रूमचं लॉक तोडून, तर तू त्यांच्याशी पंगा घेऊन सुद्धा मोकळी झालीस?”

“छोडो तिखट, आंबटला कोसनेसे अच्छा, ये कैसा करना, काही विचार कर. प्रत्येक शक्सची काही ना काही कमजोरी होती है. अमा आंबट, तू तर त्या घूलाचा, तो कोण आशिक भाटीया आहे, बोली थी ना? बस उसे झाँसा देते है!”

“गोड काय बेत काय आहे तुझा?”

“देखो, चोरी करना सोप्पं असतं, पण ती पचवता येणं कठीण असतं. ये सियासती नेता आणि अफसर बाबू लोग, दिन दहाडे आम पब्लिकला लुटत असतात. मगर जान के भी पब्लिक चूप राहतं. और तो और, आपल्याला कुठं त्यात हिस्सा मिळता क्या? संधी शोधत असतं. तेच एक मामुली पाकिटमार जर पब्लिकच्या हातात सापडला, तर उना क्या होना?”

“पब्लिक धुलाई, माय डियर गोड, बट कम टू द पॉईंट. आपण नेमकं काय-कसं करायचं हाय?”

“वो बोलती ना, सुन तो. घूलाच्या केबिनपाशी कोणी नाही एवढं बघायचं. लॉक तोडायचं. आत घुसायचं. फटाफट तिथली तिजोरी खोलायची. आतमधला माल साफ करायचा. बाहेर कोणी टपकायच्या आत सटकायचं. एकजण आत घुसनेका, एकजण बाहेर नजर रखनेका, एकजण पब्लिकला दुसरीकडे कुठं उलझके रखनेका, क्यों हैं ना अपने बसकी बात?”

“तिजोरी कशी उघडायची?”

“कम ऑन तिखट. चाबी तिथंच कुठंतरी गॉडझिला ठेवत असणार. ते मॅनेज करू. बट, गोड यात भाटीया कुठे आहे?”

“आत शिरल्यावर, तिजोरी साफ केल्यावर, उसे घूलाके ऑफिस फोनवरून कॉल करनेका. घूलाके आवाजमध्ये तिथं बुलानेका.” सलमाने तोंडातून लाडीक

चुम्मीचे आवाज काढले. “समझ गयी ना? पळत पळत आला पाहिजे. फिर तो काम एकदम आसान है. तो आत गेला की काशीबाई नही तो वॉचमन वहा हाजिर होगा, इतनाच करनेका. आपली चोरी त्याच्या नाम दर्ज होणार.”

“येस. आणि आपला बॉयफ्रेन्ड अडकतो हाय, तर गॉडझिला विल नॉट गो टू पुलीस. डन.”

“तिखट तुझाभी पक्का?”

“अं!” सरला विचार करत होती. “हां पक्का. जे होईल तेव्हाचं तेव्हा. धाडस तर करावंच लागणार. शंभर टक्के निर्धोक योजना कधीच बनू शकत नाही.”

“तो पक्का.” सलमाने सारा आणि सरलाचे हात आपल्या हातात धरले.

“छाया आंग्रे आज परत जागी होणार. तिचा चाबूक कडाडणार. जगातल्या नराधमांनो खबरदार. यापुढे येणारी तुमची प्रत्येक रात्र वैऱ्याची आहे. स्वतःला बदला. नाहीतर मरा. तिच्याकडे तुमच्यासाठी कसलीही दया माया नाही. काळरात्रीतली नागीण बनून, ती अजिबात चाहूल लागू न देता तुमच्यापाशी येईल. आणि मृत्यूचा विषारी डंख डसून जाईल.”

“हां! एका खूनाची सजा फाँसी नी सौ खूनाची सजाभी फाँसीच. कफन बांधून तय्यार आहोत आम्ही.”

“स्टॉप फटकेवाली इफ यू कॅन.” सारानं पट्टा जोरात फटकारला.

## रवीची नोंदवही : ११ ऑक्टोबर १९९५

---------------------------------------------

*लग्नाआधीच्या दिवसांमध्ये छायाचा जो दिनक्रम आणि रात्रक्रम होता, त्यात मोठासा काही फरक लग्नानंतर पडला नाही. मी तशी अपेक्षा केली नव्हती. तेव्हा अपेक्षाभंगाचं दुःख मला झेलावं लागलं नाही. तिला जर कपडे नसण्याची काही क्षिती वाटत नव्हती, तर तिच्या तशा असण्याची क्षिती, मी का बाळगायला हवी होती? लोक देखील आता हळूहळू तिच्या नागवेपणाला रूळायला लागले होते. रोज मरे त्याला कोण रडे?*

*त्यामुळे संध्याकाळी मी कॉलेजवरून लेक्चर आटपून घरी आलो, की आम्ही इतर नवपरिणीत दांपत्यांप्रमाणेच, एकत्र अगदी हातात हात घालून फिरायला बाहेर पडत असू. अशा वेळी नवऱ्याची नेहमीच अपेक्षा असते की लोकांनी वळून वळून आपल्याकडे पाहावं. आपल्या नव्या नवरीच्या सौंदर्याचं त्यांना अप्रूप, कौतुक वाटावं. बायकांना दागिन्यांचा फार सोस असतो म्हणतात. इतर बायकांचं लक्ष वेधून घ्यायला, त्या दागिन्यानी स्वतःला मढवतात. पण पुरूषासाठी अशी दागिन्यांनी सजलेली बायको, हीच एक मोठा दागिना, इतर पुरूषांसमोर मिरवायला असते. आमच्याकडे लोक माना वळवून वळवून पाहत पुढे जात हे खरं. पण....*

*छायाला दागिन्यांची नावड होती. या गोष्टी तिला शरीरावर ओझं आणि हालचालींना (मारामारीला) अडथळा आणणाऱ्या गोष्टी वाटत. वाघनख, साळीचे काटे, विंचवाची नांगी वगैरेसारख्या, हत्यारं म्हणून वापरता येण्यासारख्या गोष्टी, अंगावर दागिने म्हणून वागवायला कदाचित ती तयार झाली असती. मात्र माझ्या कपड्यांना आणि फॅशन ॲक्सेसरीजना*

*तिचा अजिबात विरोध नसायचा. उलट तिला हे सगळं आवडायचं. कधी कधी ती मला त्यातली निवड करायला मदतसुद्धा करत असे. तिची आवड बरीचशी भडक रंगाकडे आणि चित्रविचित्रपणाकडे झुकायची. तिच्या खुशीसाठी मी (कधी कधी) तसं काही वापरायचो. शिरीन आंटीनं मला एकदा गुपचूप सांगितलं की छायासाठी तिचा दागिना मीच होतो. मला सजवून सोबत मिरवायला तिला आवडायचं, मला हे ऐकून तितकंसं बरे वाटले नाही हे कबूल. ती नवरा, मी बायको?*

*आज आम्ही फिरता फिरता बरेच लांब, म्हणजे पार नूरबागेपर्यंत पोहोचलो. पदपथावर वेगवेगळा माल घेऊन विक्रेत्यांची गर्दी झाली होती. त्यांच्यापाशी कुटुंबकबिल्यासहीत खरेदी करणाऱ्या माणसांची दाटी होती. इतक्या सगळ्या माणसांमध्ये वावरताना, छायाला जाम बुजल्यासारखं व्हायचं. ती फार अस्वस्थ असायची. माझ्या हातात दिलेल्या तिच्या हाताला सुटणाऱ्या कंपावरून मला ते कळायचं. इतकी सगळी माणसं जगात असतील, याची कल्पना तिनं कधी बोमाबेईंच्या बेटावर केलेली नसेल. बोमाबेईसाठी रोजच्या ओळखीतला माणूस हा मित्र. त्यापेक्षा वेगळा अनोळखी कोणी*

*म्हणजे शत्रू. इतकी मित्र आणि शत्रूची सोप्पी व्याख्या होती. त्या संस्कारातून आलेल्या छायासाठी, इतक्या सगळ्या अनोळखी लोकांच्या घोळक्यात वावरणं, म्हणजे शत्रूच्या घेऱ्यात सापडल्यासारखी भावना जागत असे.*

*त्यामुळे तिच्या हाताला कंप सुटलेला असायचा. मी बरोबर नसतो, तर ही सारी माणसं छायाच्या विरोधात वागली असती ते देखील निःसंशय. त्यांच्या नजरांमध्ये असलेला तो सूक्ष्म विरोध मला जाणवायचा. तिच्या*

*दिसण्याबाबत, तिच्या वावरण्याबाबत, तिच्या असण्याबाबत असलेली नाराजी. ती त्यांच्यापेक्षा वेगळी होती याबाबतची. ही माणसं बोमाबेईपेक्षा वेगळी नव्हती. त्यांचे अंतरंग तसेच होते.*

*छायाला एका फळवाल्याकडली पिकलेली नारिंगी जर्द पपई हवी झाली. आम्ही लोकांचे धक्के खात, गर्दीतून वाट काढत, त्याच्यापर्यंत पोहोचलो. मी त्याला भाव विचारून पैसे देऊ केले. त्याने पपई माझ्या हातात ठेवली. छायानं ही देवाणघेवाण शांतपणे बघितली. झाडावर लगडलेली नसली, तर फळं ही ज्याच्या त्याच्या मालकीची असतात. इतपत मालकीहक्काचा स्वीकार करायला, तिनं हल्ली सुरूवात केली होती. मात्र कोणाच्या कुंड्यांमध्ये शोभणारे गुलाब खुडण्यापासून तिला रोखणं आणि समजावणं अजूनही कठीण जातं. ते तिला केसात माळण्यासाठी नव्हे, पाकळ्या खाण्यासाठी हवे असतात. माझ्या हातात पपई आल्यावर, छायानं लगेच झडप मारून ती ताब्यात घेतली. तश्शी सभोवताली खळबळ उडाल्याचं मला जाणवलं.*

*माणसं सरसावू लागली. त्यांचे व्यवहार बंद पडू लागले. मी टवकारून अंदाज घेऊ लागलो. लोकांची खळबळ आमच्यामुळे उडाली नव्हती. लोक थांबून, थरकापून ज्या दिशेला पाहत होते, आमच्या नजरा वळल्या. पाच-सहा दाढीमिशावाले उंच-आडदांड पुरूष, पठाणी कोटवाले, उग्र चेहऱ्याचे गुंड, हातांमध्ये नंग्या तलवारी आणि सुरे परजत, बाजारात मोकाट फिरत होते. ते जातील त्या बाजूला तिथले फिरस्ते दुकानदार वा विक्रेते, आपापला गल्ला खाली करून देत होते. तरी शिवीगाळ करीत, दमदाटी करत, हातापाशी मिळेल त्याला मारहाण करत, ते पुढे पुढे सरकत होते.*

*त्यांच्या वाटेतून बाजूला होण्यासाठी, लोकांची धावपळ चालू होती. थोडे लांबवरचे लोक आपापला कुटुंबकबिला वळवून, मागच्या मागे, बाजूच्या आडगल्ल्यांमध्ये पळून जात होते. त्याठिकाणी चेंगराचेंगरीत लहानमुलांच्या किंचाळ्यांनी रडण्यांनी वातावरणात आकांत माजला होता. हप्तेवसुली करणारे गुंड रस्त्यावर मोकाट फिरत होते, आणि एरव्ही तिथं सिग्नलपाशी उभे असणारे पोलीस, कुठेतरी दडी मारून बसले होते.*

*“भाईजान, जल्दीसे पतली गली खिसक जाना, उन्हा देखेंगे तो बहुत बुरा होंगा.” फळवाल्यानं मला सल्ला दिला. 'उन्हा' म्हणजे त्याला 'छाया' म्हणायचं होतं. रस्त्यानं नागवी फिरणाऱ्या बाईचं, ते गुंड काय करतील? याची काळजी आणि भीती त्याच्या डोळ्यात दाटलेली मला दिसली. “सत्तारभायके लोगा. भागो भाईजान.” पुन्हा कळवळ्याने त्याने मला विनंती केली.*

*त्या गुंडांच्या हातात तलवारी नसत्या, तर मला भीती वाटली नसती. पण त्या तलवारी वागवायची त्यांची सफाई आणि कोणावर तरी वार करायची लागलेली घाई, माझ्या काळजाचं पाणी पाणी करून गेली. मी छायाची प्रतिक्रिया पाहिली. ज्या निर्ढावलेपणानं ती दात वासून पुढे येणाऱ्या सुसरीकडे पाहत असेल, त्याच आव्हानात्मक नजरेनं ती त्या गुंडांकडे बघत होती. मी तिचा हात खेचून पाहिला. ती इथून हलणार नव्हती. हाताचा कंप बंद झाला होता. म्हणजे शत्रू की मित्र? हा तिचा गोंधळ बंद झाला होता. ती तयार होती.*

*त्या गुंडांना इतर सगळ्या नजरा त्यांच्यापासून चोरल्या जात असताना, ही रोखलेली धट नजर लवकरच बोचली. एखाद्या लोहचुंबकाकडे लोखंड खेचलं जावं, तश्या त्यांच्या तलवारी आणि हत्यारं आमच्या दिशेनं*

खेचली गेली. त्या गुंडांना तसं ललकारत आवेशात आमच्यावर येताना पाहून, माझ्या पांढरपेशा काळजाचं पाणी पाणी झालं. छायाचा हात सोडून पळून जावं, अशी मनानं क्षणभर कच खाल्ली. नाही जमलं. पुढे आयुष्यभर स्वतःचाच स्वतः, हे दुटप्पी मन किती धिक्कार करेल, याचा अनुभव छायाला मागे घराबाहेर केली, तेव्हा घेतला होता. त्यापेक्षा मरण पत्करलं.

एकदा मनाचा हा निर्धार पक्का झाल्यावर, मी छायाप्रमाणे त्या गुंडांवर अढळ नजर रोखू शकलो. फळवाल्यानं आळीपाळीने आमच्याकडे पाहिलं. त्या गुंडांकडे पाहिलं आणि जागेवरून ते पोहोचायच्या आत पळ काढला.

छायान एकवार माझ्यावर नजर टाकली. झटकन् फळांची समोर होती

ती टोपली, फळ ओतून रिकामी करून माझ्याकडे दिली. मला कळलं, ही तिनं मला रक्षणासाठी ढाल दिली होती. तलवारीचे वार झेलायला. मी जरा दुखावलो. आंग्रेंचा वंशज तलवारी ऐवजी ढालीनं लढणार? अर्थात छायाकडं तलवार नव्हती. त्या टोणग्यांकडे होती. मी ती हिसकावून घ्यायचं ठरवलं. एकदा मरू वा मारूचा निर्धार केल्यावर, सगळं किती सोप्पं वाटायला लागलेलं होतं. हृदयाची गती वाढली होती आणि नसानसांतून रक्त उसळायला लागलं होतं. वीरमद म्हणतात तो हाच.

जे दोघे सगळ्यात पुढे आले, त्या दोघांवर छायाचा आसूड सपसप चालला. त्यांची ही अपेक्षा नव्हती. एकाचा पाय चाबूक गुंडाळून खेचून, तिनं त्याला खाली पाडला. दुसऱ्याचा पुढे आलेला तलवारीचा वार शिताफीनं चुकवला. तो आपल्याच वेगात तोल जावून पुढे पडला. लगोलग टोपली

*टाकून मी त्याच्या पाठीवर झेपावलो. त्याच्या हातातली तलवार खाली खणखणत सुटली, ती उचलून घेतली. पण ती लगोलग त्याच्या शरीरात खुपसायचा धीर मला झाला नाही.*

*ही मोठी चूक झाली. तो पलटला. रस्त्यावरच्या मारामाऱ्यांतील सफाईनं त्यानं मला शह देत, माझ्या नाकावर मुक्का मारून दिला. क्षणभर मी कासावीस झालो. डोळ्यापुढे अंधारी आली. त्यानं माझ्या हातातून तलवार हिसकावली. मात्र इतक्या जवळून त्याला ती माझ्या दंडात घुसवणं जेमतेम जमलं.*

*माझ्या डोक्यात संतापाचा स्फोट झाला. या राक्षसांशी कसलीच दयामाया न दाखवता लढायला हवं. ते मला कोणताही अवसर देणार नव्हते. त्या क्षणी जे सुचलं त्याप्रमाणे, धाडकन मी माझं डोकं त्याच्या डोक्यावर मारून दिलं. आता त्याची भिरभिरण्याची पाळी होती. लगोलग मी तलवारीच्या मुठीवर कब्जा मिळवला. सगळ्या जखमा, वेदनांचा विसर पडला होता. तलवार हातात येताच, ती सरळ त्याच्या गळ्यावर फिरवली. त्याच्या नजरेत प्रचंड आश्चर्य आणि भीती उसळलेली मला दिसली. त्याकडे दुर्लक्ष करून मी उठलो.*

*आजूबाजूला नजर टाकली. एकजण सुरा परजत माझ्यापर्यंत पोहोचला होता. त्याच्या सुरेवाल्या हातावर, माझ्या पुढ्यात मी तलवार उभी आडवी चालवली. तलवार सुऱ्यावर खणखणली. माझ्या हाताला झिणझिण्या आल्या. तलवार हातातून निसटली. त्याचाही सुरा निसटला. मी त्याची गचांडी धरत पुन्हा डोक्यावर डोकं आपटायचा डावपेच वापरला. त्याच्यासह त्याला खाली घालत कोसळलो. त्याचं डोकं धाडकन खाली पदपथाच्या फरशीवर आपटत तडकलं. तो गार पडला. आता रणमद माझ्या*

*नसानसांत भरला होता. मला अजून कोणाला लोळवावसं, गार करावसं वाटू लागलं.*

*आजूबाजूला काय चालू आहे? मी पाहू लागलो. छायानं दोघांना ठारकेलं होतं. उरलेले दोघे रक्तात भिजले होते. पळून जावू लागले. छाया ओरडली, "धरा त्याला, रोज रोज तुमची लढाई लढायला मी असणार नाही." आणि काय आश्चर्य? कोणीतरी गर्दीतून मध्येच तंगडी मारून दोघांनाही पाडलं. "मारा." पुन्हा छाया ओरडली. त्या दोघांना पालथे*

*जमिनीवर पाडून, आजूबाजूची माणसं त्यांच्यावर तुटून पडली. "तुम्ही भिता म्हणून ते तुम्हाला भिववू शकतात. तुमची भीती हीच त्यांची ताकद. रक्त सांडायला भिऊ नका. सांडलेलं रक्त हीच आपली ताकद आहे."*

*मला पुरेपूर प्रत्यक्ष्यानुभवानं छायाचं म्हणणं पटलं होतं. चार-पाच बायका वाहणारं रक्त बघून बेशुद्ध पडल्या. पण मगासचा फळवाला धावत माझ्यापाशी आला. आधी रूमालानं आणि जेव्हा तो पुरेना, आपला शर्ट टराटरा फाडून, त्यानं माझ्या हातावर, जखमांवर बांधला. रक्तपात थांबवायचा प्रत्यन केला. हातात विलक्षण ठणके मारत होते. पण मनातून स्वतःच्याच पराक्रमानं हरखून गेलो होतो. स्वतःचा जाम अभिमान वाटत होता.*

*अचानक ते गुंड आले होते, त्या दिशेने पुन्हा किंचाळ्या-आरोळ्या ऐकायला यायला लागल्या. पंधरा-वीस जणांचं टोळकं आजूबाजूला दिसेल, त्याच्यावर वार करत धावत येत होते. सत्तारभायच्या कोणा खबऱ्यानं त्याला इथली खबर पोचवली होती. तो जातीनं आपली सगळी कुमक घेऊन येत*

*होता. छायानं जोरात चाबूक हवेत फडफडवला. “आज लढा. आज कायमचं याला संपवा. नाहीतर तो तुम्हाला कायमचं संपवेल. जे मिळेल ते घेऊन लढा. रक्त सांडा. हीच आपली ताकद.” छाया ओरडली.*

*त्यानंतर घडलं त्या गोष्टीची मी कधी कल्पनाही करू शकलो नसतो. ते फेरीवाले आणि त्यांच्या मदतीला इतरही काही माणसं, फळकूट, तागड्या, टोपल्या काय मिळेल ते घेऊन, लढायला सिद्ध झाली. धावणारा सत्तार अचानक थांबला. चोहोबाजूंनी शेकडो लढायला सिद्ध माणसांशी लढणं, या टोळक्याला शक्य नव्हतं. कच खावून एका दिशेला कमी माणस होती. तिथून कोंडी फोडून, तो टोळकं घेऊन निसटला. पळून गेला. जमलेल्या माणसांनी मोठा जयघोष केला. मी घायाळ माणसांना लगोलग उपचारासाठी नेण्याचं भान, लोकांना आणून दिलं. मग मी ठार मारलेल्या त्या दोन गुंडांकडे पाहिलं. त्यांना मारायची माझी इच्छा नव्हती. स्वतःचा वाटणारा अभिमान संपला. पण मग त्यांना मला ठार करू द्यायचं होतं का? कळेनासं झालं.*

---------------------------------------------

“थांबवा, थांबवा. आम्ही इथंच उतरतो.” सरलानं रिक्षावाल्याला सांगितलं.

“पण तुमास्नी जायचं होतं शिवाजी चौकात. नाय का?” रिक्षावाला करवादला. “इथं उतरलासशी, तरी बी ठरलेलं पुरं पुरं भाडं होईल, हां सांगून ठेवतो.”

“हे घे.” ठरलेल्या भाड्याचे पैसे हातांमध्ये फडफडवत सरला बोलली.

“आणि पुन्हा राती धा वाजता इथंच हजर हो. तू परतीच्या भाड्याचं पैसे सुद्धा घेतलं आहेस ना?”

“अवो, तीन तासांचा वेटिंग लागल मंग.” रिक्षावाल्यानं ताणलं.

“किती?” सलमानं विचारलं

“तिनशे रूपये.” रिक्षावाल्यानं मागणी केली.

“काय पण?” सारा बडबडली. “दिडशे फार तर.”

“तिनशे म्हंजे तिनशे.”

“हां दिले. बायांनो उतरा आता.” सरलानं मागणी मान्य करून रिक्षा सोडली. बाकी दोघी दोन मोठाली बोचकी घेऊन उतरल्या. रिक्षावाला तिथंच थांबला.

“आता जा की!” सारा कटकटली. “दुसरी भाडी मिळतील.”

“आता कुठची भाडी या गावात? मी इथंच थांबतो. जाऊनशी या की कुठ जाताशी ती.” रिक्षावाल्याचा ठाम नकार.

“चला.” सरला वैतागून दोघी मैत्रिणींना घेऊन निघाली. तिघीजणींनी वेषांतर केलं होतं. साडी नेसलेल्या जाडजूड बायकांचं.

“आता कुठं?” थोडं लांब गेल्यावर सलमा खुसपुसली.

"वेशीवरती पुढे जाखोबाची छोटी घुमटी आहे. आता तिथे कोणी नसतं. आपल्याला तयारी करता येईल." सरलानं उत्तर दिलं. हळूहळू अंगावरच्या कपड्यांचा बोजा आणि बोचकी सांभाळत, तिघी तिथं पोहोचल्या. वाटेत चालणारं दुसरं कोणी त्यांना भेटलं नाही, बाईकवरून जाणारे बाप्ये आश्चर्यानं त्यांच्याकडे बघत पुढे जात. पण तीन वयस्कर बायकांची फारशी दखल घ्यावीशी कोणाला वाटलं नाही.

"साडेसहा वाजलेत. अजून दोन तास आहेत आपल्याला."

"यार तेरा गाव तो एकदम सुनसान आहे." सलमानं सरलाला विचारलं.

"साडेआठ बजे चौकामध्ये कोई तो होगा भी ना?"

"हो असतात. दहा वाजेपर्यंत लोकं वावरतात तिथं. आता छायाचं भूत रात्रीचंच दिसणार. तरी साडे आठ म्हणजे जरा लवकरच वाटतंय." सरलानं खुलासा केला.

"माय डियर, आणि ते तुझे मवाली फ्रेंड टायमावर तिथं येणार ना?" सारानं शंका काढली.

"ते मेले तिथंच मेलेले असतात. चौकातच त्यांचा देशी गुत्ता आहे. संध्याकाळची उशिराची वेळ म्हणजे त्यांच्या गिऱ्हाईकांची गर्दीची वेळ." सरलानं तिला सावध करायचा प्रयत्न केला.

“आय स्वेअर. कधी एकदा त्या रास्कलांची चामडी सोलतेय असं झालंय.”.

“थंडे दिमाग से मेरी रानी, थंडे दिमागसे.” म्हणत सलमानं आपली गठडी सोडवायला सुरूवात केली. “ये ले तिखट, तेरे अंडे.” सरलासुद्धा तयारीला लागली. आपलं बोचकं सोडलं. त्यात एक टोपली होती. सलमाकडून उकडलेली अंडी घेऊन ती तिनं टोपलीत रचायला सुरूवात केली. “ते लोक चकण्याला अंडी घेणं पसंत करतील. माझ्याकडली पळवायला बघतील.”

“येस, तू बोंबाबोंब कर. पब्लिककडे हेल्प माग. गरीब अंडीवालीला वाचवा. मग मी फटकेवाली बनून एन्ट्री घेईन. त्या मवाल्यांना चाबकाची पनिशमेंट करेन.”

“फिर तू बोलेगी, लोगों अपनी लढाई आपण लढा. मी आम लोगमधली एक बाई बनके, पुढे येणार. मवालीपर तुटके पडणार. माझी देखादेखी बाकीचा पब्लिकभी शामील होणार.”

“लोक त्या मवाल्यांना फटकावतायत, तितक्यात आपण तिथून पळ काढायचा. इथं परत येऊन कपडे बदलून, रिक्षा धरायची आणि सुटायचं.”

“किसीको कानोकान पत्ता नाही लागणार.”

“पब्लिक धुलाई झाली की ते ब्लडीफूल, विल नेवर डू क्राईम अगेन. हिंमतच होणार नाय तेंची, पुन्हा कोणाला दादागिरी करायची.”

“हा बायांनो मगर त्याला अजून वक्त आहे. अश्या उतावळ्या होऊ नका. त्या घुलाचा गल्ला आपण केबिनमधून आरामसे सफाया किया. मगर हमेशा नसीब साथ देईल ऐसा नही.”

“अगं पोरी, हिंमत मर्दा तो मदद दे खुदा.”

“आपण मर्द नाही आहोत बेबी, आपण लेडी आहोत.”

“ओ कम ऑन गोड? तू आता माईन्डमध्ये फालतू टेन्शन घेऊ नको. होप फॉर बेस्ट अॅन्ड प्रिपेर फॉर वर्स्ट.”

“गोड, देवाचं नाव घे. अल्लाचं नाव घे. आणि बस्! आता पाऊल पुढे टाकलंय. ते परत घेण्यासाठी नाही. इतका विचार करू नको. जे होईल ते होईल.”

हळूहळू आठ वाजायचे वाजले. सारा ‘फटकेवाली'चा तंग पोषाख करून सजली. सरला अंडी विकणाऱ्या म्हातारीचं सोंग घेऊन पुढे निघाली. साराला वर बुरख्यानं झाकून, सलमासुद्धा म्हातारीची भूमिका निभावत, सबुरीनं तिच्या मागे मागे निघाली. गावातला मुख्य चौक भरात आला होता. कामावरून सुटलेले बहुतेक सगळे बाप्ये, दिवसभराचा ताणतणाव आणि खिसा हलका करायला इथं येत. लाल रंगाच्या दिव्यानं, देशी गुत्त्याचं पडदा ओढलेलं दार उजळलं होतं. आतमध्ये अंधार वाटत होता. गुत्त्यात शिरताना गिऱ्हाईकांना कोणी आपल्याला बघेल का? ओळखेल का? याचं भय असायचं. तेच बाहेर पडताना मात्र ‘रे कोण मला ओळखत नाय? तेच बघतो.' असा आवेश असायचा.

गुत्त्याच्या दारापाशीच चकण्याची सोय करायला आणि बेवड्यांच्या भुका भागवायला, फेरिवाल्यांच्या चार-पाच गाड्या लागलेल्या होत्या. कोणाकडे खारीमुरी, शेंगदाणे, वाटाण्याची पाकीट होती. कोणाकडे सुकी भेळ. एक वडापाव-भजीची गाडी होती. आम्लेट पाववाली देखील गाडी होती. त्यांच्यातच सरला जावून उभी राहिली.

"पंधरा रूपये दोन अंडी." म्हणून पुन्हा पुन्हा ओरडायला लागली.

"ऐ कोन तू, कुठनशी आली गं बया?" म्हणून अंडी-पाववाल्यानं तिला हरकत घेतली. गयावया करून केवळ आजचा दिवस, आता माल आणलाच आहे, तर तेवढा विकून जाऊ दे. पुन्हा तिथं येणार नाही, वगैरे मखलाशी सरलानं केली. शेजारच्या बंडाळा गावातली, स्थानिक बाई आहोत, समजवायचा प्रयत्न केला. ही स्थानिक बोली तिलाच बोलता येणं शक्य होतं. म्हणून फटकेवालीची भूमिका न करता, तिला विक्रेती व्हावं लागलं होतं.

हो नाय करता करता आम्लेट-पाववाला राजी होणार, तोच तिच्याकडे चार-पाच गिऱ्हाईकांनी मागणी नोंदवली. तसा गाडीवाल्याचा तळतळाट झाला. त्याच्या गाडीवरती गिऱ्हाईक उरलं नाही. गाडीवाल्यानं सरलाला इतकं स्वस्तात विकू नको, म्हणून दम भरला. गिऱ्हाईकांनी तिला त्याच्याकडे दुर्लक्ष करायला फर्मावलं. हे सरलाच्या आयते पथ्थ्यावर पडलं. कारण तिरीमिरीने आम्लेट-पाववाला गुत्त्यात धावला. गुंडाफौज या नवख्या विक्रेतीला सरळ करायला घेऊन आला.

“अरे हाड! बहिणझवाडी. शिळी अंडी इकतशी. वास मारतूया छॅ थू! थू!” तोंडात टाकलेली अंड्याची फोड, एका गिऱ्हाईकानं थुंकून टाकली. तसं निमित्त साधत सरलाच्या भावाच्या गाडीवरचा गल्ला उडवणारा, तोच आडदांड गुंड रांगडदादा पुढे सरसावला. तिच्या हातातली टोपली ओढून घेऊन, त्यानं सरळ ती मातीत रस्त्यातच उपडी घातली.

तसा सरलानं मोठ्यानं गळा काढला. “बघा हो बघा, माझा गरीबाचा माल मातीत घातला. माझं होतं नव्हतं सगळं बरबाद केलं. आता हे नुकसान मी कुठून भरून काढणार! जगायला पैसे कुठून आणणार? सांगा वो, कोणीतरी सांगा याला. समजावा बाबा याला. माझं नुकसान भरून द्यायला सांगा की वो?”

चौकात एक-दोनच रस्त्यावरच्या भणभणत्या ट्युबलाईटची बत्ती होती. दिव्याकडे पाठ असल्यानं मवाल्यांचे चेहऱ्यावरचे भाव कळत नव्हते. पण शिव्यांची लाखोली वाहत ते अंगावर चालून आले, तसं ते काय करणार होते, ते उघडच होतं. सरलाला जमिनीवर ढकलून देऊन, लाथा हाणायला त्यांनी सुरूवात केली. “वाचवा, वाचवा” म्हणून सरलानं आकांत मांडला. “कोणी मदत करा रे. हिंमत करा रे. यांना थांबवा रे.” कदाचित हे नेहमीचं दृश्य असेल, कोणी मान वळवून नजरसुद्धा टाकायला तयार नव्हतं.

अचानक फटकेवाली रस्त्याच्या बाजूच्या अंधारातून पुढे आली. तिचा आसूड फाडफाड सरलाला लाथा घालणाऱ्या गुंडांच्या पाठीवर सपकारे ओढू

लागला. सुरूवातीला काय होतंय? तेच त्यांना समजेना. सहा जणांमधले दोघं पायांवर तडाखे बसून खाली कोसळले.

पण बाकींच्या मधल्या एकानं सावध होत, शिताफीनं चाबूक मधल्यामध्ये पकडला. “हरामजादी कुत्री. तू आता जित्तीशी राहनार नाय.” रागाने पिसाळत ओरडला.

“मरणाची भीती कोणाला? मी जित्ती नाय.”

“मग कोणशी गं तू?”

“मी फटकेवाली. तुझ्यासारख्या माजलेल्या रेड्यांना वठणीवर आणायचं माझं काम. तहान लागलीय मला. रक्ताची तहान.” पण तिनं झटका देऊन चाबूक ओढून घ्यायचा प्रयत्न केला, तर तीच त्याच्या चाबकावरच्या घट्ट पकडीमुळे त्याच्याकडे ओढली गेली. तरी ती डगमगली नाही. बोटांवर चढवलेल्या वाघनखांनी तिनं त्याला बोचकारलं. आणि आपली सुटका करून घेतली.

सरलानं तिच्याकडे झालेल्या दुर्लक्षाचा फायदा घेत, कनवटीत लपवलेली तिखटाची पूड काढली आणि जवळ दोघंजण उभे होते, त्यांच्या डोळयांत मारून दिली. ओरडली, “लोकहो कितकं दिस ही अश्शी दादागिरी सहन करायाची? आपला पोटापाण्याचा पैका असा दिसाढवळया या टोणग्यांना लुटूनशी द्यायाला? आपली कच्ची-बच्ची घरची उपाशी मारायची? आनी या पाप्यांना चैनीपायी घालायचा? नाय. नाय. नाय. आजच आजच येळ हाय ही. लढा, ठोका,

ह्याणा, यांना. कायमचशी माज उतरवा.” बोलता बोलता सरलानं टोपलीत ठेवलेला धोटा उचलून, तिखटपूड डोळयांत गेलेल्यांना बडवायला सुरूवात केली.

“आरं, मी बाई लढू शकतीया. नी तुम्ही मर्द मराठे न्हाई?” सलमानं पुढे होत, खाली पडलेल्या गुंडाची सायकलची साखळी उचलत, त्यातल्या एका गुंडावर ओढली. तिचा पुढचा वार मात्र त्याने मध्येच रोखला. त्या तिघीजणी आणि ते सहाजणंच आपापसात लढू लागले. सारानं आसूड सलमाला धरणाऱ्या गुंडावर ओढला. तिला मोकळी केली. तशी सलमाने वडापावच्या गाडीकडे त्या गुंडाला हूल देत देत नेलं. गाडीपाशी पोहोचताच तळणारी कढई, पदरानं धरून, ते गरम उकळतं तेल एकदम त्याच्यावर मारून दिलं. तो जिवानिशी ओरडला. तसं वडापाववाल्यानं त्या गुंडावर बादलीतलं पाणी रिकामी केलं आणि सलमाला हालचालींपासून रोखायला, घट्ट मिठी मारत धरून ठेवलं.

बाकी जी माणसं तिथं उभी होती. ती छान तमाशा बघत असल्यासारखी, काहीच न करता, बघ्यांची भूमिका निभावत उभीच राहिली. सारानं ओळखलं. आता ही त्यांची लढाई, त्यांची त्यांनाच लढणं भाग होतं. नखांनी बोचकारलेला गुंड खटक्याचा चाकू फिरवत तिच्या अंगावर चाल करून आला. त्याचा वार चुकवण्यात तिला यश आलं. तो तोल जावून पडला. त्याचा चाकू निसटला. तिनं तो उचलला. विचार करायला वेळ नव्हता. त्या सराईत गुंडांना तीन पोरींचा सफाया करायला फार वेळ लागला नसता. पब्लिक चक्क गुंडांच्या बाजूनं होतं. तोच चाकू तिनं जोर लावत त्याच्या मानेत खुपसला. तो तडफडला.

पुरता गार होईपर्यंत तिनं धरून ठेवला, मग उपसला आणि सगळ्यांसमोर मिरवत जिभेनं त्याच्यावरचं रक्त चाटलं.

“तहान लागलीय मला रक्ताची तहान.” ही तिची खेळी चांगलीच यशस्वी झाली. म्होरक्या ठार झाल्यावर बाकी गुंडांचा धीर गळाठला. ते पळाले. तेच नव्हे, तर तिथे हजर असणारे सगळे बेवडे, विक्रेते ढुंगणाला पाय लावून पळाले. सगळे गेल्याची खात्री झाल्यावर सारा मग भडभडून ओकली.

## रवीची नोंदवही : १० नोव्हेंबर १९९५

---------------------------------------

*गावदेवी मंदिराच्या पुढच्या सिग्नलपाशी मी गाडी वळवली. माझ्या शेजारी राहुल धुरंधर बसला होता. आजकाल तो चांदनी जैनच्या मागे कमी आणि आमच्या मागे-बरोबर जास्त असतो. शहरात काय घडतंय? याच्या अगदी आतल्या, कधी वर्तमानपत्रात छापल्या जात नाहीत, अशा खासम खास खबरा, त्यानं तोंड उघडलं की आम्हाला आयत्या मिळतात. म्हणून मी त्याला सहन करत असतो.*

*जश्या की सत्तारभाईची दोन माणसं मी आणि छायानं ठार मारली होती. त्यांच्या कापाकापीत दोन सामान्य निरपराध माणसं हकनाक मारली गेली होती. पण या बातमीचं साधं खुट्ट सुद्धा कुठल्याच वर्तमानपत्रात छापून आलं नव्हतं. किंवा कुठल्या चॅनेलवर दाखवलं गेलं नव्हतं. ती बातमी पद्धतशीर दाबली गेली होती. का? याचा मला काही उलगडा होत नव्हता. त्याचा खुलासा राहुलने केला.*

*पोलिसात ना आम्ही, ना सत्तारभाईचे लोक तक्रार दाखल करायला गेले होते. सामान्य माणसांची तर हिंमतच नव्हती. आम्ही सत्तारच्या हप्तेखोरीवर टाच आणली नव्हती. ते काम सामान्य लोकांनीच करायचं होतं. ना आम्ही मुद्दाम सत्तारच्या अड्ड्यावर जाऊन हल्ला करणार होतो, ना त्याच्या मागे लागलो होतो. त्यामुळे ही एक मामुली लढाई समजून, कानामागे टाकणं, त्याला व्यावहारीकदृष्ट्या परवडणारं होतं. उलट सर्वसामान्यांतील नवराबायकोने सत्तारच्या माणसांचा पाडाव केला,*

*ही धूळ उठणे, म्हणजे त्याच्या दहशतीच्या साम्राज्याला तडा जाणं होतं. नवे-नवे बंडखोर चेहरे पुढे यायला धजावले असते. ते त्याला नको होते.*

*कोणाची तक्रार नाही, तर पोलिसांना आपल्या डोक्यावर या तपासाची डोकेदुखी नको होती. तो इलाखा इन्स्पेक्टर कपूरच्या हद्दीबाहेर होता. त्याला उड्या मारू द्यायला वरिष्ठ तयार नव्हते. अर्थात सत्तारच्या माणसांकडून घराकडे धमक्या पोच होत होत्या. राहुलचं म्हणणं होतं, त्यांना खरोखर तुमचा गेम करायचा असता, तर ते महिनाभर नुस्ते धमक्या पाठवत राहिले नस्ते. त्यांनी तो कधीच न सांगता करूनही टाकला असता. मनात डूख धरून तर ते जरूर असणार होते. पण माझ्याशी आणि छायाशी आमनेसामने लढून, जीव कुर्बान करायची, त्यांची तयारी नव्हती. ते कधीतरी गनिमी काव्याने आम्हाला बेसावध गाठणार होते.*

*राहुलशिवाय दुसऱ्या कोणी मला इतकं अभ्यासपूर्ण विश्लेषण दिलं असतं? आणि पुढे होणाऱ्या हल्ल्याची आगावू खबरसुद्धा देवू शकलं असतं. तेवढ्यासाठी त्याच्या फुशारक्या आणि शायनिंगबाजी सहन करायला हरकत नव्हती.*

*आताही तंग टि-शर्टमध्ये छाती फुगवून आणि दंडाच्या बेडक्या फुलवून तो बसला होता. मागच्या सीटवर बसलेल्या छायाला प्रभावित करण्यासाठी, त्याची ही सगळी धडपड असायची. या बाबतीत मी अनभिज्ञ नव्हतो. मला मनोमन त्याचं हसू यायचं. छायाच्या माझ्यावरच्या प्रेमाबाबत मला कधी तसूभर देखील शंका येत नाही. माझ्या तिच्यावरच्या प्रेमाबाबत? मी याचा विचार करायला स्वतःशीच घाबरतो.*

*पण सध्या आयुष्य अगदी मजेत, आलेल्या प्रत्येक क्षणाचा मनापासून आनंद घेत, रसरसून भोगतोय. प्राचार्य श्रीनिवास मला म्हणायचे की, आपल्यापेक्षा आदीमानव जास्त उत्कटतेने जगत होते. गुहेबाहेर रानात बाहेर पडलं की हरक्षणी डोक्यावर मृत्यूची टांगती तलवार घेऊन. जंगलात कुठून कोणता जीवघेणा हल्ला होईल? याचा भरवसा नसतो. कायम जगण्याची अशाश्वती उरी बाळगून. आणि म्हणूनच मिळणारा प्रत्येक क्षण भरभरून.*

*आमची आयुष्ये देखील आता अशीच, दबा धरलेल्या मारेकऱ्यांच्या सावलीत सुरू होती. त्याचा एक वेगळा कैफ असतो. कोणी या धसक्याने पार चुरडून जातात. कोणी जास्तच तरारतात. मला वाटतं माणसांनी झाडांची जंगलं बाद करून त्यांच्या जागी शहरांची क्रॉँक्रिटची गच्च जंगलं निर्माण केली. त्यातून सगळे प्राणी जवळ जवळ बाद केले. पण त्या शिकारी प्राण्यांमधला हिंस्त्रपणा-क्रूरता आता माणसांमध्ये उतरला आहे. वरवरच्या भौतिक तपशीलांमध्ये फरक झालाय, पण आतमध्ये आपण अजूनदेखील, तेच आदीमानवांच जीणं जगतोयत. माणसांचेच आता शिकारी आणि शिकार असे कळप बनलेत. सत्तारभाईंची माणसं म्हणजे लांडग्यांची टोळी आहे. हरणांसारख्या निरपराध लोकांना, त्यांच्या बछड्यांना मारते आहे. इथं इन्स्पेक्टर कपूर सारखे क्रूर बिबटे आहेत. चांदणी जैनसारखे विषारी साप आहेत. राहुल धुरंधरसारखे धूर्त संधीच्या शोधातले कोल्हे आहेत. छायासारखी खरीखुरी माणसं, दुसऱ्या निरपराधांना वाचवायला धावणारी, खरीखुरी माणूसकी असणारी विरळच आहेत. मी यातला कोणता प्राणी होतो?*

*“रवीचाचा, मारी सहेली कय दू की तमे एकदम बब्बर शेर आहे.” छायासोबत बसलेल्या झेबूची चिवचिव ऐकू आली.*

*“हां रवी अंकल, माजा दोस्त हाय नी मेलरॉय, तो होता नी तिथं नूर बागमदी. तो म्हणाला तमे एकलाने चार-चार मवालीओंने उडावी डालो. कचूम्बर करी डालयो.” मेहरूनं भावाची पुस्ती जोडली. “अमारा स्कूलमां रोज तमारी दोनोंनी बातच चाले छे.'*

*“बघितलं राहुल, खरी बातमी दाबली की काय होतं? त्याच्या किती सगळ्या, अतिरंजित तिखट मीठ मसाला लावलेल्या बातम्या तयार होतात.” मी वरवर नाराजीनं आणि मनातून खुशालून बोललो.*

*“हां. मारी सहेली तर बोलते की बिमाबा आंटीच्या बदनमध्ये इलेक्ट्रिसिटी हाय. कोन पण ऐने हात लगाव्यो, तो तेला शॉक लागते.” बोलता बोलता छायाच्या अंगाशी मस्ती करत, झेबू खिदळला. छाया दोघांबरोबर मस्ती करण्यात दंग होती. “मग रवीचाचा, तो तिच्यासंगे किस कसा करू शकते?”*

*'करून दाखवू? सोडू हात स्टीअरींगवरचे?” मी धमकी दिली. प्रत्यक्षात मला स्टीअरींग घट्ट धरत, करकचून ब्रेक मारावा लागला. एक मोठा जमाव हाय हायच्या घोषणा देत समोरून आडवा जायला लागला. “कोण हे?” मी राहुलला विचारलं.*

*“अरे कुठल्यातरी व्यंगचित्राचा निषेध म्हणून हा मोर्चा काढलाय.” राहुल नजर बारीक करून त्यांना निरखू लागला. “रवी गाडी पाठी काढ. इथून सटकूया. काय तरी मोठा झोल आहे. हे लोक राडा करायच्या तयारीनं चाललेत. दंगा-फसाद करणार. बघ त्यांच्याकडं हत्यारं लपवलेली*

*आहेत. माझी नजर खोटं नाही बोलणार. बॉम्बेत तीस पावसाळे काढलेत म्हटलं."*

*"ते पण जर्नालिझम मध्ये." त्याला दुजोरा देवून, मी कार कुठे बाजूला काढता येईल का बघू लागलो. कुठे काही संधी नव्हती. मागे एका मागोमाग कारला कार लागून कोंडी झाली होती. भरीला मागे असणारे उगाचच हॉर्न कोकलून वैतागात भर घालत होते. पुढे तर जवळ जवळ कारच्या बॉनेटला घसटून मोर्चावाले सरकत होते.*

*"तो डाव्या गालावर मोठा चॉपरचा वार आहे, तो बघितलास? तो पप्पू हटेला. आणि तो पलीकडचा गोरा चिकणा केस पुरे भादरलेला आहे ना, तो मदन बिनपानीवाला. अरे इथं तर ही सगळीच फंटर जमलीत, तिथं पुढं जावून रेल्वे स्टेशनकडे राडा करतील तर बरं, ओ शीट!"*

*"केम थयू?" घाबरलेल्या झेबून विचारलं.*

*"तिथं पुढं पोलीस स्टॉपब्लॉक्स लावून उभे आहेत. ते अडवणार. हा राडा इथंच फुटणार."*

*"राहुल, अरे राहुल?" मी ओरडतोय, तोपर्यंत कारची काच खाली करून, त्यातून आपल्या मजबूत शरीराचं ओझं बाहेर ढकलून राहुल सटकला. कारबाहेर पडल्यावर कसाबसा इथून तिथून मार्ग काढत रस्त्याकडेला पळाला.*

*राहुलनं अचूक टायमिंग साधलं. तो गेला आणि दुसऱ्या रस्त्याकडेनं काचा खळखळ फुटण्याचे आवाज ऐकायला यायला सुरूवात झाली. मोर्चावाले आता आपलं खरे रूप उघड करून दंगेखोर बनले. दुकानांवर काहीजण लाठ्या-काठ्या घेऊन धावले. काहीजणांनी रस्त्यात*

*उभ्या गाड्यांच्या काचा फोडायला सुरूवात केली. गाड्यांमधले लोक भीतीने मरणासन्न आरडाओरडा करायला लागले. दंगेखोर आमच्याच दिशेने येताहेत म्हटल्यावर, झेबूने भीतीनं भोकाड पसरलं. गाड्यांना गाड्या अशा खेटल्या होत्या, की दारं उघडून मुलांना बाहेर काढणंसुद्धा कठीण होत.*

*एकाचवेळी आमच्या चहूबाजूंना अनेक घटना घडत होत्या. डोकं बिथरून पार चालेनासं होईल अशा. दुकानांची शटर्स खाली ओढली जात होती. तश्शी ती अर्ध्यापर्यंत आली असताना, दंगेखोर तिथं घुसून मारहाण, लुटालुट करत होते. आमच्या उजवीकडच्या गाडीत दोन तरूण मुली होत्या. काचा फोडून आतमध्ये हात घालून त्यांच्या अंगाखांद्यावरचे कपडे फाडले जात होते. डावीकडच्या गाडीतल्या म्हातारा म्हातारीला भेडसावलं जात होतं. त्यांच्या गाडीच्या पेट्रोलची टाकी, त्यांची गाडीची चावी हिसकावून दोघा तरूणांनी उघडली. ती फोडून त्यातलंच पेट्रोल ते त्या गाडीवर आणि*

*आजूबाजूच्या गाड्यांवर उडवू लागले. एक सोडावॉटरची बाटली खळकन् माझ्या मोटारीची पुढची काच फोडून आत आली. मोटारीच्या नाही, पण त्या बाटलीच्या काचांनी मला रक्तबंबाळ केला. गाड्यांमधल्या लोकांना लुटलं जात होतं. नागवलं जात होतं. मारहाण होत होती. बायकांच्या अंगाशी झोंबाझोंबी चालू होती.*

*छाया कारच्या फुटक्या काचेतून बाहेर पडली. गाडीच्या टपावर जावून उभी राहिली. कोणीतरी तिला हेरलं. ओळखलं. "आली रे आली. फटकेवाली आली." बेंबीच्या देठापासून ओरडून दिले. डोंगरांच्या दऱ्यांतून*

प्रतिध्वनी उमटावेत, तसं मग ती आरोळी चारही बाजूंनी उठलेली मला ऐकू आली.

दंगेखोरांनी फटकेवालीचं स्वागत तिच्यावर सोडावॉटरच्या बाटल्यांचा मारा करून केलं. त्यातल्या मोजक्या तिच्यापर्यंत पोहोचल्या. त्या चुकवून त्यातलीच एक तिने वरच्यावर पकडली. अचूक जिथून आली होती, त्याच दिशेला फेकून मारत, तिनं मारणाऱ्याचं डोकं फोडलं. एकच जयघोष चोहोबाजूना झाला.

या घटनेमुळे सारी खेळी पलटली. दंगेखोर हल्ले करत जात होते. आणि बाकीचे पळापळ करण्यात दंग होते. पण दंगेखोरांना यशस्वीपणे प्रतिकार करता येतो, त्यांचा मार त्यांना परत करता येतो, याचं प्रत्यक्ष प्रमाण फटकेवालीने समोर घालून दिलं. लोकांना जणू त्यांच्या विसर पडलेल्या सामर्थ्याची जाणीव आणून दिली. लोक प्रतिकार केला, तर पुरती वाताहात होईल, या भीतीने सहन करत जात होते. आता मात्र फटकेवाली तिथं हजर असताना, एक अचाट शक्ती साथीला असताना, त्यांना भीती वाटेनाशी झाली. दंगेखोरांना प्रतिकार सुरू झाला.

अंगाशी बोचकारे काढणाऱ्या मवाल्यांचे हात, आतमध्येच गच्च पकडून ठेवत, त्या उजवीकडच्या गाडीतल्या मुलींनी त्यांचे चावे काढले. म्हाताऱ्यानं डॅशबोर्डवरचा दगडी गणपती उचलून, काडी सुलगावू पाहणाऱ्या तरूणाच्या हातावर मारून दिला. हाताला झिणझिण्या येऊन दंगेखोराच्या काड्या खाली पडून भिजल्या. म्हातारीनं अत्तराचा स्प्रे दुसऱ्याच्या डोळ्यांत मारून, त्याला आंधळं केलं. दुकानांची शटर्स परत वर गेली. आतले विक्रेते मिळेल त्या गोष्टींनी, दंगेखोर लुटारूंशी हाणामारी करू लागले. झगडू लागले.

*फटकेवाली एव्हाना आसूड फडफडवत, थेट त्या सोडा वॉटरच्या बाटल्या, ज्या दिशेने येत होत्या तिथे गेली. वाट काढत, धक्के घालत त्या केंद्रापाशी पोहोचली. जणू दंगेखोरांचा मुख्य तोफखाना तिनं ताब्यात घेतला. तिथून एका मागोमाग बाटल्या अचूक नेम साधत मारायचा आणि डोकी फोडायचा सपाटा तिनं लावला.*

*ते बघून प्रतिकार करणाऱ्या लोकांचं मनोबल अधिकाधिक उंचावत गेलं. दंगेखोरांचं मनोबल क्षीण होत गेलं. म्होरके नेमके फटकेवालीनं टिपल्यामुळे दंगेखोरांमध्ये अंदाधुंदी माजली. बेदिली होऊन त्यांनी पळापळ सुरू केली. पोलिसांना फारसे काही सायास न होता, दंगल आवरली गेली.*

*सावरलेले लोक नुकसानीचा अंदाज घेऊ लागले. पण त्या सगळ्यांच्या डोळ्यांमध्ये पराक्रम केल्याचा अभिमान आणि जिंकण्याचा आनंद साफ झळकत होता. जिथं कुठे आगी लागलेल्या, लोक विझवायला तत्पर झाले. एकमेकांच्या मदतीला धावले. खांद्याला खांदा लावून लढलेल्या अशा लढतींनी अनेकांना आयुष्यभरासाठी जिवाचे मित्र मिळून जातात. आणि खोट्या मित्रांची पारख होते. मी गाडी चालू होते का तपासत होतो, तोच राहुल धुरंधर छायाचं गाऱ्हाणं घेऊन परतला. तिनं त्याचा कॅमेरा फोटो घ्यायला गेला, तर चाबकानं उडवून फोडून टाकला होता. मी शांतपणे त्याला नुकसानीचे पैसे काढून दिले. मेहरू बडबडली, “राहुल अंकल सो बॅड. तुझ्या चेहरामा तो खरोच आली हाय. अवे तमे लडकियाँ कशाला बघणार?” राहुलचं नाक फेंदारलं.*

---

डोंगरटेकाडीचा रस्ता होता. सरला आणि सलमा दोघी दोन म्हाताऱ्यांची वेशभूषा करून रस्त्याकडेला उभ्या होत्या.

सलमाच्या कडेवर टोपली होती. तिच्यात काही ताडगोळे सोलून ठेवले होते. सरलानं पाहिलं एक रिक्षावाला हिरव्या रंगाचा रूमाल फडफडवत पुढे गेला. तशी लगबगीने सलमा जागेवरून उठली आणि तरातरा रस्त्यावरून पुढे चालायला लागली. सरला एका झाडामागे दडली.

रिक्षा जवळ येताच, रिक्षावाला तिच्या दिशेने ओरडला, “पांढऱ्या रंगाची लांबाडी कार आहे.” रिक्षावाला बनून सारा रिक्षा चालवत होती. ती निरोप घेऊन पुढे निघून गेली.

सरला सज्ज झाली. रस्त्याला तुरळक वाहने होती. ती विवक्षित पांढरी कार समोरच्या वळणावरून येताना दिसताच, जवळचे काटे सरलानं रस्त्यात फेकले. झाडामागे दडी मारली. लवकरच फट म्हणून मोठा आवाज करत, कारचा टायर फुटल्याचा आवाज आला. अपेक्षित ते साधले गेले. कार भेलकांडत झाडापासून पुढे जाऊन रोरावत थांबली.

“तिच्या मायला!” शिव्या घालत कारचा ड्रायव्हर खाली उतरला. टायरमध्ये घुसलेल्या लाकडी काट्यांकडे त्याचं लक्ष गेलं. “भेंडी, माझ्याच टायरखाली यायचं होतं काय?”

“काय रे ए मादरचोद, काय झालं?” कारमध्ये मागच्या सीटवर बसलेला दाढीवाला मालक विचारू लागला.

माथ्यावरच्या आठ्या शिताफीनं दडवत, ड्रायव्हरनं काय झालं मालकाला समजावलं. “स्टेपनी हाय. टायर बदलायला थोडा टायम लागेल.” एक प्रकारे गाडी खाली करण्याची, गाडीतून बाहेर उतरण्याची सूचना केली. तशी थेट सूचना करायची ड्रायव्हरची शामत नव्हती. ड्रायव्हरच्या शेजारच्या सीटवरचा हवालदार उतरला. तो पिस्तुलासह शस्त्रसज्ज होता.

ड्रायव्हरनं डिकी खोलून टायर बदलण्यासाठीची साधनं तिच्यातून उतरवायला सुरूवात केली. मालक नाइलाजानं खाली उतरला. त्यानं सभोवतालचा अंदाज घेतला.

“मावळती झाली हाय. काय ते आटप बिगी बिगी. खालीपिली टायमाची खोटी झाली.” मालक करवादला.

तसा ड्रायव्हरला बोलायला अवसर मिळाला. “ओ हवालदार! जरा मदतीला हात लावा की. काम लवकर आटपल.” तसं त्याला हवं होतं ते झालं. मालकानं अंगरक्षक म्हणून असलेल्या हवालदाराला हातभार लावायची सूचना केली. ती हवालदाराला मानावी लागली. रुकूटकू दोघांचं टायर बदलीचं काम सुरू झालं.

सलमा थोडं अंतर राखून हा सारा प्रकार बघत होती. काम जवळजवळ पूरं होत आलं, याची खात्री झाल्यावर, ती त्या दिशेने चालायला लागली. तिच्या

अपेक्षेप्रमाणे रस्त्याला माणूस दिसल्यावर आणि हाकेच्या टप्प्यात आल्यावर, तिला हटकण्यात आलं.

"ए, म्हातारे, कुठं चाललीस? टोपलीत काय हाय?' मालकान दरडावलं.

"सायब, बाजाराला ताडगोळं घेऊन गेली होती. काय तशी खपली नाय बघा. घेता काय चार-पाच ? तेवढाच गरीबाचा धंदा." सलमानं जाळं फेकलं.

"ए म्हातारे, सायबांना नाय ओळखलंस वाटतं. चार-पाच काय? तुझी आख्खी टोपली घेतील ते. साहेब तुमची आवडती गोष्ट आहे की?" ड्रायव्हर बडबडला.

"काय की आताशा नीट दिसत नाही. वय झालंय.' सलमानं डोळे टकटकवल्यासारखं केलं. "आता गं बाई. आमदार सायब की वो? खरंच अशी माझी चूक झाली." टोपली खाली ठेवून तिनं आपणच दोन्ही गालात लटके मारून घेतलं. टोपली खाली ठेवल्यावर, त्यातला रसरशीत माल सगळयांच्या नजरांसमोर उघडा पडला. हवालदार टोपलीत हात घालू गेला.

तसं सलमानं त्याला अडवले. "नको नको. तुम्ही हात घालू नका. हाताला काळं लागलंय की. फळ खराब होईल. सायबांना काय तसं द्यायचं?" तिनं बिनतोड कारण सांगितल्यामुळे, खट्टू चेहरा करून, हवालदारास हात मागे घ्यावा लागला. "सायब, मी देते ना तुम्हाला बरे बरे निवडून. पानीवाले हवे की मांसवाले देवू? सांगा." सलमा अपेक्षेने बघू लागली.

तशी मालकानं पानीवाल्या कोवळ्या फळांची मागणी केली. ती तत्परतेने पुरवत चार ताडगोळे दोन्ही हातात घेत तिनं त्याला देऊ केले. “बगा सायब चाखून. एकदम नामी फळ हाय. गरत्या ताडाचे आहेत. परत परत मागाल.”

तिच्या हातातली फळं घेवून मालकानं चाखायला सुरूवात केली. त्याच्या चेहऱ्यावरचे खुशीचे भाव बघून हवालदार आणि ड्रायव्हरच्या तोंडातून लाळ टपकू लागली. “अहो, तुमाला बी देते ना. हे घ्या की.” सलमानं त्या इतर दोघांनाही फळं देवू केली. आग्रह करकरून खायला घातली.

लवकरच फळांमध्ये टोचलेल्या गुंगीच्या औषधाचा जालीम परिणाम काम करू लागला. तिघं गुंगून खाली कोसळले. तशी झाडामागे लपलेली सरला सलमाच्या मदतीला धावली. दुरून लक्ष ठेवून असणारी सारा दडवलेली रिक्क्षा काढून मागे आली. तिघींनी त्या तिघांना भरभर कारमध्ये परत कोंबलं. त्यांच्या कपड्यांची आणि गाडीची तपासणी केली. उडवायच्या त्या गोष्टी उडवल्या.

“आता ही गाडी बरोबर रानजाईच्या दरीतल्या वळणावर थांबली पाहिजे. अडकली पाहिजे.” सरलानं सलमाला सूचित केलं.

“अरे डरो नाही. ड्रायव्हरकी बेटी आहे मी. बराबर क्या करना वो करती.” असे म्हणून सलमानं कारखाली सरकून इंधनाच्या टाकीला कळेल न कळेलसं भोक पाडून ठेवलं. “चलो, इथं आपलं काम पाहिजे तसं पार पडलं. अब रानजाईकी घाटी. जाग जानेतक इथंच त्यांना रात होणार." तिघीजणी रिक्क्षात बसल्या आणि पुढल्या मुक्कामाला निघून गेल्या.

पुढे त्या माळरानातल्या विवक्षित वळणावर रिक्षा दडवणं सोप्पं होतं. त्या निर्जन भागात गेले दोन तीन दिवस काळी जाखीण दिसतेय, अशी बोलवा पसरली होती. त्यामुळे संध्याकाळनंतर तिथून प्रवास गाडीवाले होता होईल तो टाळू लागले होते. पायी जाणारे तर तसेही कोणी क्वचित असत. ते साफ बंद झाले होते.

थोड्या वेळाने रात्रीचा अंधार पसरला. रातकिडे किर्र करू लागले. तिघींनी फटकेवालीचे तंग काळे लाल पोषाख अंगावर चढवले. त्या तीन काळया जाखीणी आपापसात बोलू लागल्या.

“आंबट, त्या रिक्षावाल्याला कुछ शक तो नाही झाला?”

“ओ गॉड! गोड, तुझी ही डाऊट पे डाऊट काढत बसायची सवय कधी सुटणार? कोणी भाडेवाल्या ब्युटीफूल तरूणानं आपल्याकडली त्याला पाजली नी तो टोटली आऊट झाला. एवढंच त्याला आठवणार. जागा होईल, तेव्हा त्याला त्याची रिक्षा गायब झालेली दिसणार. तो पोलिसात जाईल. उद्या सकाळी आपण सोडलेली रिक्षा त्याला परत मिळेल. आमदार सायबाशी कनेक्शन जोडता येणं, त्याला पॉसिबल नाय. रिलॅक्स.”

“यार, तुला रिलॅक्स बोलणं आसान आहे. मगर गेल्यावेळी केवढी गडबड झाली. तिखट, तेरे गावके लोक तर एकदम उल्टे खोपडीचे आहेत. गुंडागँगच्या खिलाफ आमचा साथ द्यायचा सोडून, ते तर त्यांचा साथ देत होते. वहा तीन पराई औरते लढली आणि रिक्षावालेने तीन बाहरची औरते, त्या वक्ताला बराबर

आणली आणि नेऊन सोडली. कोई भी दिमागवाला माणूस आरामसे, एक से दुसरा जोडू शकतो. रिक्षावाला पुलिसमध्ये नाय तो, गुत्तेपें जाकर बोलला तो?”

“गोड, तसं काही होणार नाहीय. मी त्या रिक्षावाल्या ठेंगशेला चांगलं ओळखून आहे. आपण मारला तो रांगडदादा आणि त्याच्या गुंडा टोळीने मागे ठेंगशेला बेदम मार दिलाय. त्याची रिक्षा फोडलेली. रांगडदादाला पार करणाऱ्यांना ठेंगशे अडचणीत आणणार नाही. आपण जर त्याला परतल्यावर रांगडदादाला मारून आलोय, सांगितलं असतं ना, त्यानं भाडं घेणं सोड, उल्टा आपल्याला बक्षिसी दिली असती.”

“उल्टे हैच तेरे लोगा.” सलमा हसली. “पुरे उल्टे. मगर दिमागकी बत्ती नही चलती. लोक गुंडोके बजाय, आपल्याशी का लढले?”

“मी सांगते तुला गोड.” सारानं चकचक केले. “मी बघितलंय.

माझी माय मजुरीला जायची देट टाईम. यू नो? मुकादम मजुरांना सॉलिड पिळायचा, शिव्या द्यायचा. पण त्याचं डिमोशन करून त्याच्या जागी त्यातला एखादा मजूर, जर मुकादम बनवला ना, देन वॉट यू थिंक? तो सेम टू सेम

त्या जुन्या मुकादमासारखाच वागायचा. सम टाईम त्याच्यापेक्षा पण वाईट. आय थिंक, खूप सगळी माणसं जुल्म सहन करत असतात ना, टॅट बिकॉज त्यांना तो आवडतो. त्यांना जर चान्स मिळाला, तर तसाच जुल्म गाजवायचा असतो. ओनली थिंग की ते रॉंग एन्डला असतात. त्यांचा दुसऱ्या एन्डला जायचा ट्राय चालू असतो. आम्ही त्या शिवाजी चौकात गेलो, त्यावेळी त्या गावातले कोणते लोक तिथं हजर

होते? सरळ साधे पापभिरू लोक? सरलाच्या भावासारखे लोक? नो. ते सगळे बेवडे होते. नाय तर गुत्ता होता, म्हणून धंदा करणारे. गुत्त्याच्या जीवावर जगणारे. हाऊ कम्स ते गुत्तावाल्यांच्या अगेन्स्ट फायट करतील?"

"ऐसा भी होता क्या?" सलमानं नवल केलं. "असं पण असतं?"

"कदाचित याला दुसरी पण एखादी बाजू असेल." सरला सुस्कारली. "माझ्या गावात लोकांना फटकेवाली कोण आहे? ती काय करते? वाईट माणसांशी लढते. वगैरे काहीच माहीत नाहीय. तिची एक खास ओळख वा प्रतिमा, त्यांच्या मनात तयार झालेली नव्हती. गावदेवीच्या दंगलीतली लोकं जशी फटकेवालीची प्रेरणा घेऊन लढली, तशी प्रेरणा त्यामुळे

माझ्या गावच्या लोकांच्या मनात जागू शकली नाही. तिच्या एका हाकेसरशी, भीती सोडून लढायला उभं रहायची हिंमत त्यांना झाली नसेल."

"वा! तिखट, याला म्हणतात अपनोंकी तरफदारी. अपनापन." सलमानं रेशमी चिमटा काढला.

"वा! मग आपण इथं आता या काळोखात ही चिलटं मारत, वाट बघत कशाला बसलोत? मगाशी गुंगीतच त्या आमदाराचा सफाया केला नसता? तुझीच योजना आहे ना ही? फटकेवालीच्या भुताची दहशत उभी करायची? अरे नकली गोळ्या मिळवणं, काय साधी गोष्ट आहे? त्या फिल्मसिटीतल्या स्टंटमनला केवढी खिरापत वाटावी लागली माहीत आहे?"

"श्शू! गर्ल्स, जर तुम्ही अश्याच कचाकचा भांडत-बोलत बसलात, तर येणारी शिकार आधीच सावध होईल. नाय तर आपलं भांडं इथंच फुटेल तरी. कम ऑन. कान देऊन ऐका. आय थिंक दे आर कमिंग." तिघी कान देऊन ऐकायचा प्रयत्न करू लागल्या. हवेवर कारच्या धडधडण्याचा आवाज ऐकू येऊ लागला. "रेडी?"

"रेडी." त्या तिघी रस्त्याच्या तीन बाजूंना पांगल्या.

सारा सरसरत झाडावर चढली. कारच्या हेडलाईटचा प्रकाश समोरच्या वळणावरून पुढे आला. त्या प्रकाश झोतात तिनं एकदम रस्त्यावर उडी घेतली. ती पांढरी कार आमदाराचीच होती. वळणावळणांमुळे कारचा वेग मंद होता.

"सायब, समोर बाईऽऽऽ बाई आहे." ड्रायव्हरच्या आवाजातली भीती लपली नाही. त्यानं कारचा वेग थंडावला.

"दाबायला बरी असली, तर घे की बहेनचोद, तिला गाडीत." मागच्या सीटवरून मालक बडबडला. बाईचा नेमका अंदाज घ्यायला पुढे झुकला. कारच्या हेडलाईटमध्ये उभी फटकेवालीची काळी लाल भेसूर आकृती त्याच्या नजरेला पडली. "आरं भोसडीच्या बघतो काय? घाल अंगावर. चल जाऊ दे सरळ." हुकूम सोडला.

"सायब?" गाडी रेटायला मन धजावत नव्हतं. तरी ड्रायव्हरने ॲक्सिलेटरवर पाय दाबला. गाडी जागच्या जागी हिंव भरल्यासारखी थडथडू लागली. गाडी मंदावल्याचा फायदा करून घेत सलमाने हळूच मागच्या बाजूला

लोळण घेत, सायलेन्सरमध्ये घट्ट बोळा कोंबला होता. कार जागच्या जागी थरथरू लागल्यामुळे ड्रायव्हर सुद्धा भीतीने थरथर कापू लागला. “भूतऽऽ!”

“अरे हाड, असली खूप भुतं आणि सोंग मी आजपर्यंत सरळ केली हाय.” मागच्या सीटवरून आमदार फुस्कारला. “हवालदार बगतो काय? चल उडव रांडेला. गोळी घाल. का तू पण चड्डीत मुतला?”

हवालदार उसनं अवसान गोळा करून पिस्तुल रोखत कारच्या बाहेर उतरला. “ऐ बाजू हट. नायतर सरळ गोळी घालेन.”

फटकेवाली भेसूर हसली. “मेलेल्याला मरणाची भीती दाखवतो?” हवालदाराचा धीर सुटला. त्यानं फाडफाड पिस्तुलातून फायरिंग केलं. सगळया गोळया उडाल्या. फटकेवाली वर आपटल्याचं जाणवलं. पण तिला काहीच

झालं नाही.

हवालदार घामानं भिजला. फाडकन् फटकेवालीचा चाबूक हवेत कडाडला. चाबूक समोर लांब कडाडला. पण त्याचा फटका मात्र हवालदारावर इथं कोणीतरी सपकन मारून दिला.

“आये?” ओरडून तो कसाबसा कारमध्ये पुन्हा शिरला आणि त्यानं दार गच्च लावून घेतलं. ड्रायव्हरचं तत् पप् चालूच होतं. पुन्हा आसूड कडाडला आणि कारचे हेडलाईट फुटले. अंधारसावल्या चारही बाजूंना दाटल्या. अंधाराइतका माणूस

कशाला भीत नाही. अंधारात आसपास वावरणाऱ्या धोक्याच्या अदृश्य कल्पनांनी, तो अर्धमेला होतो.

आसूडानं यावेळी कडाडून जोरात कारची मागची काच फोडली. जणू अनेक हातांनी आमदाराला मागच्या मागे, त्या खाचेतून ओढून बाहेर नेला. “काय काय पाहिजे तुला?” आमदारालाही आता आवाजातला कंप लपवता आला नाही.

“तुझं ताजं गरम रक्त.” कान जाळत शब्द आत शिरले. सपासप एकाच वेळी अनेक आसूड त्याच्या शरीरावर फटकावू लागले. त्याच्या किंचाळया दरी दणाणत राहिल्या.

रात्री दुसरा चुकार एक ट्रक त्या वाटेने आला. तोपर्यंत आमदाराची दशा बघायला म्हणून सुद्धा ड्रायव्हर वा हवालदार खाली उतरले नव्हते. मग त्याला थेट हॉस्पिटलला रवाना केले गेले.

## रवीची नोंदवही : १६ नोव्हेंबर १९९५

------------------------------------------

*दंगलीच्या घटनेपासून छायाच्या पराक्रमाची सगळीकडे बाहेर आरती ओवाळली जाऊ लागलीय. पूर्वी लोक छायापासून फटकून असत. तिच्यापासून भीतीने चार हात अंतर ठेवून, लांब राहणं पसंत करत. ते सगळंआता बदललं, लोक ती दिसली की तिला जवळून पाहायला अजून जवळ येतात. एखादी जिवंत वाघीण रस्त्यातून फिरताना बघितल्यावर लोकांना जसा थरार वाटेल, तसा तिला बाजारात बघितल्यावर लोकांना वाटतो.*

*त्यात जर ती वाघीण माणसाळलेली असेल, तर लोकांना तिला हात लावून बघण्यात, तिच्या जोडीने स्वतःचे फोटो काढून घेण्यात कसलं एवढं मिरवावंसं वाटतं? मला प्रश्न पडतो. बरं यात रिंगमास्टरची भूमिका लोकांनी न मागताच, मला बहाल केलेली आहे. लोकांना हवं असेल तसं, तिला बसवून ठेवणं, उठवणं, हात लावून घ्यायला देणं, मी भाग पाडावं, अशी त्यांची अपेक्षा असते. त्यातला अगदी नकोसा प्रकार म्हणजे लोकांना आपल्या हाताने, तिला एखादं फळ भरवायचं असतं.*

*छायाला यातलं काहीही नको असतं, हे वेगळं सांगायला नको. अनोळखी माणसं जवळ येऊन हात लावायला लागली, तर कोणतंही जंगली जनावर जसे बुजेल, तशी ती बुजते. बैचेन होते. पिसाळल्यासारखी मग लोकांना लाथाडून निघून जाते. लोकांना याचं देखील कौतुक? सहजसाध्य नसलेल्या गोष्टीचं असतं तसं!*

सकाळी सकाळी मी रोजची आन्हीकं आवरून, कॉलेजला जायच्या घाईगडबडीत होतो, आणि मिसेस पात्रावाला मिसेस डिक्रूझला घेऊन आली. तिला छायाचे काही व्यवस्थित फोटो काढून हवे होते. मिसेस डिक्रूझला तिच्या मुलीला फॅन्सी ड्रेस स्पर्धेमध्ये फटकेवाली म्हणून सजवायचे होतं. छायाला भेट द्यायला स्ट्रॉबेरी आणल्या होत्या.

"पब्लिक पन केटला मॅड छे? जो, सगळा सगळा पेरेन्टला धीस टायम, आपआपला छोकरी लोकला 'फटकेवाली' बनवायचा हाय? अरे, केम? दुसरा कौन सारा कैरेक्टर नथी केम? तमे पता छे? लास्ट संडेला सेंट पीटर स्कूलमध्ये, अरे बे डझन फटकेवाली' फॅन्सी ड्रेसमध्ये प्रेझेन्ट झाला. मिसेस डिक्रूझ तो मारी एकदम जानी दोस्त हाय. मी तेला सांगला, चालो मारी साथे. तुला डायरेक्ट रियल फटकेवाली इंट्रोड्यूस करून देते. तुजा बेबीचा ड्रेस एकदम ऑथेंटिक, सेंट परसेन्ट ओरिजिनल बनला नी? तर तेलाच फर्स्ट नंबर मिळणार."

"म्हणजे तुम्ही तिला नागडी स्टेजवर पाठवणार?" माझे डोळे चेष्टेने चमचमले.

"ओ! यू फनी मॅन! ते ड्रेस कॉम्पिटीशन हाय. बॉडी कॉम्पिटीशन नाय हाय. ते बेबीला आमी टू पीस बिकिनी घालते. आनी तेच्यावर बॉडी पेंटिंग करते. सरस छे ने आयडीया?" मिसेस पात्रावालानं मला लाडात चिमटा काढला. "यू नॉटी मॅन, ती डिकरी ओन्ली सात सालचा हाय. सो सॉरी, यू मिस द फन." मग ती इथं तिथं शोधू लागली. "पन बिमाबा हाय कुठं?

तिला बोलवनी अय्यांथी?"

*“नो चान्स, मिसेस पात्रावाला. छायाचा आता अजिबात मूड नाहीय. ती वरच्या मजल्यावर कुठेतरी बाल्कनीत आहे. तुमच्या सुरक्षिततेचा विचार करून सांगतोय, तिला आता डिस्टर्ब करायला जावू नका.” मी सदऱ्याची वरची गुंडी लावली.”अच्छा. मी निघतोय कॉलेजला. मला उशीर होतोय.”*

*“तू जानी, आमी लेडी लेडी लोक, आमचा आमचा बगून घेऊ.” मिसेस पात्रावालानं मला उडवून लावलं वा माझी सुटका केली.*

*दारातूनबाहेर पडताना मला राहू आडवा आला. म्हणजे राहुल धुरंधर. त्याला एका जगप्रसिद्ध मासिकासाठी, 'फटकेवाली' वर लेख तयार करण्याची ऑफर आली आहे, सांगायला लागला. ते मासिक किती प्रतिष्ठित आहे वगैरे पुराण त्यानं सुरू केल्यावर, मी ते ऐकायला मला वेळ नसल्याचं सांगितलं. “आधी जरा स्थानिक वार्तापत्रातून छायाची बातमी छापून आणून दाखव.” मी त्याला आव्हान दिलं. “इन्स्पेक्टर कपूरनं तर दंगलीच्या बातमीतून, छायाला पूर्ण अनुल्लेखानं मारलंय.”*

*“अरे एकदा 'टाईम'मध्ये छायाची मुलाखत आली ना, की इन्स्पेक्टर कपूरचा बाप पण, मग तिची बातमी अडवू शकणार नाही.”*

*“मी नुस्ती चेष्टा करत होतो. आम्हाला खरं म्हणजे प्रसिद्धी नकोच आहे. आहोत तसे सुखात आहोत.” आता मी गंभीरपणे म्हणालो.*

*“जळाला रे जळाला. बायकोच्या गुणगौरवानं नवरा जळफळला.” राहुल माझ्या खांद्यावर हात दाबत बोलला, “दोस्त, मी समजू शकतो तुला.” त्याच्या असल्या भोचक सलगीनं, माझ्या डोक्यात किती चीड निर्माण होतेय, हे तो समजू शकत होता का? “काळजी करू नको. मी तुला सुद्धा व्यवस्थित फोकसमध्ये ठेवेन. या जबरदस्त मादीच्या प्रणयासाठी*

*वापरला जाणारा नर. या कोनातून कंगोऱ्यातून तुझी मुलाखत. तिला प्रणयात काय आवडतं? ती कशी वागते? तिला कसं रिझवावं लागतं? असं बघ, असलं आंतरराष्ट्रीय मासिक असलं, की त्यात या गोष्टींची मोकळेपणानं खुल्लम खुल्ला चर्चा तर करावीच लागते. लोकांना याच गोष्टींमध्ये जास्त रस असतो."*

*माझ्या डोक्यात संतापाचे ठणके बसत होते. तरी त्याला सभ्यपणा नावाच्या गोष्टीची आठवण करून देताना, मला माझा सभ्यपणा राखावा लागणार होता. छायाच्या प्रणयाविषयी बोलताना, राहुलचे डोळे ज्या तऱ्हेने गढुळले होते, धुंद झाले होते, ते कशाचं लक्षण होतं? मला पुरते आकळले होते. हाय! पण ही सभ्य आणि सुसंस्कृत पुरूषाची मर्यादा. मी स्वतःच स्वतःला त्यात जखडलं होतं. वाटत होतं हा सगळा बेगडीपणा टाकून द्यावा, छायासारखं उन्मुक्त व्हावं आणि या राहुलचा गळा घोटून जीव घ्यावा. माझ्या तोंडातून शब्द बाहेर पडले, "नवराबायकोच्या बेडरूममधल्या गोष्टींमध्ये रस असणाऱ्या लोकांसाठी, मुलखात देण्याची आमची इच्छा नाही. अहो माननीय पत्रकार, आपण आता आपलं इथलं येणं गुंडाळावं. हे उत्तम."*

*"का? बायको तुझ्यापेक्षा वरचढ झाली म्हणून तुझ्या पुरूषी अहंकाराला ठेच बसली? जुनापुराणा नवरेशाहीचा जमाना असल्यासारखा सुनावतो आहेस तो? आमची इच्छा नाही म्हणून? तिची इच्छा काय आहे? ती तू कधी विचारलीस? परस्पर तिचा निर्णय घेऊन मोकळा?"*

*"मला इथं बायकांच्या स्वातंत्र्यावर वाद घालत बसायला वेळ नाही. कॉलेजला उशीर झालाय. तू जा आता." मी करड्या आवाजात निक्षून सांगितलं. "हे माझं घर आहे."*

*“तू मला जायला सांगतो आहेस, कारण तू भितो आहेस. त्या दिवशी दंगलीच्या वेळी, छाया एकटीच कारच्या बाहेर येऊन लढली. तू मात्र भित्री भागुबाई बनून, कारमध्येच लपून राहिलास. बायकोच्या पदराआड जीव वाचवणारा भेकड नवरा. आतापर्यंत किती वेळा तिने तुझ्यावरचा वार झेलून तुझा जीव वाचवलाय. तूच सांग. तूच मोज. मी तिला भेटलो, तर तुझा हा नामर्दपणा तिच्या लक्षात आणून देईन, म्हणून तू भितो आहेस. म्हणून मला तिच्यापासून दूर ठेवायला धडपडतो आहेस.” बेछूट आरोपांची राळ उठवून देऊन, मानी माणसांचा तेजोभंग करायची ही दुर्जनरीत, मानवजाती इतकीच जुनी आहे. मानी माणसांनी तिला बळी पडायची खोड देखील, तितकीच पुराणी आहे. मी अपवाद ठरलो नाही.*

*“मला कोण भेकड म्हणतोय? बुडत्या जहाजातून पळणाऱ्या उंदरांप्रमाणे ढुंगणाला पाय लावून पळालेला उंदीर. मी कारमधून बाहेर पडलो नाही, कारण माझ्यावर अजून दोन कच्च्याबच्च्यांची जबाबदारी होती. त्यांना मी राखलं.”*

*“ही आता सारवासारवी करतो आहेस. जर तू भेकड नाहीस, तर मी तुझ्या बायकोला भेटण्यात, तुला कसली भीती वाटतेय? की तुझा बायकोवर विश्वास नाही. एखाद्या गुलफाम तरूणावर भाळली तर?”*

*“मला कसली भीती वाटतेय सांगू? मी एक सुसंस्कृत जगात वाढलेला माणूस असल्याकारणानंच, तू आतापर्यंत हे सगळे प्रलाप माझ्या पुढ्यात बोलू शकलास. पण माझी बायको जंगलाचे संस्कार मानते. पाळते. हे असलं काही हाताबाहेर तिच्या पुढ्यात बोललास, तर तुझं पोट फाडून तुझा कोथळा हातात काढून ठेवेल. तुझा जीव वाचवतोय. काही कळतंय?”*

*“माझ्या जीवाचं बरं वाईट काय बघायला, माझा मी समर्थ आहे. तू नको काळजी करू.”*

*“जशी तुझी मर्जी आणि नशीब. छाया वरच्या मजल्यावर आहे.” एवढं बोलून मी तिरीमिरीनं घराबाहेर पडलो. मनातून खराखुरा धसकलो होतो. छायानं जर राहुलला ठार केला, तर ही पत्रकाराच्या खुनाची भानगड कशी मिटवायची?*

*राहुलचा संध्याकाळी कॉलेजमध्ये फोन आला. मला जरा हायसं वाटलं. तो जिवंत होता. त्याला तातडीने माझ्याशी काही बोलायचं होतं. मला लगोलग चायना टाऊनमधल्या नर्सिंग होममध्ये बोलावत होता. तो तिथे दाखल होता. राहुल तिथल्या 'क्वॉन ताई वॉन' मार्शल आर्ट शाळेचा विद्यार्थी होता. गंभीररित्या घायाळ झाल्यामुळे, त्यानं तिथल्या उपचार पद्धतींचा आश्रय घेतला होता. माझी कुशंका खरी ठरली होती. तो मरणार नाही, याची खात्री करायला, मी ताबडतोब तिथं रवाना झालो.*

*“ती माणूस नाही, जंगली जनावर आहे केवळ.” मी गेल्या गेल्या राहुलने आपली आरोपांची यादी वाचायला सुरूवात केली. “इथल्या शहरी माणसांसाठी ती प्राणघातक धोका आहे. तिला इथं राहू देणं म्हणजे बाकीच्या लोकांच्या जीवाशी खेळ आहे.”*

*“या सगळ्या गोष्टी या आधी बोलून झालेल्या आहेत. तुझी लाडकी चांदणी जैन छायाला घराबाहेर हद्दपार करण्यात, यशस्वी देखील झाली होती. पण आता लोकांनीच तिला स्वीकारलंय. आग्रहाने आपापल्या घरात आमंत्रण दिलेलं आहे. परत बोलावलेलं आहे.” मी काळजीपूर्वक त्याच्या जखमांचा अंदाज घेत होतो.*

*त्याच्या छातीभोवती जाडजूड प्लास्टर गुंडाळलेलं होतं. तो पालथा निजलेला. त्याच्या पाठीवरचा मोठा मांसाचा तुकडा उडवलेला होता. असं मला तिथल्या डॉक्टर आणि नर्सनी सांगितलं. तो मरण्याची शक्यता ५०-५० टक्के होती. म्हणजे जखमा चिघळू दिल्या नाहीत. त्यात गॅंगरिन झालं नाही तर. हे त्यानंच ठरवायचं होतं. जर योग्य ते पथ्य पाळले, तर त्या चिघळणार नसत्या. आता छायाला प्राणघातक ठरवण्यासाठी, तो स्वतःचा जीव जाणं पत्करेल, अशी शक्यता कमी होती. "जर तुम्ही तिची कळ काढली नाही, तर ती आपणहून तुमच्या वाट्याला येत नाही."*

*"तिच्या नजरेसमोर नुस्तं जाणं, म्हणजे सुद्धा कळ काढण्यात जमा होतं काय?" राहुलनं तोंड कुसकं केलं. पाठीऐवजी छायानं याच्या चेहऱ्याचा लचका काढायला हवा होता, असा विचार माझ्या मनात अलगद तरळला. "जाऊन विचार मिसेस पात्रावालाला. ती तर त्या नरभक्षक वाघिणीची चांगली ओळखीची आहे ना? मी जिन्यावरून वर पोहोचलो, तोच जीवाच्या भीतीने किंचाळत, मिसेस पात्रावाला आणि मिसेस डिक्रूझ धावत आल्या. छाया त्यांच्या पाठलागावर होती. मी दोघींना पाठीशी घातलं. छायाला समजवायचा प्रयत्न केला. पण ती हैवान बनली होती. तिच्या तोंडातून रक्त गळत होतं. नखांवरून ताजं रक्त सांडत होतं. या दोघी रडत भेकत आपल्याला जावू द्यावं, म्हणून गयावया करत होत्या. पण छाया मानायला तयार नव्हती. मी मध्ये येतो म्हटल्यावर, तिनं माझ्यावर झडप घातली. बघ काय दशा केलीय माझी?" माझ्या चेहऱ्यावरचे मख्ख भाव बदलले नाहीत. ते त्यानं ताडलं.*

*"तुला माझा विश्वास वाटत नाहीय ना? मग जा. मिसेस पात्रावालाला विचार. मिसेस डिक्रूझची साक्ष काढ. लोकांना बाहेर गुंडांशी लढणारी*

*रणरागिणी माहीताय. पण आतून ती कधीही डोकं फिरू शकणारी, पिसाट जनावर आहे. जेव्हा तिची लहर फिरेल, तेव्हा तिच्या तडाख्यात कोणीही सापडू शकतं. तुझी घरातली नोकर माणसं. तुझे आई-वडील. तुझे शेजारी. ती कच्ची-बच्ची. आपण कशासाठी मेलो? हे सुद्धा त्या निष्पाप बळींना कळणार नाही. दर वेळी स्वतःचा बळी मध्ये द्यायला, राहुल धुरंधर तिथं हजर असेलच असं नाही. नाहीतर तिला पाळणारा मालक तू?"*

*राहुल इतर कोणाला वाचविण्यासाठी स्वतः जोखीम पत्करून मध्ये उडी मारतोय, ही कल्पना मला हास्यास्पद वाटली. माझ्या चेहऱ्यावरचे ते हसू पाहून, राहुलनं वेगळा अर्थ लावला. "छायानं माझी ही अवस्था केल्याबद्दल, तुला सुडाचा आसुरी आनंद होतोय. हो ना? तुझे ज्यांच्याशी वाईट हिशोब आहेत, ते चुकते करायलाच तू तिचा उपयोग करतोस. त्याचसाठी तिला इथं आणली आहेस. म्हणून पाळली आहेस. म्हणून राखतो आहेस. रवी आंग्रे एक दिवस मी तुला पुराव्यानिशी सगळ्यांसमोर उघडा पाडीन. चॅलेंज आहे माझा." फिल्मी हिरोसारखा जोरदार संवाद, पॉझ घेत नाट्यमय शैलीत राहुल बोलला.*

*याचं मला जास्तच हसू आलं. ते त्याच्यापासून लपवावं वा थांबवावं असं सुद्धा वाटेना. मी निघालो. मागून राहुल ओरडत राहिला, "त्या नरभक्षक बाईची जागा प्राणीसंग्रहालयातल्या पिंजऱ्यात तरी आहे, नाहीतर चांदीच्या गोळ्या बंदुकीनं डागून, कबरीतल्या खड्ड्यात."*

*मी मिसेस पात्रावालाच्या घरी गेलो. मला फाटकात पाहताच, ती जणू माझी वाट पाहत थांबून असल्यासारखी, धावत पळत माझ्यापाशी आली. "बिमाबा... बिमाबा...." तिला जरा धाप लागली. मी तिला थोपटून धीर द्यायचा प्रयत्न केला. "बिमाबानी काये चुकी नथी. ते राहुल स्साला*

घाण माणस. तेला तर मी पन चाबूकने मारवा मांगू छू. अरे, बायडी म्हंजे गांडू समजते काय? तेच्या बापाचा माल?" हे ऐकलं आणि माझ्या जीवाला इतकं गार वाटलं. नाना शंका आणि प्रश्नांनी मन भंडावून गेलं होतं. खरंच छायानं मिसेस पात्रावालावर हल्ला केला असेल की काय? आणि काय नाही?

मिसेस पात्रावालानं सारं स्पष्टीकरण दिलं. त्या दोघी जेव्हा वर छायापाशी बाल्कनीत पोहोचल्या, छाया हातात सरडा पकडून खात होती. ते दृश्य बघून, मिसेस डिक्रूडाची अवस्था वेडावल्यासारखी झाली. ती किंचाळत ओरडत, तिथून भीतीने पळत सुटली. तिला थांबवायला तिच्यामागे मिसेस पात्रावाला आणि पात्रावाला मागे यांना काय झालं एकदम? बघायला छाया. जिन्यापाशी त्यांना राहुल वर येत असलेला आपटला. त्याच्याकडे दुर्लक्ष करून, मिसेस पात्रावाला मैत्रिणीला थांबवायला दारापर्यंत गेली. पण मिसेस डिक्रूझ दाद न देता पळून गेली.

मग मिसेस पात्रावाला काय घडलं, त्याचा खुलासा छायाला द्यायला परत वर गेली. तिथं भलतंच नाट्य घडत होतं. राहुलचा नेमका इरादा तरी काय आहे बघायला, सामोरी न जाता ती दडली. माझं नाव वापरून राहुलनं छायाला फोटोसेशनसाठी राजी केलं होतं. त्यापुढे जाऊन, मग पोझसाठी हात असा वळव, तसं अंग हलव करत, त्यानं तिला हात लावायला सुरूवात केली. मग रवी तुला इथं असा हात लावतो का? तसा हात लावतो का? करायला सुरूवात केल्यावर मात्र छायाच्या सहनशक्तीचा कडेलोट झाला.

तिनं तिच्या पद्धतीने प्रतिक्रिया दिली. सरळ त्याचा हात पिरगाळून फ्रेक्चर केला. त्यावर राहुल तिला धमकावू लागला. की जर ती त्याला वश

*झाली नाही, तर तो तिची आणि माझी बदनामी करेल. शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ असते. आम्हा दोघांच्या आयुष्याचा तो पुरता सत्यानाश करेल. छायाला त्याची पाठ सगळ्यात जवळ मिळाली. तिनं त्यात दात घुसवले. तुकडा मारला. राहुल धुरंधर जीव घेऊन पळून गेला.*

-----------------------------------------------

स्टारखानच्या चित्रपटाचं शुटींग चालू होतं. गावाकडे तळयाकाठी गाण्याच्या चित्रिकरणासाठी, रंगीबेरंगी झकाससा सेट उभा करण्यात आला होता. चित्रिकरणासाठी आलेला सगळा कंपू दिवसभर कामात व्यस्त होता. अर्थातच नेहमीप्रमाणे स्टारखान उशिरा पोहोचला होता. त्यामुळे सगळयाच कामाला उशीर झाला होता.

संध्याकाळ उलटून गेली होती. शुटींगवाल्यांच्या युनिट पुरता भाग सोडला, तर बाकी सगळीकडे काळोखानं आपली चादर पसरलेली होती. इथं मात्र चकचकीत दिव्यांच्या उजेडामुळे डोळयांपुढे अंधारी येत होती. हौशे-नवशे-गवशे गावातले बघे बरेचसे पांगले होते. एकप्रकारचा शिणवटा सगळया वातावरणात तरंगत होता.

एका कोपऱ्यात स्टारखानला अदबीने बसवण्यात आलं होतं. जेवणासाठी मधली सुट्टी घ्यायची तयारी चालू होती. स्टारखानच्या आसपास त्याच्या दगडापेक्षा घट्ट आणि पोलादापेक्षा कणखर अंगरक्षकांचा जथ्था घेराघालून होता.

त्यामुळे गावातल्या चाहत्यांना, त्याच्यापर्यंत पोहोचणे सहज शक्य नव्हतं. शंकराआधी नंदीला प्रदक्षिणा घालावी लागते. त्याप्रमाणे स्टारखानला भेटण्यासाठी त्याच्या सेक्रेटरीच्या नाकदुऱ्या काढाव्या लागत होत्या. विकी रिपोर्टर त्याच खटपटीत होता.

गाण्यात मागे मागे नाचणाऱ्या तीन पोरी डोळे काणे करून, इतर तीन कोपऱ्यातून या कोपऱ्यावर लक्ष ठेवून होत्या. सारा, सलमा, सरला. त्यांच्या या रंगरूपात एरव्हीच्या ओळखीच्या कोणी, त्या तिघींना ओळखणं कठीण होतं.

“खन्नाजी, माय डियर खन्नाजी, मी विकी रिपोटर. रिमेंबर मी?” विकीच्या चेहऱ्यावर एक लाचार हसू पसरलेलं आणि डोळे चकचकत होते. अर्थात सेक्रेटरी खन्नाने त्याला ओळखलं नाही. याची अपेक्षा विकीला होती. “सरजी, पिछले दफा, या गावाकडच्या हायवेवर आपण भेटलो होतो बघा? एक मिसअंडरस्टैंडिंग झालं होतं? एका म्हातारीला खानसाबची गाडी....” विकीनं तोंडानं ते सांगणं टाळत, हातांनी ॲक्शन करून दाखवली.

थोडावेळ काही कळत नसल्यासारखा खन्ना शून्य नजरेने त्याच्याकडे बघत राहिला. मग त्याच्या डोक्यात हळूहळू ओळखीचा उजेड लखलखत गेला. “ओहहो! रिपोर्टर....?” आपली स्मरणशक्ती किती मजबूत आहे, हे डोक्यावर टकटकवून दाखवत खन्ना मिस्कीलपणे हसला. “कामके आदमी हो. जरा थांब दो मिनिट. साब मोकळे होऊ दे. अरे भीमसिंग हा रिपोर्टर...? अं! क्या नाम बताया?”

“विक्रम चौधरी सरजी. विकी बोला.” आनंदाने फुलून येत विकी उत्तरला.

“भीमसिंग, जरा या विकी रिपोर्टरला काही ठंडा आणून दे. बैठ. बस तू जरा तिथं. टू मिनिट हां प्लिज.” अस्सल पंजाबी मिठास वाणीमध्ये घोळत, खन्नाने एका खुर्चीकडे इशारा केला. बाकी सोत्सुक जणांच्या गर्दीवर एक तुच्छतेचा कटाक्ष टाकत, विकी मोठ्या रूबाबात त्या खुर्चीत जाऊन बसला.

त्याचा रूबाब फुकट गेला नाही. त्या नाचाच्या मेळातली एक रंगलेली कन्या, घुटमळत घुटमळत त्याच्या दिशेने खेचत आली. “ओहोहो! स्टारखानसारखी जुल्फे, स्टारखानसारखीच पॅन्ट नी शर्ट, सिगरेट प्यायचा तोच अंदाज? हाय मे मर जावा मेरे स्टार.” ती कन्या बोलली. तश्या विकीच्या काळजाला गोड गोड गुदगुदल्या झाल्या. “जानेमन अपनी किस्मतमध्ये तर स्टारखान नाय. पण तू बी त्याच्यापेक्षा कम नाय. तूच माझा स्टार. यार, तुझ्या पर्सनालिटीत एक मॅग्नेट हाय. चुंबककडे चुंबक खेचला जाते. तसा मी तुझ्याकडे खेचला गेला हाय. ओ, ओ, नो!” म्हणून त्या सुंदरीने म्हणजे सलमाने, सरळ हात त्याच्या पायांशी नेऊन खिळवत, त्याच्या पायांपाशी बसकण मारली. “बघ ना, माझे हात. तुझ्या अंगाला चिकटले हाय.” तिच्या या स्पर्शाने आणि नखऱ्याने विकीच्या अंगात धगधगती भट्टी पेटली जणू.

“जानेमन तुझी जागा माझ्या पायापाशी नाही. राणी, ये माझ्या बाजूला खुर्चीत, माझ्या मिठीत बस.” विकी पाघळला. तशी सुंदरी उठून त्याच्या बगलेत बसली. दोन्ही हातांनी आधाशासारखा तो तिचं अंग चाचपू लागला. तिच्या अत्तराचा मादक गंध, त्याला बेभान करू लागला.

“आहो! असा दुष्काळातून आलेला भुकेला जनावर काय करते? हॅव सम डिसेन्सी मॅन. लोग सामने तमाशा-कायकू? डार्लिंग, जे तुला पायजेल, तेच मला. पन थोडा प्रायवेसीसाठी तर वेट कर.” सलमानं त्याला गुंडाळलं. “यू नो? आमी स्ट्रगलर, म्हंजे नेक्स्ट हिरोईन बननेच्या वेटिंगलिस्टमधला मेंबर, स्टारखान साथे नाच करतो. बट?” तिनं असा एक मादक सुस्कारा टाकला, की विकी पुरता नादावला. “बट यू नो? आम्हाला स्टारखान सोबत हात मिळवायचा, नी दोन मीठे बोल बोलायचा, कधी पन मौका, मिळत नाय. जानेमन?” तिनं त्याचे केस विस्कटले. “तू माझी ही विश पुरी केली, तर माँ कसम, मी तुझी कुछ पन... कुछ भी विश पुरी करेन.”

विकीला दोन मिनिटांऐवजी वीस मिनिटांनी, जेव्हा केव्हा सेक्रेटरी खन्नाचा कॉल आला, तो न चुकता स्ट्रगलर मीनाला स्टारखानच्या भेटीसाठी घेऊन गेला. स्टारखानला भेटली तेव्हा मीनाच्या म्हणजे सलमाच्या डोळयात, जी भक्तीभावना तरळत होती? सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीच्या पारितोषिकाची तीच खरी हक्कदार होती.

तिच्याशी हात मिळवायचे, गालावर चुम्मी द्यायचे सोपस्कार पार पाडल्यावर, खन्ना तिला वाटेला लावू पाहत होता. पण तिनं विकीसोबत त्यालाही असा गुंडाळला, की त्यांची 'मर्दोवाली राज की बात' खन्नानं तिच्यासमोर उघड केली. खन्नाला म्हणे या त्याच त्या नटव्या-नखरेल पोरींचा कंटाळा आला होता. (आऊँच) इथं मीनानं एक दुखावल्याचा उद्गार, पण लाडीक आणि मादक उद्गार काढला होता. रोज रात्री त्याला झोपताना खाली पांघरायला नवं अंथरूण (नवीन

बाई) मिळाल्याशिवाय झोप येत नसे म्हणे. अर्थात हे सगळं खन्ना सांगत असताना, निरागस चेहरा करून स्टारखान ऐकत होता. स्टारखाननं जांभई देत, झोप येत नाहीची खूण केली. खन्नानं सांगून टाकलं की किती जांभया येतात, पण झोप येत नाही. आज जर ते एका गावापाशी होते, तर एखाद्या गावठी पोरीची काही सोय, विकी रिपोर्टर करून देऊ शकत होता का?...

तर? विकीतर्फे आम्ही शंभर टक्के यशस्वी प्रयत्न करतो. अशी हमी देत, मीना विकीला घेऊन बाजूला गेली. “तू नुस्ती सुंदर नाहीस, हुशार पण तितकीच आहेस.” विकीनं तिची तारीफ केली. “बगते जानेमन, एक पहेचानवाली जगह विचारून, एक्सक्यूज मी फॉर फोन.” म्हणत सलमा तिथून बाजूला सटकली.

तिनं साराला आणि सरलाला कळवलं. वॉशरूमला जाऊन येते म्हणून गेली आणि बाकी दोघींबरोबर बेत नक्की करून आली. विकीला थोडावेळ असातसा तिनं घोळला. मग त्याचं लक्ष स्टारखानच्या अंगरक्षकांशी भांडणाऱ्या साराकडे वेधलं. सारा तिच्या घरगुती पोषाखात परतली होती. “डार्लिंग ती बघ गावठी पोरगी.”

“नो, नो यार. ती तसली पोरगी नाही आहे.” विकी चुटपुटला.

“मीना असताना कायकू वरी? मी बोलतेना तिच्याशी. तू खन्नाला आणि स्टारखानला असा सांग....” म्हणत मीनानं विकीच्या कानात प्लॅन सांगितला. विकीला प्लॅन काम करेल की नाही, थोडी शंका होती. पण मीनानं त्याला एक जोरकस चुम्मी देताच, ती दूर झाली. तो खन्नाला गाठायला गेला. मीना उर्फ सलमा साराला गाठायला गेली.

सारा आपल्या आईला गाडी ठोकून अपघात केल्याबद्दल, नुकसान भरपाईसाठी भांडत होती. स्टारखानला भेटू इच्छित होती. अंगरक्षक तिला त्याच्याकडे सोडायला तयार नव्हते. मीना एक सहानुभूतीदार म्हणून साराला भेटली. आपली स्टारखानकडे चांगली ओळख असून, आपण साराचं काम करून देऊ, असं तिनं तोंड भरून आश्वासन दिलं. सगळया अंगरक्षकांना हाय हॅलो केलं.

थोड्याच वेळात विकी तिनं सांगितलं त्याप्रमाणे, खन्नाला पटवून तिथं घेवून आला. विकीला बघून सारा बिथरली. निघून जायला वळली. पण मीनानं तिला धीर दिला. या कोणा विकी बिकीला आपण ओळखत नाही समजावलं. खन्नांनीसुद्धा या गोष्टीला दुजोरा दिला. मीनानं वर तर वर, आपण खनाची गर्लफ्रेंड आहोत, हे दाखविण्यासाठी खन्नाला चुम्मी दिली. ते बघून विकीचे डोळे कपाळात गेले. खन्नासारख्या याबाबतीत अनुभवी माणसाचे डोकेसुद्धा डळमळले.

पुढंच सगळं काम मीनानं ठरवल्याप्रमाणे शिस्तीत पार पाडले. स्टारखाननं साराची आणि तिच्या आईची आस्थेनं चौकशी केली. आपल्या त्यावेळच्या वागणुकीबद्दल, नंतर आपल्याला फार पश्चाताप झाल्याचं सांगितलं. या गरीबांच्या शापामुळे त्याला मोठे फटके, नुकसान पडल्याचं कबूल केलं. त्याच्या ज्योतिषाने आता त्याला चुकांची भरपाई करायला सांगितलं होतं. अगदी मनापासून साराची त्यानं माफी मागितली. मीनाबरोबर तिनं थोडा वेळ एका तंबूत थांबावं. या सगळया कामाच्या धबडग्यातून मोकळा व्हायला अर्धा तास लागणार असता.

सारा आनंदानं गहिवरून गेली. तिच्या डोळयांतून आनंदाचे अश्रू वाहू लागले. सलमा उर्फ मीनाचा सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार या क्षणी तिने हिरावला. खन्ना दोघींना एका बाजूच्या तंबूत नेऊन सोडून गेले. विकीलासुद्धा आता मीनाची वाट बघत तोपर्यंत मनगटे चावत बसण्याशिवाय पर्याय नव्हता. स्टारखान त्या तंबूकडे गेला, तेव्हा कुठे मीना मोकळी होऊन बाहेर आली.

मीनाने सोबत कालीमातेचा प्रसाद म्हणून पेढे आणले होते, ते सगळ्या अंगरक्षकांना वाटायला, विकी रिपोर्टरकडे दिले. विकीच्या कानात हळूच सांगितलं की तिच्या कामगिरीबद्दल, स्टारखान तिला दोन लाख रूपये बक्षिस देणार होता. त्या खुशीचे हे पेढे होते. त्या दोनातले एक लाख रूपये तर ती आपला दिलबर, म्हणजे विकीला देणार होती. तेव्हा विकीचा सगळयांना पेढे वाटायचा उत्साह बघण्यासारखा होता. खन्नांना तर त्यानं आपल्या हाताने तोंडात पेढा भरवला. मीनाला सुद्धा.

पण मीना थोड्याच वेळात त्याच्यावर डाफरली. “अरे इडियट, कसला पेढा खिलवला? स्साला, हे तर फूड पॉयझनिंग हाय.” मीनानं जोरात आपलं पोट आवळलं. “मी...मी वॉशरूमला जाते.”

खन्ना गेलेल्या मीनाकडे आणि भांबावलेल्या विकीकडे थोडा वेळ पाहत राहिले. मग त्यांच्याही डोळयात राग फुलला. आपले पोट आवळत ते धावले, “यू इडियट...” त्यांच्या मागोमाग पेढे खाल्लेले अंगरक्षक विकीकडे बघत, पोटं आवळत पळाले, तेव्हा विकीच्या काही नीट लक्षात येईना. सगळयांच्या शेवटी त्याच्या

पोटातून जमाल गोट्याची कळ आली. तसा त्याला उलगडा झाला. तो पोट आवळत धावला.

सगळे संडास फुल्ल झाले होते. बाहेर राहिलेले बाजूच्या माळावर पळाले. ज्याच्या त्याच्या डोळ्यातला राग बघितल्यावर, आपण इथून पळालं पाहिजे हे विकीला कळत होतं. पण नाइलाज झाला. जवळचा आडोसा पाहून, त्याला बसतं व्हावं लागलं.

सारा आणि स्टारखानमध्ये तंबूत खेळ चालू होता. सारा त्याला सरळ उडवून लावत नव्हती. पण धडपणे हात पुरेपूर लावू देत नव्हती. नुकसानभरपाईच्या दहा लाखांच्या बदल्यात, स्टारखानला आजची रात्र हवी होती. तिचं व्यावहारिक सांगणं होतं, आधी पैसे. ते ती सुरक्षित पोच करून येईल, मग काय ती रात्र त्याने साजरी करावी. पैसे असेच सोडून द्यायला, स्टारखान स्वतःला दूधखुळा मूर्ख समजत नव्हता. ही भवती न भवती चालू होती, तो थोड्या वेळात मीनाची खूणेची बांग साराला ऐकू आली.

“तुला मी पाहिजे? माझी जूती तरी तुझ्या हाताला लागते काय बघ? यू डर्टी डॉग. ब्लडी फूल.” सारानं त्याचा राग चेतवला आणि झुकांडी देवून तंबू बाहेर पडली. स्टारखान तिच्या मागोमाग बाहेर आला. तिथं तिला रोखायला अंगरक्षक नव्हते. त्याचा हुकूम फुकट गेला. ते काम आता त्याचं त्यालाच करावं लागणार होतं. सारा त्याला डिवचत-खेळवत लांब माळावर नेवू लागली. अखेर त्याच्या हाताला लागलीच.

विजयानंदाने तो खदाखदा हसला. या माळावर त्याला बघायला, तिला वाचवायला आता कोणी नव्हतं. पाठलागावर आलेल्या दोन सावल्या त्याच्या लक्षात आल्या नव्हत्या. त्यानं साराचे कपडे ओरबाडून फाडून काढले. मग भरभर आपले उतरवले. आणि मुख्य कामाला लागला. ध्यानीमनी नसताना एकदम त्याच्या पाठीवर आसूड कडाडला. तो सुन्न झाला. त्याला ढकलून सारा स्वतःची सुटका करून पळून गेली.

“कोन तू?” त्या काळया, लाल, पांढऱ्या पट्ट्यांनी रंगलेल्या भूताकडे पाहत, भीतीने अडखळत, त्याच्या तोंडातून शब्द बाहेर पडले. आपला पट्टा त्याने चाचपडला. पिस्तुल तर कपड्यांबरोबर बाजूला पडलेले होते..

“छाया आंग्रे.”

“फटकेवाली?” तो ते नाव ओळखत होता. “राम राम राम राम. अल्ला अल्ला. जीझस जीझस.” तो जप करू लागला.

फटकेवाली खदाखदा हसली. “पाप करताना नाय तुला कदी देव आठवला? तुझ्यासारख्या नीच पाप्याच्या मदतीला देव धावत नसतो. म्हणूनच तुझ्यासारख्यांची मी शिकार करते.”

“तुला काय पाहिजे? पैसा, सोना, तू काय मागशील ते देतो.”

“मला बाकी काय नको. फक्त तुझं ताजं लालभडक रक्त हवं. पोट भरून.”

“एक बार मुझे जाने दे. माफ कर. सब बुरा काम छोड देता.” उत्तरादाखल त्याला शुद्ध हरपेपर्यंत आसूडाचे फटके मिळाले. खोट्याच्या कपाळी गोटा.

## रवीची नोंदवही : १६ डिसेंबर १९९५

-----------------------------------------------

*खूप महिन्यांनी दोन दिवसांसाठी म्हणून मी घराबाहेर राहिलो. एका विद्यापिठीय चर्चासत्रासाठी आमच्या महाविद्यालयामार्फत मला पुण्याला पाठविण्यात आलं होतं. छायाची फिकीर होती. पण ती आता बरीच रूळली आहे. छायाला मुंबईत आणल्यापासून तिची आणि माझी अशी ताटातूट झाली नव्हती. तिला घराबाहेर काढली होती, त्याकाळात देखील ती घराभोवती, माझ्या आसपास दुरून लक्ष ठेवून असायची.*

*माझं जाणं तिला सुखासुखी मान्य झालं नाही. पण तिला बरोबर घेऊन जाण्याचा विचारही अशक्य होता. मी तिला स्पष्ट कल्पना दिली की जाणार म्हणजे जाणारच. मी तिला कुठे जाताना अडवतो का? मग तिनं सांगितलं की जाऊ नको, तर न जायला, तिचं ऐकायला, मी जिमी कुत्रा आहे का? तिचेच शब्द तिला ऐकवले. थोडा वेळ गप्प झाली. मग राग येऊन निघून गेली.*

*मी पुण्याला निघेपर्यंत तरी पुन्हा मला दिसली नाही. गेल्या असतील बिमाबादेवी एखाद्या भक्ताच्या वा भक्तीणीच्या घरी पूजा-आरती करून घ्यायला. आणि नैवेद्य म्हणून काय घेणार? कच्चा उंदीर की मांजर? प्रसाद म्हणून काय वाटणार? कुत्र्याचं कच्चं मांस. मनातल्या मनात टवाळी करत मी गेलो.*

परत आलो त्याच दिवशी तासाभरात कुठूनशी हजर झाली. तिला जणू मैलांवरून माझा वास येतो. काय लाडीगोडी आणि काय? एरव्ही हे खपून जातं. पण नेमकं त्याचवेळी आईच्या वरदलक्ष्मी व्रताचा गुरूवार होता. संध्याकाळच्या तिच्या मैत्रिणी साळकाया-माळकाया, शालूंमध्ये नटून थटून जमल्या होत्या. हळदीकुंकवाचा समारंभ ऐन रंगात आला होता. उखाणे घेतले जात होते. बासुंदी ओरपली जात होती. अत्तराचे फाये दरवळत होते. आणि घरची लक्ष्मी सूनबाई, अशी अलक्ष्मीच्या रूपात, नंग-धडंग दारातून आत आली. हातात कोंबडीची रक्तबंबाळ तंगडी धरलेली.

भागिरथी मावशींनी तरीही बाजू सावरून घ्यायचा प्रयत्न केला. “पाहा किती निसंग आहे आमची सूनबाई. आमच्यासारखा शालू, हिरे, मोती, दागिन्यांचा किंचितही सोस तिला नाही. हे रूप तर साक्षात महाकालीचं. महाकाली आणि महालक्ष्मी या वेगळ्या नाहीत काही.”

“तर तर? रक्तामांसाचा चिखल पायाखाली तुडवत आली ही अवदसा? काय बाई तरी अमंगळाचार? माझ्या साऱ्या सोवळ्यांचा विटाळ करून राहिली ही अवलक्षणा. छे छे! काय हे अभद्र?” ताराकाकू कडाडल्या, “अनर्थ बाई, अनर्थ होणार. कोप होईल देवीचा.”

छायाला त्या जमलेल्या बायकांचं आणि त्यांना काय वाटतं याच्याशी काही देणं घेणं नव्हतं. माझं परतणं हाच तिच्यासाठी मोठा सण होता. बोमाबोईमध्ये सण साजरा करण्यासाठी, नाचण्याची रित होती. आदिम मानवांचा तो आदिम नाच म्हणजे, माणसातली आदिम सृजनाची भावना जागवणारा नाच होता. हे फार गुळगुळीत शब्द झाले. स्पष्ट शब्दात

*सांगायचं तर 'जवळ ये आणि माझ्याशी संभोग कर.' असं कृतीतून सांगणारा तो नाच होता.*

*तो बघून सोवळ्यातल्या ताराकाकूचा जो काय रक्तदाब चढलाय, तो अजून इस्पितळात दाखल आहेत, तरी उतरलेला नाही. बाकीच्या महिला मंडळाने आमच्या घरावर कायमचा बहिष्कार जाहीर केला. आणि पळ काढला. डोळ्यांचा खाचा होण्याआधी.*

*तेव्हापासून दोन दिवस झालेत, आई माझ्याशी बोललेली नाही. सुनेशी तर तिनं कधीचं बोलणं टाकलंय. त्याचा या बेलगाम सुनेला तर काही फरक पडत नाही. “या सगळ्या कटकटी कोणत्याच प्रापंचिक माणसाला सुटलेल्या नाहीत.” असं बाबा म्हणतात. पण म्हणून त्याचा माणसाच्या डोक्यावर होणारा परिणाम टळतो, असं थोडंच आहे?*

*मी कॉलेजमध्ये वर्गावर शिकवत होतो. आणि प्राचार्यांची चिट्ठी आली. मुद्दाम वर्गातून तातडीने बोलावणं घेण्यासारखं एवढं काय घडलं असावं? मी आशंकित मनाने त्यांच्या दालनात गेलो. प्राचार्य श्रीनिवासांच्या समोर राहुल धुरंधर बसलेला होता. अजूनही त्याच्या पाठीवर बॅन्डेजचं कुबड आहे, त्याच्या ताणलेल्या शर्टातून कळत होते. मी त्याच्याशी अभिवादन करायचा बेगडी शिष्टाचार पाळला नाही.*

*प्राचार्यांच्या चेहऱ्यावर गंभीर संचित भाव होते. राहुलनं त्यांच्यासमोर एक लॅपटॉप उघडून धरलेला. मला पाहिल्यावर हातांनी खुणावूनच त्यांनी 'हे पहा,' म्हणून लॅपटॉपकडे निर्देश केला. राहुलनं माझ्याकडे दिलखुलास हसत पाहिलं आणि लॅपटॉपचा पडदा माझ्यासमोर सरकवला. त्यावर एक व्हिडिओ फिल्म चालू होती. त्यातली काळ्या-लाल-पांढऱ्या पट्ट्यांनी शरीर*

*रंगवलेली बाई? इच्छा नसताना माझे डोळे तिथे खिळले. ते हेरून राहुलने फिल्म सुरुवातीपासून सुरू केली.*

*हे आमचंच घर होतं. फटकेवालीच्या जाहीर पराक्रमानंतर आमच्यावर गुंडांकडून धमक्यांचा पाऊस पडला होता. त्यामुळे बाबांनी बराच खर्च करून. आमच्या घराभोवती आधुनिक सुरक्षा-उपकरणांच्या तंत्रज्ञानाचं जाळं निर्माण केलेले होते. त्या टेहळणीसाठी बसवलेल्या कॅमेऱ्यांतून टिपलेली ही दृश्ये होती. त्यांना आवाज नव्हता.*

*ती काळ्या-पांढऱ्या बोमाबेई तंत्राने रंगलेली बाई, एका दाढीवाल्या पुरूषाला केसाला धरून, मुख्य दारातून आत खेचत आणताना दिसत होती. त्याला तिनं इथं-तिथं आपटला. दणकावला. हेलपाट्यांमध्ये त्याचा चेहरा मध्येच कॅमेऱ्याच्या इतक्या जवळून गेला की तो स्पष्टपणे ओळखता आला.*

*कामवाल्या गंगाबाईचा नवरा सखाराम. अरे देवा? यानं परत छायाची काही कळ काढली होती का? पण ती त्याला घराकडे कशाला घेऊन आलीय? मग त्याला आपटत धोपटतच ती घरात, आत, जिन्याने वर आमच्या खोलीत, तिच्या लाडक्या बाल्कनीत नेताना दिसली. घरातले दिवे बंद दिसत होते. त्यामुळे अंधुक प्रकाशात फारसं नीट स्पष्ट कळत नव्हतं. घरातली सगळी मंडळी कुठे बाहेर गेलेली असणार. इतका मोठा आरडाओरडा होत असताना, नाहीतर कोणी काही विचारायला बघायला आलं नाही, असं झालं नसतं.*

*बाल्कनीमध्ये पलीकडच्या इमारतींकडून येणारा, रस्त्यावरच्या दिव्यांचा येणारा थोडाफार प्रकाश होता. छाया सखारामला ओढत तिथं घेऊन आली. त्याची मान लटकलेली होती. तो माराने बहुतेक बेशुद्ध*

झालेला दिसत होता. त्याच्या कपाळाला मोठी खोक पडल्यासारखी वाटत होती. कारण तिथं रक्तासारखं काळवटलं होतं. धारा वाहत होती. छायानं त्याचं डोकं हातांमध्ये घट्ट धरून जिभेने ते चाटलं. परत परत चाटलं. हसली. आणि तिनं त्याच्या कानाचा लचका घास मारून दातांनी काढला. चावला. त्याच्या शरीराची काहीच हालचाल झाली नाही. तो बेशद्ध असायच्या ऐवजी मेलेला होता

की काय?

त्यापुढची सगळी दृश्ये, तिनं एकामागून एक दातांचे चावे काढत, त्याला कसाकसा खाल्ला याची होती. मी ते सगळं बघताना थिजून गेलो. मला भोवळ यायला लागली. मी लॅपटॉपवरून नजर बाजूला फेरली. प्राचार्यांनी शांतपणे पाण्याचा पेला माझ्यापुढे केला. मी घटाघटा दोन घोट प्यायलो. मला विचार करायला अवधी हवा होता.

“कोणी घेतली ही फिल्म? कधी घेतली? तुला कशी मिळाली?” मी राहुलला प्रश्नामागून प्रश्न विचारत सुटलो. “कोणाकोणाला दाखवली?” राहुलनं काही उत्तर दिलं नाही. तो शांतपणे मला निरखत राहीला. माझा तोल सुटायची वाट बघत. जरी त्याचा गळा आवळून जीव घ्यावासा वाटत होता, तरी मी स्वतःवर बळेच नियंत्रण राखलं. माझ्यावर एखादा आरोप लावून, मला लॉकअपमध्ये टाकून, मार्गातून बाजूला करायला मिळण्याची संधी मी त्याला देणार नव्हतो. मग छायाला कोणीच वाचवायला उरलं नसतं. “हे सारं खोटं आहे. ही काहीतरी ट्रिकबाजी आहे. आजकाल ॲनिमिशेन स्टुडिओवाले असलं काहीही बनवू शकतात.” मी थंडपणा राखत, खालच्या आवाजात बोललो.

"ठीक आहे ना. फॉरेन्सिक विभागाच्या लोकांना परीक्षण करू दे. आणि त्यांचं त्यांना ठरवू दे ना, ही फिल्म किती खरी आणि खोटी आहे." राहुल बेफिकीरपणे बोलला.

"अजूनही ही फिल्म कुठून मिळवलीस सांगितलं नाहीस?" मी करवादलो.

"मला ही फिल्म कशी मिळवता आली, हे तितकं महत्त्वाचं नाही, रवी आंग्रे. ती खरी आहे आणि अशी घटना घडणं आपल्या या समाजात, आपल्या या शहरात, आपल्या या काळात किती गर्हणीय गुन्हा आहे? याची तुला कल्पना आली आहे काय?" राहुलनं माझा प्रश्न उडवून लावला.

"आधी माझ्या प्रश्नाचं उत्तर दे. तुला ही फिल्म कशी मिळाली?" मी प्रश्न लावून धरला.

"त्याचं उत्तर तितकंसं महत्त्वाचं नाही."

"आहे. तू हे का करतो आहेस, तो तुझा नीच हेतू उघड होण्यासाठी हे कळणं आवश्यक आहे."

"नीच हेतू? माझा?" राहुलनं प्रचंड आश्चर्य वाटलेलं दाखवलं.

"हो. छायावर आणि माझ्यावर सूड उगवण्यासाठी, तू हे सगळं करतो आहेस."

"सूड? कसला सूड?" राहुल अगदी निरागस बनत होता.

"तू छायावर बळजबरी करायचा प्रयत्न केलेलास. त्यात यश मिळालं नाही. तेव्हाच धमकी दिली होतीस. मला आणि छायाला आयुष्यातून उठवायची."

*"असं तुला छायानं सांगितलं?"*

*"नाही. तिथं त्यावेळी दुसरी साक्षीदार हजर होती. तिनं." मी मिसेस पात्रावालाचं नाव उघड केलं नाही. उद्या हा राहू तिच्या राशीला लागायचा.*

*"घ्या, ज्याचं करावं भलं, तो म्हणतो आपलंच खरं. सर, जरा समजवा याला. रवी, तुझ्या बाबांनी घरातल्या सुरक्षेसाठी लागणाऱ्या उपकरणांची मांडणी करण्यासाठी आणि उभारणीसाठी माझा सल्ला मागितला होता. तसं काम करणारा माझा कंत्राटदार मित्र, मी त्यांना गाठून दिला होता. दोन दिवसांपूर्वी देखभाल-दुरूस्तीसाठी त्याने तुझ्या घराला भेट दिली. तेव्हा त्याला तपासणीत हे सापडलं. काय करावं, न करावं त्याला सुचेना. तो भांबावून-घाबरून गेला. मी मध्यस्थ होतो. म्हणून माझ्याकडे घेऊन आला. मी त्याला थोडे पैसे देवून तात्पुरता गप्प केला आहे. अजून ही फिल्म बाहेर जगासमोर उघडी केलेली नाहीय. लोकांना जेव्हा त्यांच्या फटकेवालीचं हे खरं हिडीस नरभक्षक रूप कळेल, तेव्हा काय होईल? भीतीने आंधळे झालेले लोक एकत्र येऊन, तुमच्या घरावर चालून जातील. आख्ख्या घरासकट तुम्हा सगळ्यांना जाळून टाकतील. पण मी ही फिल्म अजून दाबून ठेवली आहे. तरी तू म्हणतोस मला तुझ्यावर, छायावर सूड उगवायचा आहे?" राहुलनं डोक्याला हात लावून विमनस्कतेचं चांगलं नाटक केलं. "सांगा सर याला सांगा. का करतोय मी हे?"*

*मी प्रश्नार्थक नजरेनं प्राचार्यांकडे पाहू लागलो. दुःखाने त्यांची मान थरथरली. "मी म्हणालो नव्हतो, ही एक शोकांतिका ठरणार आहे. हा राहुल तुला आणि छायाला सुटकेची एक संधी देऊ इच्छितो. तुला दोन पर्याय आहेत. एकतर तू छायाला परत तिच्या देशात, अंदमानातल्या बेटावर सोडून ये. नाहीतर छायानं केलेल्या खुनाची आपणहून पोलिसांकडे कबुली*

*दे. छायाची मनःस्थिती सामान्य माणसांप्रमाणे नाही. असं कोर्टाला दाखवून देवू. तिच्यापासून इतर कोणाला याउप्पर धोका होऊ नये, म्हणून तिला बंदीवासात ठेवलं जाईल. तू तिला नियमित भेटू शकशील, अशी आशा करूया."*

*मी राहुलला निरखत राहिलो. शह तर त्यानं अगदी अचूक दिला होता. छायाला परत तिच्या बेटावर सोडायचा पर्याय प्रत्यक्षात अस्तित्वात नव्हता. पण ते मी प्राचार्यांना आणि इतर सगळ्यांना समजावून देऊ शकणार नव्हतो. मात्र त्यामुळे राहुलने मोठ्या दर्यादिलीचा आव आणला होता. बघा बघा, मी यांना खून करून सुद्धा पूर्णपणे सुटून जाण्याची संधी देतो आहे. यांचा पक्का हितैषी आहे. हा दुसरा पर्याय स्विकारणं म्हणजे छायाचा विश्वासघात करणं होतं. या हरामखोरांच्या तावडीत तिची वाताहात करणं होतं. राहुल खाली मान घालून बसला. चेहऱ्यावरचं कपटी हसू त्याला*

*लपवता येत नव्हतं. त्याचा जीव घेऊन सुद्धा उपयोग नव्हता. प्राचार्यांना तर त्यानं आधीच हुषारीनं यात गुंतवलं होतं. अजून कोणाकोणाला सांगितलं असेल? नेम नव्हता.*

*"सर, माझा विश्वास आहे की ही फिल्म खोटी आहे. मला दोन दिवसांची मुदत द्या. मी काय तो निर्णय तुम्हाला कळवतो." मी विनवणी केली.*

*"दोन दिवस? त्यात अजून कोणा माणसाचा बळी तिनं घेतला तर?" प्राचार्यांच्या भिवया वर गेल्या. "रवी तुझ्या लक्षात येतंय, ही किती धोकादायक गोष्ट आहे?" राहुलनं त्यांना चांगलीच पट्टी पढवली होती तर.*

*"सर, मी याची पुरी जबाबदारी घेतो. दोन दिवसात मला माझं म्हणणं सिद्ध करता आलं नाही, तर तुम्ही ही फिल्म पोलिसांत द्या. सर, कृपया माझा विश्वास धरा. तुम्ही मला चांगलं ओळखता."*

*"होय. रवी, मी तुला चांगलं ओळखतो. म्हणून तुला दोन दिवस देतो. त्यानंतर मात्र माझा नाइलाज होईल." प्राचार्यांनी अखेर विश्वासाचं दान माझ्या पारड्यात टाकलं. राहुल जरा हिरमुसलेला दिसला. त्यानं माझा हात हातात घ्यायचा प्रयत्न केला. मी झिडकारला.*

*"रवी मित्रा, आज तू माझ्यापासून लांब गेला आहेस. पण खरंच मनापासून सांगतो, देव करो आणि तुझं म्हणणं खरं ठरो. ही फिल्म खोटी निघो. सगळ्यात जास्त आनंद मला होईल."*

-----------------------------------------------

सारा, सरला, सलमा आपल्या होस्टेलच्या खोलीवर जांभया काढत पलंगावर आडव्या पडल्या होत्या. सारानं अयाय करत शिवी हासडत आपल्या पोटऱ्यांवर बाम चोळला. तसं त्या बामच्या उग्र वासामुळं सलमानं नाक वाकडं केलं.

"अरे इतना बाम लावशील, तर चामडी जळून जाईल."

"ओफ्! अगं कसले पेटके येतायत, यू कान्ट नो."

“आता ही लढाई लढायचं काम शिरावर घेतलंय, तर सैनिकहो, या सगळ्या जखमा, दुखापती तर आपल्यासाठी रोजचं रूटीन आहे. याला काय रडायचं?”

“अमा यार आंबट, बदन दर्द काय फक्त तुझ्या हिश्श्याला आलाय? दोन पुरा दिन-रात झोपलो नाही आहोत. दुनियाभरची परेशानी तर आपण आपल्या सिरपर घेऊन बसलो आहोत. आ बैल मुझे मार. आता दो दिन-रात मै कहीच नाही जानेवाली. बस्! तकिये पर डोकं ठेवून झोपून राहणार आहे.”

“झोपून राहणार काय? आज रात्री मनु शर्माच्या वकिलाला, पुन्हा शिवाजीच्या पुतळ्याकडे कचाट्यात पकडायचाय. त्याचे बॉडीगार्डस् तर असतीलच. त्यांना बाजूला काढायचं कसं? विचार करायला नको? तयारी नको का करायला?”

“तिखट फॉर गॉडस सेक! आज नको गं बाई. अजिबात नको. माझी कन्डिशन एकदम खाली गेलीय. मी म्हणते, आज त्या डॉक्टर हणमंतकडे एक मजासचं सिटींग घेऊन येते. अरे सिर सलामत तो असले वकील पचास.फटकेवालीला ॲट लीस्ट चाबूक फडफडवायला, हाताचा कोपरा तर युज करता आला पायजेल ना? कसली सणक भरलीय गं, त्या दिवशी त्या दगडू मटकेवाल्याला हाणलं तेव्हापासून. शरीर म्हणजे दगडच होता.”

“आता? त्या डॉक्टर हणमंतावर तुझी लाईन चालू झाली काय? एक तरी कोणा दुसऱ्या कोणासाठी सोड?”

“क्या बात है तिखट? तू तर त्या चक्करमध्ये पडली नाय ना? आग तुझ्याकडून लागलीय की वहाँसे? आँ, आँ!” सलमानं सरलाला गुदगुदल्या केल्या. “यार तुमच्यापैकी कोणी तरी एकीनं त्याला पटवाच. गेल्या तीन महिन्याचा आपला मेडिकलचा खर्चा किती वाढलाय? एकदा हिसाब घातला ना तर कळेल? वो पट गया तो, दवापाणी तरी फुकट निघेल. आणि मला आता शक होतो, की उसे भी शुभा होता होगा . कम्बख्त! ये लडकियाँ घडी, घडी. रोज रोज असं करतात तरी काय, की त्यांना मरम्मतची जरूरत पडते?”

“ओफ! मी तर सांगितलंय त्याला, मी क्वॉन ताई वॉन मार्शल आर्टच्या चॅम्पियनशिपमध्ये भाग घेतेय म्हणून. प्रैक्टिसमध्ये तर असे इन्जरी होतच राहतात. यू सी?”

“अल्ला! मै भी त्याला यहीच बोली है.”

“अय्या! मी सुद्धा.” सरला, सलमा, सारा तिघी खो-खो हसत सुटल्या. “चला गं पोरींनो, छापा काटा करूया. छापा आला तर डॉक्टर माझ्या वाट्याला.”

तोच साराचा फोन वाजला. तिनं बाकीच्या दोघींना गप्प राहा, खूण केली. जवळ जवळ दहा मिनिटं फोनवर नुस्तं हुं हू करत होती. मग फोन कट झाला.

“हा तेरे बॉयफ्रेंडका फोन नव्हता. नही तो तू बोलती, वो सुनता. अच्छा बोल कौन?”

“माय गं! रडत होती.” साराचा चेहरा आनंदीत झालेला.

"ती रडते तर तू कशाला हसते?"

"दे वेअर टिअर्स ऑफ गॅटिट्यूड. छायासाठी कृतज्ञतेचे अश्रू होते ते. स्टारखानने जाम प्रयत्न केला होता. फटकेवालीनं दिलेल्या माराची गोष्ट लिक होऊ न देण्याचा. पण दोन आठवडे तो हॉस्पिटलमध्ये ॲडमिट आहे. कोणाला भेट देत नाय. याची बोंबाबोंब तर होणार. आणि समवन हॅज मेड द क्लिप व्हायरल. मला कळत नाही. फटकेवाली त्याला सडकवतेय, याची क्लिप घेतली कोणी? आपल्या तिघींशिवाय त्या जागेवर हजर राहायची, तेव्हा कोण अजून हिंमत करणार? आणि असलं, तर आपलं सिक्रेट?"

"एक मिनिट. मला वाटतं, जरूर हे त्या सिनेडस्टर मासिकच्या पत्रकाराचं काम असणार. मी त्याला हेरलं होतं. तो सारखा चोरून पेन कॅमेरा स्टारखानवर रोखून वावरत होता. चोराची पावलं चोर ओळखतात. त्यानंसुद्धा नाच्या पोरीचं सोंग घेतलं होतं. पण त्याच्या सगळ्या हालचाली अनाठायी वाटत होत्या. म्हणून तो माझ्या होऱ्यात आला होता." सरलानं खुलासा केला. "मला नाही वाटत त्याला आपलं गुपित कळलय. तो स्टारखानमागे होता. स्टारखानला जेवढं दिसलं, तेवढंच त्याला दिसलं असणार."

"हां बात तो तेरी पतेकी लगती है, मगर जल्द से जल्द त्याला एकदा भेट दिली पाहिजे. उद्या?"

"नो चान्स. उद्या आपण मनुच्या वकिलाला गाठू. आज आराम."

“माय रडत होती म्हणून सांगितलंस ना. मगाशी भाऊचा फोन आला होता. तो पण असाच रडत होता. गुत्तेवाल्याच्या गुंडांची दहशत मोडली. आता त्यांना कोण टरकत नाही. आवाज केला तर उल्टा त्यांनाच दम भरला जातो, फटकेवालीला सांगू काय? बोलवू काय म्हणून.”

“वल्ला! ज्या गोष्टीसाठी आपण इतका त्रास सहन करतो, ती धीरे धीरे हासिल होते आहे. आमदारानं पण माराची गोष्ट दाबायचा प्रयत्न केलेला. मगर हवालदारने सब बात यहा वहाँ चोरी छिपे उगल दी. फटकेवालीवर बंदुक की गोली नाही चालत. सगळीकडे खबर फैलावली आहे. अपना काम आसान झाला आहे.”

“अगं गोड, लगेच मनात केक बेक करायला लागू नको. त्या बास्टर्ड मनुच्या वकिलाकडे, पिस्तुल नक्की असणार. आणि ते ट्राय करायला तो चुकणार नाहीय. एवरी टायम आपल्याला खऱ्या गोळयांच्या जागी नकली घालायचा चान्स मिळणार नाहीय.”

“तर दुसरी काही युक्ती काढूया. तू टेन्शन नको घेऊ आंबट, असं बघा आज रात्री तो शिवाजीच्या पुतळयापाशी....”

“तिखट यार. सच्ची. या फटकेवालीला आपण कुछ दिन सुट्टीवर नाही का पाठवू शकत? विश्रांती नाही मिळाली, तो मर जाएगी बेचारी कामच्या बोझ्याखाली.”

“हु! जगातले हे माजलेले रेडे, हे गुन्हेगार काही दिवस व्हेकेशनला गेले, तर गं? हाऊ फँटास्टीक! तिखट माय डियर, आज नको बाई. अशा दमलेल्या,

भागलेल्या, पेंगुळलेल्या आपण गेलो, तर हमखास संकटात सापडू. बॉडी आणि ब्रेन दोन्हींचे रिप्लेक्स, हवं तसं फास्ट काम देणार नाही बघ."

"अमा पहले खुदको बचाओ. फिर दुनिया बचा पाओगे."

"श्शू! कोणी तरी येतंय. मला चाहूल लागतेय."

"तुझे कान आता सुपर सेन्सेटिव्ह बनलेत तिखट." साराचं बोलणं संपण्याआधी, दारावर खटखट झाली, "कोण?' तिनं ओरडून विचारलं.

"पोलीस." उत्तर आलं. लगेच तिघींनीही खोलीत धावपळ केली. अडचणीत आणू शकणाऱ्या, नको ते प्रश्न उत्पन्न करणाऱ्या गोष्टी, नजरेआड सुरक्षित ठिकाणी रवाना झाल्या. मग सारानं दार उघडलं.

"ओहो! इन्स्पेक्टर बिलिमोरीया." ती ओळखीचं हसली.

"येस." त्यानं आत डोकावून बघितलं. "व्वा! तिघी एकत्र सापडलात. बरं झालं. मी मागे तुम्हाला म्हटलं होतं, सुमनची चौकशी करायला तुमच्याकडे परत येईन म्हणून." बोलता बोलता तो खोलीत शिरला. एक्स-रे प्रमाणे त्याची नजर खोलीतला कोपरा न् कोपरा तपासून पाहू लागली.

"पर सर, तिला गुजरे तो महिना होऊन गेला."

"आणि आता मनु शर्मा. कालच दुपारी फटकेवालीनं त्याचा बळी घेतलाय."

"टॅटस् नॉट पॉसिबल."

“का? का शक्य नाही?' बिलिमोरीयानं कडक नजर साराच्या नजरेत रोखत विचारलं. “तुम्हाला यातलं काही माहीत आहे का? फटकेवाली इथं दिसली होती का तेव्हा?”

“नाही. म्हणजे तसं नाही सर.” सारा जरा घुटमळली. “ती फटकेवाली तर भूत हाय. सो हाऊ कम्स, ती दुपारी दिसली?”

“व्वा छान! बराच अभ्यास दिसतोय तुमचा भुताच्या विषयात. आणि कसला कसला अभ्यास करता तुम्ही तिघी सध्या?”

“हमेशा करतो वही. रूटिन. सर, तुम्हाला आम्ही गेल्या भेटीत सगळं सांगितलंय.”

“हो. बरं, फटकेवालीचं दर्शन तुम्हाला पुढे इथे झालंच असेल? इतक्या सगळ्या वेगवेगळ्या ठिकाणी ती दिसते आहे. मग हे तर तिचं जन्मस्थान. इथं ती रोजच दिसत असेल.”

“नाही सर, आम्हाला तरी ती नाही दिसली.”

“बरोबर, तुम्ही असताच कुठेशा आता हॉस्टेलवर. वॉर्डनबाई म्हणत होत्या, तुम्ही बहुतेक वेळ बाहेरच असता. बऱ्याचवेळा रात्रीसुद्धा गायब असता. वॉचमन सांगत होता.”

“अं! नाही तसं नाही. त्यांचा गैरसमज झालाय काहीतरी. आम्ही खोलीतच अभ्यास करत असतो.”

“अभ्यास, कसला अभ्यास? या म्हणे आताशा कराटेच्या वर्गाला जातात,” साराकडे बोट दाखवून तो सरलाकडे वळला, “तुम्ही नेमबाजीच्या वर्गाला जाता,” शेवटी सरलाला म्हणाला, “आणि तुम्ही तलवारबाजीच्या. व्वा! ऐकून आनंद झाला. भारताला पुढच्या ऑलिम्पिकमध्ये पदक मिळणार बहुतेक नक्की. मग वेळ बाहेर जाणारच.”

“सर! मुली जळतात. सो, आम्ही त्यांना सांगितलेलं नाही. तुम्हाला कसं कळलं हे सगळं?” सारानं सहज आविर्भावात विचारलं.

“कडू पाटीलने सांगितलं. तिला तुमच्याविषयी फार आस्था आहे. त्यामुळे ती तुमच्यावर लक्ष ठेवून असते. तिला फार आश्चर्य वाटतंय, कालपर्यंत हॉस्टेलची फी भरायला पैसे नसणाऱ्या मुलींना, हे महागडे हजारो रूपयांचे फी असणारे वर्ग कसे परवडताहेत?”

“अपनी कमाईसे ते पैसे भरतो. सर, पार्ट-टाईम जॉब करतो.”

“कसला?”

“ते म्हणजे.... आम्ही सेल्सगर्लचे फिरतं काम करतो. कमिशनचे पैसे मिळवतो.”

“चला. सारखं सारखं रात्री बाहेर का रहावं लागतं, याचा उलगडा तरी झाला. रात्री फिरून विकण्यासारखं काय बरं विकता?” सारा, सलमा, सरला तिघींना पटकन काय उत्तर द्यावं सुचेना.

तोच कडू पाटील तिथं रडत-धावत आली."सायेब, बरं झालं, तुमी इथं आलात. इथंच भेटलात. आत्ताच्या आत्ता चला. बाहेर नाक्यावर एका नव्या लगीन झालेल्या जोडप्याचं दागिनं लुटले हायत. ती लोकं बोंबा मारतायत." धाप लागून कडूचा श्वास फुलला होता.

"हो. जरा दम खा. कोणी लुटले? तू बघितले?" पोलिस अधिकाऱ्यानं विचारताच, एका झटक्यात उत्तर देऊन कडू मोकळी झाली, "फटकेवालीनं."

"चल तर ताबडतोब. तिला फार लांब सटकायला मिळालं नसणार. हल्ली तिचं बंड फार माजलय. परवा बॅन्केची कॅशव्हॅन अडवून लुटलीय." घाईघाईने बडबडत इन्स्पेक्टर कडूबरोबर गेला. सारा, सलमा, सरला तिघी गोंधळून एकमेकींकडे टकामका टकामका बघत राहिल्या.

"आता ही कोण आली नवीन फटकेवाली? आपण तर तिघी काल, परवा, आज इथंच आहोत."

"फटकेवालीच्या नामका कोणीतरी गैरफायदा घेतो आहे. उसे बदनाम करतो आहे. मला विचाराल तर कडू पाटीलची काही साजिश वाटते आहे. नामाकूल आपल्यावर नजर ठेवून असते काय?"

"ब्लडी बीच कुठची? तिला तर पुन्हा चांगला धडा शिकवायचा आहे, आधी या डुप्लिकेट फटकेवालीचा शोध लावला पाहिजे. तिखट, माय डिअर तू बोलली बरोबर. फटकेवालीच्या नशिबात आराम नाही. आजची नाईट पन नो स्लीप. शो मस्ट गो ऑन."

“अरे, पण ये पुलिसवाल्याचा काय करनेका? त्याला पुरा शुभा झालेला आहे.”

“त्याचा पण त्या पत्रकारासारखा गेम करायचा? होली मेरी!”

“असं ठरवून-आखून खून करण्याइतक्या, थंड रक्ताच्या आपण अजून झालो नाही आहोत.” सरला उसासली. “पण डोकं थंड ठेवलं पाहिजे.”

“हां, पहले तो या खोलीत जे पण काय फटकेवालीच्या अस्तित्त्वाचे पुरावे आहेत, ते सगळे इथून हटवून कोना पहेचान वालेके पास महफूस रखने पडेंगे.”

“कम ऑन. वेळ नको घालवूया. लेटस हरी.”

# रवीची नोंदवहीं: १७ डिसेंबर १९९५

---------------------------------------------

*मुंबईची लोकसंख्या सव्वा कोटीच्या वर आहे. वर्षाला त्यातले साठ वर्षाच्या आयुर्मानाच्या सरासरीने, दोन लाख लोक खपत असतात. मरतात. म्हणजे दिवसाला जवळ जवळ पाच सहाशे लोक मुंबापुरीत मरतात. त्यातल्या शे-दिडशे मृत्यूंची कुठेही नोंद होत नाही. चाळीस ते पन्नास मृत्यू या हत्या असतात. त्यातल्या नामचीन भाई लोकांनी घेतलेल्या बळींची नोंद, ना नगरपालिका घेते ना पोलिसदल. न उलगडणाऱ्या नगण्य लोकांच्या अशा केसेस, पोलिसांना आपल्या माथी मारून घ्यायच्या नसतात. आपलं रेकॉर्ड खराब करायचं नसतं. मृताच्या नातेवाईकांनी फारच जोर लावला, तर बेपत्ता म्हणून नोंद होते. मात्र त्यांची इतकी हिंमत क्वचितच होते. पुढचा नंबर आपला लागू नये, म्हणून ते गुपचिळी धरतात.*

*क्राईम स्टोरीत छापून येणाऱ्या केसेस, या सामान्य लोकांनी आपापसातल्या खाजगी हेव्या-दाव्यांनी केलेल्या खुनाच्या असतात. नोंदलेल्या अशा हत्या, हे एकूण होणाऱ्या हत्यांपैकी दिसणारे हिमनगाचे पाण्यावरचे टोक असते. वर जेवढा आकार दिसतो. त्याच्या आठपट आकार पाण्याखाली दडलेला असतो. ही राहुल धुरंधरची थिअरी होती.*

*सत्तारभाईच्या माणसांचे आम्ही दिवसाढवळ्या, भर बाजारात केलेले खून कसे पचले? याचे स्पष्टीकरण देताना त्यानं मांडलेली. माझी सद्सद्विवेकबुद्धी सांगत होती, ते खून नव्हते. आम्ही*

*आमच्याआत्मरक्षणासाठी केलेल्या लढाईतल्या हत्त्या होत्या. त्याबद्दल मला वाईट जरूर वाटले होते. पण पश्चाताप झाला नव्हता.*

*सखारामच्या मृत्यूची गोष्ट वेगळी होती. मी घरी परतलो तेव्हा छाया घरी नव्हती. परत कधी येईल कोणाला सांगता आलं नसतं. बाबा आज खूप उशिरापर्यंत पेग वर पेग मारत बसले होते. घर फार अशांत वाटत होतं की हा माझ्या मनाचा खेळ होता?*

*“बाबा, मी पुण्याला गेल्यावरच्या दोन रात्रीत, तुम्ही कोणी घरी नव्हता का?” मी बाबांशेजारी बसत विचारलं. बाबांनी माझ्यासाठी एक पेग भरला. मी नाही म्हटलं.*

*“का विचारतो आहेस? आम्ही तुझ्या बायकोला एकटं टाकलं म्हणून? घर लॉक करून गेलो होतो म्हणून? तिनं काही तक्रार केली का?” बाबांच्याकपाळावर आठ्या चढल्या. एरव्ही ते असं लगेच डोक्यात राख घालत नाहीत.*

*“तिला कोणाच्या कागाळ्या करायची सवय नाही. तिचं तिला काही चुकीचं वाटलं, तर तिथल्या तिथे स्वतःच निस्तारते.” मी शांतपणे बोललो. छायाचा विषय निघाला की आमच्या घरात सगळ्यांच्या तो लगेच डोक्यात जातो.*

*“हो. म्हणून तिनं घराचं लॉक फोडलं. इथं रोज धमकावण्या येताहेत, आणि बंदोबस्त केलाय, तर घरातलंच माणूस तो फोडून सताड मोकळा उघडून घालतंय.” बाबा करवादले.*

*“कशावरून तिनंच लॉक फोडलं? कोणी पाहिलय का तिला फोडताना?” मी प्रतिवाद केला.*

*"काय पण बायकोची बाजू घेऊन, वकिली चालू आहे." आई बाबांच्या मदतीला आली. आमच्यात येऊन बसली. "तिच्याशिवाय दुसरं कोण करणार? चोर असता तर काही चोरीला गेलं असतं. तसं तर काहीच गेलेलं नाही. वर तुझ्या खोलीच्या बाल्कनीत मात्र नुस्ता रक्ताचा-मांसाचा सडा पडलेला होता. दुसऱ्या दिवशी गंगाबाई आली, तेव्हा जावून तो सगळा व्यवस्थित धुवून काढता आला. काय ती घाण, तो वास?" आईनं आता सुद्धा नाकावर पदर घेतला.*

*"कोणी बघितलं म्हणतोस? सगळं कॅमेऱ्यात व्यवस्थित चित्रित झालंय. सखारामला बडवत घेऊन आली. दार बंद म्हणून सरळ दगड घेऊन फोडून घातलं." बाबांनी माझ्या प्रश्नाला चोख उत्तर दिलं.*

*"आणि काय काय दिसलं कॅमेऱ्यात?" मी चपापून विचारलं. बाबांनी सगळं पाहिलंय का?*

*"आतल्या कॅमेऱ्यातलं रेकॉर्डिंग काहीच दिसेना. म्हणून त्या कॅमेऱ्यावाल्याला बोलावून घेतलं. एका महिन्यात यंत्रणा बिघडली, म्हणजे काय?" बाबांनी सांगितल्यावर मला जरा हुश्श झालं.*

*"म्हणजे लगेच दुसऱ्या दिवशी तुम्ही परतल्यावर कॅमेरा तपासलात. आणि आतल्या कॅमेऱ्यांमध्ये काही दिसत नाही, म्हणून त्या बसवणाऱ्यालाबोलावून घेतलंत?" मी उलट तपासणी करत विचारलं.*

*"हो... आला होता दुपारी, बरी आठवण झाली. दोन दिवस गेले. अजून त्यानं काही कळवलं नाही. त्याला फोन लावला पाहिजे." बाबा उठत म्हणाले.*

*"थांबा हो, मग लावाल." आईने बाबांना थांबवलं. "बसा. रवी, तू आज हे सगळं असं का विचारतोयस?" मला विचारलं.*

*"सांगतो मग. पण आधी मला हवी ती माहिती द्या. मी जाताना तर तुमचं रात्री कुठे घराबाहेर जायचं-राहायचं, काहीच ठरलं नव्हतं. मग कुठे गेलात? असे अचानक?" आवाज शक्य तितका नरम, सहज वाटेल याची मी काळजी घेतली. "आणि घर लॉक का झालं? भोलाराम कुठे गेला?"*

*आईबाबांनी एकमेकांकडे बघितलं. आई सरसावली, "तू गेलास आणि भोलाच्या गावाहून फोन आला, त्याच्या बहिणीचं लग्न ठरल्याचा. तेव्हा देण्याघेण्याची बोलणी आणि बाकी सगळ्या गोष्टी नक्की ठरवायला, त्याला तातडीचं बोलावणं होतं. तसा तो गेला. यांच्या मित्राचा फोन आला, चांदनीचा वाढदिवस आहे. आग्रहाचं जेवायचं निमंत्रण आलं. रात्री घरी जेवणार नाही, आम्ही कोणीच नसल्यावर काही काम नाही, म्हणून गंगाबाईला लवकर सुट्टी दिली. तुझ्या बायकोचा तर काही पत्ता नसतोच. तिला काय? दार उघडं हवंय असं थोडंच आहे. बाल्कनीतून सुद्धा झाडावरून प्रवेश करते. शिवाय तू घरी नसल्यावर, इथे आहेच कोण तिचं? ज्याच्यासाठी ती येणार? आम्ही का तिचे कोणी आहोत?" आईनं बोटं मोडली.*

*"बरं आम्ही रात्री लगोलग येणार असतो. पण पार्टीत यांना काही पिण्याचं भान राहिलं नाही. मग गाडी चालवता येण्यासारखी यांची अवस्था राहिली नाही. मला बाई नाही झेपत आता, यांना अशा अवस्थेत एकटीनं गाडीतून आणणं आणि घरात पोचवणं. जैन म्हणाले, तुम्ही अशा जाऊ नका, इथंच थांबा. थांबलो." आईनं मोठा दिर्घ श्वास लांबवला. "आता तुझं*

*काय ते सांग. तू कशाला इतकं सगळं खोदून खोदून विचारतोयस?" मी सर्दावलो होतो. राहुलच्या सगळ्याच गोष्टींना दुजोरा मिळत होता.*

*मी तोंड उघडणार एवढ्यात गंगाबाई आली. मलाच उद्देशून विनवायला लागली. "मालक, एक विनंती करतेजी. आमच्या कारभाऱ्याचा दोन दिवस कुठं बी पत्ता नाही. असं या पूर्वी कधी झालं नव्हतं. एखादी रात कुठे पिवून गटारात लोळला असेल, पण दुसऱ्या दिवशी सकाळी हजर होतो बघा. तसं त्याला फुकट पाजणारं कोन कोन हायत. पण फुकटंच खायला घालणारं कोनी नाय. तेवा गुमान दिवसात भूक लागली की तो घरी हजर होतो. मी पाय धरते मालक, जरा माझ्या संग चला नी पोलिसात तक्रार द्यायला मदत करा. माझ्यासारख्या गरीबाचं तिथं कोणी काय ऐकून घेणार नाही. तुम्ही आलात तर नोंदून तरी घेतील. काय तपास तरी करतील. एरव्ही मला तसा घोर लागला नस्ता जी. पन...." गंगाबाईनं जीभ चावत बोलणं तोडलं आणि मान खाली घातली.*

*"पण काय गं? छायाचं त्याचं भांडण झालं होतं होय ना?" आईनं तिचं बोलणं पुरं केलं. "दुपारी भोलाराम गेला आणि सखाराम इथं हिच्याकडे पैसे मागायला आला होता. त्याचा आवाज ऐकला आणि छाया चवताळून वरच्या मजल्यावरून खाली आली. दोघांमध्ये काही बोलाचाली झाली. छायानं त्याला दणके दिले. तसा तो पळाला. पण लांबून पुन्हा छायाला शिव्या-धमक्या द्यायला लागला. तशी छाया त्याच्या मागे गेली. तेव्हापासून छाया जी गायब झाली, ती रवी तू पुण्याहून परत आल्यावरच, या घरात परत आलेली मी पाहिली."*

*“मालक, तेवापासूनच यांचा काय बी पत्ता नाही.” आपलाच अपराध असल्यासारखी, गंगाबाई खालच्या आवाजात, मान खाली घालून बोलली. आता मात्र माझ्या हृदयावरचं दडपण मला स्पष्टपणे जाणवायला लागलं.*

*“अगं, छाया नंतर परत दिसली नाही कसं म्हणतेस? सकाळी आपण परतलो, तेव्हा ती मागच्या लॉनमध्ये नव्हती का?” बाबांनी आईला आठवण करून दिली.*

*“होय हो होय. आता मला बरी आठवण झाली. काय पुरलंय तिथं नेऊन? देवाला ठाऊक. कुत्री अध्येमध्ये येऊन सारखी उकरायला बघतात. जे काय ते आपण नव्हतो, त्या रात्री खाल्लंय ना, त्यातलंच कसलं मांस, तिथं पुरून ठेवलं असणार.” आईने कपाळ बडवून घेतलं. “अरे देवा, रोज रोज विटाळ होतो या घराला.”*

*“अगं, अस्सल जातिवंत क्षत्रिय आहोत आपण. रक्तामांसाचा आपल्याला विटाळ कसला?” बाबांचा क्षात्राभिमान मध्येच जागा झाला.*

*“विटाळ नाही, पण घाण तर रोजचीच ना? अनारोग्य, दुर्गंधी. मी बघितली तिला, तेव्हा ती माती लोटत होती. तिने खात्रीने काही पुरलंय तिथं.” आईनं आपला हेका सोडला नाही.*

*“आई, मला जरा ती जागा दाखवशील?” माझ्या तोंडातून शब्द बाहेर पडले, याचं मलाच आश्चर्य वाटत होतं. खरंतर सगळं शरीर-मन बधीर झाल्यासारखं वाटत होतं.*

*“आता काळोख पडल्यावर नको. उद्या दाखवते सकाळी.” आई बोलली.*

*“नाही आताच ताबडतोब. तिथे दिवा आहे.” मी जागेवरून उठलो.*

*थोड्या वेळात हातात बागकामाची कुदळ घेऊन, मी त्या जागेवर उभा होतो. सोबत आई, बाबा, गंगाबाई उभी होती. कुदळीचे घाव घालून झाले. तशी दुर्गंधी सुटली. आई बोलली ते खरं होतं. तिथं मांस पुरलं होतं. ते आता सडलं होतं. मी फावडं आणून माती उकरली. खड्डा खणला. बाहेर जे काही आलं, ते किती विरूप असले तरी, तो माणसाचा हात होता नक्की.*

*“हे तर कारभाऱ्यांचे घड्याळ?" एवढं बोलून त्या हातावरच्या घड्याळावर, गंगाबाई शुद्ध हरपून कोसळली. पलीकडे झेबू आणि मेहरू छायानं शिकविलेला बोमाबोई ठेका काठ्या धरून वाजवत होती. तो ऐकू येत होता. माझ्यापुढे पूर्णपणे स्वच्छ चित्र उभं राहिलं. बोमाबोई शत्रूला नुस्तं मारत नव्हते. शत्रूचं मांस खाणे त्यांचा धर्म होता.*

रात्रीचे अकरा वाजले होते. शहरातली चहलपहल बरीच कमी झाली होती. मोतिशा जैन मंदिरामागच्या लवलेनमध्ये तुरळक कोणी जोडपं दिसून आलं असतं. या गल्लीमध्ये नेहमी अंधुक उजेड असायचा. लफडेबाज प्रेमिकांसाठी म्हणूनच ती गल्ली, एक लोकप्रिय संकेतस्थळ होतं. भेटी-गाठी घेण्याचं. मिठ्या-चुम्या देण्याचे. केतननं ज्युलीचं एक शेवटचं चुंबन घेतलं.

“अच्छा डार्लिंग, गुडबाय. आता या आठवड्यात पुन्हा सुट्टी नाही. मालकानं पुढल्या हप्त्यात दिली तर फोन करीन.”

"सो स्वीट." ज्युलीनं परतीचा किस दिला, ती त्याच्या कारमधून खाली उतरली. केतननं चढवलेली हातातली अंगठी, तिनं डोळयांसमोर धरत निरखली, "डॅडीला सांगितलं की ही असली हिऱ्याची आहे, तर तो लगेच राजी होईल."

केतननं ओठाचा चंबू केला. ती खऱ्या हिऱ्याची नाही, हे त्याला पक्कं ठावूक होतं.

"ती अंगठी काढून आधी इथं दे." एक खरखरीत आवाज ज्युलीच्या कानात शिरला. पटकन तिचा हात धरून कोणी मागे पिरगाळला आणि मागच्या मागे तिच्या बोटातली अंगठी जबरदस्ती ओढून काढून घेतली. ज्युलीनं लावलेल्या मादक अत्तराच्या वासावर मात करून, त्या व्यक्तीच्या अंगाचा खरखरीत आणि तापलेला स्पर्श नकोसा वाटत होता.

ज्युलीने मदतीच्या अपेक्षेने केतनकडे पाहिलं. त्याच्या तोंडाचा आ वासलेला, आणिडोळे भयानं विस्फारलेले होते. ज्युली जरा धडपडली, तिला वळता आलं नाही. पण शेजारी बसलेल्या कारच्या रिअर-व्ह्यू आरश्यात तिला आपल्यामागे कोण आहे ते दिसलं. तिच्या किंचाळी मारायला उघडलेल्या तोंडावर, त्या व्यक्तीने हात दाबला. ज्युलीचं डोकं कारवर धाडकन आपटलं. ते रक्तबंबाळ होऊन, ज्युली अस्फुट चित्कार तोंडातून काढत, शुद्ध हरपून खाली कोसळली.

आता त्या काळया-पांढऱ्या-लाल रंगांचे पट्टे रंगवलेल्या बेढब बाईंना केतनकडे मोर्चा वळवला. "गाडीतून खाली उतर." तिचा आवाज परत खरखरला. भीतीमुळे केतनच्या शरीराची हालचाल होईना. "लवकर. तुला तुझी प्रेमिका जिवंत राहायला हवी का नको?"

फटकेवालीने धमकावल्याबरोबर त्याच्या शरीराच्या हालचाली सुरू झाल्या. कापऱ्या अंगानं तो दार उघडायचा प्रयत्न करू लागला. फटकेवालीनं थंडपणे ज्युलीची पर्स उचलून घेतली. तिच्या आसुडाच्या दांड्याने कारची काच फोडली. आत हात घालून लॅच काढलं. आत शिरली. ती आत शिरताच अचानक केतनच्या अंगात चपळाई संचारली. तो ड्रायव्हरच्या सीटवरून दुसऱ्या दाराने बाहेर पडू लागला. फटकेवालीनं त्याहून चपळाई करत, त्याचं बखोट धरून त्याला आत रोखला.

“तुला काय पाहिजे ते घे. हा मोबाइल घे, हे पाकीट घे. ही गळ्यातली चेन घे.” घाई करून एकेक चीजवस्तू काढून, तो तिच्या हवाली करू लागला. “पण माझा जीव घेऊ नकोस.”

“हातातली अंगठी काढ.”

“ती नको. ती राहू दे. माझ्या लग्नात बायकोकडून आलेली आहे. ती दिसली नाही तर माझा जीव खाईल.”

“नाही दिलीस तर मी तुझा जीव घेईन. तुझ्या जीवापेक्षा तुझ्या बायकोला तुझी अंगठी जादा नसणार. काढ ती गुमान.”

केतननं नाइलाजानं अंगठी काढून दिली. ती घेतल्यावर पुन्हा फटकेवालीनं त्याला कारमधून खाली उतरायला फर्मावलं. “आता काय हवं ते घेतलंस ना? मग कशाला बाहेर उतरू?”

“चावी लाव परत जागेवर.” फटकेवालीच्या सूचनेनुसार त्यानं कारची काढून घेतलेली चावी परत जागेवर लावली. तसं त्याला गाडीबाहेर ढकलून घालण्यात आलं. चावी फिरवून कार सुरू झाली.

“अरे. म्हणजे तू माझी कारपण नेते? तुला भुताला कार कशाला पाहिजे?” केतन भय झटकून आश्चर्याने ओरडला.

“चूप, वटवट केली तर गळा चावून टाकीन.” फटकेवालीनं धमकी दिली. “कार चालू का होत नाही? ॲक्सिलेटर किती दाबला तरी...?”

“माझ्या घराच्या चाव्या त्या जुडग्यात आहेत. आधी त्या परत दे. तर सांगतो.” केतन आता भयाच्या घेऱ्यातून बाहेर आला होता.

“माझ्याशी चलाखी?” एवढं बोलून एक सुऱ्याचं तेज पातं फटकेवालीने केतनच्या छातीवर मारून दिलं. फरफरत कार पुढे निघाली. धूर मारत निघून गेली. केतननं छाती दाबून आपले हात समोर धरून पाहिले. ते रक्त बघून त्याला भोवळल्यासारखं झालं. ज्युली कण्हली. ती शुद्धीत परतल्याची ती खूण होती.

सरला धावत त्या दोघांपाशी आली. केतनचा शर्ट फाडत छाती उघडी करून, तिनं आपल्या फोनचा प्रकाश त्यावर फेकला. अंदाज घेतला. “ही जखम फारशी खोलवर नाही. पुसटसा वार झालाय.” पुटपुटली.

“कोण तुम्ही?” कपाळावरची ठसठसणारी जखम दाबत ज्युली उठून बसली. “ती... ती फटकेवाली?” तिच्या आवाजात भय उमटलं.

“मी पुढे येईपर्यंत ती पळाली.” सरला चुटपुटली.

“स्साले पेपरात छापतात, फटकेवाली सत्याचा वाली आहे. अन्यायाचा दुश्मन आहे, बदमाषांचा काळ आहे. अरे ही स्वतःच डाकू आहे.” केतन चरफडला.

“ती फटकेवाली वेगळी. ही ती नाही. ही कोण तरी फटकेवालीच सोंग घेऊन, लोकांना लुटणारी बदमाष आहे.” सरलानं स्पष्टीकरण दिलं.

“मग ती फटकेवाली करतेय काय? तिला कळत नाही का, की कोणी आपली डुप्लिकेट बनून बदनामी करतेय? ती जर हिला धडा नाही शिकवू शकत, तर काय कामाची?' ज्युलियानं आपल्या प्रेमिकाची री ओढली.

सरलाने तोंड कुसकं केलं. ते तिच्या चेहऱ्यावर सावली असल्यानं ज्युलियाला दिसलं नाही. हे बरं झालं. “तुम्ही जरा आता धीराने घ्या. मला ह्या बदमाषाचा पाठलाग करायला, पटकन काही तरी वाहन पाहिजे आहे. त्याची काही सोय होईल का बघा.” सरलानं हात चोळले.

“माझी बाईक मी तिथं पलीकडे पार्क केलीय. पण तुम्ही कोण? तुम्हाला बदमाषांची भीती नाही वाटत?” ज्युलियाला प्रश्न पडला.

“मी सी. आय. डी. आहे,” सरलानं आपल्या खिशातून उगाच एक आयकार्ड काढून, ज्युलियाला दाखवलं न दाखवलसं केलं. “चला, घाई करा. ती खूप दूर निघून जाता नये.” ज्युलियाला हात देवून सरलानं उभं केलं.

“ज्युलिया डार्लिंग, माझ्या हृदयावर इथं वार झालाय. जखमेतून रक्त वाहतंय. मला आधी तातडीनं एखाद्या डॉक्टरकडे नेण्याची गरज आहे.” मजनू केतननं तक्रारराग आळवला.

“ओ माय पुअर केतन.” ज्युलियानं त्याचा पुसटसा मुका घेतला.

“सॉरी, सी. आय. डी. माझ्या लवबरोबर माझी ड्यूटी पहिली.”

“तुझ्या या लवचं लग्न झालेलं आहे. आणि त्याच्या डाव्या हातात तो मिरवायचा, ती अंगठी लग्नात त्याच्या बायकोकडून मिळालिय. हे त्यानं तुला कधी सांगितलंय?” सरलानं सरळ एक घाव दोन तुकडे करायचं ठरवलं.

“नाही. तुला काय माहीत? तुला कधी सांगितलं?” ज्युलिया सरलाकडे संशयाने पाहू लागली.

“मगाशी त्या बदमाष गुंडीने अंगठी मागितली, तेव्हा यानं तेच कारण सांगत, तिला आधी नकार दिला होता.” सरलानं साळसूदपणे सांगून टाकलं.

“ओफ हो! ते ? ते तर मी त्या बदमाषशी खोटं बोललो. अंगठी तरी वाचावी म्हणून.” केतननं चटकन या हातावरची थुंकी, त्या हातावर फिरवत म्हटलं.

“मी सांगते तुला, याचं काय खरं आणि काय खोटं? तुला यानं कधी त्याच्या घरी नेलंय? कधी कामावर नेलंय? आपल्या कुठल्या मित्राची वा कधी नातलगाची ओळख करून दिलीय? यानं त्याचं जे नाव सांगितलंय. त्याच्या पलीकडे याच्याविषयी कोणती माहिती तुला आहे? त्या माहितीचं खरं-खोटं याच्या

शब्दाबाहेर, दुसऱ्या कशानं करू शकतेस? नाही ना? ज्युलिया बाईकची चावी दे." सरलानं चावीसाठी हात पुढे केला.

"ज्युलिया कशीच देवू नको. तुला आपल्या प्रेमाची शपथ." केतननं सरलाला रागानं दात रगडून दाखवले. ओठ चावले. ज्युलिया आळीपाळीनं दोघांवर नजर फिरवत राहिली.

"ज्युलिया, मी मगाशी काय घडलं, सगळं पाहिलंय. असल्या गुलहौशीझखुशालचेंडूंना मी बरोबर ओळखते. तुला त्यानं दिलीय, ती अंगठी नकली हिऱ्याची आहे. त्या बदमाषाकडून ती परत मिळवू. तू ती सोनाराकडे तपासून घे." सरलाची ही मात्रा अचूक लागू पडली. ज्युलिया बाईककडे धावली. बाईक चालू करून तिनं सरलाकडे सोपवली. सरलाच्या मागे आपण डबलसीट बसली. दोघी तरूणी केतनच्या बगलेतून बाईक कुर्र करून उडवत निघून गेल्या. केतननं पायातला बूट काढून, रागानं मागून त्यांच्या दिशेनं फेकून मारला. तो त्यांच्यापर्यंत पोहोचला नाही.

लवकरच ज्युलियानं बाहेरच्या मेनरोडवर केतनची निळया रंगाची कार बरोबर हेरली. अर्ध काम फत्ते झालं. इतका वेळ त्या चोरणीनं तिथं का फुकट घालवला? हे कोड होतं. तेवढा विचार करायला सरलाला वेळ नव्हता. ती निळी कार इस्टर्न एक्सप्रेस हायवेला छेदणाऱ्या पुलावरून बंदर भागात घुसली. तिथे एका चिंचोळया गल्लीत घुसून, एका मोठ्या गोदामापाशी थांबली.

सरलानं बाईक गल्लीच्या मुखापाशी थांबवली. उतरली. ती फटकेवाली कारमधून उतरून गोदामांच्या रांगेत पायी पसार झाली. सरला तिच्यामागे निघाली. “मी नाही येणार तिथं. मला भीती वाटते.” ज्युलियाने सरलाचा दंड धरत तिला रोखलं.

“बरोबर आहे तुझं. तिथं धोका होऊ शकतो. तू बाईक घेऊन परत जा. मी पुढे जाते.” सरलाला तिची अडचण नकोच होती.

“ती अंगठी, तू मला कुठे आणून देशील?” ज्युलियानं भाबडेपणानं विचारलं.

“तूच सांग?” सरलाला तिला लवकर झटकायचं होतं.

“तुला भांडारवाडा हिलचा बगिचा माहीत आहे?” सरलानं होकारार्थी डोकं हलवल्यावर, ज्युलियानं पुढचा तपशिल दिला, “त्याच्या गेटसमोरच फोसेन्का बेकरी आहे, माझ्या डॅडीची. तिथं आणून दे.” सरलाने मान डोलावली आणि पुढे निघाली. तसं थोड्या अंतरावर ज्युलियानं पुन्हा तिला हाकारलं. “आणि डॅडीसमोर केतनचा विषय बोलू नको.” सरलानं पुन्हा मान 'हो' म्हणून डोलावली. त्यानंतर परत ज्युलियाची हाक आली, तशी ती थांबलीच नाही. ती बदमाष बाई घुसली होती, त्या जागी डोकावून, अंधारलेल्या जागेत कानोसा घेत आत शिरली.

थोड्या लांबवर प्रकाशाचा कवडसा पडला होता. तिथं एका इमारतीचं दार उघडून, फटकेवाली आरामात आत घुसताना सरलानं पाहिलं. आपल्या फोनवरून घाईघाईने सरलाने साराला आणि सलमाला फोन केला. जागेच्या खाणाखुणा सांगितल्या. अर्धा तास उलटला. त्या दोघी तिच्या जोडीला हजर झाल्या.

तेवढा वेळ सरलानं बराच तणावात काढला. एकदा वाटत होतं. एकटीनेच पुढं जावून काय तो प्रकार बघावा. पण तिथं बदमाषांची टोळी असली तर त्यात मोठाच धोका होता. एकसे भले तीन. आघाडीच्या, पिछाडी दोन्ही व्यवस्थित सांभाळता आल्या असत्या. तिघींनी एकमेकींशी कट्टर शपथा खाल्ल्या होत्या. जे काय करायचं, ते तिघींनी. जे काही होणार ते तिघींचं.

सारा आणि सलमाला तिथंच त्या इमारतीच्या दारावर लक्ष ठेवायला सांगून, सरला त्या इमारतीत शिरायचा, दुसरा काही मार्ग सापडतो का? शोधायला निघाली. त्या इमारतीच्या भोवती चक्कर टाकताना, सरलाला एका बाजूला उंचावर एक खिडकी उघडी दिसली. थोड्या वेळाने एकमेकींच्या खांद्यावर चढून, ती पंधरा फुटाची उंची गाठण्यात त्यांना यश आलं. सरला आधी आत घुसली. मग तिनं सलमाच्या ओढणीचा उपयोग करून, बाकी दोघींना वर खेचून घेतलं.

त्या शिरल्या होत्या, त्या खोलीत कसले कसले मोठे डबे पडलेले होते. अंधार होता. त्या खोलीच्या पत्र्याच्या दाराला किलकिलं करण्यात त्यांना यश आलं. ते हळूच उघडून त्या खोलीतून इमारतीत शिरल्या. हा वरचा माळा होता. तिथून खालच्या मजल्यावर दोन माणसं दिसत होती. त्या भल्या मोठ्या गुदामात बरीच जागा मोकळी होती. वरून सोडलेल्या बल्बच्या प्रकाशात ती दोन्ही माणसं उजळून निघाली होती.

त्यातली एक काळ्या-लाल पट्ट्यांनी रंगलेली फटकेवाली होती. ती त्या पट्ट्यांच्या गुंडाळया शरीरावरून सुट्ट्या करत होती. म्हणजे ते पट्टे अंगावर रंगवलेले नव्हते. लवकरच ती बाई नसून, पुरूष असल्याचे उघड्या अंगावरून स्पष्ट झाले. आज बराच माल हाती लागल्याचे, एक दुसऱ्याला सांगत होता. दुसरा त्याचं कौतुक करत होता. ही फटकेवाली

तर आपल्याला चांगलीच फळलीय. लोक अजिबात प्रतिकार करत नाहीत. गपगुमान काय असेल, ते सगळं काढून देतात. दोघांनी एकमेकांना आपापली आणलेली लुट दाखवली. पळताना त्यांना फटकेवालीच्या रूपात, सगळयांसमोरून गायब व्हायला कार चोरी कराव्या लागत. पुन्हा आपले सर्वसामान्य पोषाख चढवल्यावर, ती कार दुसरीकडे कुठे भलतीकडे सोडून द्यायला दोघे निघाले.

सरला इतर दोघींच्या कानात कुजबुजली. “हे दोघे तर भुरटे चोर आहेत. त्यांच्याकडे पिस्तुलं नाहीत. नुस्ते चाकू, सुरे आहेत. पुन्हा कुठे शोधत बसायचं यांना? चला, बरे चोप देवून सहा सात महिने हॉस्पिटलात पोचवू.”

“मै बनती आज फटकेवाली. असली फटकेवालीचा सामना झाल्यावर दोघं काय करतात देखेंगे.” त्याप्रमाणे सलमा फटकेवालीचा पोषाख चढवून तयार झाली.

साराने नेम धरून बल्बवर बेचकीनं गोटी मारली. बल्ब फुटला. काळोख झाला. दोघा मवाल्यांनी फोनच्या विजेऱ्या पेटवून अदमास घ्यायचा प्रयत्न केला. त्यांच्या प्रकाशझोतात फटकेवाली आली. दोघांनी सुरे परजले. पण त्यावर सपकन

आसूडाचा वार झाला. सुरे गळाले. दोघांच्या हातातले फोन पडले. विजेच्या विझल्या. पुन्हा काळोख झाला.

मात्र थोड्याच वेळात गोदामातला एकूण एक दिवा उजळून निघाला. आणि त्यात दडलेली पंधरा-वीस माजलेल्या गुंडांची टोळी. सलमासकट सारा आणि सरलासुद्धा त्यांच्यासमोर उघड्या पडल्या. इतक्या निर्ढावलेल्या सराईत गुंडांसमोर फार काळ तिघींचा टिकाव लागला नाही. तिघींना धरून बांधण्यात आलं.

मग त्या गुंडांचा म्होरक्या एक वयस्कर टक्कल पडलेला माणूस, त्यांना सामोरा आला. “कमाल आहे बघा. या तीन कवळ्या काकडीसारख्या पोरी, आख्ख्या बॉम्बेच्या अंडरवर्ल्डला संपवायला निघाल्या. भाई वाह! हिंमत तर मानली पाहिजे.”

“वाहवा, तर पापा तुमची करायला पाहिजे. काय सॉलिड सापळा लावलात. शिकार आपणहून गळाच्या मागे चालत चालत जाळयात आली. भाई वाह! अक्कल हो तो माझ्या पपांसारखी.” मनु शर्मा मलमपट्ट्यांनी भरलेल्या चेहऱ्याने तिघींना सामोरा आला.

“मनु तू तर मेला होता?” सलमा चुटपुटली.

“मेल्याची वार्ता पसरते ना, त्या माणसाची जिंदगी अजून वाढते

म्हणतात." मनुनं चाळे केले. "हे काय बघितलं? ॲसिड. खून का बदला खून. ॲसिडचा बदला...." हसत सुटला.

## रवीची नोंदवही : १८ डिसेंबर १९९५

---

*काल रात्रभर घरातली आम्ही सगळीजणं जागत राहिलो. मी, आई आणि बाबा, गंगाबाईला मानसिक धक्का बसला होता. तिचे जुजबी उपचार आम्ही घरीच केले. त्यातून थोडा उतार पडल्यावर, तिने हट्ट धरला की मुलगा घरी एकटा आहे. आपल्याला गेलं पाहिजे. नवऱ्याच्या मृत्यूबद्दल तिनं कसलं आकांड-तांडव वा रडारड केली नाही. तिला त्याच्यापासून*

*सुटकारा हवाच होता का? सांगता येणं कठीण आहे. पोलिसात जायचा विषय तिने काढला नाही. आईबाबांनी सुद्धा काढला नाही. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.*

*आमच्यात पुढे काय करायचं? कसली चर्चा झाली नाही. घरच्या सुनेच्या नावावर गुन्हा नोंदवण्यात त्यांची प्रतिष्ठा आड आली असेल. त्यांच्या मनात काय चालू आहे? मला ठरवता येत नव्हतं. कदाचित छायाचं काय करायचं? सखारामच्या प्रेताचं काय करायचं? हा निर्णय सर्वस्वी माझ्यावर सोपविण्यात आला होता. एका तऱ्हेने तेच योग्य होतं. छाया माझी जबाबदारी होती.*

*छाया काल रात्रभर घराकडे फिरकली नव्हती. बोमाबोईंची फार सय आली की ती राणीच्या बागेत तेवढा काळ मुक्काम हलवी. तिथं त्या प्राण्यांच्या आरड्याओरड्यात, तिला तिच्या जंगलाचा आभास मिळत*

असावा. मी कॉलेजात येणार नसल्याचं कळवलं. प्राचार्यांना वेगळं काही कारण सांगायची गरज पडली नाही. छायाची वाट बघणं भाग होतं. दुपारची जेवणं होण्याच्या आधी ती आली. इथं भूक कोणाला होती?

मी तिला घेऊन वर माझ्या खोलीत गेलो. दार बंद करून घेतली. दार बंद होण्याचा तिच्या लेखी अर्थ होता प्रेम. तशी ती गळ्यात पडल्यावर, मी हळुवार तिचे हात बाजूला काढले.

“छाया, मी तुला परत जंगलात नेऊन सोडणार आहे. आता लगेच थोड्या वेळात आपण निघूया.”

“तू माझ्याबरोबर तिथे राहणार?” ती आनंदली.

“नाही. मला लगेच परत आलं पाहिजे.” मला प्राचार्यांना दोन दिवसात उत्तर द्यायचं होतं. एक दिवस लांबवर तिथे जायला. एक दिवस तिथून परतायला.

“मी तिथे का राहू?”

“कारण तुला तसंच जगायची सवय आहे. इथे तुझी जी कुचंबणा अडचण होते, ती तुला तिथे होणार नाही.”

“तू तिथे नसणार?”

“हो. मला इथं राहून माझी इथली कामं, आईबाबांना बघितलं पाहिजे.” थोडावेळ ती काही बोलली नाही.

“तू मला सोडून देतो?” ती सरळ मुद्द्यावर आली. दोन वेळा तोंडातून शब्द बाहेर पडताना मी परतवले. पण अखेर तिसऱ्या वेळी ते उमटले. ते बोलणं भाग होतं.

*"हो." मी चेहरा कोरा ठेवायचा प्रयत्न केला.*

*"तुला मी आता नको?"*

*"नको." मी निग्रहानं तिच्या डोळ्यांत डोळे लावून बोललो. नाहीतर तिनं ते खरं मानलं नसतं.*

*"कोण पाहिजे? चांदनी?"*

*"नाही. कोणी नको दुसरं." हे मात्र पूर्ण ठामपणे बोलू शकलो.*

*"मी नाही जाणार.' तिनं तितक्याच ठामपणे सांगितलं. तिचा चेहरा साफ पडला होता. डोळ्यात व्याकुळता उतरू लागली होती. "माझं तुझ्यावर प्रेम आहे. मी तुला सोडून राहू शकत नाही."*

*"छाया, तुला गेलंच पाहिजे. तू इथं राहू शकत नाहीस. तुझ्या चांगल्यासाठीच सांगतो आहे." मी समजवायचा प्रयत्न केला.*

*"माझं सगळं चांगलं तू आहेस."*

*"हे बघ छाया, बोमाबोईंचं जगणं वेगळं. इथल्या माणसांचे जगणं वेगळं. बोमाबोईंचे नियम वेगळे. इथले नियम वेगळे. ते तू पाळत नाहीस. त्यामुळे इथल्या लोकांना तू नको. ते तुला याउप्पर इथे राहू द्यायला तयार नाहीत. म्हणून तुला गेलंच पाहिजे."*

*"तू बरोबर ये. मी जाते." तिची ही मागणी पुरं करायचा, मी विचार करू शकत नव्हतो. मला जंगलातलं जगणं जगता येणं अशक्य होतं. तशी इच्छा सुद्धा नव्हती.*

*"मला जंगल नको." मी कबुली दिली. "मी नाही तिथं राहणार."*

*“तू नाही? मी नाही जाणार.”*

*“अगं, तुला कसं समजावू? इथली लोक शिक्षा म्हणून तुला ठार करणार आहेत. तू इथली लोकं ठार केली आहेस म्हणून. जीवाबदल्यात जीव.”*

*“करू दे ठार. मी लढेन.”*

*“इतक्या लोकांशी तू नाही लढू शकत. जगण्याच्या प्रत्येक क्षणी नाही लढत राहू शकत. तू मरणार. मला ते नको. म्हणून तू इथून जा.”*

*“करू दे मला ठार. मी मरणाला भीत नाही. तू नसताना दुसरीकडे राहणं मला नको. इथं तुझ्याबरोबर मरायला मी तयार आहे. आपण लढू.”*

*“मला नाही इतक्यात मरायचं,” छाया इतकी सरळ थेट होती की तिच्याबरोबर बोलताना शब्दांचे भुलभुलैय्या खेळवता यायचे नाहीत.*

*“तू नको मरू. मला मारू देत.” तिच्या या बोलण्यावर मी डोकं गच्च धरून खुर्चीत बसता झालो.*

*“छाया, तू माझा जीव वाचवला आहेस. तुला मी मरायला देऊ शकत नाही. म्हणूनच बोमाबोईंपासून तुला दूर इथं घेऊन आलो होतो. त्यांनी तुला ठार मारलं असतं.”*

*“मी मरायला भीत नाही. बोमाबोईंना सोडून मी तुझ्याबरोबर आले. मला तुझ्याबरोबर राहायचं होतं म्हणून. तुला मी हवी आहे, वाटलं म्हणून. माझा जीव वाचवायला नाही.” तिच्या डोळ्यात अश्रू तरळू लागले. “तुला मी नको होते? मी आले नसते.”*

*यावर मला काहीच सुचेनासे झाले. माझी चहूबाजूंनी कोंडी झाली. स्वतःच्या नेभळटपणाचा स्वतःलाच राग येत होता. छाया माझ्यासाठी सगळंच सोडून आली होती. मी तिच्यासाठी काहीच सोडायला तयार नव्हतो. तिचं माझ्यावर जीवापेक्षाही जास्त प्रेम होतं. माझं तिच्यावरचं प्रेम? मला उत्तर मिळत नव्हतं. माणूस स्वतःवरचा राग दुसऱ्यावर काढतो अशा वेळी. “का? का मारलंस तू सखारामला? गंगाबाईच्या नवऱ्याला? हा सगळा तिढा निर्माणच झाला नसता.”.*

*“सखाराम? गंगाबाईचा नवरा?” छायाच्या चेहऱ्यावर गोंधळल्याचे भाव निर्माण झाले. छायाला अभिनय येत नाही. खोटेपणा जमत नाही.*

*“त्याला मारून, त्याचं मांस खावून, तू त्याला तिथं पुरलास ना?” मी खिडकीतून छायाला ती जागा खुणेनं दाखवली. तिच्या चेहऱ्यावरचा गोंधळ अजूनच वाढला. तसं मी घाईघाईनं जाऊन बाहेरच्या दारावरच्या कॅमेऱ्याने जे रेकॉर्डिंग केलं होतं, ते आणलं. तिला लॅपटॅपवर दाखवलं. छाया बारकाईने ते बघत राहिली. तिच्या चेहऱ्यावरचा गोंधळ आणि आश्चर्य लपत नव्हतं. “मी पुण्याला गेलो, त्याच रात्री तू सखारामला घेऊन आलीस ना?”*

*छायाने मला परत परत ते रेकॉडींग दाखवायला लावलं. मग एकाएकी तिच्या चेहऱ्यावरचा सगळा गोंधळ संपला. तिचा चेहरा रागाने फुलून गेला. अन्याय दिसला की नेहमीच असा फुलायचा तसा. “राहुल धुरंधर” ती रागाने एवढंच बोलली. मला आश्चर्याचा धक्का बसला. छायाच्या बुद्धिमत्तेविषयी मला पुरेशी जाण नव्हती. मी तिला फार कमी लेखत होतो. हे मला जाणवलं. राहुलचा यात काही हात आहे, हे तिला कसं कळलं? की तिच्या अंर्तमनाने तिला ते सांगितलं. निसर्गाच्या इतक्या*

*जवळ, त्याच्याशी तादात्म्य पावून जगणाऱ्या सगळ्या माणसांच्या अंतःप्रेरणा तितक्या तीव्र असतात.*

*“छाया, सखारामचं प्रेत त्या तिथं सापडलंय. तुला तिथं खड्डा बुजवताना आईनं स्वतः बघितलं आहे.” मी बोललो आणि मला बोलल्याचा पश्चाताप झाला.*

*“आई? आई खोटं बोलतेय.” छायाच्या कपाळावरची नस रागाने तडतडली. “द ना आब ऊ ऊ ऐ अवासी ई थॉबे.” ती खोटं सहन करणार नव्हती. “बाबांनीसुद्धा बघितलंय तुला तिथं.” मी आईवरचा आरोप खोडून काढायला पटकन बोलून गेलो.*

*“बाबा खोटं बोलतात. मी विचारते त्यांना.” छायानं रागाने फुत्कार टाकत, आसूड फाडकन हवेवर फडकवला. 'सुईंग' बारीक आवाज हवा चिरत गेला. आसूडाच्या तडाख्यात भिंतीवरची आईबाबांच्या फोटोची फ्रेम उडाली. खाली पडून खळकन् काच तडकली. फोटोचे तुकडे तुकडे झाले. ते बघून मी हादरलो. ही अवस्था आईबाबांची खरोखर होऊ शकणार होती. छाया दार उघडायला निघाली.*

*“थांब, थांब छाया. तू त्यांना काही विचारू नको.” मी मागून तिला थांबवायला जोरात ओरडलो. प्रत्युत्तरात छायानं दाराची खिट्टी उडवली. दार समोर सताड उघडं झालं. माझ्या टेबलचा ड्रावर समोरच उघडा होता आणि त्यात आम्ही संरक्षणासाठी बाळगत होतो, ते रिव्हॉल्व्हर होतं. त्या क्षणी जे सुचलं ते मी केलं. ती आईबाबांपर्यंत पोचणं, म्हणजे मला मोठे आक्रित वाटत होतं. ते रिव्हॉल्व्हर मी उचलून छायावर रोखलं.*

*“छाया आईबाबा कधी माझ्याशी खोटं बोलणार नाहीत. तू त्यांच्याकडे जाऊ नकोस. थांब.” मी खेचलेल्या सेफ्टीकॅचचा आवाज झाला.*

*छायानं वळून माझ्याकडं पाहिलं. तिच्या नजरेत एवढी धुम्मस होती. मला वाटलं ती आता माझ्यावर हल्ला करणार. फाडकन् तिचा आसूड हलला. माझ्या हातातलं रिव्हॉल्व्हर तिनं दूर उडवलं. मग नजर माझ्यावर रोखत विचारलं, “तू मला ठार मारणार?”*

*“हो, तू आईबाबांना काही विचारू नकोस? त्यांना काही करू नको.” धपापत्या छातीनं मी बोललो.*

*“तू मला ठार मारू शकतो.' बोलून ती जायला वळली. मी जाऊन पुन्हा रिव्हॉल्वर उचललं. ते घेऊन बाहेर धावलो, तेव्हा ती जिना उतरत होती.*

*“छाया थांब.” मी ओरडलो. तिनं वळून माझ्याकडे पाहिलं. ती पुन्हा चाबूक फडकावू शकली असती. पण तिनं तसं केलं नाही. मला आव्हान देत ती खाली उतरायला वळली. मी गोळी झाडली.*

-----------------------------------------------

सारा, सलमा, सरला गोदामामध्ये मनु शर्माच्या बापाच्या गुंडाफौजेच्या तावडीत सापडलेल्या होत्या. मनुने त्यांना ॲसिडची धमकी दिली तरी त्या डगमगल्या नाहीत.

“ज्या दिवशी आम्ही छाया आंग्रे बनून, बदमाषांचा सामना करायला उतरलो होतो, त्याच दिवशी एक ना एक दिवस असा सुद्धा येणार, याची पक्की खूणगाठ मनाशी बांधून होतो.”

“हर रोज जीत मिलेगी, ऐसी नसीबची सिकंदर हम नाही. यह आम्ही समजून होतो. कभी तो हार भी खानी पडती हैं.”

“फायट मध्ये डेथ पन होऊ शकते, आम्ही रेडी आहोत. यू रास्कल, करून घ्या काय करायचं ते. आम्ही नाही भीत.”

“अरे, बनवारी, सुना क्या? लौंडी म्हणते करून घ्या, काय करायचं ते. बोल तुझे क्या करना, हिच्यासोबत?” मनु शर्मा अॅसिडची बाटली खळखळवत तिघींभोवती नाचायला लागला.

“भाय, मेरे खयालमा तो यह, गॅन्ग रेपका मामला बनतो.” फटकेवालीची डुप्लिकेट बनलेला गणंग बोलला.

“हा बनवारी हा. बोल या कोवळया काकड्या तुला कश्या पायजेल. आधी अश्या बिना मीठमसाला मारके, की जरा मीठ नी अॅसिड मारके?” मनु शर्मानं जवळ येत बाटलीतला एक एक तेजाबाचा थेंब तिघींच्या उघड्या अंगावर सांडला. चर्र-चर्र आवाज करत चामडी जळाल्याचा वास सुटला. किती तरी वेदना झाल्या, तरी त्यातल्या एकीने सुद्धा 'आह' केलं नाही.

“अरे, देखो लाला. मर्दको दर्द नही होता. सुना था. पण औरत को दर्द नाही होत. असा अजुबा बघितला होता काय?”

“ऐ भुक्कड, नौटंकी बंद कर. फालतू तमाशा नको, मर्दची अवलाद है, तो हममेसी किसी एक बरोबर मुकाबला करके दिखा. बीस पाळलेले कुत्ते घेऊन जादा उडू नको.”

“अरे, इतनीभी क्या जल्दी रानी? अजून तर तुम्हा लोगला खूब तडपाना बाकी है. आसानसी साधी मौत नाही देणार मनु तुला. एक एक खून का घूट पिला पिला के मारणार. हां. लेकिन जोपर्यंत ही मखमली चामडी सलामत आहे, आमच्या दोस्ताना तिचा पुरेपूर मजा घेऊ दे.” मनु दूर सरकला. ओरडला, “साथीओं गॅन्ग रेप शुरू.” तसे ते सगळे गुंड त्या तिघींच्या अंगाशी येऊन झोंबू लागले आणि तिघींचे कपडे फेडू-फाडू लागले.

“शर्माजी मुझे बचाओ.” एक चष्मेवाला टकल्या म्हातारा धावत धावत तिथे आला. त्यामुळे गुंडांच्या कुकर्मात जरा खंड पडला. “फटकेवाली माझ्या मागे लागली आहे.” त्या माणसाच्या काळया कोटावर आसूडाच्या फटकारण्याने चीर गेली होती. पाठ रक्ताळली होती.

“वकिलसाब, फटकेवाली बनून सोंग वठवणाऱ्या पोरी तर इथं आहेत. शायद यांच्या आणखीन कोणी मैत्रिणी आहेत. कोई वांदा नही.” मनुच्या बापानं दोन गुंडांना खूण केली. “लाला और प्यारे जा आणि त्या लौंडीला पकडून घेऊन या. कम्बख्त! या लौडीनी तर सगळा खेळ करून टाकलाय. न जाने आहेत तरी किती?

इसी कारण मी हमेशा सांगत असतो. लौडीको पढानेका नही. सीखकर तो इनके दिमागची सिट्टी बजने लगती है.”

पुढे अजून काही हालचाल करायची संधी त्या सगळयांना मिळू शकली नाही. सगळे दिवे अचानक पुन्हा विझले. एक गोडसर वास हवेत फैलावू लागला. आपापल्या खिशातल्या फोनच्या विजेऱ्या पुन्हा एकवार सगळया गुंडांनी पेटवल्या. गोदामाच्या मधोमध एका दिव्याच्या वायरवर हवेत तरंगल्यासारखी फटकेवाली उभी होती. फटाफट मनुच्या बापाने तिच्यावर पिस्तुलाचे बार टाकले. तिला काही झालं नाही. ती तशीच तरंगत राहिली.

साऱ्यांचे श्वास जड होऊ लागले. कुठूनतरी फार लांबून येत असल्यासारखा घुमत घुमत तिचा आवाज ऐकू आला, “माझं नाव छाया आंग्रे. आणि काम तुमच्यासारख्या बदमाषांचा काटा ढिला करायचं. तहान लागलीय मला ताज्या लालभडक रक्ताची तहान.” तिचं विखारी हास्य कढत शिसं ओतल्यासारखं सगळयांच्या कानात शिरलं.

“तू कोणी पण अस. माणूस नाय तर भूत. स्साली रांड आज तुझा खेळ खतम.” म्हणत मनु शर्मानं ॲसिडची बाटली तिच्यावर फेकून मारली. काडकन् हवेत तिचा आसूड कडाडला. बाटली त्याच्या डोक्यावर तिनं हवेतच फोडली. मनुच्या अंगावर ॲसिडचा वर्षाव झाला. त्याच्या किंचाळयांनी सगळयांना शहारे फोडले. सपसप तिचे वार हवेतच तरंगल्यासारखे उडत गुंडांच्या अंगावर पडायला लागले.

कोणाला तिचा प्रतिकार करता येईना. भोवळ येऊन जो तो खाली गार होऊ लागला.

तो सारा देखावा बघता बघता सारा, सलमा, सरला सुद्धा भोवळून खाली पडल्या. अर्धवट ग्लानीत काही सुचेना. कानावर फक्त छायाचं खदखदा हसणं तेवढं शिरत राहिलं.

## रवीची नोंदवही : १७ जानेवारी १९९६

-----------------------------------------------

*छायाच्या खुनाच्या संदर्भात माझ्यावरील खटल्याची सुनावणी अखेरच्या टप्प्यात आली होती. मी जे घडलं, जसं घडलं, सरळ स्पष्ट सांगितलं होतं. मात्र माझ्या वकिलांना ते स्वीकार्य नव्हतं. ते बचावाचं अखेरचं भाषण करायला उभे राहिले.*

*"युवर ऑनर, एक माझे अशील श्री. रवी आंग्रे यांनी स्वतःच दिलेला कबुलीजबाब सोडला, तर सरकारी पक्षाकडे इतर कोणताही सबळ असा पुरावा नाही, ज्याच्या योगे म्हणता येईल की माझ्या अशिलाने, जाणूनबुजून थंड डोक्याने सौ. छाया आंग्रे उर्फ फटकेवाली, या आपल्याच बायकोची हत्या केली.*

*श्री. रवी आंग्रे हे अतिशय प्रतिष्ठीत, सभ्य, विद्वान असे समाजातील आदरणीय व्यक्ती आहेत. ते ज्या महाविद्यालयात अध्यापन करतात, तिथल्या प्राचार्यांच्या साक्षीने हे स्पष्ट झालेले आहे. तर दुसरीकडे मयत फटकेवाली ही कोण होती? अंदमानच्या जंगलातील एक नरभक्षक रानटी तरूणी. जी आपल्या सभ्य सुसंस्कृत समाजाचे कोणतेच रिती-रिवाज, कायदे-नियम पाळत नव्हती. तिच्या जंगली जमातीनेसुद्धा तिला बहिष्कृत केले होते इतकी स्वैर आणि क्रूर वृत्तीची.*

*श्री. राहुल धुरंधर यांच्या साक्षीतून आणि त्यांनी सादर केलेल्या कॅमेरा रेकॉर्डीगच्या चित्रफितीतून, त्या रानटी स्त्रिचा हिडीस पाशवीपणा*

आपल्या नजरेस आलाच आहे. आजच्या काळात आपल्या या शहरात, असे सैतानी कृत्य कोणी करू शकेल, यावर विश्वास बसणं कठीण. माणसाने माणसाला ठार मारून, तसंच खाणं? उच्चार करताना देखील माझ्या सगळ्या अंगावर शहारा येतो आहे. पण ते किती सत्यं आहे, याचा ढळढळीत पुरावा आपल्यासमोर सादर झाला आहे. ते अर्धवट खाल्लेले, सडलेले प्रेत सापडलेले आहे.

आपल्या अनुपस्थितीत आपण जिला बायको मानतो, तिनं केलेलं हे कृत्य जेव्हा नवऱ्याला कळतं, तेव्हा काय होतं? अश्या सुसंस्कृत माणसाच्या मनाला किती प्रचंड धक्का बसतो, याची कल्पना करा. तो घरी येतो. चौकशी करतो. त्याला एकामागोमाग पुरावे सापडतात. बायको जेव्हा घरी येते, तेव्हा तो तिच्याकडे जाब मागतो. अशावेळी ती सैतानी बायको त्याला उलट धमकावते. कोणी चुगली केली माझी? तुझ्या आईवडिलांनी? चल, मग त्यांनाच संपवते. त्यांनाच खाऊन टाकते.

आणि ही अघोरी राक्षसी स्त्री त्याप्रमाणे करायला तत्पर होताच, तिच्या नवऱ्याकडे तिला थांबवण्याचा एकच मार्ग शिल्लक राहतो. बंदुकीची गोळी. स्वतःला, स्वतःच्या आईवडिलांना आणि ती त्यापुढे जगात घडवणार असलेल्या निरपराध बळींना वाचवण्यासाठी, तो तिला बंदुकीने गोळी घालतो. मिलॉर्ड,गोळी घालणं हा तिला थांबवायचा एकमेव उपाय होता का?

आपण इन्स्पेक्टर कपूर यांची साक्ष ऐकली आहे. ती अतिशय खतरनाक आणि ताकदवान बाई होती. तिच्यात सैतानी संचार असल्याची बोलवा आहे. तिने केलेल्या अचाट गोष्टींचे किस्से ऐकले, तर या वैज्ञानिक युगात देखील या गोष्टीवर, क्षणभर विश्वास ठेवावासा वाटून जाते. श्री.

*रवी आंग्रे यांनी फटकेवालीचा वध करून, आपल्या समाजावर लाखो उपकार करून ठेवलेले आहेत. ही गोष्ट सरकारी फिर्यादी पक्षदेखील नाकारणार नाही.*

*मात्र प्रेम हे मोठं अजब रसायन आहे. कोणाचं कोणावर कशासाठी प्रेम बसावं, ही अतर्क्य लीला आहे. न पेक्षा श्री. रवी आंग्रे यांच्यासारख्या सुसंस्कृत भल्या पुरूषाचं प्रेम, फटकेवालीसारख्या रानटी सैतानी स्त्रिवर बसणं, अविश्वसनीय गोष्ट आहे. त्या प्रेमापोटी ते तिला अंदमानच्या जंगलातून इथे घेऊन आले. सारा त्रास सोसून तिला आपल्या घरात आश्रय दिला. तिच्याशी लग्न लावून या समाजाला तिचा स्वीकार करायला लावला. तेव्हा तिचा अशा कारणासाठी आणि तऱ्हेने, स्वतःच्या हाताने केलेला वध, त्यांच्या मनाला झेपला नाही आहे. एका भल्या इसमासाठी तर कोणाचीही कोणत्याही कारणाने हातून घडलेली हत्त्या, विलक्षण क्लेशकारी असते. मग ही तर त्यांची प्रिय पत्नी होती. त्यांना हा धक्का पेललेला नाही. त्यांची मानसिक स्थिती स्थिर नाही आहे. सरकारी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तसे दिलेले प्रमाणपत्र आणि साक्ष आपल्या समोर आहे.*

*माझे अशील स्वतःच्या आणि जगाच्या संरक्षणासाठी केलेल्या या हत्येला, खून मानून स्वतःला शिक्षा करून घेऊ इच्छितात. आत्मक्लेष साहू इच्छितात. पण युवर ऑनर, एका सुसंस्कृत आणि सभ्य समाजाचा वारसा चालवणाऱ्या, आपल्या सगळ्यांचेही त्यांच्या प्रती काही सुसंस्कृत कर्तव्य आहे. उत्तरदायित्व आहे. मी कोर्टाला विनंती करतो की सर्व गोष्टींचा साधक-बाधक विचार करून, माझे अशील श्री. रवी आंग्रे यांना खुनाच्या आरोपातून निर्दोष सोडण्यात यावे."*

*कोर्टाने माझ्या वकिलांचे म्हणणे अजिबात खळखळ न करता मान्य केले. मला छायाच्या खुनाच्या आरोपातून निर्दोष सोडले. छायाला*

*फटकेवालीच्या स्वरूपात जो मान लोकांच्या मनात होता, तो सारा राहुल धुरंधरने सादर केलेल्या चित्रीकरणाने नष्ट केला. आदराची जागा तिरस्काराने घेतली. ते चित्रीकरण बनावट आहे. माझ्या मनाची खात्री झाली आहे.*

*छायाने खरोखर सखारामला मारून खाल्ला असता, तर ते कधी माझ्यापासून दडवलं नसतं. पण ही बनावटगिरी कशी सिद्ध करावी मला कळत नव्हतं. कोणी तरी छायाचं सोंग घेऊन सर्वांना बनवलं होतं. मला, आई, बाबांना, कॅमेऱ्याला, सगळ्यांना. पण कोणी? माझ्या लक्षात येत नव्हतं. छायाने लगोलग राहुलचं नाव घेतलं होतं. पण ते सोंग पुरूषाने वठवलेलं नव्हतं. ती स्त्रीच होती. पण कोण?*

*मला घरी आणून सोडण्यात आलं. आई बाबा दारापुढं झाले. भोलाराम दार उघडून बाहेर आला. कोपऱ्यापाशी उभा राहिला. संध्याकाळ उलटून गेली होती. हिवाळ्याचे लहान दिवस होते. दिवेलागण झाली होती. आमच्या दाराच्या लगतच्या दोन दिव्यांपैकी एक निकामी झाला होता. उजव्या बाजूचा. डाव्या बाजूच्या दिव्यामुळे दारात उभ्या माणसांच्या सावल्या उजव्या बाजूला सरसरत होत्या. कॅमेरा दाराच्या मध्यभागी लावलेला उंचावर. आईबाबा दारातून आत गेले. भोलाराम माझ्या स्वागतासाठी तसाच दाराबाहेर थबकून राहिला. माझ्या मनःचक्षूसमोर दुसरं काही दृश्य उभं राहिलं. बाकी कोणाला माझ्या मनात काय चालू आहे? याचा सुगावा न लागू देता मी घरात शिरलो.*

भोलारामच्या विचारपुसीला मोघम उत्तर देऊन, नंतरचे सारे घरगुती सोपस्कार उरकत राहिलो. जेवल्यावर माझ्या खोलीत गेलो आणि लॅपटॉप उघडला. छायाला काय दिसलेलं जे मला दिसलं नव्हतं? मला थोडा अदमास लागत होता. मी छायानं सखारामला दारात ओढत आणलं, आपटलं, त्याचं चित्रीकरण पुन्हा तपासू लागलो.

तिथं तीन सावल्या होत्या. छायाची आणि सखारामची सावली हलत होती. तिसरी स्थिर उभी होती. भोलाराम उभा होता तिथं. कॅमेऱ्याच्या कक्षेबाहेर कडेवर. फक्त एकदा ती सावली हलली. तिच्या केसांची पोनीटेल उडालेली लक्षात आली. राहुल क्वॉन ताई वॉनच्या मार्शल आर्ट केंद्राचा सदस्य होता. त्याची ती तशी चिनी पद्धतीची वेणी घातलेली असे. बाकी त्या सावलीचा मजबूत बांधा स्पष्ट जाणवत होता. बे एके बे गणित मांडायला छायाला इतकं चांगलं जमलं. मला का नाही जमलं?

हे कोर्टात काय? प्राचार्य श्रीनिवासांसमोर देखील सिद्ध करणं सोप्पं नव्हतं. त्यांनी तिथं तिसरी कोणी व्यक्ती उपस्थित होती, हे रडत रडत मान्य केलं असतं. पण तो राहुल धुरंधर होता, हे नस्तं स्वीकारलं. त्याला संशयाचा पूर्ण फायदा दिला असता. हा उलगडा झाल्याचा मला काही आनंद झाला का? नाही. माझा मनःस्ताप अजून वाढला. माझ्या मनाची बोच अजून वाढली. छाया निर्दोष होती. आणि हे मनोमन ठाऊक असून, मी तिला ठार केलं होतं. भीतीच्या आहारी जाऊन.

घराच्या प्रत्येक कोपऱ्या कोपऱ्यातून छायाच्या आठवणी उसळी घेऊन येतात. प्रत्येक वस्तूतून तिची एखादी गोष्ट, हालचाल, गंमत डोळ्यापुढे नाचायला लागते. तिचे भास होत राहतात. रात्री झोपेत चादरीच्या शेवाने का कशानं नाकाला गुदगुदल्या झाल्या. मी झोपेतच

*चाळवलो, "छाया, तुझे केस माझ्या नाकात घालू नकोस." तिला ओरडलो. ती आता नाही. भान येताच दचकून उठून बसलो.*

*माझ्या खोड्या काढण्यात तिला भरपूर मजा वाटत असे. मी तिला जर कधी आमचं शिजवलेलं अन्न, एखादा खाद्यपदार्थ खायचा आग्रह केला, हट्टाने भरवला, तर झालं! तिनं एखादा प्राणी सोलून आणून, त्याचं कच्चं मांस माझ्या तोंडात घुसवलंच. नाक दाबून तोंड उघडायला लावण्यात ती पटाईत होती. मग आमची लहान मुलांची चालते तश्शी मारामारीच व्हायची. थेट पुरूषी ताकदीशी तिचा पाड लागायचा नाही. ताकदीशी टक्कर देता यायची नाही. पण मग प्रतिस्पर्ध्याचं लक्ष आणि ताकद विचलित करायचे, तिला हजारावर तरी पैतरे-युक्त्या ठाऊक होत्या.*

*भोलारामला आज सोलाची कढी करायचं का सुचावं? त्या नारळाच्या दुधाच्या वासानं, असं वाटायला लागलं की ती इथंच अगदी जवळ आसपास घुटमळतेय. मी का तिच्याबरोबर जंगलात जायला तयार झालो नाही? तिच्याशिवाय मला सुद्धा जगता येणार नाही, क्षणभर चैन पडणार नाही, मला मूर्खाला का आकळलं नाही?*

*मी आता आम्हा दोघांचंही जीवन गमावून बसलोय. लवकरच मी तिच्याकडे जाईन. त्या मृत्यूपलीकडच्या जगात. असं ठरवल्यावर मला खूप शांत शांत वाटायला लागलं. पण आधी तिचं सोंग कोणी उठवलं होतं, तिचा छडा लावून, केल्या अन्यायाचं-कारस्थानाचं माप पुरेपूर तिच्या पदरात घालून. सावली. तिच्या सावलीवरून मी तिचा माग घेईन.*

-----------------------------------------------

सारा, सलमा, सरला आपल्या हॉस्टेलच्या रूमवर बिछान्यात आराम करत पहुडलेल्या होत्या. तिघींच्या अंगावर भरपूर मलमपट्ट्या होत्या. सरलाच्या हाताला प्लॅस्टर होतं. त्याच्यावरून हात फिरवत ती सुस्कारली. “चला बाई, आज संध्याकाळी एकदाचं हे बॅन्डेज खुलेल. एकदाची या अवघडलेपणातून सुटका होईल. महिना झालाय बांधून. जीव वैतागलाय अगदी.”

“ओफ हो! माझ्या गालावर या जखमेचा परमनन्ट मार्क पडला नाही म्हणजे निभावलं. मार्केट डाऊन होईल ना माझं?” सारानं आपल्या चेहऱ्यावरच्या मलमपट्ट्या आरश्यात तपासल्या.

“आंबट तेरे ये आंबटषौक कधी पुरे होणार? अल्ला जाने. मला परेशानी आहे, माझी टांग पहले जैसी कंधेसे भी उपर जाएगी भी की नाही?” सलमानं उभं राहून तंगडं वर न्यायचा प्रयत्न केला. उजवी लाथ वर गेली. डावी वर करताना उईमाँ करून जांघेतली कळ जिरवत खाली बसती झाली. “बायी टांग तो काम देती आहे. पर दायी टांगचं खरं नाही.” मग बुचकळयात पडल्यासारखी विचारती झाली, “यार क्या सचमुच ती छाया होती? यानी के भूत?”

“तिनंच आपल्याला बेशुद्ध करून, बाहेर सुरक्षित जागी आणून टाकलं असेल का?”

“गॉड! आपण जर त्या अड्ड्यावर तश्याच अनकाँशस पडून राहिलो असतो ना, तर त्या सगळ्या रास्कल गुंडांबरोबर आगीत जळून मेलो असतो. छायानेच त्या सगळयांना किल करून, मग बर्न करून टाकलं असणार.”

“यानी की सारा सबूत मिटवला.”

“आणि आपल्या फटकेवालीच्या गुपितांचे माहीतगारसद्धा!”

“मगर वो आपल्याला फिरसे कभी भेटली का नाही?”

“ती फक्त बदमाषांच्या मागावर त्यांनाच भेटत असेल.”

“दॅटस् वंडरफुल. बेस्ट फॉर अस. आता आपल्यालाच सगळया गुंडांना लाईनमध्ये आणायला, हातात चाबूक घेऊन, लाईफची रिस्क घेऊन, छायाचं सोंग आणायला नको. द ओरिजिनल छाया आंग्रे, विल अॅक्ट हर ओन पार्ट. आपलं लाईफ रेग्युलर बायकांसारखं जगायला आपण फ्री झालो.”

“मगर कुछ कुछ बाते समजत नाहीत. अगर गौरसे सोचो तर एकमेकांशी जुळत नाहीत. अगर छाया फिरसे जागनेवाली होती, तो हम तिचा हुलिया लेके चलनेसे पहले कुठे होती? आणि अब कहाँ गायब झाली आहे? गये महिना तो उसकी काहीच खबर नाही आली.”

“लेट इट गो फ्रेंड. आपल्याला तेव्हा जसं वाटलं, सुचलं, तसं आपण केलं. जमलं तेवढं केलं. पुरा लाईफ काय असंच वेस्ट करायचं? कायम लाइफ रिस्कमध्ये फुकायचं? आपल्याला आपली म्हणून काय, स्वतःची प्रायव्हेट लाईफ आहेत का नाही? घर बसवायची, मुलंबाळं, संसाराची ड्रिम्स आहेत की नाही? मरायच्याच होतो. मिरॅकल होऊन वाचलोत. आय से इनफ इज इनफ. नो मोअर फटकेवाली.”

“श्शू.. कोणी तरी येतंय. मला चाहूल लागतेय.”

“अमा यार, तुझी ही आदत आता मरने तक सुटणार नाही. हमेशा चौकना! अच्छाही आहे.” तिघी स्वतःला हसल्या. दारावर ठकठक झाली.

“आय टेल यू, या स्टाईलवरून, हा तो इन्स्पेक्टर बिलिमोरिया आहे.” सारा उठून दार उघडायला गेली. दारात तोच उभा होता. डोळे आणि खांदे उडवत सारानं मैत्रिणींना 'बघा, मी सांगितलं नव्हतं?' दर्शवलं.

“व्वा! मी जेव्हा येतो तेव्हा तुम्ही तिघी एकत्र भेटता. माझं काम सोप्पं होतं.” पोलिसवाला बोलता झाला. “बरं, तुमचा हॉस्टेलच्या बाहेर जाणारा सगळा वेळ, तुम्ही कसा घालवता, पैसा कुठून कसा? आणता. याची पटण्याजोगी खात्रीची उत्तरं, तुम्ही तयार करून ठेवली असतीलच. तुमची बाजू भरभक्कम करून ठेवली आहात ना?”

“साहेब, आम्ही महिनाभर जागेवरच आहोत.” सरला कडवटपणे उत्तरली, “तुम्ही आमचा कसला संशय घेताय?”

“आणि त्याआधी काय करत होतात? सेल्सगर्ल म्हणून काय विकत होतात?”

“आमचे जॉब गेले. फ्रेक्चर झाल्यावर, फिरता येत नसल्यावर, हूज गोईंग टू पे अस? जगात कोणी कुणाला फुकट पैसे घालत नाही सर.” सारानं आपले हात नकारार्थी त्याच्या पुढ्यात नाचवले.

“तिघींना एकदम मार? काय झालं? कसं झालं?' इन्स्पेक्टर गालाला हात लावत आश्चर्य करता झाला.

“साहब, ॲक्सिडंट....” सलमा बोलू जात होती, तोच सरलानं तिला हाताने थांबायला खुणावलं.

“मी सांगते साहेब, सगळं खरंखुरं.” बाकी दोघींनी डोळे मोठे करून तिच्याकडे पाहिले. डोळे मिचकावून सरलानं त्यांना आश्वस्त केलं. “आम्हाला फटकेवालीविषयी जाम कुतुहल होतं. एक दिवस आमच्या समोरच लवलेनमध्ये एका प्रेमी युगुलाला तिने लुटलं. गाडी पळवली. आम्हीही उधारची मागून गाडी घेऊन तिचा पाठलाग केला. बंदराकडच्या एका मोठ्या गोदामात ती शिरली. तिच्या मागे आम्हीही मूर्खासारख्या आत शिरलो. पंधरा-वीस गुंडांनी आम्हाला घेरलं. ते मवाली फटकेवालीचं सोंग घेऊन लोकांना लुटत होते. त्यांनी आम्हाला छळलं. आम्हाला ठार मारणार होते. पण खऱ्या फटकेवालीनं येऊन आम्हाला वाचवलं. ती छाया आंग्रेचं खरंखुरं भूत होती. गुंडांनी तिच्यावर बंदुकीच्या अनेक गोळया चालवल्या. तिला काही झालं नाही. गुंडांच्या मारामुळे आम्ही अर्धवट शुद्धीत होतो. पुरते बेशुद्ध झालो. शुद्धीवर आलो, तेव्हा गोदामापासून लांब एका झाडाखाली पडलो होतो. गोदाम जळत होतं. आम्ही उठून सरळ खोलीवर कसेबसे आलो. तेव्हापासून गुंडांच्या मारामुळे झालेल्या दुखापतींनी महिनाभर जागेवर आहोत.”

“भूत? छाया आंग्रेचं भूत? मी या गोष्टीवर विश्वास ठेवेन, असं तुम्हाला वाटतं का?” इन्स्पेक्टर कुजकट हसला.

“बघा साहेब, म्हणूनच आम्ही पोलिसांना काही सांगायच्या आणि कळवायच्या भानगडीत पडत नाही. खरं सांगितलेलं त्यांना पटतच नाही. उलटे आम्हालाच घेरायला बघतात.” सरला कावली.

“अच्छा! फटकेवालीच्या पाठलागावर कार मागून घेऊन जाणाऱ्या तरूणी, म्हणजे तर बऱ्याच धाडसी तरूणी म्हणायला हव्यात. तिला तुम्ही पाहिलं असेलच. कशी दिसते ती?” पोलिसवाल्याला कुतुहल जागलं.

“वेल यू सी, तिच्या अंगावर सगळीकडे रंगवलेलं आहे. पांढऱ्या रंगाच्या रेषा, काळ्या रंगाने मधला भाग भरलेला, लालचुटुक ठिपके. चित्रविचित्र आकृत्या, फनी शेप्स काढलेले आहेत. हेअर स्टाईल म्हणजे केसांचा डोंगा बांधलेला होता. त्यात हाडं घुसवलेली होती. गळयात, हातात, पायात मण्यांच्या माळा घातलेल्या होत्या. माळांमध्ये नखं घुसवलेली होती. तिचे डोळे लाल लाल होते.” सारा चटपटीत, वर्णन करण्यात रममाण झाली.

“लाल डोळे? म्हणजे बुब्बुळं लाल की डोळयांच्या बाहुल्या लाल म्हणायचं आहे तुम्हाला?” इन्स्पेक्टरला शंका वाटली.

“बुब्बळं. रागामुळे रक्त साकाळलेली.” सरलानं साराला बोलू न देता, आधी उत्तर पुढे सरकवलं. पोलिसवाल्यामागून डोळयांनी दटावलं. 'काय पण लपेटू नको.'

“म्हणजे ती नेमकी कशी दिसते? याचं चित्र तुम्हा तिघींच्याही डोळयांसमोर स्पष्ट आहे.” पोलिसवाल्यानं गळ टाकला. तिघींनी माना डोलावल्या. थोड्याशा

फिकीरीने. “हे बघा. म्हणजे हे असंच काहीतरी का? हा तिचा पोषाख वाटतो का?” बिलिमोरियाने एक कागदी गुंडाळी पुढे केली. “घ्या ना, उघडून बघा.”

त्याच्या आग्रहास्तव सरलानं ती गुंडाळी हातात घेवून उघडली. आतला काळा-पांढऱ्या-लाल रंगाचा पोषाख दिसताच साराच्या तोंडातून शीळ निसटली. सलमाच्या तोंडातून अल्ला निघालं. सरलाच्या तोंडातून अय्या. हा त्यांनीच बनवलेला पोषाख होता. गुदामाच्या बाहेर शुद्धीवर आलेल्या, तेव्हा सलमाच्या अंगावरून गायब झालेला. “उसीकाच लगता. हा कुठे मिळाला तुम्हाला?” सलमानं तो उघडून अंगाला लावून बघत विचारलं.

“इन टॅट गोडावून.” सारा चुकचुकली.

“नाही. फटकेवालीनं स्वतःच तो उतरवून दिलाय.” पोलीस बोलला.

“आम्ही नाही समजलो.” तिघींच्या तोंडातून एका वेळी एका सुरात शब्द बाहेर आले. त्या एकमेकांकडे गोंधळ आणि शंकेने पाहू लागल्या.

“तुम्ही हा घालावात आणि तिचं काम पुढे चालवावं, अशी तिची इच्छा आहे.”

“आम्ही?" पुन्हा एकाच वेळी एका सुरात.

“तुम्ही जेव्हा मनु शर्मावर ॲसिड फेकलंत, तेव्हा फक्त तो बेरका पत्रकार तिथे होता असं नाही. मी सुद्धा मनु शर्माच्या पाळतीवर होतो. त्याने सुमनवर ॲसिड टाकलं हे नागवं सत्य समोर असून, पूर्ण माहीत असून, काही करता येत

नव्हतं. तक्रार नाही, साक्ष नाही. पुरावा नाही. मला हात चोळत बसावं लागलं होतं. ते पुरावे मिळवायला मी मनु शर्माच्या मागावर होतो. याच प्रकरणाच्या बाबतीत नाही, इतर अनेक बदमाषांच्या प्रकरणात, माझे हात असेच बांधलेले असतात. किंवा पैसे खाऊन माझे वरिष्ठ बांधून घालतात. तीन वर्षे ब्लॅक कॅट कमांडोचं खडतर प्रशिक्षण घेतलेल्या, माझ्यासारख्या माणसाची कर्तबगारी आणि ध्येयनिष्ठा इथं शब्दशः कुजवली जाते. ही बाजारबुणगी मला आपल्या बोटांच्या इशाऱ्यांवर नाचवतात. अनेक वेळा नोकरीला लाथ मारून बाहेर पडावं असं वाटायचं. पण माझे गुरू मला रोखायचे. जर कायद्याच्या रक्षकाचं काम करायला, माझ्यासारखी प्रामाणिक माणसं तिथं शिल्लक राहिली नाहीत, तर तिथं सगळे हे असे भक्षक येऊन बसणार. मग तर पुरते अराजक माजेल. जे मी करू शकत नाही, ते तुम्ही करू शकाल."

"मगर आम्हीच का?" सलमा साशंकली.

"त्या दिवशी मनु शर्माला तुम्ही जो धडा शिकवलात, तो बघितल्यावर मला हा वेगळा मार्ग सापडला. जिथे आमचे हात बांधलेले असतात, तिथे तुमचे हात काम करू शकतात. म्हणून मी तुमचं गुपित उघडं पाडलं नाही. तुमचं काम तुम्हाला करू दिलं आणि तुम्ही माझ्या कल्पनांच्या पार, अपेक्षांच्या पार जाऊन यश मिळवलंत. रांगडदादाची टोळी, स्टारखान, आमदार रावजी. जणू बिमाबाप्रमाणेच तुम्हाला सुद्धा मर्यादा नव्हत्या. भीतीची ग्रंथीच नाही शरीरात, मेंदूत."

“ओ नो! आम्हाला खूप खूप लिमिटेशन आहेत. आम्ही मनातून खूप खूप भिऊन असतो. अॅट मोमेंट जाम पॅनिक असतो. आदरवाईज आम्ही मनु शर्माच्या बापाच्या ट्रॅपमध्ये फसलो नसतो. वुई आर बट ह्यूमन. आमच्याकडून भरपूर चुका झाल्यात.”

“हो, मनु शर्माला फटकेवालीनं ठार केलं, अशी बातमी पसरली, तेव्हा मला देखील आधी वाटलं, हे तुमचंच काम. पण मनुची बॉडी मिळाली नाही. त्याच्या बापाच्या लबाड चेहऱ्यावर कुठे दुःखाचा मागमूस दिसेना. तसा मला संशय आला. मी माझे खबरी त्याच्या मागे लावले. मनु जिवंत होता. मनुच्या बापाने आणि त्याच्या गुंडा फौजेने गोदीतल्या गोदामाकडे धाव घेतल्याचं कळल्यावर मी सतर्क झालो. तिथे वेळेत पोहोचलो. हे आपल्या सगळयांचं सुदैव. फटकेवालीचं सोंग घेऊन मीच तुमच्या मदतीला आलो.” बिलिमोरीयानं छायाच्या भुताचं रहस्य उलगडलं.

“पण त्या सगळयांनी झाडलेल्या गोळया? त्या सगळयांची पिस्तुलं काही नकली असणं, बदलणं शक्य नाही.” सरलाची शंका.

“हो. पण मी तयारीने आत बुलेटप्रुफ कवच घालून आलो होतो ना. ते सगळे तुमच्यात व्यस्त होते. मी दाराने आत शिरलो. तरी कोणाच्या लक्षात आलं नाही. त्या गोदामात क्लोरोफॉर्मचे आणि इतर रसायनांचे डबे ठेवलेले मला सापडले. मी त्यांचा वापर करून घ्यायचं ठरवलं. क्लोरोफॉर्म मोकळा केला. तो वायू हवेपेक्षा

जड असल्याने जमिनीलगत पसरला. म्हणून मी स्वतःला शुद्धीत ठेवण्यासाठी, वरच्यावर वायरला लटकत तरंगत राहिलो.”

“त्या सगळयांची तुम्ही जान घेतलीत?”

“त्याशिवाय इलाज नव्हता. त्यांनी तुम्हाला जवळ जवळ ठार मारलं होतं. याआधी किती जणांचे खून पाडले असतील आणि पुढे किती जणांचे खून पाडणार होते. या जर आणि तरला काही अर्थ नसतो. हा खेळ कच्च्या दिलाने आणि हळव्या मनाने खेळता येत नाही. इथं फक्त मरण्याचीच नाही, तर मारण्याचीही तयारी ठेवावी लागते. मारा नाहीतर मरा. लढाईचा हाच एक नियम असतो. मला वाटतं तो मी तुम्हाला नव्यानं शिकवायला नको. तुम्ही तो आधीच शिकला आहात.” पोलिसवाल्यानं सलमाच्या डोळयात डोळे रोखले.

“हा.” सलमानं कबुली दिल्यावरच त्यानं ती चौकस नजर तिच्यावरून हटवली.

“आता मी जो प्रश्न विचारतो त्याचं खरंखुरं उत्तर द्या. आपण यापूर्वी खेळलोय तशी लपाछपी नाही कामाची. तुम्ही मनु शर्मावर ॲसिड फेकताना, नेमकं फटकेवालीचं रूप का घेतलंत? तिची माहिती तुम्हाला कुठून मिळाली? तिला मरून आणि इतिहासजमा होऊन, आज वीस-बावीस वर्षे झालीत.” बिलिमोरीयानं रहस्याच्या मूळ गाभ्याला हात घातला.

“आणि तुम्हाला बिमाबा हे नाव कसं ठाऊक? आधी तुम्ही ते बोलण्याच्या ओघात उच्चारलंय.” सरलानं प्रतिप्रश्न केला.

"या तो दुनिया उसे फटकेवाली म्हणून ओळखते. या तो छाया आंग्रे म्हणून."

"आय थिंक, तुम्ही तिला आधी पाहिली आहे. यू नो हर वेल."

इन्स्पेक्टर बिलिमोरियाने हसत हसत हात पराभव झाल्यासारखे वर केले. "मी सपशेल शरण आहे तुम्हाला. तुम्ही बरोबर ओळखलंत. मी तिला जवळून पाहिलंय. फार चांगल्या त-हेने ओळखायचो. माझ्या शेजारीच तर राहायची ती. तेव्हा तुमचं हे हॉस्टेल आंग्रे भवन म्हणजे एक बंगला होता. माझी आणि माझ्या बहिणीची ती खेळगडी होती."

"यू आर झेबू, राईट? आणि तुमची बहिण मेहरू?" बिलिमोरीयाच्या चेहऱ्यावर प्रचंड आश्चर्य झळकलं. ते फार न ताणता, सरलानं आपल्याजवळची रवीची नोंदवहीची प्रत काढून, झेबूच्या हातात ठेवली. ते काय आहे, हे झेबू उघडून पाहू लागला. आणि चाळता चाळता त्याचे डोळे भरून आले. हे दृश्य तिघी चकित होऊन पाहू लागला. झेबू डायरी चाळता चाळता जणू स्थळ-काळाचं भान विसरून गेला.

सरलाने साराला खुणावलं. सारानं दार जाऊन गच्च बंद केलं. आजूबाजूला कोणी नव्हतं याची खात्री करून. झेबू पानं उलगडत छायाच्या मृत्यूपर्यंत आला. "रवी अंकलची डायरी आहे, हे मला कधी माहिती पडलं नाही. ही तुम्हाला कुठून सापडली?"

"धुरंधर मॅमच्या केबिनमध्ये. ती यूज करते त्या डेस्कच्या ड्रॉवरमध्ये." साराने उत्तर दिलं.

“शक्य नाही. चांदनी तिच्या विरोधात जाऊ शकणारा हा पुरावा, ही सगळी माहिती देणारी डायरी जपून ठेवेल शक्यच नाही.” झेबू खोल श्वास घेत, नजर बारीक करत ठासून बोलला.

“शायद, धुरंधर मॅमला मालूमच नही की अशी डायरी आहे. तभी मै सोचू, त्या दिवशी सारानं डायरी पळवली, तरी त्या घुलानं काही हंगामा का केला नाही? साराकडे परत चौकशी का केली नाही.”

“हो. आपण त्या भोचकभवानीचा गल्ला साफ करायला गेलो, तेव्हा साराला तो खणच उघडता येईना. मुळात तिथं खण आहे हेच कळत नव्हतं. तो एक चोर कप्पा असणार.”

“हो. ही आंबट, त्या झाडूवालीच्या पोरावर जबरदस्ती करायला गेली, उस वक्त त्याच्या धडपडीत, बराबर उस अलमारीची छुपी कळ दबली होगी.”

“ॲन्ड गॉट ओपन. येस!”

“झाडूवालीच्या पोरावर जबरदस्ती? छुपी कळ? काय आहे हा सगळा मामला?” झेबू चक्रावला. सारा जरा लाजली.

“ओहो! जनाब, असं आहे ना, मेरी इस सहेलीको चिकन्या चुपड्या खुबसूरत लौंडोंका शौक है. तो जहाँ मौका मिळेल, ती जरा आजमाईश करून बघते. त्याच्यावर हात चालवून बघते. या फिर होठ चालूवन बघते. पट गया तो पट गया.” सलमानं व्यवस्थित खुलासा पुढे मांडला.

“तसं तर तुम्हीसुद्धा तिच्या विश-लिस्टमध्ये आहात. मन जरा आधीपासून घट्ट करून ठेवा. आणि तिच्यासोबत एकटे कधी सापडू नका.” सरलाच्या या खुलाश्यान झेबू पुरताचा गारद झालाय, हे त्यानं ज्या तऱ्हेने घशाची हालचाल करत आवंढे गिळले, तिघींना समजून चुकलं.

“इन्स्पेक्टर बिलिमोरिया, तुम्ही या आगाऊ आणि नॉटी गर्ल्सकडे फारसं लक्ष देऊ नका. मेन पॉईंट असा आहे की ही डायरी मला गॉडझिला, सॉरी. आय मीन धुरंधर मॅमच्या केबिनमधल्या, तिच्या डेस्कच्या ड्रॉवरमध्ये सापडली. तो ड्रॉवर एक सिक्रेट ड्रॉवर आहे. तो बाय चान्स मी तिथे असताना खुलला होता. मोस्टली धुरंधर मॅडमला असा काही सिक्रेट ड्रॉवर आहे हे माहीत नसावं. तेव्हा त्या डायरीचं एक्झिस्टन्स नॅचरली तिला माहीत नसावं.” साराच्या या साऱ्या खुलाश्यानं झेबू जरा माणसात आला. पण शेवटी तिनं 'गॉट इट ना झेबू डियर!' असा केल्यावर त्याचा परत त्रिफळा उडाला. मग स्वतःला सावरत तो म्हणता झाला, “या नोंदवहीतली खूप सारी पानं गहाळ आहेत. या शेवटच्या पानाच्या मजकुरावरून एक गोष्ट तर मला आज साफ स्पष्ट झाली.”

“कोणती?” तीन आवाज एका वेळी एका सुरात.

“रवी अंकलने वेडाच्या भरात आत्महत्या केली नाही. जसं आम्ही सगळे आजपर्यंत समजत होतो.” झेबूचे डोळे आठवणींमध्ये हरवल्यासारखे स्वप्नाळू झाले. “आंग्रे आजी नेहमी ममाला सांगायची की रवी अंकल सारखे सावली, सावली करतात. त्यांना छायाची सावली दिसते. त्या बिमाबाला काळी हडळ बोलायच्या.

म्हणायच्या ती काळी हडळ भूत बनून माझ्या मुलाला छळतेय. आंग्रे आजोबा डॅडला सांगायचे की रवी अंकल बिमाबासारखे झुंबरावर जावून बसतात. तिथून जिन्यावर आणि जमिनीवर सावल्यांचे खेळ खेळतात. रवी अंकल बिमाबा गेली म्हणून पागल झालेत.”

“जनाब, मामला जादा पेचिदा झाला आहे. राहुल धुरंधरला जर रवी आंग्रे दुश्मन मानत होते, तो ये कैसे? राहुल धुरंधर आज उनके कॉलेजके आणि जमीन-जायदाद के ट्रस्टी कसे झाले?”

“यू कॉल धुरंधर मॅम चांदनी? तीच चांदनी जैन काय?”

“हो. चांदनी जैनचं राहुल धुरंधरशी लग्न झालं. राहुल धुरंधर हा आंग्रे फॅमिली ट्रस्टचा सदस्य होता. बिमाबाच्या मृत्यूनंतर एका महिन्याने रवी अंकलने आत्महत्या केली. आम्ही लहान होतो. आम्हाला सांगितलं गेलं की वेडाच्या भरात. मला तर रवी अंकल कधीच वेडे वाटले नव्हते. त्यानंतर एकुलत्या एक मुलाच्या अकाली मरणानं आंग्रे आजी-आजोबासुद्धा एक-दोन महिन्यात हाय खावून मेले. ट्रस्टची सूत्रं राहुल धुरंधरने आपल्या हातात घेतली. एक एक जुनी माणसं हटवली. बंगला पाडला. तिथं इमारती उभ्या केल्या. माझ्या डॅडनं इतकी जुनी वास्तू असला शाही बंगला पाडू नको. हेरिटेज म्हणून जपला पाहिजे. म्हणून त्याला खूप समजावयाचा प्रयत्न केला होता.” झेबूनं सांगितलं.

“गोड आणि आंबट, काही करून आपण या डायरीची बाकीची गहाळ पान मिळवलीच पाहिजेत. छायाच्या गुन्हेगारांना शोधलंच पाहिजे. आपण जिचं नाव वापरतो, तिच्यासाठी हे केलंच पाहिजे.”

## रवीची नोंदवही : २६ जानेवारी १९९६

-----------------------------------------------

*मी दिवाणखान्याच्या झुंबरावर बसलो होतो. छायाची ही एक घरात असली की, बसायची आवडती जागा होती. खास करून तिनं पकडून आणलेलं अभक्ष्य भक्षण करायचं असलं की. मी इथे बसण्याचं कारण होतं, दिवाणखान्यातला रेकॉर्डींग करणारा कॅमेरा, इथं या झुंबरात बसवलेला होता. इथून मला त्याच्या कोनातून नजरेत येणारा जिना आणि इतर भाग निरखता येत होता.*

*छायानं इथून ओढत नेलेलं सखारामचं शरीर, तिला एकटीला असं खांद्यावर टाकून, विक्रम राजाने वेताळ असलेलं प्रेत नेलं, तसं नेता येणं शक्य नव्हतं. तो कदाचित बाहुला होता. ती चित्रिकरणातली बाई छाया नव्हती. तर मग त्या किरकोळ प्रकृतीच्या बाईनं, सखारामसारख्या दांडग्या पुरूषाचा देह, असा जिने चढून वर नेणं, भौतिकशास्त्राला धरून शक्य नव्हतं. चित्रिकरणात या दालनात त्यावेळी सोयिस्कर अंधार ठेवण्यात आला होता.*

*जर ती बाई छाया नव्हती, तर प्रवेशद्वारापाशी तिनं सखारामला जी मारहाण केली होती, ती सुद्धा इतर सामान्य कुवतीच्या बाईला शक्य नव्हती. याचा दुसरा अर्थ होता, सखारामनं जाणून बुजून मार खाऊन घेतला होता. तसा त्याने खावा म्हणूनच, राहुल धुरंधर तिथं दारात त्याच्यावर पिस्तुल रोखून, धमकवायला उभा असेल का?*

माझ्यात छायासारखी लढण्याची कौशल्ये असती, तर मी कधीच राहुलची गचांडी धरली असती. एखाद्या पोपटाप्रमाणे त्याच्याकडून सगळा कबुलीजवाब धडाधडा बोलवून घेतला असता.

जर ती बाई छाया नव्हती, तर? अनेक गोष्टींमध्ये गडबड झाली होती. त्या बाईला छायासारखं कच्चं मांस, ते पण मानवी प्रेताचं खाता येणं शक्य नव्हतं. ती खात होती ते प्रेत नव्हतं. प्रेतासारखं दिसणारं काहीतरी असणार होतं. लग्नाच्या रूखवतात जसे वेगवेगळ्या आकार आणि आकृतीमध्ये रचलेले खाद्यपदार्थ असतात, तसं काही. एखाद्या कुशल कलाकारानं बनवलेलं, केक आणि टोमॅटो सॉसचं मानवी प्रेत?

जे पुरलेलं सडलेलं प्रेत सापडलं, त्यातदेखील बरीच गडबड होती. त्या प्रेताला डोकं नव्हतं, अधले मधले शरीराचे भाग गायब होते. ते भाग, त्या प्रेताचा मृत्यू नेमका कशानं झाला? ते कळू नये, म्हणून गायब होते का? राहुल धुरंधरने सखारामला गोळी घालून ठार मारलं होतं, हे कळू नये म्हणून का?

खरेतर त्या प्रेताची योग्य त-हेने तपासणी झाली नव्हती. योग्य ती दखल घेतली गेली नव्हती. इन्स्पेक्टर कपूरकडे, छायाच्या सुडाने पेटलेल्या पोलीस अधिकाऱ्याकडे, नेमका या केसचा तपास जावा, ही मला योगायोगाची गोष्ट वाटत नव्हती. छायानं भलेही रक्त आणि मांस खाल्लं असेल. पण हाडं खाल्ली आणि पचवली असणं शक्य नव्हतं. मग गायब झालेल्या शरीराच्या भागांची हाडे सुद्धा कुठे गायब झाली? खड्ड्यात वा आमच्या आवारात सापडली का नाहीत?

जसा जसा मी विचार करत जात होतो आणि मला या सगळ्या गोष्टी लक्षात येत चालल्या होत्या, मी जास्त जास्त गांजावून चाललो होतो. या

सगळ्या गोष्टी मला अगदी सुरुवातीला, का लक्षात आल्या नाहीत? छायावर आरोप करण्याआधी का सुचल्या नाहीत?

मी बसलो होतो तिथून भोलारामने गंगाबाईला घरात घेतलेलं मला दिसलं. गंगाबाईच्या डोक्याला मोठं बँडेज कपाळावरून गुंडाळलेलं होतं. हातावर सुद्धा मलमपट्ट्या लावलेल्या होत्या. तिला साधं चालायला धडपणे जमत नव्हतं. ती आज घरकाम काय करणार होती?

भोलारामने आईला गंगाबाई आल्याची वर्दी दिली. आई आता दालनात आली. गंगाबाईचा एकूण अवतार तिने बघितला. "का गं, हे काय करून घेतलस? एवढा उशीर कशाला केला?" मालकिणीच्या तोऱ्यात आईनं विचारलं.

गंगाबाईने इथं तिथं आजूबाजूला नजर टाकत, कोणी नसल्याची खात्री केली. वर नजर टाकावी असं तिला वाटलं नाही. आपला स्त्री विरहानं पछाडलेला धाकटा मालक, तिथं वर बसलेला असेल, अशी शंका तिला आली नाही. आईच्या कानाला लागत ती जे कुजबुजली, मला स्पष्ट ऐकायला आलं. "आईसाब, तो परत आलाय."

"कोण गं?"

"कारभारी, त्याचंच हे काम." गंगाबाईनं डोक्याकडे बोट दाखवलं.

"सखाराम?" आईच्या या प्रश्नावर गंगाबाईनं नंदीबैलासारखी मान डोलावली. "काय सांगतेस?"

"तर हो. माझा विश्वासच बसेना. महिनाभर कुठे गोव्याला जावून मजा मारून आला. रात्री उशिरा आला. घरात घुसला. दारू मारूनच होता. आल्या आल्या मला तुडवायला सुरूवात केली. महिनाभर मी इथं

*कोणा कोणाबरोबर मजा मारली, म्हणून संशय घ्यायला लागला. आईसाहेब खरं सांगते, तो नाय होता तर सुखात जगत होतो हो, मी आणि माझं लेकरू." गंगाबाई हुंदके देऊन हमसत हमसत रडायला लागली.*

*"गप्प, गप्प हो अगदी." आई कावरी बावरी झाली. "रवीच्या कानापर्यंत जाता नये. त्याला अजिबात कळता नये, सखाराम जिवंत आहे ते. तू अशी परत जा. सखारामला तिथंच कशात गुंतवून ठेव. त्याला आला तसा परत बाहेर कुठे धाडून दिला पाहिजे. मी बघते. यांना विचारून काहीतरी व्यवस्था करते."*

*"पण असं कशाला करायला पाहिजे आईसाब?" गंगाबाईनं भाबडेपणानं विचारलं. "धाकट्या सायबांपासून कशाला दडवायला पायजे. त्यांना कळू दे की छाया वैनीसाबनी सखारामला नाय मारला. किती बरं वाटेल त्यांच्या जीवाला."*

*"तुला सांगतेय तेवढं कर. अजून तुझी वर अक्कल पाजळू नकोस." आईन गंगाबाईला दमात घेतलं. "रवीला कळलं, सखाराम जिवंत आहे, तर तोच रागाने सखारामचा जीव घेईल."*

*"बरंच होईल की," गंगाबाईच्या मनातलं पटकन ओठांवर आलं. मग भानावर येऊन, तिनं आपल्या थोबाडात चूक झाल्यागत मारून घेतलं. "नको, नको, चूक झाली. धाकट्या सायबांना फाशी नको व्हायला. मी जाते. तुम्ही सांगितलं तसं करते." गंगूबाई आल्या पावलांनी मागे गेली.*

*आई तरातरा बाबांना गाठायला, व्हरांड्याकडे गेली. मी झुंबरावरून उतरून पुन्हा जमीन गाठली. आईच्या पाठीवर गेलो. भाबड्या गंगाबाईला न जाणवलेला, आईसाबचा कावा मला आतल्या आत जाणवला. बाबा*

*व्हरांड्यात झोपाळ्यावर झोके घेत होते. आईने त्यांच्यापाशी जाऊन झोपाळ्याची वादी धरून तो थांबवला. बाबांच्या कानाशी लागून कुजबुजली. मी सामोरं न जाता दाराआडून कान देऊन ऐकायचा प्रयत्न केला. यश आलं नाही.*

*बाबा झोपाळ्यावरून उठले. तिथं फुलदाणीच्या बाजूला फोन ठेवलेला होता. ते तो डायल करू लागले. घरातले सगळे फोन इंटरकॉमनं जोडलेले होते. मी हलक्या हाताने दिवाणखान्यातला फोन उचलून, कानाला लावला.*

*“हॅलो, राहुल धुरंधर?”*

*“बोला आंग्रे काका. मी आपल्याला ओळखलं.”*

*“हुषार आहेस. बाकी तब्येतपाणी ठीक ना?”*

*“काका का फोन केलात?”*

*“सखाराम काल रात्री परत आला आहे. गंगाबाईला त्यानं मारहाण केली. ती आता येऊन सांगून गेली.”*

*“नवरा बायकोच्या विषयात मी काय करू?”*

*“सखारामचा विषय तुझी जबाबदारी म्हणाला होतास ना? तो सहा महिने तरी, प्रकरणावरचा सगळा धुरळा खाली बसेपर्यंत परतणार नाही, अशी हमी दिली होतीस. पुरे दोन लाख रूपये त्याला त्या बदल्यात दिले आहेत.”*

*“तो आता महिन्याभरात ते उडवून परत आला. तर त्याला मी काय करू?”*

*“तुझी जबाबदारी आहे तो. त्याला परत पाठवून दे.”*

*“काका याउप्पर माझी कसलीही जबाबदारी नाही. मला छायाला अडकवायचं होतं. ती मेली. आता मला या प्रकरणात कसलाही रस नाही.”*

*“असं कसं? कोर्टात तू साक्ष दिली आहेस. तू यात पुरता गुंतलेला आहेस.”*

*“काका, मी सखाराम संबंधाने साक्ष दिलेली नाही. तुम्ही दिली आहे. तुम्ही त्यात गुंतला आहात. मी नव्हे. सखारामाचं काय करायचं, ते तुमचं तुम्ही बघा. मला जर पुन्हा यात लक्ष घालायला सांगणार असलात, तर माझी तशी त्यासाठी वेगळी किंमत पडेल.”*

*“किती?”*

*“या गोष्टी फोनवर नाही बोलल्या जात. प्रत्यक्ष भेटीत बोलू.”*

*“आता लगेच ये.”*

*“गरज तुम्हाला आहे. मला नाही. मी माझ्या सवडीने येईन. दुपारी जेवणाच्या वेळी. तुमचा भोलाराम बंगाली फिशकरी चांगली बनवतो. ती त्याला बनवायला सांगा.” राहुलनं फोन कट केला. बाबांनी ठेवला. मी देखील ठेवला. बाहेर व्हरांड्यात गेलो. आईबाबांचं काय कसं आता करायचं यावर गुफ्तगू चालू होतं.*

*“बाबा, तुम्ही आता राहुलशी फोनवर जे काही बोललात, ते सगळं मी ऐकलं.” मी सरळ विषयाला तोंड फोडलं. बाबांच्या चेहऱ्यावर अपराधी भाव पसरला.*

*आई मात्र निगरगट्टपणे म्हणती झाली, “दुसऱ्यांच्या गोष्टी अशा चोरून फोनवर ऐकायच्या नसतात.”*

*“स्वतःच्या मुलाशी, कोर्टात साक्षीवर खोटं बोलणाऱ्या बाईनं दुसऱ्याचं खर-खोटं काढू नये.” मी भडकलो.*

*“आपल्या आईशी बोलतोयस तू.” आई तरी तोऱ्यात म्हणाली.*

*“स्वतःच्या सुनेचा बळी घेणाऱ्या, खुनी सासूशी बोलतोय मी.”*

*“तिला मी नाही, तू मारली आहेस.” आईनं माझ्यावर उलटा आरोप केला.*

*“कशासाठी? तुम्हा दोघांच्या खोटेपणाचा जाब विचारायला ती निघाली होती. तुम्ही खऱ्याचे आहात अशी माझी खात्री होती म्हणून. तिच्या न्यायनिवाड्यात तुमचा बळी पडू नये म्हणून. तुमचा मुलगा म्हणून माझा तुमच्यावर विश्वास होता. पण स्वतःच्या मुलाशी आणि सुनेशी कट कारस्थान करणारे कपटी आईबाप आहात तुम्ही. तुमच्या काव्यानं सुनेचा बळी गेलाच आहे आणि आता मुलाचाही जाणार आहे. मी जीव देईन.” मी धमकी दिली. तरी खरी आहे त्यांना जाणवलं.*

*“रवी, अरे ऐकून तरी घे. छायाचं असं काही होईल, आम्हाला वाटलं नव्हतं. बस्! तिला पकडून कुठेतरी पिंजऱ्यात सुरक्षित ठेवतील असं आम्हाला वाटलं होतं. एकदा ती दूर झाली की तुझं डोकं ठिकाणावर येईल आणि तिच्या प्रभावातून तू मोकळा होशील, असं आम्हाला वाटलं. मग एखाद्या चांगल्या घरातल्या सुसंस्कृत मुलीशी तुझं लग्न लागेल आणि इतर सामान्य लोकांप्रमाणे तुझा सरळ साधा सुखाचा संसार होईल. यासाठी आम्ही या गोष्टीला तयार झालो.”*

*“मी छायाबरोबर सुखात नव्हतो, असं तुम्हाला मी कधी सांगितलं?” मी घुश्श्यात ओरडलो.*

*“सांगायला कशाला पाहिजे? सरळ सरळ उघड डोळ्यांसमोर तर सगळं दिसत होतं. घर सांभाळायला, नवरा सांभाळायला जे बाईपण लागतं, ते तिच्यात नव्हतं. नवरा संध्याकाळी थकून-भागून कामावरून घरी आला. तर त्याचं हसतमुखानं स्वागत करून, अगत्य करणं सोडा, ती हडळ कधी जागेवर हजर देखील नसायची. तुलाच तिचा मागोवा काढत रस्त्याभर फिरावं लागायचं. तिच्या कागाळ्या मिटवाव्या लागत. लोकांची समजूत काढत बसावं लागे. नवऱ्याला कधी आपण काही शिजवून, गोडा-धोडाचा सुग्रास तर तिनं खायला घातलाच नाही. पण पुढ्यात असलेल्या आयत्या पंचपक्वान्नावरची ही वासना उडावी, असं ते अमंगळ खाणं पुढ्यात नाचवायची. कपड्याच्या बाबतीत तर ते अजून तसलं आक्रित. नुस्ता नंगानाच. घरात एका पेक्षा एक भारी पैठण्या, जड-जवाहिर सगळं आहे. बायका तरसतात या गोष्टींना. त्या सगळ्याला फाट्यावर मारून हळदीकुंकवाच्या दिवशी घराण्याच्या कुळाचाराला कसा बट्टा लावला, तो पाहिलास ना? ह्या असल्या हडळीला गृहलक्ष्मी म्हणायचं? माझ्यानंतर या सगळ्या घरादाराची तिनं धुळदाण उडवली असती. माझ्या सासून जे पुढच्या वारसांना सोपविण्यासाठी, माझ्या हातात सोपवलं, मी राखलं, ते सारं मी त्या हडळीला सोपवायचं होतं? काय म्हणून? आमचे वारस म्हणून तिच्यासारखी काळी, गिच्ची-मिच्ची नातवंडं मला नको होती. सांगू नकोस मला की या सगळ्या गोष्टींनी तुला सुखच सुख लागत होतं. नऊ महिने पोटात बाळगलाय. लहानाचा एवढा मोठा केलाय, जो आज तोंड वर*

*करून मला उलट विचारतोस? तुला काय खुपतं, काय रूचतं, सगळं मला न सांगता कळतं." आईनं डोळ्यातून अश्रूच्या धारा बरसवल्या.*

*मी स्तब्ध झालो. बाबांना जोर आला. बोलायला लागले, "आपल्या आंग्र्यांच्या वंशाच्या नावलौकिकाचं पुरतं मातेरं झालेलं आहे. आम्ही जिथे जातो लोकांच्या उपहासाचा आणि टवाळीचा विषय होऊन राहतो. काय म्हणते तुमची सून? आणली का नाहीत तिला जोडीला? आमच्याकडे चार पाच घुशी-उंदिर आहेत की खाली ड्रेनेजमध्ये. ताजी जिवंत शिकारीला दिली असती तिला. काय उत्तरं द्यायची आम्ही असल्या प्रश्नांना? आणि काय झेलायच्या होत्या रोजच्या धमक्या, वाटेत आडवे येऊन धमकावणाऱ्या टोळभैरवांच्या? तिनं स्वतःच्या उरावर आणि आमच्याही, केवढे शत्रू करून ठेवले होते. उद्या ना परवा कोणी ना कोणी सूडाने जळणारा तिला संपवणार होता. प्रत्येक दिवशी रोज रोज नशीब साथ देणार नव्हतं. तिच्याबरोबर आम्हीही, तू ही आणि हा आंग्र्यांचा वंश इथंच कायमचा संपणार होता. ती दूर जाती तरच आपण जगणार असतो."*

*"जर तुम्हाला ती इतकी नकोशी वाटत होती, तर तिला सून करून घ्यायला आणि घरात घ्यायला, मुळात तयार का झाला होतात?" मी शांतपणे विचारलं.*

*"तुझ्यासाठी. तुला ती हवी होती म्हणून." बाबा उसासले.*

*"मला ती नको झाली, मी कधीच सांगितलं नव्हतं. मग तिला इथून नाहीशी करायला, इतके उतावळे का झालात? तुमच्या संसार सुखाच्या आणि प्रेमाच्या फुटपट्ट्यांनी, आमचा संसार आणि सुख आकारायची चूक तुम्ही केली आहे. तुम्हाला तुमचा मुलगा हवा आहे. पण कसा? तुमच्या*

*हिशोबाने आणि तुमच्यासाठी केवळ जगणारा आणि तसा चालणारा. छायाला आमच्या या जगाच्या रीती अमान्य होत्या. कारण ती नेहमी म्हणायची, इथं माणसं दुसऱ्या माणसांवर, पशु-पक्षी, झाडं-झुडं, नद्या-डोंगर, माती-आकाश, सगळ्या सगळ्यांवर आपली स्वतःची हुकूमत चालवायला, मनमानी चालवायला बघतात. तिनं आमच्यावर आपले विचार, आपल्या आवडी-निवडी कधी लादायचा प्रयत्न केला नाही. पण तुम्ही तो सतत करत आलात. आई. मुलाचं सुख काय ते आपल्यालाच कळतं. हा तुझा दावा किती फोल आहे. तुला ते कळतं, तर मला छायाबरोबर जाण्यास तू मोकळं केलं असतंस."*

*"म्हणजे तू सुद्धा तिच्यासारखा एक रानटी जनावर होणार होतास?" आई कडवटपणे बोलली.*

*"एका स्त्रिला तिच्या नवऱ्यापासून तोडून, आयुष्यभरासाठी पिंजऱ्यात कोंडायला, तुम्ही उद्युक्त झालात. केवळ तुमच्या सुखाच्या कल्पनांसाठी. त्यासाठी राहुल धुरंधर सारख्या नीचाशी हातमिळवणी करायला तयार झालात. खोटेपणा केलात. या सगळ्या सगळ्या गोष्टी रानटी नाहीत? छायाला रानटी, सैतानी बोलायचा कोणताही अधिकार तुम्हाला नाही. आता मला फक्त एका प्रश्नाचं उत्तर हवंय. छायाचं सोंग घेऊन कोणती स्त्री इथं वावरली?"*

*"मला या प्रश्नाचं उत्तर देणं जरूरी वाटत नाही." सुंभ जळला तरी आईचा पीळ सुटला नाही. "तू तिचं काय करणार?"*

*"मी छायाला का मारलं ठाऊक आहे? ती तुम्हाला मारेल या भीतीने नव्हेच. तिला याउप्पर आमच्या या जगात जगता येणं अशक्य आहे. हे माझ्या लक्षात आलं म्हणून. पिंजऱ्यात कोंडलं जाण्यापेक्षा तिनं मरण*

*पत्करलं असतं. तिचे हाल हाल केले जाण्याआधी, मी तिला साधं मरण दिलं. तिच्या मागे आता मला देखील जगता येणार नाही. माझ्या लक्षात आलं आहे. मरण्यापूर्वी छायावरच्या अन्यायाचा न्याय करावा, गुन्हेगारांना शिक्षा देता यावी, ही माझी शेवटची इच्छा आहे. मुलाच्या मृत्यूने ती तुम्हाला मिळणारच आहे. राहुलच्या जोडीला ती कोण होती?"*

*"चांदनी जैन." सांगून बाबा खचून खाली कोसळले.*

-------------------------------------------------

सारानं रवीच्या नोंदवहीतलं ते पान वाचून संपवलं. सलमा आणि सरला ऐकत होत्या. "झेबू डियर म्हणाला होता, रवी आंग्रेनी २६ जानेवारीला सुईसाइड केली होती. २६ जानेवारीची सुट्टी होती. त्यामुळे ती डेट, त्याच्या परफेक्टली लक्षात राहिली आहे."

'यानी के यही पान, आखरी पान असणार या डायरीचे."

"रवी आंग्रेनी राहुल आणि चाँदनीला शिक्षा करायचं नक्की केलं होतं. म्हणजे नक्कीच ठार करायचं ठरवलं होतं. स्वतःच्या मरण्याआधी. राहुलने त्यांच्या घरी त्या दिवशी यायचं देखील ठरलेलं होतं. मग राहुल आणि चाँदनी जिवंत कसे?"

"अमा यार, या सगळ्या गोष्टी आपल्याला नंतर आरामसे बोलायला मिळतील. पहले या घूलाच्या कमरेसे बाहर पडूया. ते सगळे गळलेले पन्ने एक करा. खाली पिली इथं थांबूया नको."

“व्हाय वरी? गोड तू नेहमी अननेसेसरी काळजी करत असतेस. गॉडझिलाला आपण इथं शिरलो होतो, कळायचा नो चान्स. आपण यावेळी लॉक फोडून नाही, मास्टर की वापरून घुसलोय.” साराने तो चोर कप्पा पुन्हा जागेवर नीट बसवून टाकला. “जस्ट चेक तिखट. बघ हा डॉवर ओपन होत नाही ना?”

सरलानं मेजाच्या चार खुरांपैकी एका नक्षीदार खुराच्या आतील छोटा हत्ती दाबला. तसा चोरखण पुन्हा खटाक्कन उघडला.

“तिखट, मी तुला बाय ऐनी आदर चान्स खुलत नाही, बघायला सांगितलेलं. खोलायला सांगितलं नव्हतं.” सारानं पुन्हा तो चोरकप्पा बंद केला. “ओ.के. गोड. लेट अस गो.” सरलानं तिथं मिळालेली सगळी डायरीची पानं गोळा करून घेतली.

सलमानं दार उघडलं. पण तिथेच थिजली. समोर राहुल धुरंधर त्याच्या रूबाबदार पांढऱ्या दाढीतून हसत, उजव्या हातात भरलेलं पिस्तुल रोखून उभा होता. त्यानं नजरेनंच तिघींना आत सरकायला खुणावलं. तिघी मैत्रिणींचा नाइलाज झाला. त्या मागे सरल्या.

दारातून राहुल धुरंधर आणि त्याच्या मागोमाग चाँदनी जैन उर्फ धुरंधर मॅडम आत शिरले. धुरंधर मॅडमनं आपल्यामागे दार पुन्हा घट्ट बंद करून घेतलं. लॉक केलं. विषारी हसू हसली, “राहुल हे लपवलेले गुप्त कॅमेरे पण किती कामाचे असतात ना? या आधी पण ते आपल्या खूप कामाला आले आहेत. आज पण खूप कामाला येणार आहेत.” तिच्यासोबत अत्तराचा तीव्र फणफणाट खोली दरवळू लागला. “काय गं पोरींनो, पण आज तुम्ही गल्ल्यावर हात नाही तो

मारला? नुस्तेच कागद कसले गोळा करत बसलात? चोर रंगेहाथ पकडून, पोलिसात देण्याची माझी मनषा होती. म्हणून तर त्या चोरीनंतर एवढा खर्च करून, हे कॅमेरे इथं बसवून घेतलेत.”

“त्याची काळजी नको चाँदनी. घरफोडी ही घरफोडीच आहे. पैसे उचलले काय आणि कागद उचलले काय? गुन्हा हा गुन्हाच साबित होणार?” राहुलनं चाँदनीला समजावलं.

“एका गोष्टीचं मला राहून राहून नवल वाटतंय राहुल. ज्या खणाची मलासुद्धा माहिती नव्हती, तो नेमका या टवळ्यांनी कसा शोधून काढला? यांना त्याची काय माहिती?” चाँदनी फिस्कारली.

“ते तर त्या कागदात काय आहे? ते नेमकं बघितलं की कळेल. हे रवीचं डेस्क आहे. या पोरींना त्याच्या जुन्या कागदपत्रांविषयी काही सुगावा लागलेला दिसतोय.” बोलता बोलता राहुल खदाखदा हसत सुटला. “कदाचित त्यानं मरण्यापूर्वी केलेलं मृत्युपत्र. सगळी मालमत्ता या तिघींच्या नावे करून टाकणारं.”

“अरेरे! मग तर आपली मोठी पंचाईत होईल. ही सगळी गिळलेली मालमत्ता, मी काही परत या उपटसुंभ आगाऊ पोरींना द्यायला तयार नाही.” चाँदनीचं सगळं बोलणं नाटकी अंदाजात चालू होतं. “या पोरींना सुद्धा आपल्याला ठार मारावं लागेल रे.”

“जरूर.” राहुलनं पिस्तुलाचा खटका ओढला. आवाज न करता गोळी सणसणली. सरलाच्या कानातली रिंग उडवली गेली. तिथून कानाच्या पाळीतून

रक्त यायला लागलं. सरला, सलमा, सारा तरीही काही आवाज न करता, आधी पहात होत्या तश्श्याच त्या दोघांना खाऊ की गिळू अशा पाहत राहिल्या.

“कागद दे इथं.” राहुलनं कठोरपणे हुकूम सोडला. सरलानं कागदाचं भेंडोळं पुढे केलं. राहुलने नजरेने खुणावताच, चाँदनी पुढे झाली. तिने ते कागद ताब्यात घेतले, आणि चाळून बघायला सुरूवात केली. “काय आहे त्यात?” राहुलला फार वेळ धीर धरवला नाही.

“छाया आंग्रेची कथा. रवीनं लिहिलेली डायरी.” चाँदनीनं रागानं ओठ चावत सांगितलं. “आपल्या कटकारस्थानाचा उलगडा.”

“हुडत! आता इतक्या वर्षांनी हे कागद आणि नुस्ती कथा, आपलं काहीही बिघडवू शकणार नाहीत.” राहुल बेफिकिरीने बोलला.

“कागद नाही, पण फटकेवाल्या काहीतरी कट आपल्याविरूद्ध रचू शकतील. तश्या बऱ्याच उलथापालथी आणि उपद्व्याप हल्ली त्यांनी केले आहेत. तू पेपरात वाचलेच असशील?” चाँदनी नजर बारीक करून तिघी मैत्रिणींना या नव्या पैलूने जोखू लागली. “मला यांचं काहीतरी बरंच आतल्या गाठीचं काम चालू आहे, असा संशय होताच. आता साऱ्याच कड्या एकमेकांत अचूक बरोबर बसायला लागल्यात. छाया आंग्रेचं भूत या हॉस्टेलमध्येच पहिल्यांदा का दिसलं? या तिघींच्या गावाकडे का दिसलं? अचानक यांच्याकडे पैसे कसे दिसायला लागले? रात्री बेरात्री या बाहेर कशाला भटकायला लागल्या? याच फटकेवाली बनून लोकांना सतावतायत.”

“छायाचं भूत खरं नाही, हे मी पहिली बातमी आली, तेव्हापासून जाणून आहे. का? विचारा ना?” राहुलने तिघींना चिडवत विचारलं, “आता या डायरीतून तर तुम्हाला पत्ता लागलाच असेल. वाचलीयत ना ही डायरी?”

राहुलच्या या प्रश्नाला देखील तिघींनी उत्तर दिलं नाही. “असं बघा, छाया आंग्रेच भूत जर खरोखर जागं झालं, तर ते कोणाला पहिली शिक्षा देणार? कोणावर आधी सूड उगवणार?” राहुलनं डोळे मिचकावले, “सांगा ना? सांगा सांगा.” त्याने झटक्यात पिस्तुलाचा चाप पुन्हा खेचला. सलमा काही हालचाल करू पाहत होती. वळवळली म्हणून त्यानं तिच्या दंडात सरळ गोळी घातली. ती अस्पष्टसं कण्हली. तशीच ताठ नजरेने त्याच्याकडे बघत राहिली. “पोरी भारी हिंमतीच्या आहेत, हां चाँदनी. छायाच्या भुताने सगळयात आधी आमच्यामागे लागायचं? तर ते सोडून मनु शर्मा, त्याचा बाप आणि कोणा कोणा भलत्यामागेच लागलं होतं. किती हा मूर्खपणा? त्या भुताचा?”

“राहुलकाका, आम्हाला ही पानं तेव्हा हाती लागली नव्हती.”

“राहुलचाचा, कसमसे, अगर यह बात शुरूसे पता असती, तर पहला कत्ल तुम्हाराही होता. इत्मिनान रखो.”

“राहुल अंकल, फुल टू बिमाबाच्या स्टाईलमध्ये आसूडाने फोडून आम्ही तुमची स्किन बॉडीवरून हटवली असती. त्यावर साल्ट टाकलं असतं आणि तुम्हाला खिळयांच्या गादीवर झोपवून, तुमच्यावर डान्स केला असता.”

राहुलचे डोळे आनंदाने चमकायला लागले. “चाँदनी बघ, बघ. काय धाडसी पोरी आहेत या? जश्या काय, चवताळलेल्या वाघीणी? इतक्या वर्षांनी छायासारख्या कोणी, मला आज पुन्हा दिसल्या. ती धगधगती आग कोणाच्या डोळयात पुन्हा दिसतेय. तोच फणकारा? हाय, तेच सेक्स अपील?”

“होय.” शब्दात आणि चेहऱ्यावर ओतप्रोत तिरस्कार भरत, चाँदनी बोलली. “इतक्या वर्षांनी त्याच पिस्तुलाने, पुन्हा एकदा या डूख धरणाऱ्या नागिणींची डोकी फोडली जातील. ज्या पिस्तुलाने छायाचा बळी घेतला आणि रवीचा, त्याच पिस्तुलाने पुन्हा एकदा आपल्या शत्रूचा बळी घेतला जाणार. इतिहासाची पुन्हा पुन्हा तशीच उजळणी होते. यालाच म्हणतात काव्यगत न्याय. उडव बार, फोड या नागिणींची मस्तवाल नजर आणि डोळे.”

“ऐ छिनाल, तुझ्याच बेलगाम जुबानला चिरून, तिच्यात मसाला भरू.” सलमाने दोघी मैत्रिणींशी नजरानजर करून अस्पष्टपणे काही व्यक्त केलं.

“ऐ बारा जणांखाली झोपणारी ब्लडी बीच, तुझ्या बीटवीन द टू लेग कुत्र्याची टांग घालू.” सारा जे काही बोलली, त्यावरून आपल्याला सांगायचं होतं, ते तिला बरोबर कळलंय. सलमाची खात्री झाली.

“त्या भाटीया सारख्या कोवळया तरूणाचा रस लुचणारी, तू जरठ डाकीण? तुझं नरडं चावून रक्त पिऊ.” सरलानं जिभल्या चाटल्या.

डोळयांच्या कोपऱ्यातून एक नजर राहुल धुरंधरवर टाकली. त्याच्या डोळयात विकृत आनंदाची नशा दिसायला लागली होती. तो दात कराकरा चावू लागला. मात्र पूर्णपूणे पिसाळून गेली होती ती चाँदनी.

“राहल आधी गोळ्या घाल या रांडांना. अरे बघतोस काय नुस्ता?” चाँदनी राहुलवर खवळली. “मूर्खा, आता काय त्या रवीशी द्वंद्व खेळायला गेलास, तसा या तीन कुत्रींशी झटापट खेळायचीय की काय तुला? तेव्हा तुझा कारभार आटपणार असता. मीच रवीला गोळी घातली म्हणून वाचलायस. आण ते पिस्तुल इथं. माझ्याकडे दे.” चाँदनी राहुलवर झपटली आणि पिस्तुल खेचू लागली.

दोघांच्या लक्ष विचलित होण्याचा फायदा घेत, तिघी मैत्रिणी तीन दिशांना पांगल्या. राहुलचं चापावरचं बोट ओढलं गेलं. चाँदनीच्या पोटात गोळी शिरली. एक आश्चर्य आणि भयाची नजर सगळयांवर फिरवत पोट आवळत ती खाली कोसळली. राहुलला पुन्हा चाप ओढायची संधी मिळाली नाही. तीन दिशांनी, अंगावर झालेले तीन प्रहार त्याला चुकवता आले नाहीत. कोणत्याही दया-मायेशिवाय खेद वा शंकेशिवाय तिघींनी त्याला ठार मारलं. क्वॉन ताई वॉनचा तो सामना आणि चॅम्पियनशिप राहुलविरूद्ध तिघी जिंकल्या.

----------------------------------------

पोलीस इन्स्पेक्टर बिलिमोरीयानं आपल्या वरिष्ठ साहेबाला कडकडीत सलाम ठोकला, “सर, छाया आंग्रेच्या भुतानं उर्फ फटकेवालीनं, काल पुन्हा बळी घेतल्याची खबर मिळाली आहे. माथरपाखाडीत. आंग्रेभवनच्या आवारात.

हॉस्टेलचे आणि कॉलेजचे मुख्य विश्वस्त श्री.राहुल धुरंधर आणि त्याची पत्नी चाँदनी धुरंधर यांचे.”

“डॅम इट.” पोलीस अधीक्षक कपूर कडाडले. “भूत असं कुछ नसतं. तुमच्यासारख्या जबाबदार पोलिस अधिकाऱ्याला इतकी तो अक्कल असायला हवी. सगळीकडे मिडियातून पोलीस खात्याची नाचक्की चालू आहे तुमच्यासारख्यांमुळे. आय वॉन्ट रिझल्टस्. कोणत्याही एक्सक्यूज मला ऐकून घ्यायच्या नाही आहेत. ही फटकेवाली बनके कोण नाचतंय? त्याचा छडा लावा.”

“सर, एक रिक्वेस्ट आहे. मला या केसमधून मोकळं करा.”

“का?”

“सर, जिथं दोन्ही डेडबॉडी सापडल्या, तिथं त्या केबिनमध्ये एक जुनं डेस्क होतं. आंग्रेभवनचे जुने मालक आणि छाया आंग्रेचे पती रवी आंग्रे यांचं. त्या डेस्कमध्ये रवी आंग्रेची जुनी डायरी सापडली. त्यांनी छाया आंग्रेला गोळी घालून ठार केलेलं. त्या खटल्याचा तपास तुम्ही केलेलात असं नमूद आहे. आणि तुमच्या संबंधाने बरंच काही आहे.”

“बरं मग?”

“त्या डायरीची ओरिजिनल आधीच मिडीयाकडे पोहचलेली आहे सर. आम्हाला बस कॉपी मिळाली.”

“काय सांगायचंय ते सांगून मोकळा हो.”

“मिडीयाने सखाराम घंघाळेला शोधून काढलं आहे. तुम्ही त्याच्या डेडबॉडीसंबधी साक्ष दिली होतीत सर, त्या खटल्यात.”

“व्हॉट यू वॉन्ट टू से?”

“मला काहीच म्हणायचं नाही सर. मिडीया खूप काही म्हणते आहे. फटकेवालीच्या टार्गेट लिस्टमध्ये पुढचं नाव तुमचं असेल म्हणून.”

“यू आर डिसमिस्ड.”

“येस सर.” इन्स्पेक्टर बिलिमोरिया पडत्या फळाची आज्ञा घेत पळाला.

---------------------------------------------------

माय व्हरांड्यात शून्यात नजर लावून बसली होती. अचानक एक तरूण माणूस तिच्या पुढ्यात उगवला. दोनदा खाकरला. तेव्हा तिच्या लक्षात आलं. विकी रिपोर्टरला पाहून ती चपापली. भ्याली. “काय माँगता रे तुका?”

“बस्! आपले आशीर्वाद मदर.” लाचार तोंडदेखलं हसत विकी बोलला. बोलताना त्याचे पुढचे दोन्ही दात पाडलेले दिसत होते. एक कापडी बॅग त्याने मायच्या पुढ्यात ठेवली. “स्टारखानने तुमच्या अपघातात झालेल्या दुखापतीसाठी माफी मागितली आहे. हे पाच लाख रूपये नुकसान भरपाईपोटी देवू केले आहेत.”

“माका नाका.” माय जास्तच भ्याली. हा याचा काही नवा डावा दिसतो, “तुका ठेय.”

विकीला जोरदार ठसका आला. डोळ्यात पाणी आलं, “असं म्हणू नका मदर. नाही म्हणू नका. हे घ्या. माझ्यावर उपकार करा.” कावराबावरा होत तो आजूबाजूला नजर फिरवू लागला. “तिला कळलं ना तर मला पुन्हा ?”

“कोणाक?” माय गोंधळली.

“फटकेवाली.” विकीने असं म्हटल्यावर, हळूहळू मायच्या चेहऱ्यावर हसू झळकत गेलं.

--------------------------------------------

अब्बूच्या ट्रकच्या पुढे एक आलिशान लाल कार चालली होती. “आब्बाजान एक हॉर्न तो मारो.” बाजूला क्लिनर म्हणून बसलेल्या सलीमने सांगितलं. “कितना स्लो चाललाय?”

“न मालूम, कोणाची होगी?” अब्बाजान चिंतेत दिसले. तसं न राहवून सलीमनं स्वतःच हॉर्नवर हात दाबला. जोरदार हॉर्न वाजला. “अल्ला! क्या करता तू?” अब्बा डाफरले.

समोरच्या गाडीतून ड्रायव्हरनं हात बाहेर काढून, 'पुढे जा' इशारा केला. सलीमच्या चेहऱ्यावर आनंद झळकला. त्यावर एक नाराज कटाक्ष टाकत, अब्बांनी ट्रक त्या कारच्या पुढे काढला. कार ओलांडून पुढे जाताना, त्यांनी त्या कारवर एक नजर टाकली. तिची मागच्या सीटजवळची खिडकी उघडी होती. त्यातून त्या

कारमालकाने ट्रकवाल्याला दोन्ही हात जोडून अभिवादन केले. ते बघून सलीम उडालाच. “अब्बा, ये तो वोच आमदार?”

---------------------------------------------

भेळेच्या दुकानापाशी सरलाचा दादा गिऱ्हाईकांना पाणीपुरी खिलवण्यात मग्न होता. एका आडदांड तरूणाची सावली त्याच्यावर पडली. हबकून दादानं पाहिलं. तो गुत्त्यातल्या बाऊन्सर तरूणांपैकी एक होता. “सहा भेळ सुकी बांधून दे. तिखा जादा घाल.”

दादानं नजर उचलून रस्त्यावर पाहिलं. एक कार आणि तिच्यात चार टोणगे बसलेले होते. भेळगाडीच्या दिशेने अपेक्षेने बघत होते. दादानं गुमान मान खाली घालून, भेळ बनवून सहा पुड्या बांधून, त्या तरूणाकडं दिल्या. तो त्या घेऊन तसाच निघाला.

“ओ, सहा भेळेचं साठ रूपये झालं?” मदतीला असलेली दादाची बायको ओरडली. तसं घाबरून दादा तिला नजरेनं दाबायला लागला. दादाच्या इशाऱ्याकडे लक्ष न देता, ती पुन्हा ओरडली, “फटकेवालीचं नाव ठावूक हायशी ना?”

चरफडत तो मस्तवाल तरूण परत फिरला. एक शंभर रूपयाची नोट काढून त्यानं दादावर फेकली. “ठेव उरलेलं तिच्या नावानं लिंबू उतरायला.” बडबडून तरातरा परत गेला.

दादाची बायको बडबडली, “सहन करणारा सहतो, म्हणून अन्याय करणारा करू शकतो.”

---------------------------------------------

सारा, सलमा, सरला चौपाटीवर पावभाजी खात उभ्या होत्या. “लो, कुसुम आली.” सलमाने इशारा केलेल्या दिशेनं सारा आणि सरलानं पाहिलं. सुमनची बहिण कुसुम दोन बॅगाचं ओझं घेऊन आली. ते तिनं सारा आणि सलमाच्या हातात ठेवलं. “खालीपिली तुला आम्ही नेहमी ही परेशानी देतो. क्या करे? आमच्याजवळ ठेवायचा वांधा आहे.”

“टू आहेत की थ्री? तिघींचे ड्रेस?” सारानं कुसुमला विचारलं.

“तिघींचे आहेत.” तिला उत्तर देऊन कुसुम सलमाकडं वळली. “दिदी असं बोलू नका. तुमच्यामुळे सुमननंतर माझा नंबर लागता लागता वाचला. आणि कितीतरी दुसऱ्या मुलींचा. मी काही करू शकतेय तुमच्यासाठी, याची खुशी किती मोठी आहे. मी शब्दात नाही सांगू शकत.” मग सरलाकडे वळली, “ताई आज नंबर कोणाचा?”

“वाचशील की उद्या पेपरात.” सरला उत्तरली आणि चौघी हसल्या.

-------------------------------------------

“अगं ऐ मुग्धा? दिसत नाय काय?” कडू पाटील पाठमोऱ्या मुग्धा गोडबोलेवर ओरडली. तशी मुग्धा सामोरी झाली.

“काय काम होतं?” मुग्धाने नम्रतेने विचारलं. कडूची नजर मुग्धाच्या गळयातल्या फटकेवालीच्या पदकावर खिळली.

“काय नाय गं, बरी हाय ना इचारायचं होतं.” कडू नरमाईने म्हणाली.

“हो. फटकेवालीची कृपा.” मुग्धाने पदक डोळयांना लावलं.

-----------------------------------------

# समाप्त

# कसं वाटलं पुस्तक मित्रांनो?

फ़ुकट असलं तरी दर्जेदार आहे ना?

काही लोकांचा असा समज आहे की जे फ़ुकट मिळतं ते कमी दर्जाचं असेल. पण तसं नसतं. आपल्याला आपले आईवडील मिळतात ना की ते आपण विकत घेतो? आणि त्यांचे संस्कार? आणि आपला देश आपलं राष्ट्रीयत्व? अगदी आपल्या आजूबाजूच्या हवेतला ऑक्सिजनही फ़ुकटच मिळतो ना. आणि हा मौल्यवान मनुष्यजन्मही फ़ुकटच मिळाला की आपल्याला!

तेव्हा मित्रांनो जे जे फ़ुकट ते ते फ़ालतू असा समज असलेल्या लोकांना एकदा ई साहित्यच्या साइटवर आणा. ई साहित्यची पुस्तकं वाचायला द्या. तुम्ही जे पेराल तेच उगवेल. जर तुम्ही समाजात चांगली मूल्यं पेराल तर तुम्हालाही या समाजात चांगली वागणूक मिळेल. समाज म्हणजे आपणच की. निदान आपल्या आजूबाजूचा समाज तरी मूल्यप्रधान करुया.

चला तर मित्रांनो, एक भव्य चळवळ उभारुया. यात प्रत्येकाने आपला सहभाग घेतला तर हा बाराकोटींचा महाराष्ट्र जगातला सर्वोत्कृष्ट अभिरुचीपूर्ण वाचकांचा प्रदेश बनायला वेळ लागणार नाही.

टीम ई साहित्य

esahity@gmail.com

www.esahity.com

## एक प्रसन्न अनुभव